म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. १८५३

REFBK-0016622

४९३५९
निबंध
२५।।६८
१८५

म. ग्रं. संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६६२२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# ललित लेख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... दि:
नोंद दि:

REFBK-0016622

डॉ. राममनोहर लोहिया



दा. क्र. १६६२२

# डॉ. राममनोहर लोहिया

२३ मार्च १९१० रोजीं उत्तर प्रदेशातील अकबरपूर येथे जन्म

वयाच्या सोळाव्या वर्षीच गौहत्ती कॉंग्रेसचे अधिवेशनात भाग

शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबई व कलकत्ता या ठिकाणीं

उच्च शिक्षणासाठी जर्मनीस प्रयाण

राजकीय तत्त्वज्ञान विषय घेऊन बर्लिन विद्यापीठाची डॉक्टरेट—१९३२

युरोपांतील वास्तव्यात हिटलरचा उदयकाल जवळून पाहिल्यामुळे

हिंसात्मक मार्गाविषयी अप्रीति

युरोपांतील नामवंत समाजवाद्यांशी प्रत्यक्ष परिचय

भारतांत परतल्यावर कॉंग्रेस प्रवेश–कॉंग्रेसच्या परराष्ट्र विभागाचे चिटणीस-१९३६

कॉंग्रेसमधील समाजवादी विचारसरणीच्या गटाचे नेतृत्व

'कॉंग्रेस सोशलिस्ट' पत्राचे संपादक

१९४२-भारत छोडो भूमिगत चळवळीचे नेतृत्व–अटक–लाहोर किल्ल्यात छळ

हिंदु-मुस्लीम दंग्यात कार्य—फाळणीस विरोध

गांधीजी आणि नेहरू यांच्याशीं सतत मतभेद होऊनहि गांधीजींविषयी अपार आदर

सरकारविरोधी चळवळीमुळे ब्रिटिश, नेपाळी, पोर्तुगीज, अमेरिकन व

कॉंग्रेस सरकारनें एकूण २२ वेळां अटकेत ठेवले

त्यांच्याइतका तुरुंगवास कुणाही राजकीय पुढाऱ्यानीं भोगला नसावा.

लोकसभेत निवड १९६३

उत्तम संभाषणपटु–शाकाहारी, चहाचे आणि धुम्रपानाचे भोक्ते

अलिकडे मात्र या दोन्हींहि गोष्टी वर्ज्य

जर्मन, फ्रेंच आणि इंग्रजी भाषांवर प्रभुत्व

सात आठ भारतीय भाषाहि अवगत

विश्वलोकसभा व विश्वसरकारचे पुरस्कर्ते

जन ( हिंदी ) व मनकाइण्ड ( इंग्रजी ) मासिकांचे संस्थापक, संपादक

विविध प्रकारचे राजकीय लिखाण विपुल

मृत्यु १२ ऑक्टोबर १९६७

प्रेस्टीज
प्रकाशन

# ललित लेणी

लेखक
डॉ. राममनोहर लोहिया

©
*लोहिया साहित्य प्रकाशन*
पुणे ४

*आवृत्ति पहिली*
मार्च १९६८
किमत सहा रुपये

*मुद्रक*
सर्जेराव घोरपडे
प्रिंटेक्स्ट प्रेस
४६१/१ सदाशिव पेठ
टिळक रोड
पुणे २

*प्रकाशक*
सर्जेराव घोरपडे
प्रेस्टीज प्रकाशन
४६१/१ सदाशिव पेठ
टिळक रोड
पुणे २

# अनुक्रम

लोहिया – एक रसिक तापस्

शिल्प

आंतरिक एकता

राम कृष्ण शिव

रंग आणि सौंदर्य

कृष्ण

पावित्र्य आणि स्त्री–पुरुषसंबंध

दिल्ली

अथ योगानुशासनम्

दि: ..................
नों. दि: ..................

# लोहिया : एक रसिक तापस्

*पु. ल. देशपांडे*

ह्या जगात सत्याची कास धरून समर्थपणे जगायचे असेल तर एकट्याने जगण्याची तयारी हवी. डॉ. लोहिया हे असे एकटे निघालेले संन्यासी. जीवनातले 'सत्' शोधायला निघालेले. साथी होऊन आलात बरोबर तरी 'वाहवा,' नाही आलात तरी वाहवा! ह्या वृत्तीने चालणारे. भलत्या वेळी खरे बोलायची खोड असलेला हा माणूस. 'न ब्रूयात् सत्यमप्रियम्' चा संभावित गुळमुळीतपणा न जाणणारा, रसिक आणि रांगडा. आनंदसंचयी आणि विरागी. जीवनातल्या सौंदर्याला जाऊन झोंबणारा आणि तितकाच अलिप्त. अत्यंत आकर्षक अन्तरंगाचा आणि तितकाच भीतिदायक बहिरंगाचा. प्रेमाने भेटायला आला तरी वार करायला आल्यासारखा येणार. हे ओबड धोबड भांडे वास्तविक डॉक्टर केतकर, विसूभाऊ राजवाडे, ज्योतिबा फुले यांच्यासारखे मराठी मातीतच घडायला योग्य होते. गडकऱ्यांच्या 'राकट देशा कणखर देशा दगडांच्या देशा। कोमल देशा नाजुक देशा फुलांच्याहि देशा' हे वर्णन महाराष्ट्राइतकेच डॉक्टर लोहियांच्या व्यक्तिमत्त्वाला लागू पडले असते.

लोहियांच्या रांगडेपणाला खूप प्रसिद्धी मिळाली. ' मोले घातले रडाया ' ( किंवा ' खरडाया ' ) सांप्रदायातल्या पत्रकारांनी स्तंभा-स्तंभातून–खरे म्हणजे स्तंभाआडून–त्यांची प्रतिमा विकृत करण्याची भरपूर संधी साधून घेतली. लोहियांनी देखील ' गच्छ सूकर भद्रं ते ' अशा थाटात त्यांना आपल्यावर राड उडविण्याची भरपूर संधीही दिली. बेगड आणि सोने ह्यातला फरक समजावून घ्यायला पत्र-कारांनाच कशाला सर्वसामान्य वाचकाला तरी कुठे सवड आहे ! कोटयवधी रुपयांच्या अफरातफरी करणाऱ्या शेठियांना पाठीशी घालणारांची संसदीय सभ्यता आम्हाला मंजूर असते. आणि समा-जाच्या तोंडात माती कालवणाऱ्या त्या धनमत्तांचे सत्याची चाड बाळगणाऱ्यांनी केलेले साधे शाब्दिक मुखभंग देखील असभ्य ठरतात.

नव्या पिढीपुढे उभे केले जात होते ते पार्लमेंटात सरकारला विरोध करणारे लोहिया. बेचाळीसच्या चळवळीत तुरुंगांत हालअपेष्टा सहन केलेले लोहिया विसरले गेले होते. अमेरिकेतून आयात होणाऱ्या आधुनिक सभ्यतेवर श्रद्धा ठेवून वागणारांना लोहिया ' क्रूड ' वाटायचे.' अंग्रेजी हटाव ' म्हणणाऱ्या माणसाला सुसंस्कृत म्हणायचे ? ममी-डॅडी संस्कृतीतल्या लोकांना ते जंगली वाटायचे. भोजनोत्तर तांबूलसेवन करावे तसे सांस्कृतिक कार्यक्रमांचे सेवन करणाऱ्या सांस्कृतिक स्वातंत्र्यवाल्यांना लोहिया अरसिक वाटायचे. लेनिन–मार्क्सवादी पोथीनिष्ठांना ते व्यक्तिवादी वाटायचे. नवश्रीमंत आंग्ल भारतीयांना तर त्यांचा सगळयात राग. रीडर्स डायजेस्टमधले विनोद, लाइफमधली चित्रे आणि टाईम्समधले मथळे ह्या पलीकडे असल्या ' कल्चर्ड ' लोकांचे वाचन जात नाही. क्लबांत व्हिस्की-बरोबर तोंडी लावायला एवढा व्यासंग उपयोगी पडतो. मिसेसना लेटेस्ट फॅशनविषयक माहिती पुरवायला भारतातली आणि इंग्लंड अमेरिकेतून येणारी इंग्रजी मासिके असतात. पिंकी आणि डिंकीला

*दोन : ललित लेणी*

हॉरर् कॉमिक्स आणि मर्डर स्टोरीजचा चारा टाकला की ती आघाडी चूप बसते. असल्या तलम लोकांना 'अंग्रेजी हटाव' म्हणणारा लोहिया–क्रॅक, बॅकवर्ड, जंगली, क्रूड वाटणे अगदी सहाजिक आहे. स्वातंत्र्य आले. पण अजूनही भारताचे भारतीय भारत आणि आंग्ल भारत असे एक अदृश्य विभाजन आहे. भारतीय भारतात भाषावार प्रांतरचनेमुळे नव्या तेढी निर्माण झाल्या आहेत.

आंग्लभारतीयांची तशी एकजूट आहे. देशी लोकांच्या हाती सत्ता न जावी म्हणून त्यांना इंग्रजी भाषा हवी आहे.

राष्ट्रीयत्वाची, स्वत्वाची किंमत देऊन त्यांनी आपल्या मुलामुलींना पाश्चात्य रंगाने अंतर्बाह्य रंगवले आहे. इंग्रजी येणारा तो आपला. न येणारा तो फक्त 'कूली' होण्याचा किंवा फार तर 'बैरा' होण्याच्या लायकीचा माणूस आहे ही त्या पोरांना न कळत दिलेली शिकवण आहे. उद्या देशी भाषांतून राज्यकारभार सुरू झाला तर मुख्यत: ख्रिस्ती मठांतून शिकलेल्या 'हर हर न हिंदुर्नयवन:' झालेल्या आणि रामकृष्णापेक्षा जेम्स बॉण्डची जवळिक असणाऱ्या आंग्ल भारतीयांचे कसे व्हायचे ? महिना तीन तीनशे रुपये जिथे द्यावे लागतात अशा महाग शाळांतून हे नवे राज्यकर्ते घडवायला घातले आहेत. सारे ज्ञानभांडार इंग्रजीतून आहे. त्यामुळे इंग्रजी नाही म्हणजे ज्ञान नाही, असा त्यांचा युक्तिवाद आहे. नाहीतरी इंग्रजाने इंग्रजी रोवलेच आहे. कशाला झाडे उपटता ? इंग्रजांनी ख्रिस्ती धर्मोपदेश-कही आणले होते. खरे तर आपण सर्वांनी ख्रिस्तीच का होऊ नये ? त्याहीपेक्षा रशिया किंवा अमेरिका किंवा आता चीन ह्याचाच एक भाग म्हणून का जगू नये ? ही भारतीयत्वाची राष्ट्रीय आणि सांस्कृतिक कटकट हवीच आहे कशाला ?

दुर्दैव हेच आहे की ह्या इंग्रजीवाद्यांपैकी बहुतेकांचे इंग्रजीप्रेम नोकरी मिळवायची व्यापक सोय ह्या कारणासाठी आहे. आणि हिंदुधर्मातून अन्यधर्मात गेलेल्यांची धर्मान्तरेही पारमार्थिकापेक्षा

ऐहिक अभ्युदयासाठीच अधिक झाली आहेत. काही चाकरीपायी, काही तर पुनर्लग्न किंवा विवाहविच्छेदनाची सोय म्हणूनही ! ह्या इंग्रजीवाल्यांना ज्ञानाची मुळीच खाय खाय सुटलेली नाहीं. त्यांना ठाऊकही नाही की डॉक्टर लोहिया इंग्रजीचे पंडित होते. इंग्रजी लेखनातली किंवा बोलण्यातली व्याकरणविषयक लहानशी चूक सुद्धा पटकन् त्यांच्या ध्यानात येई. युरोपिय संस्कृतीचा आणि इतिहासाचा त्यांचा दांडगा व्यासंग होता. ते जर्मन भाषा उत्तम जाणत. अनेक भारतीय भाषा त्यांना अवगत होत्या. उत्तरभारतीयांनी एकतरी दक्षिणी भाषा शिकावी असा त्यांचा आग्रह होता. त्यांचा विरोध इंग्रजी भाषेला नव्हता.

ती भाषा या देशातील राज्यकारभाराची भाषा करूं नये असे त्यांचे मत होते. देशातल्या अठ्याण्णव टक्के लोकांना ज्या भाषेचा गंध नाही त्या भाषेत राज्यकारभार चालवायचा म्हणजे दोन टक्के लोकांनी उरलेल्या अठ्याण्णव टक्के लोकांवर राज्य चालवायचे. म्हणजे हे नवे मोगल. असल्या मोगलाविरुद्ध लोहिया चिडून उठत. ती चीड अनेक प्रकारांनी व्यक्त होई. इंग्रजीची सक्ती आम्हाला अन्यायाची वाटत नाही. त्या अन्यायाविरुद्ध ओरडणे चूक वाटते. वादी-प्रतिवादी किंवा आरोपी ह्यांना अजिबात न कळणाऱ्या इंग्रजी भाषेत कज्जे लढवून, न्यायदान ही इंग्रजी जाणणारे वकील आणि न्यायाधीश ह्यांच्यातली खाजगी बाब असल्याच्या ढंगात, ज्या माणसाच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे त्याला ते कामकाज कळू न देता चालवणे हे आम्हाला अमानुष वाटत नाही. पण असल्या अमानुष वृत्तीला विरोध करणारे लोहिया आम्हाला शिष्टाचारविहीन वाटायचे. परकी भाषेच्या दडपणामुळे मुक्या झालेल्या, भीतिग्रस्त, दारिद्र्याने पिडलेल्या, माणुसकीच्या प्राथमिक हक्कांना पारख्या झालेल्या सामन्यांचा हा प्रतिनिधी होता. चिडले की अद्वातद्वा बोलत. ते बोलणारा लोहिया नव्हता— त्या गांजलेल्या, उपेक्षित, भुकेल्या सामान्य भारतीयाचा संचार

त्यांच्या अंगात होत असावा. भुताने झपाटावे तसे भुकेपोटी व्याकुळ झालेल्या सामान्य माणसाच्या कळवळ्याने त्यांना झपाटलेले असायचे. तो आरडा ओरडा लोहिया करीत नसे—लोहिया नावाच्या झाडाला झपाटणारे ह्या देशातले ते करोडो अर्धनग्न, अर्धपोटी अर्धमानवाचे जिणे जगणारे जिवंत संमंध असत.

त्या भुकेकंगाल त्रस्त संमंधांसाठी स्वतःच्या देहाचा पिंपळ करणारा हा माणूस आपल्यातून गेला. दिल्लीतल्या सार्वजनिक इस्पितळात त्यांचे निधन झाले. सामान्य माणसाची आत्यंतिक ओढ असणारा हा असामान्य माणूस भारतातल्या सामान्याच्या नशिबी सार्वजनिक इस्पितळांत जो भोगवटा असतो तो भोगत मेला. जीवनात कसलाच इतमाम त्यांनी मागितला नाही. मरताना मागता येत नसतो—पण मिळालाही नाही. जी काही आसवे ढाळली गेली ती खरी होती. एरवी फकिरासारखा जगला आणि फकिरासारखा मेला.

अन्यायाविरुद्ध चिडून उठणारे हे व्यक्तिमत्व प्रखर तर खरेच पण हा विष्णुदास मेणाहून मऊ सुद्धा होत असे. पार्लमेंटातले लोहिया पहाणारांना त्या मनाची ओळख नव्हती. सर्वांनाच त्यांच्या संगतीचा, त्यांच्या अंतरंगात डोकावण्याच्या योग कसा येणार ? माझ्या कुंडलीत असे योग आले. मी त्या आठवणी पुस्तकातल्या मोरपिसासारख्या जपून ठेवल्या आहेत. बेचाळीस सालचे तर ते माझ्या पिढीचे हीरो. अच्युराव पटवर्धन, लोहिया, जयप्रकाश, एस्. एम्., मेहेरअली, अरुणा असफअली हे आमचे देव आनंद आणि मीनाकुमारी. पण त्यावेळी दूर व्यासपीठावर त्यांना पाह्यचे. त्यांचे पराक्रम वाचायचे, आठवायचे, एकमेकांना सांगायचे, प्रत्यक्ष भेटीचा योग फार उशीरा आला.

माझ्या एका स्नेह्याच्या घरी त्यांच्या सहवासात खरोखरीच 'अविदितगतयामा रात्रिरेवं व्यरंसीत्' असे झाले. मुंबईच्या भाषेत सांगायचे म्हणजे भय्याने 'बाई दोऽऽध' म्हटले तेव्हा कळले की

संपली रात्र. लोहियांची आणि माझी ती पहिली भेट. जॉर्ज फर्नांडिस वगैरे इतर संसोपामधली स्नेही मंडळी होती. तशी ही सारी मंडळी ज्वालाग्राही म्हणूनच अधिक प्रसिद्ध. त्यातून राजकीय पक्ष हा माझ्या नावडीचा विषय. कुठल्याही तत्वज्ञानाला पक्षाच्या चौकटीत कोंबले की त्या तत्त्वज्ञानाचे पालन करणारा पक्ष न राहता त्या पक्षाचे तत्त्वज्ञान तयार होते. आणि प्रत्येक गोष्ट त्या पक्षीय तत्त्वज्ञानाच्या निकषावर घासली जाते. साधा हिंदु आणि हिंदूमहासभा पक्षातला हिंदू ह्यांच्यात फरक पडतो. समाजवादी, प्रजासमाजवादी, लोकशाही समाजवादी किंवा संयुक्त समाजवादी अशा निराळ्या नाममुद्रा आणि दीक्षा तयार होतात. लोहियांनी समाजवाद ह्या विषयावर माझी तोंडी परीक्षा सुरू केली तर आपले काय होणार देव जाणे ही भीती मनात बाळगूनच मी त्या मित्राच्या घरी गेलो. राजकीय पक्षात गल्लीनिहाय प्रतिष्ठा लाभलेला कार्यकर्ता देखील सदैव जिथे एका अदृश्य व्यासपीठावर उभाच असतो तिथे लोहिया म्हणजे केवढा मोठा माणूस! नेहरूंना सुद्धा न भिणारा. आणि त्या रात्री लोहियांनी मला प्रचंड धक्का दिला. ‘फारतर ग्लॅक्सो बिस्किट्, ॲल्युमिनियमच्या थाळीत तेलकट चिवडा, हिरव्या सालीचे हिरवे केळे आणि सायीचा थर साचलेला थंड चहा’ एवढ्याच अपेक्षेने जावे आणि यजमानांनी बत्तीस कोर्सेस्चे चिनी भोजन तयार ठेवलेले असावे– ‘साके’ सकट! म्हणजे जाणाराचे काय होईल? त्या रात्री माझे तस्से झाले. लोहिया या माणसाला ती जपानी गेशा ‘मला आजवर भेटलेल्या लोकात तुम्ही मला सर्वांपेक्षा अद्‌भुत वाटलात’ हे म्हणाली तेच आजही त्या रात्रीची आठवण झाली की मी म्हणतो. चित्र, शिल्प, साहित्य, नाट्य, इतिहास. लोहियांचे जीवन समृद्ध करणारी किती अंगे होती! आणि ह्या साऱ्यांच्या जोडीला त्यांचे ते गुंगवून टाकणारे बोलणे. त्यांनी ती रात्र आपल्या रसिकतेने उजळली. अनुभवांचे अमृतकुंभ मोकळे होत होते. ते प्रश्न विचारून

*सहा : ललित लेणी*

डिवचीत, चेष्टा करीत. एका क्षणात त्यानी मला मोकळे केले होते. तासा दोन तासांनी तिथे आलेल्या माणसाला मी आणि ते एकेकाळी एकाच गल्लीत गोट्या खेळणारे दोस्त होतो असे वाटले असते. ही किमया लोहियांची. ते स्वतः अंतर कापीत तुमच्या जवळ येत. तुम्हाला धडपडायचे कष्ट देत नसत. त्या रात्री ह्या थोर माणसाचे मला ' दर्शन ' झाले. लोहियामधला ' कवी ' मी पाहिला. ' दीदावर ' पाहिला. रंग, रस, गंध, स्पर्श, नाद ह्यांचा हा माणूस इतका लोभी असेल ही मला कल्पना नव्हती. आमच्या राजकीय पुढाऱ्यांची अरसिकता वाखाणण्यासारखी असते. आपले मंत्रीपद किंवा साधे एम्. एल्. ए. पद विसरून देवाचे देखील दर्शन घेणे आमच्या कित्येक राजकीय नेत्यांना जमत नाही. सांस्कृतिक कार्यक्रमांचे अध्यक्ष म्हणून त्यातली काही मंडळी व्यासपीठावर बसलेली जेव्हा मी पहातो. तेव्हां मला त्यांची, आमची आणि आमच्या संस्कृतीची दया येते. आणि इथे रांगडा, उद्धट, भांडखोर असल्या दूषणांनी माखून टाकलेला माणूस भारतीय शिल्पावर बोलत होता. युरोपीय चित्रकलेतल्या खुब्या सांगत होता, गटेच्या वाङ्मयातल्या थोरवीने भारावून जात होता, भारतीय लोकवाङ्मयातल्या जिव्हाळ्याने हेलावून गेल्यासारखा बोलत होता. आणि हे सारे स्नेहभावाने चालले होते, गुरुशिष्य–संबंधाने नव्हे. शिक्षण हे जेव्हा देणारा–घेणारात मैत्रीच्या पातळीवर होते त्याचवेळी ते ह्या हृदयीचे त्या हृदयी जाते. बौद्धिके रुक्ष असतात. हार्दिके हवीत. त्यात ज्ञान झिरपून मनात जाते. ' काव्यशास्त्र विनोदेन ' ह्यातल्या विनोदाचे महत्त्वाचे स्थान अशावेळी कळते. काव्यशास्त्र ज्यावेळी कपाळाला आठ्या घालून चालते त्या वेळी त्या चर्चेतून ज्ञानप्रदर्शनाचा अहंकार सांडत असतो. हे सारे जेव्हा हसत हसवत चालते तेव्हाच त्या चर्चेला चव येते, गंध येतो. डॉक्टर विद्वान् होते पण विद्वज्जड नव्हते. जडता हे मेदवृद्धीचे लक्षण. न पचलेल्या अन्नाचा मेद होतो. न पचलेल्या विद्वत्तेतून पांडित्याची जडता येते.

पांडित्य पचलेले असले की पंडित देखील किती सहजतेने वावरतो, हे डॉक्टरांसारख्यांशी बोलतानाच कळते. भोवतालचा समुदाय छोटासा असो किंवा प्रचंड सभा असो लोहियांची तिथली बोलण्या चालण्यातली सहजता विलक्षण असे. दुसऱ्या माणसाचे बोलणे ऐकताना अत्यंत गंभीर, सारी शक्ती श्रवणेंद्रियीं साठवल्यासारखे ऐकत. आणि बोलू लागले की मोकळे होत.

दिल्लीला मी नाटयप्रयोग करण्यासाठी गेलो होतो. लोहियांनी प्रयोग पाहिले. आपल्या निवासस्थानी मला आणि आमच्या सगळ्या सहकारी कलावंतांना चहाला बोलावले. तिथे जातो तर दिल्लीतल्या साहित्य आणि कलाक्षेत्रांतली शेसवाशे नामवंत माणसे हजर होती. बंगल्यापुढल्या हिरवळीवर मेळावा जमला होता. ह्या संन्याश्याच्या घरचे गृहस्थाश्रम्याला लाजवील असले आतिथ्य मी कधीही विसरणार नाही. त्या सर्व पाहुण्यांची खातिर् स्वत: करीत होते, आग्रह करीत होते. साहित्य आणि इतर कलांविषयी चर्चा चालली होती. राजकारणावर वाद चालले होते. विविध मतांची माणसे त्या पार्टीला होती. लोहियांच्या राजकीय पक्षाशी माझा कांहीही संबंध नाही, तो यावा असे त्यांनी चुकूनही कधी सुचवले नाही. त्यांची कलाभिरुचि अव्वल दर्जाची होती. त्यामुळे कलावन्ताचा उपयोग पक्षप्रचाराची तुणतुणी वाजवायला करण्याचा कलाहीन विचार त्यांना शिवणेही शक्य नव्हते. त्यांच्याशी झालेल्या भेटीतून मला नेहमी वाटे की ह्या वरपांगी खडबडीत माणसाच्या आतल्या सौंदर्यासक्तीचे दर्शन अधिकाधिक लोकांना कसे घडवता येईल ? ह्या पुस्तकाच्या रूपाने अंशत: तो योग आला आहे. पण किती उशिरा !

उत्तम कलानंदाला आसुसलेले लोहिया, माणुसकीने ओथंबलेले लोहिया, तत्त्वचिंतक लोहिया, बुद्धिमान् लोहिया, जीवनासक्त लोहिया अशी त्यांच्या सर्वसामान्यांपासून लपून राहिलेल्या अंत-

रंगाची विविध स्वरूपे पुढल्या पानांतून आढळतील. ह्या लेखांना त्यांनी राजकारणांतून मिळालेल्या ‘ रिकामपणाची कामगिरी ’ असे थट्टेने म्हटले आहे. ही त्यांच्या भाषेत एकप्रकारची ‘ चावटी ’ ( frivolity ) आहे. लोहियांनी आयुष्यात कधी चेहऱ्यावर मुखवटाच चढवला नाही. तेव्हा तो बाजूला काढून ठेवण्याचा प्रश्नच नव्हता. इथे सारा कारभार खुला होता. इतके परदेशी संस्कार पचवून हा माणूस अगदी “ देशी ” होता. आत-बाहेर काही नव्हतेच. मनी दाटले ते मुखांतून फुटले असे होते. मग तो आघात नेहरूंवर आहे की आणखी कोणावर याची फिकिर नव्हती. अट्टाहासाने ‘ प्रिय ’ होण्याचीही वासना नसणाऱ्या माणसाला ‘ अप्रिय ’ होण्याची भीती का वाटावी ? स्त्री-सौंदर्याला उगीचच उच्च उदात्ततेचे ढोंगी सोवळे नेसवण्याचा त्यांनी कधी प्रयत्न केला नाहीं. झगमगणारे सौंदर्य आणि माजघरातल्या मंद दिव्याच्या वातीसारखे तेवणारे सौंदर्य ह्यातला फरक त्यांना दिसत होता. अमेरिकेला एका व्याख्यानात त्या अमेरिकन बायकांना अमेरिकन बाई कशी राजकन्येसारखी झगमगते हे सांगितले. आणि त्या समुदायात नटराज वर्शींची बायको त्यांना दिसली. त्या राजकन्यांच्या झगमगत्या समुदायात एक सौम्य, शीतल सौंदर्य त्यांना आढळले. लगेच त्यांनी त्या अमेरिकन बायकांना सांगितले, “ तुम्ही राजकन्या तर खऱ्याच पण आमच्या भारतीय स्त्रिया देवकन्यांसारख्या सुंदर असतात. ” आमच्या शेतामळ्यातून राबणाऱ्या ‘ वल्कलेनाऽपि तन्वी ’ अशा शेकडो कृषिककन्या, गिरजा, मत्स्यगंधा ज्यांच्या डोळ्यापुढून झर्रकन् जाऊ शकतात त्यांना डॉक्टरांच्या ह्या सौंदर्यचिकित्सेतले मर्म सहज कळावे.

असामान्य अनुभूतींची ओढ असलेला हा माणूस. अमेरिकेत जाताना ग्रेटा गार्बो आणि आइन्स्टाइन ह्यांना भेटायची तीव्र इच्छा मनात बाळगून गेला होता. सर्वांगांनी जीवन परिपूर्ण करण्याच्या जिद्दीचे

आणखी दुसरे कोणते उदाहरण हवे ? ‘उत्कट भव्य ते घ्यावे मिळमिळीत अवघेचि टाकावे,’ ह्या समर्थांच्या ओळींतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन होऊ शकेल. खाजगी किंवा सार्वजनिक जीवनातल्या लेचेपेचेपणामुळे ते भडकून उठत. देव आणि दैव हे दोन्ही दुर्बळांचे घातक असतात. ‘सारवासारव’ हाच केवळ ज्यांच्या राजकारणाचा आज अर्थ उरला आहे असल्या आजच्या काँग्रेसशीं असल्या माणसाचे कसे पटावे ? लोहियांचा पिंड नवी सामाजिक परिवर्तने मानणारा. बैठक मात्र संपूर्ण भारतीय. ‘राम कृष्ण आणि शिव’ ही भारतीयांना पडलेली परिपूर्णतेची स्वप्ने आहेत’ अशासारखे सूत्रमय वाक्य उगीचच येत नाही. ह्या निबंधाच्या अखेरची त्यांची प्रार्थना तर थेट विवेकानंदांचे स्मरण जागवून जाते. भारतमातेकडे लेकुराच्या आर्ततेने मागणे मागणाऱ्या व्याकुळ लोहियांचे तिथे दर्शन घडते. ‘भारतमाते– आम्हाला शिवाची मती दे. कृष्णाचे अंतःकरण दे. रामाची कृती दे. अपरिमित मन देऊन आमची घडण कर. उन्मेषशाली हृदय दे. पण जीवन मात्र संयमी कर.’ उपनिषद्‌कालीन ऋषींनी तरी आणखी निराळे काय मागितले होते ? हा कळवळा संताचा आहे. राजकारणी पुढाऱ्याचा नव्हे.

भारतीयाचा सांस्कृतिक वारसा ‘राम कृष्ण शिव’ यांचा आहे हे सांगताना लोहियांचा समाजवाद आड येत नाही. कारण त्यांना राम, कृष्ण आणि शिव ह्या तीन जीवनविषयक दृष्टिकोणातली विश्वात्मकता दिसते. कच्च्या सेक्युलरांना ही नावे हिंदु देवतांची वाटली असती. आणि त्यांचा असा जाहीर उच्चार ? रामा शिवा गोविंदा ! !

लोहियांनी हा भारतीय तत्त्वज्ञानांतला कर्मयोग आचरणात आणून दाखवला, कबीराच्या एका दोह्यात त्याने ‘जो आपले घर फुंकून त्याची विभूती फासून तयार आहे त्यानेच माझ्या मागून यावे’

असा पुकारा केला होता. म. गांधीमागून त्याकाळीं असंख्य तापस निघाले.सत्तेच्या मेनका,उर्वशींनी अनेकांचे तपोभंग केले.विनोबा, जयप्रकाश, सानेगुरुजी, युसुफ मेहेरअली, अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्यासारखे अपवादरूप तपस्वी व्रतापासून ढळले नाहीत.साधनानाम् अनेकता असेल. पण तप चालू. लोहिया त्याच दिंडीतले. भयशून्य चित्ताचे. पाठीच्या कण्याला वाकायची सवय नसलेले. भारत स्वतंत्र झाला. गोव्याची व्यथा सलत होती. त्या पाशवी सत्तेविरुद्ध हा एकटा माणूस दंड ठोकून उभा राहिला. गोव्यातले पोर न् पोरे बाकीबाब बोरकरांचे गीत गात उठले. ' गोयान् लोहिया आयलो रे-- ', " गोविंदा आला रे आला. गोकुळात आनंद झाला. " भीती गेल्याशिवाय आनंद होत नाहीं. पोटाच्या भांडयांत भीती असली तर आनंद कळकतो. कंस भय गेले तेव्हाच गोकुळात आनंद झाला. पोर्तुगीजाचे भय गेले. आणि गोयात आनंद आला. आज पणजीच्या बंदरावर सिंधुसागराकडे दृष्टी लावून पुतळा उभा करायला हवा तो ह्या अभयकारी राममनोहर लोहियांचा ! कोण करणार! सार्वजनिक स्मरण कमालीचे अधु असते ! लोहिया म्हणतात, " जे मन भयहीन, वासनाहीन आणि नैराश्यहीन आहे तेच योग्य विचार करू शकते. " सत्याच्या उपासकाची ही साधनत्रयी, लोहियांच्या डोळ्यांत ही निर्भयता होती. ह्या असंग्रही माणसाने मागे काय इस्टेट ठेवली ? दोनपाच ट्रंकाभरून पुस्तके आणि असंख्य स्नेही. जवळ संग्रह नव्हता म्हणून पराजयाची भावना नव्हती. भीती नव्हती. त्यामुळेच दिल्लीतल्या सत्तेसाठी हपापलेल्या संधिसाधूंच्या इतिहासकालापासून आजतागायतच्या किळसवाण्या लीला पाहून त्यांनी म्हटले आहे की " ह्या नगरभवानीने आपली थाने जेत्यांपुढे सदैव उघडीच टाकली आहेत." भिकेच्या झोळीत अन्नधान्य घालणाऱ्या परदेशी सैयांपुढे नटण्यासाठी ही नगरी स्वत:करिता पाण्यासारखा पैसा उधळते. पण जिथे लक्षावधी भारतीय नागरिक जमतात अशा तीर्थक्षेत्रात ना

अद्ययावत् संडासाच्या सोई ना सुंदर सडका. दिल्लीतली चाणक्य-पुरी झगमगते. पण ह्या साक्षात् देवपुरीमध्ये मात्र उत्तम फ्लशिंग् करावे, उतरण्यासाठी सुंदर धर्मशाळा बांधाव्या, आधुनिक सुख-सोयींचा लाभ आमच्या गरीब जनतेला मिळावा ही चिंता काळ्या-गोऱ्या शेठजींना सुखवणाऱ्या, वारांगनेच्या संस्कृतीची जोपासना करणाऱ्या दिल्लीला वाटत नाही. कारण दिल्ली अजूनही मोगल-कालीन राजधानीच आहे. ती लोकधानी नाही. शाळामास्तरांचे राष्ट्रपतींकडून शालजोडया देऊन सत्कार होतात. पण त्यांना उतरायला अशोक हॉटेल सरकारी असूनही लाभत नाही. ' गुरु-र्ब्रह्मा ' पावसापाण्यात देखील फडतुस तंबूत पाठवला जातो. गोऱ्या पाव्हण्याची सोय मात्र अशोक हॉटेलात ! कारण ते डॉलर्सचा किंवा रुबल्सचा दौलतजादा करतात. शिवाय तीर्थक्षेत्रांत लक्षावधी भारतीय जमत असले तरी ते मुख्यत: हिंदू ! निधर्मी राज्यात त्यांची सोय केली तर कुळाला बट्टा लागेल. मिशनऱ्यांच्या शाळां-मधून राष्ट्रद्रोहाची शर्करावगुंठित शिकवण मिळते हे लिहायला लोहिया कचरत नाहीत. हिंदूंच्या जातीभेदाविषयीची आपली चीडही त्यांनी असंदिग्ध शब्दांत व्यक्त केली आहे. भीड ठेव-ण्याचे त्यांना प्रयोजनच नव्हते, तुरुंगातल्या हालअपेष्टा सहन करीत त्यांची योगसाधना झाली होती. ' शुचीनाम् श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभि जायते, हे गीतावचन अशावेळी आठवते. शंकराचार्य, रामकृष्ण ह्यांच्यासारख्या शुचि आणि श्रीमतांचे घर असणारा हा आपला देश, पूर्व पश्चिम, दक्षिण उत्तर चारी दिशा ज्या एका अद्वैत तत्वज्ञानाने भारून गेल्या होत्या, अशी ही खंडप्राय असलेली अखंड भारतभूमी. ' जमुनातीरी जन्मलेल्या कृष्णाचा अन्त द्वारका-नगरीला समुद्रतीरी व्हावा आणि समुद्रतीरावर जन्मलेल्या मोहन-दासांचा देहान्त जमुनातीरी व्हावा ' हा योग पूर्वपश्चिमेला सांधून जातो. केरळातल्या कालडीतला एक महान् नंबुद्री काश्मिरातल्या श्रीनगरात शंकराला स्तोत्राभिषेक करतो आणि उत्तर दक्षिण

जोडतो असा ह्या देशाच्या अखंडत्वाला रामकृष्णशिवाच्या समन्वयी तत्वज्ञानाने नाही साधायचे तर कशाने ? सांधावे लागते मन आणि मनाला सांधणारे तत्वज्ञानाइतके दुसरे सिमेंट नाही. ते ज्यांना दिसले त्यांचे जीवन खऱ्या अर्थाने श्रीमंत झाले. साऱ्या भारतीयांची मरगळ घालवून त्यांना एकत्र आणणाऱ्या शिवरायाला समर्थांनी ‘ श्रीमान् योगी ’ म्हटले ते ह्या अर्थाने.

असल्या आध्यात्मिक आणि सौंदर्यसंचयी श्रीमंतीचे असंख्य पुरावे पुढल्या पानांत ठिकठिकाणी विखुरलेले आहेत. श्रीपादराव केळकर आणि त्यांच्या सहधर्मचारिणी सौ. इंदुताई केळकर ह्यांनी लोहियांचे हे विचारधन मराठीत आणले. मराठी जाणणाऱ्या वाचकावर त्यांचे उपकार आहेत. हे लेख मी प्रथम इंग्रजीतून वाचले. डॉक्टरांची इंग्रजी शैली विलक्षण आकर्षक आहे. लेख वाचताना आपल्या भेदक डोळयांनी, ओठाला अतिमिष्किल मुरड घालीत, त्या जाड भुवयांचे आकुंचन आणि प्रसरण करीत बोलणारे लोहिया मला सारखे दिसते होते. अत्यंत पारदर्शक असे त्यांचे हे लिखाण.

दिल्लीला त्यांची आणि माझी अखेरची भेट झाली त्यावेळी त्यांनी माझ्या घरी यायचे वचन दिले होते. ते हे असे केवळ पुस्तकांच्या कपाटात येऊन रहातील आणि फक्त त्या पानामागूनच बोलत राहतील हे माझ्या स्वप्नीही नव्हते. आता त्यांच्या संगतीत रात्र जागवायची म्हणजे त्यांची पुस्तके उघडून बसावयाचे आणि मानसपूजेसारखी मानसभेट घडवीत राह्यचे एवढेच उरले आहे. त्यांच्या निधनाचा शोक करणें आपल्या धर्मशास्त्राविरुद्ध आहे. संन्याशाच्या मृत्यूचा शोक करायचा नसतो. त्याचे अमरत्व न मानण्यासारखे होते. दुःख ते होते एकाच घटनेचे. ज्या कालपुरुषाला ते कधीच भीत नव्हते, किंबहुना ‘ माझी आणि तुझी छोटीसी मुलाकात ’ झाली आहे म्हणत होते अशा ह्या योग्याच्या अलिप्ततेने

जीवनात रंगलेल्या माणसाला मरणाच्या वाटेने नेण्याची इतकी काय घाई लागली होती. ? बाकी काळाने असे काही विपरित केले नाही तर ‘ कालाय तस्मै नमः’ म्हणून त्याला तरी जुलमाचा रामराम कोण करणार ? सत्ताधीशांच्या खोडी त्यालाही जडलेल्या आहेत.

आजच्या या प्रसंगी, लोहियांच्या रसिकतेवर तीक्ष्ण बुद्धिमत्तेवर आणि निःसंगतेवर अपरंपार प्रेम करणाऱ्या अनेकातला मी एक त्यांच्या स्मृतीला मनोमन वंदन करतो.

ह्या थोर माणसाविषयी माझ्या भावना व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल श्रीपादराव केळकर आणि सौ. इंदूताई यांचा मी ऋणी आहे.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६६२२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

शिल्प

इतिहासाचे ग्रंथ कधी तरी नाश पावतात म्हणूनच की काय भारतीय जनतेने अनंत काळ प्रचलित राहणाऱ्या कथा–कहाण्यांच्याद्वारे तो सांगून ठेवला आहे. इतिहास संतापला. त्याने सूड घेतला आणि सर्वांत अधिक काळ टिकणाऱ्या पाषाणावर चित्ररुपाने त्याने आपला आत्मा खोदून ठेवला. भारतीय धर्मानेही आपली कथा पाषाणावरच चितारली आहे.

भारतीयांचा धर्म जसजसा उत्कर्षाप्रत पोचू लागला तसतसा तो अधिकाधिक सत्त्वहीन व चिंतनहीन बनत गेला. पाषाणासारख्या सर्वांत जड अशा वस्तूवर भारताचा धर्म अधिक प्रमाणात खोदला जात होता, त्याच वेळी चिंतनातील पोकळपणा मात्र वाढत होता. जगातील अन्य कोणत्याही देशाने आपल्या आत्म्याच्या इतिहासाला आणि आपल्या इतिहासाच्या आत्म्याला भारताप्रमाणे पाषाणावर कोरलेले मोहक रूप दिले नसेल. एका बाजूला इतिहास व धर्मविषयक चिंतन याबाबतचे रितेपण आणि दुसऱ्या बाजूस धार्मिक व ऐतिहासिक घटनांच्या काल्पनिक चित्रांतील श्वास अवरुद्ध करणारे जवळपास चिरंतन सौंदर्य !

भगवान बुद्ध व महावीर प्रत्यक्ष कसे दिसत होते कोणाला माहित ! परंतु त्यांच्या देहावसानानंतर सुमारे तीनशे वर्षांनी ज्या शिल्पकारांनी त्यांच्या मूर्ति

कोरल्या, त्यांनी महापुरुषांच्या शिकवणुकीचे मर्म त्या मूर्तींत असे काही साकार केले आहे की त्या जणु जिवंत वाटाव्या. अनेकविध रूपांत बुद्ध व महावीर यांना या मूर्तींमध्ये चितारले आहे. कोठे चिंतनमग्न तर कोठे द्यानिधि; कोठे अभय शिकविणारे तर कोठे विकारांवर विजय प्राप्त केलेले. क्रॉसवर हातापायांना खिळे टोकलेले जसे ख्रिस्ताचे एकच रूप दिसते, तसे बुद्ध–महावीरांच्या मूर्तींचे नाही. भारतीय शिल्पकाराने त्यांचे एकच रूप चितारण्याचे बंधन स्वतःवर लादून घेतलेले नाही. आपणाला आवडेल त्या पद्धतीने आपल्या आराध्य देवतेचे चित्रण करण्याचे स्वातंत्र्य युरोपीय चित्रकारांना असावे, पण शिल्पकारांना ते नसावे. मात्र भारतीय शिल्पकार याबाबत संपूर्ण स्वतंत्र होता.

बुद्ध व महावीर यांच्या मूर्ती अनेक रूपांत असल्या तरी त्या सर्वांचा आत्मा व शिल्पशैली एकसारखी आहे. या साऱ्या मूर्ती काही कोणा एकाच शिल्प-काराने कोरलेल्या नाहीत. कितीही मोठ्या शिल्पकाराला ते अशक्यच होते. पिढ्यान् पिढ्यांच्या अविरत परिश्रमांचे ते फळ आहे. तरीही बुद्ध व महावीर यांच्या मूर्ती तर सारख्याच दिसतात असे क्वचित्‌च कोणाला म्हणता येईल.

बुद्धमूर्तित बुद्ध निश्चित दिसतात तर महावीरांच्या मुद्रेवर एक प्रकारचा तंगपणा दिसतो. मानवाला प्राप्त होऊ शकणारा श्रेष्ठ विजय दोघांनाही मिळाला आहे असे त्या मूर्ति पाहिल्या की वाटते. परंतु विजयी बुद्धाच्या मुद्रेवर निश्चि-तता आहे तर विजयी महावीराचा चेहरा मात्र तंग आहे. या धर्मपुरुषांची शिकवण समजून सांगण्यासाठी लिहिलेल्या जाडजूड ग्रंथांना व धर्मप्रबंधांना जे जमले नाही ते या शिल्पकारांनी आपापल्या धर्मपुरुषांच्या अलौकिक प्रतिमा कोरून अत्यंत संक्षिप्त पण स्पष्ट स्वरूपात सांगितले आहे.

सारनाथ त्याचप्रमाणे मथुरा, नालंद, अजंठा, वेरूळ येथील महान बुद्ध-मूर्तींच्या चेहऱ्यावर सर्वत्र प्रसन्न विजेत्याचा भाव आढळतो. श्रवणबेलगोळ येथे महावीरांची एक अत्यंत मोठी पाषाणमूर्ति आहे. ती मूर्ति कदाचित आद्य महा-वीरांची नसेल; त्यांच्या परंपरेतील दुसऱ्या कोणा महावीरांची असेल. जगातील सर्वांत प्रचंड अशी ती मूर्ति आहे. विजयी महावीराच्या मुद्रेवर अन्यत्र दिस-णारा आत्मनिग्रह येथेही आढळतो. त्या मुद्रेची भीतीच वाटते. जणू ती मुद्रा आपणाला असे सांगत असल्याचे भासते की, "माणसाला आपल्यावर कधीच अंतीम विजय मिळविता येत नसतो. मनाच्या बैलाला पकडण्यात यश मिळविले तरी त्याला मोकळे सोडता कामा नये." जैन धर्म व त्याच्या अनुयायांची, विशेषतः जैनमुनींची कठोर व्रतवैकल्ये ही त्या धर्मातील कडवेपणाची व निरंतर



**बुद्ध**

बोधगया इ. स. १० वे शतक

दक्षतावृत्तीची साक्ष आहे. बुद्धाचे असे नाही. विजयप्राप्तीनंतरही त्याचे काही विशेष वाटणार नाही अशी मनाची अवस्था प्राप्त करता येते असे बुद्धमूर्ति पाहिल्यावर वाटू लागले. यापैकी कोणती प्रवृत्ति बरोबर हा येथे प्रश्नच नाही. कारण या दोन्ही धर्मपंथांचे पुढे अधःपतनच झाल्याचे दिसून येते. त्यातल्या त्यात कोण अधिक बरोबर हा देखील प्रश्न नाही. कारण मानवी दृष्टीने पाहिले तर बुद्ध अधिक बरोबर होता असे म्हणता येईल तर तार्किक दृष्टीने पाहिले तर महावीर जास्त बरोबर होता असेही म्हणता येईल. मला येथे फक्त एवढेच सांगावयाचे आहे की शिल्पकारांनी या दोघांचीही शिकवण त्यांच्या शरीराकृती आणि मुद्रा यांच्या माध्यमाद्वारे उत्तम रितीने पाषाणगत केली आहे.

अमेरिकन राष्ट्रीय नेत्यांच्या अमेरिकेतील चार पुतळ्यांची मला येथे आठवण होते. ते प्रचंड आहेत. एकदा विमानातून अमेरिकेत हिंडत असताना त्या पुतळ्यांवरून माझे विमान गेले. मी माझ्या विमानचालकाला पुन्हा त्या पुतळ्यांवरून विमान न्यायला सांगितले. जमले तर त्या अखंड मूर्तींच्या कलेचे सार समजून घ्यावे अशी इच्छा होती. वास्तविकतेच्या दृष्टीने त्या मूर्ती भारतीय मूर्तींपेक्षां अधिक चांगल्या आहेत असे म्हणतां येईल. त्या मूर्ती ग्रीक व रोमन शिल्पपरंपरा सन्माननीयपणे पुढे चालवीत आहेत. मात्र या मूर्तींतून काही संदेश मिळतो की काय ते मला सांगता येत नाही. अर्थात त्या मूर्तीं–मागच्या कथा मात्र वेधक पद्धतीने चितारण्यांत या शिल्पाने यश मिळविले आहे. आणि त्या कथा हाच मुळी एक महान संदेश आहे. त्या मूर्ती फक्त चेहऱ्यांच्या आहेत. समजा, शरीराचा उर्वरित भाग जरी दाखविला असता तरी फार तर लिंकन व वॉशिंग्टन यांनी पुढे टाकलेल्या पावलांत भासणारी जादू तेवढी प्रेक्षकाला अनुभवता आली असती. असेही कदाचित् असेल की मलाच त्या मूर्तींचा अर्थ पूर्णपणे कळला नाही. कारण घाईघाईने पाहणाऱ्यांना महान वस्तु आपली रहस्ये कधीच सांगत नाहीत. परंतु मला त्या अमेरिकन मूर्ती आवडल्या. सौंदर्य रेखाटण्यात व्यक्त झालेली प्रतिभा व कारागिरी यामुळे त्या मूर्ति भारतीय कलाकृतींपेक्षाही अधिक आवडल्या. भारतीय पुतळ्यात असे सौंदर्य व अशी कारागिरी आढळत नाही.

तथापि भारतीय मूर्तिकलेचे एक वेगळेपण आहे. मूर्तितील माणसाची केवळ शरीराकृति चितारण्यावर भारतीय शिल्पाचा भर नाही; तर त्या व्यक्तिचे जीवन, त्याचा अर्थ याला भारतीय शिल्पात जास्त महत्त्व आहे. त्या व्यक्तीचा एखादाच भाव किंवा सर्वच्या सर्व भाव शिल्परूप करून भारतीय

कलावंताचे समाधानच होत नसावे. तर ज्या अमूर्त जीवनशक्तीच्या आधारे त्या व्यक्तीला, तिच्या पाषाणमूर्तीला किंवा आपणा साऱ्याजणांना अस्तित्त्व प्राप्त होत असते तो जिवंतपणा, ती जीवनशक्ती भारतीय शिल्पांत संक्षिप्त रुपांत चितारलेली अनुभवावयास मिळते. आणि त्याने प्रेक्षक वेडा होतो.

सर्वच भारतीय कलावंत बौद्ध व जैन पंथांच्या प्रभावाखाली गेले आणि त्यांना मूळ हिंदुधर्माविषयी आस्था राहिली नाही असे कदाचित् वाटेल. पण तसे घडलेले नाही. उलट शिवशंकरावर इतर कोणाहि देवतेपेक्षां भारतीय शिल्पकाराचे अधिक प्रेम असल्याचे दिसते. शिवाच्या शांत, स्तब्ध व्यक्तिमत्त्वाने तत्त्वज्ञान्यांना अधिक सर्वांगीण विचार करण्याची प्रेरणा दिली, तसे शिल्पकारांच्या शिल्पकलेचे संपन्न स्वरूप अधिक प्रमाणात जगापुढे ठेवले. सातव्या शतकातील व त्यानंतरच्या काळातील वेरूळ येथील शिल्पामध्ये अथवा बाराव्या शतकांतील व त्यानंतरच्या काळातील खजुराव येथील शिल्पामध्ये शिवशंकर हा पार्वतीच्या अंगाभोवती व वक्षस्थळाखाली हात वेटाळून बसलेला दाखविला आहे; आणि पार्वती त्याच्या डाव्या मांडीवर बसली आहे. अगदी संतुष्ट अवस्थेत ते दोघे बसलेले दिसतात. काळ निश्चल उभा आहे. त्याच्या गतीवर नियंत्रण ठेवण्याची इच्छा कोठे दिसत नाही. क्षण अनंत आहे. भविष्यकाळाने आपल्या मागोमाग यावे अशी उत्कंठा वर्तमानकाळाच्या ठायी दिसत नाही. भूतकाळाचीही त्याला चिंता नाही. तत्काल कृति स्वयंपूर्ण असते आणि आपल्या अस्तित्वाची पुष्टी ती स्वतःच करीत असते. तत्काल कृति ही एक निःस्तब्ध कृति होय. अचराची चर कृति होय. माणसाला आपल्या व्यवहारांत तत्कालिकतेचे हे तत्त्व अंमलात आणता येईल काय? सांगता येत नाही. शिल्पकाराने कोरलेले शिवाचे पुराण व्यक्तिमत्त्व मात्र माणसाला त्या दिशेने अंगुली निर्देश करीत आहे. पुढच्या क्षणाविषयीची माणसाची उत्सुकता कदाचित् संपूर्णतया कधीच नाहीशी होणार नाही. परंतु वर्तमान काळात स्वतःला बरेचसे गुंतवून घेऊन त्यातून अधिकाधिक फलप्राप्ती करणे त्याला शक्य आहे.

शिवाच्या असीम व्यक्तित्त्वामुळे भारतीय शिल्पकारांना हिंदूंचे धर्मविषयक चिंतन श्रेष्ठ व संपन्न स्वरूपात आणि संक्षिप्त पद्धतीने व्यक्त करता आले. घारापुरी येथील आठव्या शतकातील आणि नवव्या तसेच सोळाव्या शतकामधील चित्तूरच्या लेण्यात शिवाच्या तीन भिन्न भिन्न रुपातील मोहक मूर्ति आहेत. एक ध्यानमग्न, दुसरी रौद्र व तिसरी लास्ययुक्त. शिल्पकारांनी शिवाचे एकही रूप

चितारावयाचे बाकी ठेवलेले नाही. तंजाई येथे ते महान प्रसिद्ध तांडवनृत्य शिव करीत आहे. त्या शिल्पांत शिवाची निश्चलतेतील चलता व चलतेतील निश्चलता प्रत्ययास येते. सिंह व मेंढीला एकत्र नांदवावे तसा बुद्धीला अगम्य चमत्कार त्या मूर्तीत घडवून आणलेला आहे. अर्ध्या बाजूने स्त्री आणि अर्ध्या बाजूने पुरूष, अर्धांगाने पार्वती आणि अर्धांगाने शंकर असलेले ते अर्धनारीनटे-श्वराचे रूप म्हणजे एक सर्वोच्च आणि सजीव असे सारे भेद मिटवणारे सृजन वाटते.

विष्णूने मात्र भारतीय शिल्पकारांना शिवाइतके भारावून टाकलेले दिसत नाही. तरीही विष्णूची वैशिष्ट्यपूर्ण अशी अनेक शिल्परूपे आढळतात. विष्णू आपल्या वस्त्रप्रावरणाखाली काही तरी लपवून ठेवीत आहे असे मला नेहमीच वाटते. अर्थात ती लपवणूक मानवी हितासाठी व मानवाच्या लोभाला मर्यादा घालण्यासाठी व त्याच्या व्यापक संरक्षणाकरिता असेल. विष्णू अगदी आरा-मात पहुडलेला दिसतो. जय-पराजयामुळे होणाऱ्या आनंद-विषादाच्या कक्षा ओलांडून गेलेला दिसतो. अखंड निद्रा घेत तो आपल्या कृपाछत्राखाली नांद-णाऱ्या विश्वावर देखरेख करतो आहे असे वाटते. उदयगिरी येथील विष्णूचे शिल्प मला सर्वात अधिक आवडले. त्यातील विष्णू वराहाचे रूप धारण करून एका अलौकिक सुंदर कुमारिकेची, प्रत्यक्ष पृथ्वीची मुक्तता करीत आहे असे दाखविले आहे. ही पृथ्वी म्हणजे विष्णूची पत्नी. समुद्र हे तिचे वस्त्र आणि पर्वत हे वक्षस्थल असल्याचे एका स्तोत्रात वर्णन आहे.

भारतीय शिल्पकारांना रामाचे काहीसुद्धा आकर्षण का वाटले नाही आणि कृष्णालाही त्यांनी आपल्या कलाविष्काराच्या विषयात का स्थान दिले नाही याचे आश्चर्य वाटते. कदाचित् त्यांनी राम व कृष्णाच्या शिल्पाकृती कोरल्याही असतील. एक तर त्या नष्ट झाल्या असतील किंवा अद्याप अज्ञात असतील. अद्याप अस्तित्वात असलेल्या द्वारकेच्या कृष्णमंदिरातील बालकृष्ण चतुर व चलाख दिसतो.

भारतीय शिल्पांतील सौंदर्याचा मागोवा घेत असतांना मला त्या शिल्पांतून व्यक्त होणाऱ्या भारताच्या इतिहासाचे अधिकाधिक व वारंवार दर्शन घडत गेले. रोम येथील कोलिसिअम म्हणजेच स्तंभ आणि काहिरा येथील पिरॅमिडस, किंवा स्फिन्क्स हे अवशेष जसे इतिहासाचे दर्शन घडवितात तसेच इतर पाषाण विटा, धातूचे तुकडे इत्यादि—विशेषतः ज्यावर काही कोरलेले आहे अशा वस्तु—इतिहास उलगडून सांगत असतात. अर्थात त्यामार्फत कळणारा इतिहास

प्रत्यक्ष घडलेला असतो.

ही इतिहास साधने कोठे तरी केंद्रीय ठिकाणी वस्तुसंग्रहालयात ठेवलेली असतात. अन्यत्र कोठेतरी मुळात अस्तित्वात असलेल्या वस्तुंचे ते एकत्र ठेवलेले केवळ नमुने असतात. निरनिराळ्या काळातील सात दिल्ल्यांमध्ये असे अनेक ऐतिहासिक पाषाण व धातु पहावयास मिळतात. वेगवेगळ्या सात कालखंडांतील या सात किंवा आठ दिल्ल्या एकाच संलग्न क्षेत्रात वसलेल्या आहेत. त्यांच्या रचनेचा काळ व पद्धत यामध्ये एकप्रकारची परस्परसंगती आढळते. त्यापैकी प्रत्येक दिल्लीत काही सहज ध्यानी येणारी वैशिष्ठ्येही आढळतात. आणि त्यामुळेच या सर्व दिल्लयांच्या उभारणीचा विशिष्ट काळही लक्षात येतो. परंतु त्यापैकी बऱ्याचशा दिल्ल्यांची बांधणी परस्परांसारखी दिसते. या दिल्ल्यांत चार असाधारण सुंदर अशा वास्तु आहेत. त्यांची बांधणी काहीशी अलीकडच्या काळातील आहे. मॅजिक लँटर्नच्या सहाय्याने दाखविल्या जाणाऱ्या एखाद्या छायाचित्रकथेमधील चित्रमालेसारखी या सात दिल्ल्यांतील वास्तुंची एक सलग मालिका आहे. या चित्रमालिकेचा मनावर जो ठसा उमटतो तो माणसाच्या सहज विस्मरणशक्तीचा आणि भारताच्या गेल्या एक हजार वर्षातील नादानपणाचा. दुर्दैवाने मी अथेनाला (अथेन्सला) कधी जाऊ शकलो नाही. परंतु मला असे वाटते की अथेना येथील अवशेष ही अथेनियन व ग्रीक इतिहासाची प्रतीके आहेत. हिंदुस्थानचे उलट आहे, येथील इतिहास हाच येथील अवशेषांचे चिन्ह आहे.

अन्य देशात ऐतिहासिक अवशेष व प्राचीन कलावास्तूंपेक्षा लिखित इतिहास अधिक विपुल प्रमाणात आढळतो. भारतात मात्र लिखित इतिहासापेक्षा प्राचीन कलावास्तु व अवशेष अधिक प्रमाणात आढळतात. मानवी विस्मृतीने आपणास गडप करून टाकू नये, आपल्या कलेची अभिव्यक्ति अधिक दीर्घकाल टिकणाऱ्या धार्मिक माध्यमातून करता यावी आणि स्त्री सौंदर्य व मानवी जीवनामधील आनंदमय कृति उत्तम रितीने चितारता याव्या यासाठी भारतीय कलावंतांनी केलेल्या प्रयत्नामुळेच खरे म्हणजे ते भारतीय इतिहासाचे अधिकच श्रेष्ठ उद्‌गाते बनले. मात्र त्यांच्या कलाकृतींत भारतीय इतिहासातील प्रसंग चितारलेले नाहीत तर भारतीय आत्म्याची कथा चितारली आहे. प्रत्येक बदलत्या युगाबरोबर भारतीय आत्म्याने वेगवेगळे रूप धारण केले आहे.

सबंध इटलीत किंवा सबंध इजिप्तमध्ये पहावयास मिळणार नाही अशी शिल्पकला खजुराव, भुवनेश्वर, कोणारक, धारवाड भाग या एकेक शिल्पात

आढळते. अजंठा, वेरूळ किंवा चित्तूर याबद्दल तर बोलायलाच नको. या विशाल देशात अनेक ठिकाणी अशी साठांहून अधिक शिल्पे पसरली आहेत. विविध मानवी समाजांनी शिल्पकलेत व वास्तुशिल्पात केलेली प्रगति जोखण्यासाठी तराजूच्या एका पारड्यात भारताच्या कलावस्तू व दुसऱ्या पारड्यात उरलेल्या साऱ्या जगाच्या कलावस्तु ठेवल्या तर पारडे कोणत्या बाजूस झुकेल ते सांगणे कठीण आहे.

भारतातील ही कलाकेंद्रे हौशी प्रवाशांच्या नेहमीच्या वाटेवर नाहीत. त्यापैकी बहुतांश स्थळे मोठ्या शहरांपासून दूर आहेत. महाबलीपूरम मद्रासपासून चाळीस मैलांवर तर घारापुरी समुद्रमार्गे मुंबईपासून अंदाजे एक तासाच्या अंतरावर आहे. खजुराव, अजंठा, कोणारक, ही स्थळे ही जवळच्या रेल्वेस्टेशनापासून अशीच चाळीस-चाळीस मैलांवर आहेत. ही सर्व कलाकेंद्रे मोठ्या शहरांपासून दूर आहेत हे स्वाभाविकच आहे. कारण भारतीय इतिहासाचा आत्मा, ही परक्यांच्या नजरेचे जिच्यावर सतत आघात होत असतात अशी एक नाजुक सुंदरी आहे. म्हणून येणाऱ्या जाणाऱ्याची आकस्मिक नजर जाणार नाही अशा दूरच्या व निर्जन ठिकाणी ही सुंदरी छपून राहिली आहे.

मी एकदा भोजपुरीला गेलो होतो तेव्हा तेथे या सुंदरीचे—भारतीय आत्म्याचे—मला दर्शन झाले. भोपाळपासून तीस मैलांवर भोजपुरी हे स्थळ आहे. त्याचा कोणत्याही कलाविषयक पुस्तकांत किंवा इतिहासविषयक ग्रंथांत उल्लेख नाही. भोजपुरी येथील शिल्पात भारतीय आत्मा—ही सुंदरी—काहीशी संकोचलेली परंतु अतिशय नाजुक मोहकतेने नटलेली दिसली. सोमनाथाच्या लुटीनंतरचे हे शिल्प असावे. भारतीय आत्मा येथे अभंग व अविनाशी राहण्याचा निष्फळ प्रयत्न करीत आहे असे वाटते. भोजपुरीच्या शिवमंदिरातील शिवलिंग व स्तंभ असाधारण प्रचंड आहेत. हे शिवमंदिर म्हणजे सोमनाथाची छोटीशी प्रतिकृति आहे असे म्हणतात. भारतीय आत्म्याचे दुसरे रूप मी चितोड येथे पाहिले. तेथे ती वेडी रूपगर्विता सुंदरी आपल्या केवळ नखांनी व दातांनी प्रतिकार करीत आहे; पण माघार घ्यायला तयार नाही. सोमनाथ व मथुरा येथे ही सुंदरी काहीशी भयभीत, फाटक्या वस्त्रात, साऱ्या शरीरातून रक्तस्राव होत असलेली आणि पळून जाण्याच्या तयारीत आहे असे वाटते. असे असले तरी तिची मोहकताच इतकी अमीट आहे की तिच्या प्रेमिकांना आपल्यावर चिरंतन प्रेम करायला ती भागच पाडते. मात्र आपल्या भक्तांमध्यें शौर्य जागृत करायला ती बव्हंशी असमर्थ ठरली आहे.

भारतीय आत्मा – ही सुंदरी – अजमेर व वरंगळ येथील शिल्पात आपल्या जखमा भरून काढायला गेली असावी. परंतु जुन्या जखमा भरून निघतात न निघतात तोच तिला आणखी नवीन खोल जखमा झाल्या. भारतीय आत्म्याच्या – या सुंदरीच्या–संरक्षणात नेहमीच कुचराई झाली असे मात्र म्हणता येत नाही. कारण प्राचीन काळातील तिच्या प्रियकरांचे तिच्यावर गाढ प्रेम होते. ते हुषार व पराक्रमीही होते. तिच्या नागरी प्रियकरांनी तिला नृत्यकलेचे व मल्लविद्येचे शिक्षण दिले होते. त्यामुळे आणि प्रेमक्रीडा करूनही चिरकुमारी कसे राहता येते याचेही शिक्षण तिच्या प्रियकरांनी तिला दिले असल्याने ही सुंदरी महाबली-पूरम, अजंठा – वेरूळ, हळेबीड व कलागुमलाई येथील शिल्पाकृतीत कमनीय शरीर असलेल्या एखाद्या निर्दोष कुमारिकेसारखी दिसते. अर्थात सांची येथील मूर्तीतील ग्रामीण युवतीची निरागसता मात्र तिच्यात या ठिकाणी दिसत नाही. कोणारक व खजुराव येथील या सुंदरीचे व्यक्तित्त्व उत्फुल्ल आहे; तिचे शरीर व एकंदर ढब ठसकेबाज आहे. श्वास अवरुद्ध करणारी कदाचित् ती भारतीय कलावंतांची सौंदर्याकडची अखेरची झेप असावी!

फतेपूर सिक्री येथील मनोऱ्याच्या शेवटच्या मजल्यावर मी एकदा गेलो होतो. त्यावेळी भारतीय इतिहासाच्या आत्म्याचा, आनंद व निराशा या दोन विभिन्न मनोदशेतील संपूर्ण आविष्कार मी पाहिला. एतद्देशीय बनण्याचा प्रयत्न करीत असताना भारताच्या एका परकीय विजेत्याने हा मनोरा बांधला. आपापल्या धर्मश्रद्धांनुसार आपल्या मुसलमान व हिंदू राण्यांना वेगवेगळया वेळी चंद्राचे सौंदर्य निरखता यावे यासाठी त्याने तो मनोरा बांधला होता. त्या मनोऱ्यामागे सिक्री या मोंगलकालिन नगराचे अवशेष आहेत. भारतीय मुसलमानांच्या कलेची ती कदाचित सर्वोच्च सुंदर निर्मिति असेल. तसेच आमचे पूर्वज सामील असलेल्या परकीयांनी केलेल्या बलात्कारातून जन्मलेली एतद्देशीय संतती असेही त्यांस म्हणायला हरकत नाही. त्या मनोऱ्यासमोर कणवाचे मैदान आहे. त्या जागी भारतीय आत्म्याच्या रक्षणार्थ तिच्या संरक्षकांनी थोडासा पराक्रम गाजविला होता. तथापि ते फारच मूर्ख होते. त्यांनी आपल्या पराभवाचेही पवाडे गायले. मी कधी न रडणारा, पण जुन्या स्मृतींनी माझेही डोळे भरून आले.

सांची, अजंठा–वेरूळ, नालंद व चितोड ही भारतीय ऐतिहासिक अवशेषांची व कलाकृतींची चार महान केंद्रे आहेत. ती केंद्रे म्हणजे एक प्रकारे संस्थाच होत. आणि आश्चर्य असे की त्या शेकडो वर्षे टिकून आहेत. यापैकी प्रत्येक स्थळ

किमान नऊशे किंवा त्याहून जास्त वर्षांपूर्वीचे आहे. नालंद तर त्याहिपेक्षा प्राचीन आहे. अर्थात् यापेक्षाही पुरातन अशा अनेक गोष्टी जगाच्या पाठीवर आहेत. उदाहरणार्थ काही नगरे. त्यापैकीच वाराणसी हे एक होय. जगातील ते सर्वांत प्राचीन शहर आहे. अर्थात शहर ही काही एकच संस्था नसते. अनेक संस्थांचा तो समूह असतो. त्यापैकी काही जेव्हा नष्ट होतात तेव्हा नव्या जन्माला येत असतात.

एक पूजास्थान म्हणून ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकात सांचीचा जन्म झाला. धार्मिक श्रद्धा व समाजाचे रीतिरिवाज यांत कालमानाप्रमाणे अनेक परिवर्तने झाली; देवाण घेवाण झाली. तरिही पुढे नऊशे वर्षांहून जास्त काळ सांचीचे पूजास्थान म्हणून असलेले महत्त्व टिकून होते. या नऊशे वर्षांत तेथे, नवनवे मठ जसे स्थापन झाले तशी ज्ञानसंपादनाचीहि साधने वाढत गेली. सर्वच बुद्ध–लेण्यात स्तुप आढळतो. सांची येथेही एक अत्यंत विशाल पण दिसायला मात्र साधा असा स्तुप आहे. त्या स्तुपाच्या खालच्या गोल सज्जाचे छोटे खांब, जणू काही मातीत सहजगत्या कोरावे, तसे वळणे घेत गेले आहेत. वरचा गोल सज्जा खालच्या पार्श्वभूमीवर अधिकच वेधक वाटतो.

अजंठा-वेरूळच्या शिल्पाकृतींचे काम सांचीनंतर थोड्या वर्षांनी सुरू झाले व बऱ्याच उशीरा पूर्ण झाले. मी तरुणपणी ही लेणी पाहिली तेव्हा ‘भारतीय मानसाचा इतिहास’ असे त्यांचे मी वर्णन केले होते. बुद्ध, महावीर व शिव हे तिघेही तेथील रंगीत भित्तिचित्रात आणि कोरीव पाषाणचित्रात अगदी शेजारी-शेजारी, ताटातूट न होता आणि न भांडता युगानयुगे रहात आहेत. अजंठा लेण्यातील सोळाव्या लेण्याच्या बाहेरच्या बाजूला अतुलनीय सुसंस्कृततेचा भाव मुद्रेवर असलेली एक युवतीची मूर्ति मी पाहिली आहे; एकदा नव्हे तर सहा सात वेळा. तसेच अवलोकितेश्वर पद्मपाणीची मूर्ति आणि युवतींची इतरही शिल्पचित्रे पाहिली आहेत. मृत्यूपूर्वी आणखी अनेकदा अजंठा-वेरूळची शिल्पे पहाण्याची संधि मिळेल अशी आशा आहे.

वेरुळ येथील कैलास लेण्याच्या संपन्न सौंदर्याविषयी तर काय सांगावे? ते एक भव्य पण गुंतागुंतीच्या रचनेचे शिल्प आहे. कोन येथील डॉम किंवा नोत्रदाम यांच्यापेक्षाही ते अधिक भव्य आहे. प्रथम कैलास पाहिले तेव्हा तर मी प्रभावित झालोच होतो. परंतु आता तर अधिकच भारावून गेलो आहे. कैलास लेण्याच्या शिखर भागावर उभा राहून मी खाली वाकून पहात होतो, त्यावेळी त्याच्या खालच्या छतावरील सिंहांची गोलाकार साखळी अधिक आक-

धक आहे की वरच्या बाजूची बैलांची गोलाकार रांग जास्त वेधक असा मला प्रश्न पडला. बैलांची रांग मला अधिक वेधक वाटली. उंचावरून पाहिला की वेरूळलेण्यातला विजयस्तंभ तर फारच भव्य दिसतो. महान वस्तूतील सौंदर्य उमजायला मला थोडा वेळ लागतो. त्यासाठी त्या वस्तू पुनःपुन्हां मला पहाव्या लागतात. म्हणून एकदा सर्व वेरूळच्या शिल्पांची सम्यक् कल्पना माझ्या मनांत पक्की झाली की मग मी त्यातील तपशील समजून घेण्यासाठी पुन्हा वेरूळला जाणार आहे.

नालंद विद्यापीठ अति विशाल आहे. ख्रिस्तोत्तर एक शतकाने ते अस्तित्वात आले; आणि तेराव्या शतकापर्यंत चालले. मनात येते की, खरे म्हणजे आणखीही काही शतके का चालू नये ? भारतातील संस्थांवर विनाशाची धूळ कशी चढते हे नालंदाचे अवशेष पाहून लक्षात आले आणि वाईट वाटले. चितोडचा इ. स. ६०० ते १६०० पर्यंतचा एक हजार वर्षांचा इतिहास म्हणजे भारताने मध्ययुगात दाखविलेल्या नादानीची व त्याचबरोबर त्याच्या वैभवाची गाथा आहे. चितोडने पराभव कधीच मान्य केला नाही, पण गंमत अशी की त्याने प्रत्येक वेळी बहुधा पराभवापेक्षा काही मिळविलेही नाही. चितोड पराक्रमी होते, पण चतुर नव्हते. आपल्यापेक्षा अधिक अंतर्गत सामाजिक ऐक्य व संघटन असलेल्या एका शत्रूशी आपला सामना आहे हे चितोडने ओळखले नाही. चितोडमधील सूर्यमंदिर व शिवमंदिर (समाधि ईश्वर) शिल्पातील मनुष्याकृतींवर ठसकेबाज, आकर्षक सौंदर्यापेक्षा शुचितेच्या कल्पनेची अधिक छाप दिसते. आपण आजवर समजत होतो त्यापेक्षा ही दोन शिल्पे अधिक जुनी आहेत. एक सुमारे आठव्या शतकातील आहे तर तर दुसरे अकराव्या.

विजयस्तंभ हे चितोडचे जीव कासावीस करणारे सौंदर्य आहे. हा स्तंभ पंधराव्या शतकात बांधलेला आहे. याच शतकाच्या आगेमागे रजपूतांना पराभव पत्करावे लागले होते. परंतु हा मनोहर विजयस्तंभ उभा करून आपला जणु विजयच झाला आहे असा भ्रम फैलावण्याचा त्यांचा हेतू असावा.

या स्तंभाचा शिखरभाग व पाया सारख्याच रुंदीचा आहे. उंची सुमारे शंभर फूट असेल. अत्युत्ताम शिल्पाकृतींनी हा स्तंभ नटलेला आहे. चौथ्या किंवा पाचव्या मजल्यावर बाहेरच्या बाजूने सज्जे आहेत. ते निष्कारण बांधल्यासारखे वाटतात.

दिल्लीचा कुतुबमिनार चितोडच्या विजयस्तंभापेक्षा जास्त उंच आहे. मिनारावर कोरलेल्या कुराणातील वचनांप्रमाणेच साध्या रेषांकनाने त्याला

डौलदारपणा आणला आहे. गुंतागुंत नसलेली सुबोध आकर्षकता आणि सामर्थ्य यांचा कुतुबमिनारच्या रचनेत प्रत्यय येतो. हा मिनार तेराव्या शतकात मुळातच बांधण्यात आला किंवा त्याची पुनर्रचना करण्यात आली. बुलंद दरवाजा हे शिक्रीचे महान द्वार. चितोडच्या विजयस्तंभाला कदाचित् आव्हान म्हणून आणि चितोडच्या राणांना शरण आणल्याच्या स्मरणार्थ सोळाव्या शतकात हा दरवाजा उभारण्यात आला. त्या दरवाजाची विजय कमान म्हणजे एक वैभवशाली सौंदर्यकृति आहे. आणि खरे म्हणजे तो दरवाजा बांधल्यानंतरच्या नजिकच्या काळात देशांत निर्माण झालेल्या निराशेची व षंढपणाची ती खूण आहे.

दौलताबाद ही काही काळ भारताची राजधानी होती. तेथील तो छोटा स्तंभ पाहून मला नेहमीच विषाद वाटला आहे. ध्येय उच्च पण त्या मानाने ते साध्य करण्याचे प्रयत्न छोटे याचे तो स्तंभ हे प्रतीक आहे. प्राचीन काळांतील विदीशा किंवा आजचें भिलसा येथे हेलिओडोरोस या एका विदेशी यात्रिकाचे नांव असलेला स्तंभ आहे. तो पाहिला की मन काहीसे प्रक्षुब्ध होते. प्रत्येक पुस्तकांत या स्तंभाचा न चुकता उल्लेख आहे. असे कां ? कदाचित् देशी व विदेशी ग्रंथलेखकांच्या दृष्टीतील दोषामुळे हे होत असावे. सम्राट अशोकाच्या राजधानीपासून दूर असलेल्या सांचीसारख्या ठिकाणी आणि अति उत्तरेतील लुंबिनी, कुशीनगर, लोरिया व वैशाली या प्राचीन राज्यांत अनेक ठिकाणी अशोक स्तंभ आढळतात. निरपवाद व अनलंकृत सौंदर्याचे ते स्तंभ प्रतीक आहेत. सत्ता व सात्विक आनंद यांनी जणु हातांत हात घालून या स्तंभांच्यारूपानें भारतमातेला प्रेमाने विळखा घातला आहे असे वाटते. परंतु भारतासारख्या भुसभुशीत व ठिसूळ भूमीवर सत्तेचे प्रतीक असलेले असे स्तंभ उभारण्यात काय औचित्य आहे ते समजत नाही.

भारतात कला व इतिहास यामध्ये एक प्रकारची दृढ युति असावी. येथे कला इतिहासाच्या मागे पुढे चालताना दिसते. समाजाच्या विकासाची गति खुंटल्यामुळे जेव्हा जेव्हा त्याच्या विनाशाचे भय उद्भवले किंवा भयानक पराभवामुळे तो नष्ट होण्याची अथवा भंगण्याची भीति वाटली तेव्हा तेव्हा त्याची पूर्वकल्पना येऊन भारतीय कलाकार हातोडी-छिन्नी किंवा कुंचला घेऊन घराबाहेर पडलेला आहे. भारतात कलेने इतिहासाचा अग्रदूत किंवा लेखक व संरक्षक म्हणून कार्य केले आहे. स्पष्टपणे व अक्षरात लिहिलेला इतिहास समजायला सोपा असतो. परंतु गेल्या पंधराशे वर्षांतील भारतीय इतिहासकारांना आपल्या इतिहासाचीच लाज वाटली असेल म्हणून तसा इतिहास लिहिण्याच्या



शेषशाई विष्णु
दक्षिण भारत–१७ वे शतक

भानगडीतच ते पडले नसावेत. म्हणून शिल्परूपाने तो इतिहास त्यांनी अप्रत्यक्ष-पणे खोदून ठेवला आहे. या शिल्परूप लेखनात इतिहासाचा आत्मा व कलेचा आत्मा हे दोघे कसे एकमेकांशी गुफ्तगू करीत आहेत! संवेदनाशील मनालाच त्या गुफ्तगूमधील रहस्यांचा बोध होऊ शकेल.

भारतीय कलाकृतींची केंद्रे आणि ऐतिहासिक अवशेष असलेली स्थळे यांचा अक्षांश-रेखांशाच्या आधारे आलेख तयार केला तर त्यांच्याविषयीची अनेक रहस्ये प्रकाशात येतील, असे मला अलीकडे अनेक दिवस वाटत होते. मीच स्वतः असा एक आलेख तयार केला. तो मी प्रथमच केला आहे. तो काहीसा ढोबळही आहे. प्रत्येक भारतीय कलाकृतीच्या निर्मितीचा निश्चित काळ व स्थळ याविषयी मला अधिक अचुक माहिती मिळाली असती तर मी काढलेल्या निष्कर्षाला अधिक सत्यता प्राप्त झाली असती. भारतीय कलाकृतींची समयनिश्चिति कालखंडवार तशीच शतकवार केली पाहिजे असे माझे मत आहे. उदाहरणार्थ कृत्रिम पावित्र्यनिष्ठेच्या कलेचा काळ इसवी सनाच्या सहाव्या ते दहाव्या शतका-पर्यंत होता. माझा आलेख काहीसा ढोबळ असला तरी तो मी मांडलेल्या सिद्धां-तावर बराचसा प्रकाश टाकतो. माझा सिद्धांत असा की राजकीय चढउतारा-बरोबर भारतातील कित्येक कलावंतांनी आपले राज्य किंवा देशही सोडून अने-कदा स्थलांतर केले आहे.

भारत एक आहे. भारताचा इतिहास मूर्खपणाने लिहिला गेला आहे. तो वाचून पंडित मंडळींनी भारतीय ऐक्याविषयी जी कल्पना करून घेतली आहे त्यापेक्षां भारत जास्त एक आहे. भारतीय कलावंतांनी केलेली स्थलांतरे याला साक्ष आहेत. त्यांच्या ठायी स्थानीय अभिमानाचा कोठे लवलेशही आढळत नाही. ज्या काळात देश राजकीय दृष्ट्या दुभंगला होता त्या काळात या स्थानां-तर केलेल्या कलाकारांनीच देशाचे कलात्मक ऐक्य कायम ठेवले.

सारा देश त्यांनी पायाखाली घातला. जुन्या काळातील अनेक शिल्पे व स्थापत्ये याला पुरावा आहेत. दक्षिणेतील धारवाड भाग व महाबलीपूरम येथल्या, मध्यभारतातील अजंठा–वेरूळ व सांची येथल्या आणि मथुरा येथील कलाकृतींतील शिल्पशैलींमधील फरक शोधून सापडणे कठीण आहे. सहाव्या व सातव्या शतकातील कृत्रिम पावित्र्यनिष्ठ शिल्पशैली या सर्व शिल्पात समानपणे आढळते.

महाबलीपूरमबद्दल थोडे सांगतो. अखंड पाषाणात उठावाच्या चित्रकला-पद्धतीने ते शिल्प खोदलेले आहे. मी ते प्रथम पाहिले तेव्हा त्यातील गवळण,

तिचे वासरू व हरिण यांच्याकडे माझे हृदय जणु झेप घेत आहे असा मला भास झाला, तेही माझ्याकडे झेप घेत आहेत की काय असे वाटले. चमत्कार म्हणून कोठे घडत असेल तर त्या शिल्पात तो घडला आहे. नंतर पुढे दुसऱ्यांदा मी ते शिल्प पाहिले तेव्हा मात्र माझी क्रूर निराशा झाली. इतकी की मी पहिल्या भेटीत पाहिले ते बरोबर होते की दुसऱ्या भेटीत दिसले ते बरोबर होते आणि त्याचा निकष कोणता हे ठरविण्यात त्यानंतरची कांहीं वर्षे मी घालविली. त्यानंतर पुन्हा तिसऱ्यांदा मी महाबलीपूरमचे शिल्प पाहिले. त्यावेळीं मात्र मला त्यातील सत्य गवसले. माझ्या लक्षात आले की त्या शिल्पातील गवळणीची मांडी व पोट यामधला भाग अवास्तवपणे मोठा आहे. तो वाकलेल्या अवस्थेत असूनहि तिच्या पोटाला कोठे घडी पडली नाही की कोठे वळी दिसत नाही. गवळणीवर शिल्पकाराचे किती प्रेम असले पाहिजे !

मोठा पूर आला होता तेव्हा दिवसा उन्हात मी एकदा गंगा पाहिली होती; त्यावेळी ती शुभ्र, चंदेरी दिसली आणि सावलीमध्ये ती पाहिली तेव्हा ती चिखली व पिवळया रंगाची दिसली. यापैकीं गंगेचा खरा रंग कोणता हा प्रश्न येथे निरर्थक आहे. कारण दोन्ही रंग एकाच वस्तुस्थितीचे दोन भाग होते. आणि मला ते दोन्ही आवडले होते. महाबलीपूरम शिल्पाची मला वेगवेगळया वेळी जी दोन रूपे दिसली तीसुद्धा एकाच सत्याची दोन अंगे होती. एखादी वस्तु जेव्हा पाहतो ती वेळ व ती पहाण्याचा दृष्टीकोण हा ती वस्तु पहाण्याच्या क्रियेचाच भाग असतो. एखादी प्रिय व्यक्ति सुंदर वाटणे किंवा ती पूर्णत्वाने दिसणे ही गोष्ट योगायोगावर किंवा ती पहाणाऱ्याच्या वयावर अवलंबून असते. शिसवीच्या लाकडासारखा काळया अथवा हस्तिदंतासारखा फिकट पिवळया रंगाचा किंवा रागीट अथवा मठ्ठ अथवा कुरूप चेहराही कधी कधी कोणा-कोणाला मोहक दिसतो. सयामी जुळयाप्रमाणे प्रेम हे देखील सौंदर्याचे जुळे भावंड आहे. एखाद्या व्यक्तीवर प्रेम असले म्हणजे ती सुंदरही दिसू लागते. पाषाणात कोरलेल्या युवती तरी याला का अपवाद असाव्यात ?

महाबलीपूरम येथील उठावाची कोरीव पाषाणशिल्पे मी तिसऱ्यांदा पाहिली तेव्हा त्यांतील सौंदर्य मला अधिकच प्रतीत झाले आणि माझे त्यांच्यावरील प्रेम जास्तच वृद्धिंगत झाले. जवळपास त्या शिल्पांच्या निर्मात्यांइतकेच माझे त्यांच्या-वरील प्रेम गाढ असेल अशी अपेक्षा आहे.

थोडे विषयांतर झाले. भारतातील सर्व शिल्पे एकाच शैलीतील आहेत हा मुद्दा मी विषद करीत होतो. सारनाथ येथील शिल्पांमधील युवती व हरणे एकाच

प्रकारची आहेत. महाबलीपूरमची शिल्पे थोडी जास्त वेधक आहेत एवढेच. वायव्येकडील गांधार शिल्पे वगळता साऱ्या भारतातील कलेची शैली एकच आहे—आणि ती म्हणजे भारतीय शैली. प्रांतनिहाय असलेला फरक हा केवळ वरवरचा व कलाकृति अधिक आकर्षक बनविण्याच्या प्रयत्नांतून निर्माण झालेला आहे. गांधार शिल्पशैलीचे वेगळेपणही फार काळ टिकू शकले नाही. लौकरच ती शैली भारतीय शैलीत मिसळून गेली.

तज्ञ मंडळी हळूच अशी तक्रार करतील की, तुम्ही तर आपला मुद्दा सिद्ध करण्यासाठी मोठ्या हुषारीने पुरावे निवडले आहेत. तुम्ही निवडलेली सर्व शिल्पे एकाच आर्यन शिल्पशैलीतील आहेत. म्हणून मी तंजाई व कल्गुमलाई या दक्षिणेतील अगदी दूरच्या ठिकाणच्या शिल्पांचा दाखला देतो. अकराव्या शतकातील तंजाई येथील ब्रॉंझच्या मूर्ती मी पाहिल्या तेव्हा आर्यन किंवा द्रवीडियन असा त्यांच्या शैलीत काही फरक आहे मला आढळले नाही. तंजाईहून प्रथम नालंदला व त्यानंतर नालंद विद्यापीठ संपुष्टात येऊ लागले तेव्हा परत तंजाईला अशा रितीने त्यावेळच्या कलावंतांनी स्थलांतर केले असावे अशी दोन्ही ठिकाणच्या कलाकृतींतील साम्य पाहिल्यानंतर माझी खात्री झाली. देशाच्या दक्षिण सीमान्तावरील कल्गुमलाईची मंदिरे तर आर्यन व द्रवीडीयन असा भारतीय कलाशैलीत भेद करणाऱ्यांना चांगलेच उत्तर आहे.

मथुरा, कल्गुमलाई व खजुराव येथील अनुक्रमे पाचव्या, नवव्या व बाराव्या शतकातील शिल्पांतील सुरसुंदरींची मला या संदर्भात आठवण होते. त्या एकाच शैलीतल्या बहिणी-बहिणी आहेत. या सुरसुंदरींनी काळाची वा स्थलाची कक्षा ओलांडून केलेल्या स्थलांतराचा कोणी इतिहास का लिहीत नाही? तसेच त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या जनतेचा व शिल्पकारांचाही इतिहास कोणी का लिहू नये? तसा कोणी इतिहास लिहिला तर भारतीय शैलीत आर्यन-द्रवीडियन असा फरक आहे असा घाईघाईने तो निश्चितच निर्णय घेऊ शकणार नाही.

भरवेगाने धावणारी गंगा व संथ यमुना हे भारतीय कलेचे दोन अत्यंत प्रिय विषय आहेत. सातव्या व आठव्या शतकातील वेरूळ, नवव्या शतकातील खजुराव येथील शिल्पांतील गंगा-यमुना आपल्या संपूर्ण वैभवानिशी चित्ररूपाने वाहात आहेत. त्याची वैभव-यात्रा अखंड चालू आहे. विवाहित प्रौढ स्त्रीप्रमाणे काहीशी भासणारी गंगा आणि काहीशी अवखळ यमुना आपापल्या मूळ प्रवृत्तीनुरूप वहात असतात. पण सतत बरोबरीने वाहणाऱ्या या दोन बहिणी पाहणाऱ्याचे मन एका न सुटणाऱ्या कोड्याने गोंधळून टाकत असतात.

आर्यन व द्रवीडियन असा भारतीय कलाशैलीत फरक आहे असे सांगितले जाते. पण या विधानाचा अर्थ तरी काय? आपले विधान सिद्ध करण्यासाठी तज्ञमंडळी असे सांगतील की पश्चिमेकडील देवळांचे कळस गोलाकार, फुगीर व काहीसे सजवलेले आहेत तर दक्षिणेतील देवळांची छपरे सपाट आहेत. एकाच शैलीतील तपशीलाचा हा किरकोळ फरक आहे. त्यालाच आर्यन व द्रवीडियन यांच्यातील भिन्नत्वाची संज्ञा देणे बरोबर नाही. हे फरक स्थानिक स्वरूपाचे आहेत. आणि त्यामुळेच ते एकमेकांहून वेगळे वाटतात. भारतीय कलावंतांनी स्थल व कालमर्यादा उल्लंघून देशाच्या आत्म्याच्या बरोबरीने जे भ्रमण केले त्याचेच हे फरक खरे पाहता प्रतीक आहेत. आपले अज्ञान लपविण्यासाठी किंवा आपले विषमय हेतु साध्य करण्यासाठी युरोपीय विद्वानांनी व मिशनरी पंडितांनी भारतीय कलेत भेदाभेद करणारी आर्यन-द्रवीडियन ही परिभाषा मुद्दाम रूढ केली आहे. क्लासिक पीरियडमधील ग्रीक व रोमन कला आणि त्या देशांच्या अगदी शेजारी असलेल्या फ्रान्स व जर्मनी या देशांतील गोथिक पीरियडमधील कला यामध्ये तर भारतीय शैलीतील फरकांपेक्षा कितीतरी अधिक फरक आहे. पण तेथे कोणी अशी भेदाभेदाची भाषा करीत नाही. भारतीय पांडित्य सनातनी वृत्तीचे आणि परकीयांची री ओढणारे आहे. आणि मानवी समाजाचे दुर्दैव असे की साम्राज्यवाद्यांनी जे सांगितले, लिहिले ते सर्व खरे समजून त्याला इतिहासकार चिरस्वरूप देत असतात.

इतिहास व कला यांच्या भारतीय अभ्यासकात अधिक समर्पणवृत्ति व कष्ट करण्याची तयारी असती तर त्यांनी अक्षांश–रेखांश यांच्या आड दडलेल्या भारतीय कलेच्या रहस्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला असता. कलावंतांनी केलेल्या स्थलांतराचा भारतीय कलेच्या एकात्मतेशी संबंध आहे हे तर त्यांना कळलेच असते पण इतरही अनेक गोष्टींचा उलगडा झाला असता. १३ व १७-१८; २० व २५ व २७ या अक्षांशांवरील आणि ७३ व ७५–७६; ७८–७९ व ८१–८२ या रेखांशांवरील भारतीय भूमि कलाकृतींच्या बाबतीत अत्यंत संपन्न आहे. उदाहरणार्थ २५ अक्षांश घ्या. या अक्षांशावरील अरवली व विंध्य पर्वत श्रेणीत भारतीय आत्मा सौंदर्यक्षेत्रात स्वच्छंदपणे विहार करीत आहे. अशा प्रकारचा भारतीय आत्म्याचा उत्फुल्ल आविष्कार कोणारक येथे व कदाचित् वरंगळ येथेच फक्त दृष्टीस पडतो.

कलावंतांच्या स्थानांतराची अनेक कारणे सांगितली जातात. तंत्र पंथाचे धार्मिकविधि हे त्यापैकी एक कारण होय. पण ते किरकोळ वाटते. देलवाडा,

चितोड व वरंगळ येथील मंदिरातील कलेत इतर कोणत्याही ठिकाणच्या कले-इतकीच उत्फुल्लता आहे. परंतु खजुराव व कोणारक इतकी लैंगिक उच्छृंखलता मात्र तेथे दिसत नाही. शरीरसुखाविषयीच्या विशिष्ट कल्पनेनून ही लैंगिक उच्छृंखलता निर्माण झाली असण्याची शक्यता आहे. तिला धार्मिक आधारहि मिळू शकतो. अगदी पुराणकालातील कलावंतांनीही स्त्री-पुरुष आलिंगन हा आपल्या कलेचा विषय बनविलेला आहे. कारण सौंदर्य व विषयवासना या दोन परस्पर-संलग्न वस्तु आहेत आणि निदान पुरुषाला तरी भूतलावर सर्वांत आकर्षक कांहीं वाटत असेल तर ते स्त्रीचे शरीर होय याची जाणीव भारतीय कलावंतांना व ऋषिमुनींना होती. तशी स्त्री-पुरुषांच्या सर्वच सामान्य आलिंगन प्रकारांत सौंदर्याची वेधक वक्रता आढळते. तथापि खजुराव व कोणारक येथील शिल्पां-मधील शृंगारचेष्टांत स्त्रीशरीराच्या विविध हालचाली जेवढ्या उत्तान स्वरूपात व्यक्त झाल्या आहेत तेवढ्या अन्यत्र कोठेहि नाहीत. कदाचित् सौंदर्याच्या शोधाचा कलावंतांचा तो सर्वोच्च प्रयत्न असेल.

खजुराव व कोणारक येथील मंदिरांच्या बाह्यांगावर स्त्री-सौंदर्य आणि मृगया किंवा संगीत अथवा स्वाभाविक दैनंदिन मानवी जीवन यासंबंधीची चित्रे खोद-लेली आहेत तशी ती मंदिरांच्या अंतर्भागातही कोरलेली आहेत; पण जरा सौम्य स्वरूपात. मंदिराच्या अगदी अंतरगाभाऱ्यांत संपूर्ण शांतता आहे. तेथील सूर्यमूर्ति निर्दोष व सरळ रेषांकनाच्या बाबतीत केवळ अजोड आहे. शिवमूर्ति अर्थात्‌च सारमय आहे. कोणारक इतका ठसकेदार स्त्री-सौंदर्याचा आविष्कार जगात कोठेही सापडणार नाही. कोणारक येथील शिल्पात संगीत गाणाऱ्या युव-तींची चित्रे जेथे आहेत तेथे एकदा मुद्दाम अलगद चढून त्या युवतींचे डोळे, ओठ आणि शरीराची सुंदर वक्राकार वळणे यांच्यावरून मी हात फिरवला. मला त्या वेळी असे वाटले, या मानवी युवती नसून पाषाणरूप घेतलेल्या अदृश्य स्वर्गीय आकृतीच आहेत !

अकराव्या ते तेराव्या शतकांमधील काळातील शिल्पांत आढळणाऱ्या या उत्फुल्लतेचे खरे कारण काय असावे ? सोमनाथची लूट दहाव्या शतकाअखेर झाली. त्यानंतर दोनशे वर्षांनी तरौरी येथे अखेरचा तडाखा बसला. मूर्तिभंजक परकीय आक्रमकांनी अत्याचार केले आणि ते विजयीही झाले. सोमनाथ व तरौरी येथील अत्याचारांनी तत्कालिन पूर्वजांना भविष्यकालातील घटनांची चाहूल लागली असावी. आणि त्यातूनच आंतरिक शांति मिळविण्यासाठी त्यांनी बाह्यात्कारी सौंदर्याची साधना आरंभिली असावी. त्यांची कदाचित् अशीही

कल्पना असेल की, या मार्गाने भावी संकट टळेल.

कोणारक व वरंगळ येथील शिल्पे हा आमच्या पूर्वजांनी भावी संकटाची चाहूल लागल्यानंतर नित्याप्रमाणे लटके बळ आणण्याचा केलेला अखेरचा प्रयत्न होता. देलवाडा, चितोड, खजुराव येथील शिल्पेही याच प्रयत्नाची द्योतक आहेत. या प्रयत्नांची भारतीय इतिहासकारांनी उपेक्षा केली आहे. पण हा प्रयत्न हा देखील एक इतिहास आहे आणि तो महान्ही आहे. दांतीया येथे एका चोरांच्या टोळीच्या नायकाने सुमारे सातव्या शतकात एक विलक्षण सुंदर राजवाडा बांधला आहे. तो २५ व्या अक्षांशावरच आहे. एका परकीय समीक्षकाच्या मते तो भारतीय वास्तुशिल्पाचा सर्वोत्कृष्ठ नमुना आहे. त्याचा आकार स्वस्तिकासारखा आहे. बालचित्रकाराची एखादी असाधारण कलाकृति पाहिली की जसा कौतुकमिश्रित आनंद होतो तसा आनंद चोरांच्या एका नायकाने ' राजवाडा ' म्हणून बांधलेल्या या वास्तुमुळे होतो.

तर्कानुमानपद्धतीने भारतीय कलाकेंद्रांच्या स्थानांसंबंधीचा आलेख तपासला तर भारतीय कलाकार कोठे जाऊन राहिले होते हे सहज लक्षांत येईल. सोमनाथाच्या लुटीनंतर कलावंतांनी पूर्वेला १ किंवा २ रेखांशावरच्या म्हणजे ५०-६० मैलांवरील आणि उत्तरेकडील ४ अक्षांशावरच्या म्हणजे अंदाजे २८० मैलांवरील देलवाडा व चितोडकडे स्थलांतर केले असले पाहिजे. हलेबीड व बेलूर येथेही ते गेले असतील असे कोणी म्हणेल पण ते उघड उघड अशक्य वाटते. कारण हलेबीड व बेलूर येथील मंदिरांतील अकराव्या शतकातील कलाकृती या महाबलीपूरम, अजंठा-वेरूळ, सांची, मथुरा, ऐहोल येथील सहाव्या शतकातील कलाकृतींसारख्याच आहेत. जणू काय सोमनाथच्या लुटीचा कलावंतांना पत्ताच नव्हता. हलेबीड व ऐहोल ही ठिकाणे तर एकमेकांच्या जवळ आहेत. त्यामुळे हलेबीड येथील शिल्पशैली व ऐहोलची शैली एकसारखीच आहे हे मानायला हरकत नाही. सहाव्या—सातव्या किंवा नंतरच्या शतकांतील शिल्पांच्या मानाने हलेबीड व बेलूरची शिल्पे निश्चितच छोटी आहेत. पण ती सुंदर आणि नाजुक आहेत.

सारेच कलावंत आपापली गांवे सोडून गेले असतील असे अर्थात्च म्हणता येणार नाही. काहींनी दुसरा व्यवसाय पत्करला असेल; काहींनी विजेत्यांशी जमवून घेतले असेल; आणि काहींना मृत्युदंडही भोगावा लागला असेल. अशीही शक्यता आहे की काही प्रमुख कलाकारांनी स्थानांतर केले असले तरी त्यांच्या जातीतले किवा कुटुंबातले इतर कलावंत मात्र होते तेथेच राहिले.

कोसंबी, सारनाथ व पाटलीपुत्र येथून कृष्णातीरावरील अमरावती व विजय-

पुरी या ठिकाणी काही कलावंत गेले होते याला आधार सापडतो. काही कलावंतांनी आपले भाग्य उजळण्यासाठीही स्थानत्याग केला असण्याची शक्यता आहे. विजयपुरीहून भुवनेश्वरला याच कारणासाठी कलावंत गेले असतील.

भारताच्या वायव्येकडील अत्यंत पुरातन कलाकृति व वास्तुशिल्पे मी दुर्दैवाने पाहू शकलेलो नाही. तरुणपणी मला भारताच्या वायव्य विभागाचे आकर्षण वाटत नसे. तेथूनच देशावर आक्रमणे झाली या जाणीवेमुळे कदाचित् असे झाले असेल. माझी कल्पनाशक्तीही अतिशय कमजोर आहे. त्यामुळे मी प्रत्यक्ष न पाहिलेल्या वस्तूंचा अर्थ मला नीट समजत नाही, किंवा माझ्या भावना त्या उचंबळून आणीत नाहीत. वायव्य विभागांतील तक्षशिल, मोहंजदारो व हडाप्पा येथील प्राचीन अवशेष यापैकीच होत. यापैकी तक्षशिल व हडाप्पा हे अवशेष ७३ व्या अक्षांशावर आहेत. भारतीय कलेच्या उत्कर्षाचे अक्षांशाचा हिशेबाने हे दुसरे महत्त्वाचे क्षेत्र आहे. आता या तिन्ही वास्तु दुसऱ्या शासनाखाली असल्या तरी भारतीय वास्तुशिल्पाची ती अतुलनीय स्मृतिचिन्हे आहेत.

भारत हा जगातील अत्यंत पुरातन देश आहे. तरीही तीन हजार किंवा त्यापेक्षा प्राचीन काळातील फारच थोडे अवशेष येथे सांपडतात. याचे कारण गंगा–यमुना नद्यांनी केलेला संहार. याच भूमीत खरे म्हणजे त्या 'महा–काला'ने आपले वास्तव्य केले. परंतु त्याचे मंदिर मात्र, एकवेळ भारताची राजधानी असलेल्या माळव्याच्या मैदानात, उज्जैनीत उभारले गेले. कारण या 'महाकाला'ने गंगा–यमुना खोऱ्यांतील सारे अवशेष नष्ट केले आणि दिसणार नाहीत इतके खोल गाडून टाकले. या भूक्षेत्राच्या उत्तरेस भारतीय इतिहासाचे काहीही अवशेष सांपडलेले नाहीत. निदान अद्याप तरी दिसलेले नाहीत. याच भूमीत आपले अतिप्राचीन पूर्वज रहात होते. कदाचित् त्यांच्या कलेची स्मृतिचिन्हे तेथे लपून असतीलही. अयोध्येमध्ये जमिनीचे असेच काही उंचवटे मला दिसले. त्याचे उत्खनन झाले पाहिजे.

शृंगार व बौद्ध जीवन यांच्याशी संबधित उत्खननित शिल्पे व कलाकृती यापैकी अगदी अलीकडील एक म्हणजे कोसंबी येथील कलाकृती. या पाषाण वास्तूचा काही भाग तर इतर कोणत्याही वास्तूपेक्षा विशाल आहे. बुद्धपूर्व एक हजार वर्षांपूर्वीचे म्हणजेच सुमारे पस्तीसशे वर्षांपूर्वीचे हे शिल्प असेल. स्फटिकशिला येथे मंदाकिनीच्या किनाऱ्यावर एक सपाट शिला आहे. तिचा रंग चकचकीत तपकिरी किंवा शिसवी आहे. ही शिलादेखील एक पुराणकालिन अवशेष आहे असे सांगतात. ही कदचित् कपोकल्पित कथाच असेल. या कथेनुसार याच



नर्तकी

पार्श्वनाथमंदिर–खजुराव

शिळेवर सीता-लक्ष्मणासह राम बसले होते आणि रामाने सीतेसाठी शेला येथेच विणला. मानवाने खोदलेल्या पाषाणशिल्पांपैकी सर्वात जुने शिल्प मिर्झापूर येथे आहे. सुमारे दहा हजार वर्षांपूर्वीचे तरी ते असेल.

अजंठा लेण्यांतील रंगचित्रांसंबंधी ओझरता उल्लेख मी केला असेल तेवढाच; बाकी प्राचीन जलरंग व तैलरंगचित्राविषयी मी फारसे संशोधन केलेले नाही. अजंठ्यापासून जवळ माळव्यात बाघ या ठिकाणच्या लेण्यात अशी काही चित्रे आहेत. नृत्य, संगीत व युवकयुवतींच्या हर्षक्रीडांसंबंधीची चित्रे तेथे पहावयास मिळतात. माळव्याच्या कलेच्या लौकिकाला शोभतील अशीच ती अप्रतिम आहेत. सुंदर वस्तूंचा नाश करण्याची माणसाला हौसच असते की काय कोण जाणे! खेडेगावांतील या प्रवृतीच्या मूर्ख लोकांनी बाघ लेण्यांतील चित्रांचा विध्वंस करून टाकला आहे.

भारतीय पाषाणशिल्पाच्या तुलनेनें अथवा वास्तुशिल्पाइतकी भारतीय रंगचित्रकला श्रेष्ठ दर्जाची नाही हे मात्र खरे. जगात सर्वश्रेष्ठ तर ती निश्चितच नाही. याचे एक कारण संभवते. ते जसे की ज्या काळात युरोपमध्ये चित्रकला अत्युच्च शिखरावर चढत होती ( आजही आहे ) त्याच वेळी नेमके भारत फूट व विनाश यांच्या फेऱ्यात सांपडला होता. मला थ्री–डायमेन्शनल चित्रकला टू–डायमेन्शनल चित्रकलेपेक्षा अधिक आवडते. हे कदाचित् माझ्यावर उल्लेखिलेल्या मताचें दुसरे कारण असू शकेल. थ्री–डायमेन्शनलचे मला इतके आकर्षण आहे की, मी अनेकदा एका उजाड देवळाच्या शिखराकडे, एखादा तरुण आपल्या प्रेयसीकडे पहातो तसे, दूर अंतरावरून, झाडाझुडपांमधून ते कसे दिसते ते पुनः पुनः पाहिले आहे. अर्थात् काही नाजुक मोंगल व रजपूत कलेतील चित्रे व त्यांच्या छोट्या प्रतिकृती रोचक आहेत. फक्त एकदा अशा एकाच चित्राने मी प्रभावित झालो होतो. ते कोणत्या काळातील असावे ते सांगता येत नाही. स्नानगृहातून बाहेर पडणाऱ्या स्त्रीची साध्या रेषांनी अंकित केलेली ती प्रतिकृती होती. माझ्या खोलीत ते चित्र टांगले होते. भूमिगत असल्याने त्या खोलीबाहेर मी कोठे जाऊ शकत नव्हतो.

सुंदर वस्तूचा विध्वंस करण्याच्या प्रवृत्तीमुळे पुष्कळ उत्तम प्रतीच्या प्राचीन वस्तूंचा नाश झाला आहे. पण त्याहिपेक्षा वाईट गोष्ट अशी की, कलेची नवनिर्मितीही त्यामुळे अडखळली. परकी माथेफिरू मूर्तिभंजक व स्थानिक मूर्ख लोक यांच्याप्रमाणेच काळ व हवामान हेदेखील या विनाशाचे एक कारण आहे. मूर्तिभंजक परकीय आक्रमक एतद्देशीय बनल्यानंतर त्यांनी अनेक सुंदर वास्तु

बांधल्या. त्यापैकी काहींचा उल्लेख मागे आलाच आहे. देशातील अत्युत्कृष्ट वास्तूंपैकी त्या आहेत. या संदर्भात मी आणखी दोन वास्तुशिल्पांचा उल्लेख करतो. एक म्हणजे मांडवगडावरील सुंदर महाल व उघडे प्रेक्षागार. आणि दुसरी महान् वास्तु म्हणजे ताजमहाल. या वास्तु जनतेला तर अतिशय प्रिय आहेतच, पण जात्याच त्या सुंदरही आहेत.

सध्या भारतातील ऐतिहासिक अवशेषांचा व महान प्राचीन कलाकृतींचा व त्यांच्या आत्म्याचा नाश करण्याचा सपाटा चालू आहे. आपल्या आजच्या शैक्षणिक व संघटनात्मक क्षेत्रातील कामगिरीची जाहिरात करण्यासाठी प्राचीन कलावस्तूंचा व अवशेषांचा गैरवापर केला जात आहे. घाईघाईने येणारे परकी हौशी प्रवासी मोठ्या संख्येने या केंद्रांना भेटी देत असतात. अर्थातच लुप्त प्राचीन युगाशी विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठीही काही देशी व परदेशी प्रेक्षक तेथे जात असतात. अनेक अवशेषांच्या व कलाकृतींच्या रक्षणाची काळजी घेतली जात नाही. उदाहरणार्थ वाराणसी येथील १८ व्या शतकातील मंदिर. सोमनाथचीहि अशीच कदाचित पैशाभावी व रोगट मनोवृत्तीमुळे उपेक्षा होत असेल. अयोध्या येथील एका उंचवट्याचा मी मागे उल्लेख केलाच आहे. जेथे उत्खनन करणे जरूर आहे असे आणखी एक ठिकाण मथुरा जिल्ह्यातील कटारा केशवदेव येथे आहे. मथुरा अठरा वेळा लुटली गेली. जगातील हा उच्चांक असावा. कटारा केशवदेव येथे एक कृष्णमंदिर आहे. मुसलमानांचा एक इदगाहि आहे. दोन्ही धर्मीयातील अंधधर्मभावनांनी केलेला हा उद्योग असेल. एक शक्तीच्या मदातून जन्मलेला व दुसरा अडाणीपणातून उद्भवलेला. वास्तविक त्यांनी या जागी उत्खनन करून भूमीच्या उदरात कदाचित् पडून असलेले प्राचीन भारतीय कलेचे धन शोधून काढणे अधिक योग्य झाले असते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही धनाढ्य व्यक्तींनी प्राचीन कलेची नक्कल करणारी खाजगी मंदिरे बांधली आहेत. काही निकृष्ट दर्जाचे पुतळेहि घाईघाईत सार्व-जनिक ठिकाणी उभारण्यात आले आहेत. खेड्यातील मूर्ख विध्वंसक व षंढ सुसंस्कृत लोक आपल्या पूर्वजांनी निर्मिलेल्या कलाकृतींचे जतन तर करू शकले नाहीतच; पण नवनिर्मितीही करू शकले नाहीत. नवनिर्मिती हे स्वतंत्र व समर्थ जीवनाचे प्रतीक होय.

● ● ●

# आंतरिक एकता

भारतातील पुराणे, इतिहास किंवा तीर्थक्षेत्रे याद्वारे हिंदुस्थानची आंतरिक एकता सिद्ध करण्याचा थोडासा प्रयत्न आतापर्यंत झालेला आहे. पुराणातील किंवा इतिहासातील महत्त्वाच्या व्यक्तींची जनमानसावर जी पकड आहे ती मला मुळीच कमी लेखावयाची नाही किंवा देशभर पसरलेली तीर्थक्षेत्रे आणि प्रवास स्थळे यांचा ऐक्याच्या कामी झालेला उपयोगहि मी कमी लेखत नाही. ही स्थळे देशाच्या चारी दिशांना पसरलेली आहेत. भारतीय जनतेची प्राणभूत एकता साधण्याच्या संदर्भात पूरक ठरणाऱ्या अन्य काही मार्गांचे मला केवळ कथन करावयाचे आहे. या बाबतीत मानववंशशास्त्रज्ञ, भूगोलतज्ञ आणि इतिहास-संशोधक बरेचसे कार्य करू शकतात. पण या विषयावर खूप माहिती असलेली पुस्तके त्यांना उपलब्ध नाहीत आणि त्यांच्या वाचनालयातही तशी पुस्तके नहीत. किंवा अशा प्रकारचे संशोधन करण्याची प्राथमिक प्रेरणा देखील त्यांचे-पाशी नाही. म्हणूनच त्यांनी खूप प्रवास केला पाहिजे आणि जनतेकडून जुन्या आणि नव्या लोककथा मोठ्या रुचीने ऐकावयास पाहिजेत आणि अर्थातच जनतेच्या आणि सामान्य माणसांच्या सुप्त एकतेपुढे त्यांनी आपली मने खुली केली पाहिजेत.

'शबरी' ही एक काल्पनिक कथा आहे. या स्त्रीने पहिल्यांदा दंतक्षताद्वारे

ग्रंथ ठाणे. स्थलप्रत



हडप्पा
इ. स. पूर्व ४०००



मोहोंजदारो
इ. स. पूर्व
२ रे शतक

सांकेतिक लिपी

बोरे गोड आहेत की नाहीत हे पाहून ती उष्टी बोरे रामाला दिली असे सांगतात. २५०० वर्षांपूर्वी ही कथा पहिल्यांदा लिहिली गेली. आणि ती कपोलकल्पित नसून सत्य घटना असेल तर ती सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी घडली असावी. अलीकडे शबरी काही जिज्ञासू संशोधकांच्या संशोधनाचा विषय बनली आहे. सीता समजून ज्या स्त्रीला रावणानें चुकीने लंकेला नेले ती हीच स्त्री होय असे देखील मानण्यात येते. हिला रामाची खास मित्र ठरविण्याचा प्रयत्न केला जात आहे. काहीतरी असामान्य बंधनाने बांधले गेल्याशिवाय कोणीहि स्त्रीपुरुष एकमेकांचे उच्छिष्ट खात नाहीत.

जवळपास हजार वर्षांपूर्वी जगन्नाथ ही देवप्रतिमा ज्या वन्य जमातीकडून घेण्यात आली, त्या जमातीतीलच शबरी होती असे सांगण्यात येते. ती जमात ओरिसातील एक पहाडी आदिवासी जमात होती. ओरिसाच्या शेजारच्या, मध्य प्रदेशात अशीच कथा रूढ आहे. ही रामाची शबरी त्या मध्यप्रदेशातील एक आदिवासी होती. या शबरीचा देव जगन्नाथ. त्याच्या चोरीची कथा देखील फारच अद्भुत आहे. पठारावरच्या राजाने आपल्या सर्वांत हुशार मंत्र्याला आदिवासी राजाकडे पाठविले. हा मंत्री आणि आदिवासी राजाची कन्या यांच्यात प्रेम अंकुरले आणि प्रसंगवश जगन्नाथाची चोरी झाली. अजूनपर्यंत पुरीच्या या जगन्नाथाची पूजा ब्राह्मण पुजाऱ्यांच्या बरोबरीने अब्राह्मण पंड्यांकडून करण्यात येते. या समाजातील पंड्यांना शबरी पंड्या म्हणतात. देव जेव्हा आजारी असतो असे समजले जाते त्या पंधरवड्यात हे शबरी पंड्या पूजा करतात.

या शबरीचा उल्लेख अगदी दक्षिणदिशेकडेही होतो. केरळातील एक सर्वांत पवित्र देऊळ म्हणजे शबरीमलाईचे होय. तेथे लूटालूट झाल्याचे वृत्त असल्याने तर ते अलीकडे अधिकच प्रसिद्धीस आले आहे. काळे उपरणे पांघरलेल्या यात्रेकरूंचे थवे प्रतिवर्षी, एका विशिष्ट काळी या शबरी पर्वतातील शबरी मंदिरात जातात.

निःसंशयपणे भारतीय जनतेतील एका फार प्रचंड जनसमुदायाचे शबरी नाव असले पाहिजे असे दिसते. हे लोक जवळपास साऱ्या देशभर पसरले असावेत. आणि सांप्रतच्या भारतीय समाजात ते पूर्णपणे मिसळूनही गेले असावेत. त्यांचे खास वंशज नसावेत. सारी भारतीय जनताच त्यांची वंशज आहे; आणि अशा या शबरीचा उल्लेख पुराणे, भूगोल, इतिहास किंवा रीतीरिवाज याद्वारा अति उत्तरेकडच्या अयोध्येत आणि त्याचप्रमाणे अति दक्षिणेकडच्या केरळमध्येही होत असतो.

पोरबंदरजवळच्या मेहेर यांनाही सांप्रत मागास जातीचे किंवा आदिवासी गटाचे मानण्यात येते. एका गटातील स्त्रिची दुसऱ्या गटाच्या स्त्रीबरोबर सौंदर्याच्या बाबतीत तुलना करणे चुकीचे आहे. कारण इतरांच्याप्रमाणे सौराष्ट्रांतील देखील सर्व स्त्रिया सुंदर आहेत. पण तरीहि मेहेर स्त्रीची शरीरयष्टि जणू स्वर्गात घडविल्याप्रमाणे अत्युत्कृष्ट आहे. त्यांची पोलकी दोन किंवा तीन भडक आणि चकाकणाऱ्या रंगांनी तेजाळलेली दिसतात.

हिंदुस्थान–पाकिस्तान सरहद्दीजवळील राजस्थानच्या अतिपश्चिमेकडे या मेहेरनाच माहेर म्हणतात. त्यांना मी पूर्वीच पाहिले आहे. पश्चिम सरहद्दीवरील सिंधी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुस्लीमांमधील राजस्थानचा हा मेहेर किंवा माहेर सर्वांत मोठा गट होय. राजस्थानमध्ये मी पाहिलेल्या अशा मेहेर स्त्रिया वेगळ्या होत्या. त्या फारशा सुंदर नव्हत्या आणि ऊनवाऱ्याचा परिणामही त्यांच्या कातडीवर झालेला दिसत होता. पण त्यांची कृशकठोरता देखील कमी आकर्षक नव्हती. या दोन्ही गटांमध्ये काहीतरी साम्याचा धागा असला पाहिजे. तो मग त्यांचें न शिवलेले पण ऐटबाजपणे गुंडाळलेले साडीवजा वस्त्र असो की त्यांच्या डोळ्यातील अथवा त्यांच्या चेहऱ्यावरील खास विशेषता असो. राजस्थानच्या मेहेर मुस्लीम आहेत आणि सौराष्ट्रांतील मेहेर या हिंदु आहेत अशी खात्री करून घेण्यासाठी मला तीन चार वेळा त्यांना विचारावे लागले.

सौराष्ट्रांतील बघेर वा बगेर आणि मध्यप्रदेशातील बघेल या नावातील साम्याकडे मी लक्ष वेधू इच्छितो. हे नाव वाघापासून घेतलेले दिसते. परस्परांशी संबंध नसलेल्या अशा भिन्न गटांनी शूरपणाच्या आकर्षणानें हे नाव घेतले असल्याची देखील अगदी शक्यता आहे. या बघेर किंवा काबांबाबत साऱ्या सौराष्ट्रात एक म्हण प्रचलित आहे. त्यातील तत्त्वज्ञान तर वेधक आहेच पण त्यामुळे हिंदुस्थानातील जवळपास सर्व भाषांतील एकात्मकताही स्पष्ट जाणवते. कृष्णाच्या मृत्यूनंतर सौराष्ट्रातील चोर दरोडेखोरांच्या विरुद्ध लढण्यांत अर्जुन हतवीर्य झाला. या दरोडेखोरांनी त्याच्यावर, त्याच्या संपत्तीवर आणि स्त्रीयांवर हल्ला केला. महाभारतातील महान् युद्धात विजय मिळवून देणारी सर्व शस्त्रास्त्रे त्याचेपाशी होती. म्हण अशी आहे की शक्ती व्यक्तीशी नव्हे तर काळाशी निगडीत आहे. म्हणीचा शेवट असा आहे कीं, “ अर्जुन काबा लुटियो, वही धनुष, वही बाण.” ही भाषा हिन्दी किंवा ब्रिज अथवा अवधी नसून गुजराथीच आहे यावर विश्वास ठेवणे कठिण आहे.

सौराष्ट्रात मला सैतवार नावाची एक जात आढळली. बिहार, उत्तर प्रदेशात

याच नावाची एक जात आहे. मागास जाती आणि आदिवासी जमाती यांच्या संशोधनाकडे पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही. असें संशोधन म्हणजे एका सोन्याच्या खाणीचे उत्खनन आहे. कारण हिंदुस्थानच्या भूतकालाचा शोध हेच त्याचे भविष्यकालीन पुनरुज्जीवनही आहे.

कडप्पा या तेलगु शब्दाचा अर्थ माहीत झाल्यापासून तर माझा विश्वास अधिकच बळकट झाला आहे. अर्थात त्याच बरोबर माझा काहीसा गोंधळही उडालेला आहे. तेलगूतील कडप्पा किंवा गडप्पा यांचा अर्थ संस्कृतमधील देहेली किंवा पर्शियनमधील देहेलिजप्रमाणेच उंबरठा असा आहे. उत्तरेकडील दिल्ली हा खरोखरच दक्षिणेकडून येणाऱ्या सर्व टोळ्या आणि विजेते यांचा उंबरठाच होता. आंध्र देशातील कडप्पा हा देखील कोणाचा तरी उंबरठा असेल. इतिहासात पहिल्यांदा हे नाव केव्हा आले हे मला माहीत नाही. आणि म्हणून मी काही अनुमान काढू शकत नाही. पण तरीही काहीतरी वेगळे आणि रोमांचकारी निष्कर्ष निघू शकतील. मथुरा आणि चितोड यांचा दिल्ली हा उंबरठा होय. त्याचप्रमाणे मदुरा आणि चित्तूर यांचा कडप्पा हा उंबरठा होय. चितोडचे चित्तूर होणे किंवा मथुरेचे मदुरा होणे अथवा त्याच्या उलट सुलट होणेही आश्चर्यजनक नाही. त्याच त्याच घटना आणि व्यक्ती असलेले नाटक पुन्हा निर्विवादपणे घडलेले असावे. हे नाटक पहिल्यांदा उत्तरेकडे की दक्षिणेकडे घडले यात मला मुळीदेखील रुची नाही. ती घटना पुन्हा घडली याचेच मला महत्त्व वाटते. दिल्लीपासून मथुरा आणि चितोड यातील अंतर कडप्पा ते चित्तूर आणि मदुरा इतकेच आहे.

आदिवासी आणि मागास जाती यांच्या संशोधनाप्रमाणेच भारतातील लिप्या या देखील भारतीयांची सारभूत एकता सिद्ध करतात. भारतातील लिप्या ही नागरी लिपीचीच अदलतीबदलती स्वरूपे आहेत. प्रत्येक गोष्टीवर सुंदरतेचा साज चढविण्याची दक्षिण भारतीयांची वृत्ती त्यांच्या लिप्यांमध्येही प्रकट झाली आहे. उरिया–बंगाल्यांनीही वर्तुळे व लपेटी यांनी नागरी लिपी सुंदर बनविण्याचा प्रयत्न केला. परंतु लिपी अथवा आंकडे यांना सुंदर बनविण्याचा प्रयत्न म्हणजे अपव्यय होय. शिक्षितांच्या या प्रयत्नाची परिणती राष्ट्रीय एकता दुर्बल होण्यात आणि राष्ट्राच्या वेळाची उधळपट्टी होण्यात झाली.

उर्दूव्यतिरिक्त सर्व भारतीय लिप्या या ध्वनि व आकार ह्या दोन्ही दृष्टींनी ९९ टक्के सारख्या आहेत. लिप्यांच्या जडणी–घडणीत काळ हा महत्त्वाचा घटक असतो. स्थळ–काळाची जादू मोठी विलक्षण आहे. आणि त्याचा भार-

तीय लिप्यांवर परिणाम झाला आहे. सर्व भारतीय लिप्यांतील साम्य शोधण्याचे कार्य हा एक अध्ययनाचा विषय बनला पाहिजे.

९० अंशाच्या कोनाने नागरी लिपी वळवल्यास कानडी अक्षर होते. तामीळ आणि बंगाली लिप्यात डावा कल आणि दोन रेषांनी जोडणे हा फरक आहे.

नागरी लिपी साऱ्या जगात शास्त्रीय लिपी आहे. अनेक लिप्या असणे हा राष्ट्रीय वेळेचा व्यर्थ व्यय होय. त्यांतूनच संकुचितपणा, स्वार्थ आणि हित-संबंध निर्माण होतात. नागरी लिपी देखील अधिक शास्त्रीय आणि काटकसरीची बनविली पाहिजे. वरची ओळ आणि एकूण सजावट हा शुद्ध अपव्यय आहे. वरची ओळ काढल्यास दाक्षिणात्य लिपीशी साधर्म्य भासू शकेल.

भारतीयांची एकता भारतातील शिल्पांद्वारेही प्रकट होते. दक्षिणेतील महाबा-लीपुरम्, मध्य हिंदुस्थानातील अजंठा–वेरूळ व सांची आणि उत्तरेकडे सारनाथ या सर्व सातव्या–आठव्या शतकातील शिल्पांत असलेले विलक्षण साम्य हा त्या एकात्मतेचा पुरावा आहे.

• • •

# राम कृष्ण शिव

राम, कृष्ण आणि शिव खरोखरच कधी होऊन गेले आहेत काय हा प्रश्न फारसा महत्त्वाचा नाही. कोट्यवधी भारतीयांच्या मनावर राम-कृष्ण-शिव यांच्या अनेक लहान मोठ्या कथा-कहाण्यांचा गेली शेकडो वर्षे जबरदस्त प्रभाव आहे, ही वस्तुस्थिती आहे. या तिघांइतक्या जनमानसावर प्रभुत्व असलेल्या अन्य व्यक्ती हिंदुस्थानच्या इतिहासात सापडणारच नाहीत. गौतम बुद्ध, अशोक, अकबर इत्यादी इतिहासकालीन व्यक्तींची नावे माहीत असणारे लोक फारतर शंभरात पंचवीस असतील. आणि या व्यक्तींसंबंधीच्या कथा-कहाण्या माहीत असणारे तर त्याहूनही कमी म्हणजे हजारात फार तर एक-दोनच असतील. पण पुराणकालातील राम, कृष्ण, शिव यांची केवळ नावेच नव्हेत तर त्यांच्या शेकडो कथा सर्वांना माहीत असतात.

राम, कृष्ण, शिव यांची नावे धर्माशी जोडलेली आहेत म्हणून काही केवळ त्या व्यक्ती लोकप्रिय झालेल्या नाहीत. मानवी जीवनातील आदर्श म्हणून या त्रिमूर्तीकडे भारतीय जनता पाहात आली आहे. जीवनातील प्रत्येक व्यवहाराच्या प्रसंगी या तीन व्यक्तींची जीवने आदर्श म्हणून जनतेच्या नजरेसमोर उभी असतात व कळत न कळत लोक या आदर्शांचे अनुकरण करीत असतात. विचारपूर्वक मानलेल्या आदर्शांपेक्षा अशा प्रकारचे न कळत स्वीकारलेले आदर्शच अधिक प्रभावी असतात. राम, कृष्ण, शिव या तिघांच्या केवळ आद-



**कोदंडराम**

दक्षिणभारत–१८ वे शतक

शांचे भारतीय लोक स्मरण करतात एवढेच नव्हे तर त्यांच्या अनेक लहान-मोठ्या कथा आणि त्याचे बारीक सारीक तपशीलही त्यांनी आठवणीत साठवून ठेवलेले असतात.

तसे तर प्रत्येक देशाला स्वतःचा असा इतिहास असतो. राजकीय, सामाजिक आणि अन्य घटनांनी तो बनलेला असतो. त्याची एक लांबलचक सांखळी असते. देशाची परंपरा अशाच घटनांनी बनते आणि तिचा त्या देशांतील जनतेच्या मनावर प्रभाव पडलेला असतो. परंतु या इतिहासकालीन घटनांबरोबरच परंपरेच्या या दीर्घ श्रृंखलेत दुसरी आणखी एक महत्त्वाची कडी असते. ती कडी म्हणजे काल्पनिक कथा–कहाण्यांची. हिंदुस्थानातील हितोपदेश व पंचतंत्र यातील गोष्टी हा त्यातलाच एक प्रकार होय. या कथा मोठ्या गोड आहेत. यातील माणसांची, पशुपक्षांची नावेही मोठी मनोहर आहेत. यातील एक गोष्ट मला आठवते. त्यात गंगदत्त नावाचा एक बेडूक प्रियदर्शन नावाच्या एका सापाला एका राजाच्या नोकराबरोबर निरोप पाठवितो. तो नोकर सापाला म्हणतो, "हे बघ, गंगदत्त काही इतका मूर्ख नाही. तो पुन्हा मुळीच विहिरीत उतरणार नाही. बुभुक्षित माणसाला धर्माचे बंधन नसते." हितोपदेश व पंचतंत्रातील अशा कथा मुलांची मने बनवित असतात. या कथांनीच हिंदुस्थानचें नीतिशास्त्र घडविले आहे. पण आता मी ज्या राम, कृष्ण, शिव यांची चर्चा करीत आहे, त्यांच्या कथा–कहाण्यांचा नीतिशास्त्राशी तसा प्रत्यक्ष संबंध नाही.

अशा महान् कथा–कहाण्यात देशातील माणसाचे हास्य आणि स्वप्ने कोरलेली असतात. हास्य आणि स्वप्ने या पेक्षा श्रेष्ठ अशी दुसरी कोणतीही गोष्ट नाही. राष्ट्र हसते तेव्हा ते प्रसन्न, समाधानी असल्याचे प्रतीक असते; त्यावेळी त्याचे काळीजही विशाल असते. राष्ट्र स्वप्न पहात असते तेव्हा ते आपल्या आदर्शांमध्ये रंग भरून कथा गुंफित असते.

उदात्त आशा-आकांक्षा, जीवनशक्ति असलेल्या अदम्य व्यथा आणि देशाचा प्रादेशिक आणि दैवी इतिहास यांची नोंदवही म्हणजे पुराणे. पुराणे म्हणजे निव्वळ लोककथा नव्हत की लघुकथा-कादंबरी नव्हत. लोककथेचा उद्देश मनोरंजनाचा असतो. पुराणांचा हेतु सर्वसमावेशक असतो. श्रेष्ठ पुराणकथा म्हणजे महाकाव्य व लोककथा, लघुकथा व कादंबरी, नाट्य आणि पद्य यांचा एकप्रकारचा मनोज्ञ संगम होय. पुराण म्हणजे कधी अंतच नसलेली कादंबरी, जनतेच्या रक्तमासाच्या पेशी. अशी पुराणेच सामान्य जनतेची समर्थ सांस्कृतिक

शक्तिकेंद्रे असतात.

धर्म आणि राजकारण, परमेश्वर आणि राष्ट्र वा जनता यांची गल्लत सर्व जगभरच सदासर्वदा होत आली आहे. परंतु भारतात ती जरा अधिक प्रमाणात झालेली आहे. एवढ्या खंडप्राय देशात ऐक्य आणायचे कार्य आपल्या पूर्वजांपुढे होते. या विलक्षण हेतूने देखील पुराणे रचण्यात आली असतील.

पुराणे ही महान् मानवतेची महान् गाथा आहे. सारी मानवजात एकमेकांशेजारी एकेकाळी राहात होती हे दाखवून देणारी आणि आता ती जात एकमेकांपासून विखरून दूर राहात आहे असे सांगणारी शोकांतिक आहे. पण विश्वव्यापकता स्थानिकतेतूनही बोलते हेही लक्षात ठेवले पाहिजे.

राम-कृष्ण-शिव या महान् व्यक्ती काही एका दिवसात घडलेल्या नाहीत. हजारो वर्षे हिंदी माणसे त्या व्यक्तींच्या काल्पनिक मूर्ती घडवीत आली आहेत. सामान्यपणे आपण असे समजतो की, राम-कृष्ण-शिव यांनी हिंदुस्थान बनविला आहे. एका मर्यादेपर्यंत ते खरेही आहे. पण त्यापेक्षा असे म्हणणे अधिक वास्तव आहे की, कोट्यवधी हिंदवासीयांनी युगानुयुगांच्या कालात, हजारो वर्षांत, राम-कृष्ण-शिव यांना निर्माण केले आहे. त्यांच्या व्यक्तित्वात आपल्या प्रसन्नतेचे, स्वप्नांचे रंग आम्ही भरले आणि त्यांतूनच या व्यक्ती आपण घडविल्या.

राम व कृष्ण हे विष्णूची रूपे आहेत तर शिव महेशाचे. भारतीयांच्या कल्पनेप्रमाणे राम व कृष्ण हे, जे जे चांगले व मंगल त्याचे रक्षण व पोषण करण्याचे प्रतीक आणि शिव हे वाईटाच्या व अमंगलाच्या विनाशाचे, संहाराचे चिन्ह आहे. या चर्चेत मी इथे पडत नाही. काही लोकांना असल्या गोष्टींतून अर्थ शोधून काढण्यात मजा वाटते. मी अशा प्रकारे अर्थ लावत बसणार नाही. त्यामुळे माझे कथन कदाचित निरर्थकही वाटण्याचा संभव आहे. पण ते जितके निरर्थक होईल तितके बरेच असे मला वाटते. हास्य व स्वप्ने अर्थशून्यच असतात. परंतु तरी देखील माणसाच्या मनावर त्याचा केवढा प्रभाव असतो ! त्याने माणसाचे अंतःकरण विशाल बनते. मानवाने आपल्या पुराणातील काल्पनिक कथांची उजळणी करून आपले हृदय उदार बनविले तर त्याहून अधिक हितकारी काय असू शकेल ?

राम-कृष्ण-शिव यांच्या व्यक्तिमत्वाच्या परिशीलनातून काही विशिष्ट राजकीय, सामाजिक अथवा तात्त्विक तात्पर्य काढावयाची माझी इच्छा नाही. हजारो वर्षे आमचे पूर्वज या तिघांच्या कथा–कहाण्यातून जे सांगत आले आहेत ते काय आहे तेवढे सांगण्याचा माझा प्रयत्न आहे.

रामाला मर्यादा पुरुषोत्तम म्हणतात. या त्याच्या नामाभिधानातच रामाचे सर्वश्रेष्ठत्व व्यक्त होते. राम मन मानेल तसं वागत नाही. त्याची शक्ती आबद्ध आहे; त्याच्या वर्तनाला रेखांकित परीघ आहे. नीती वा शास्त्र वा धर्म वा व्यवहार यांच्या परीघांत रामाची शक्ती मर्यादित आहे. आधुनिक शब्दात सांगायचे तर रामाने कायद्याच्या मर्यादा सांभाळल्या आहेत. विधानसभा व लोकसभेवर जशा घटनेच्या मर्यादा असतात; त्यांनी केलेल्या कायद्यांवर जसे घटनेचे नियंत्रण असते—तसे रामाने आपल्या वागणुकीवर व कार्यावर कशाचे तरी नियंत्रण मान्य केले आहे. हे नियंत्रण कोणते आणि ते रामाने का स्वीकारले या चर्चेत तूर्त आपण पडू या नको. राम अपूर्ण होता. जुने सनातनी लोक सुद्धा त्याला आठ कलांचा अवतार म्हणतात. आणि कृष्णाला सोळा कलांचा अवतार समजतात; संपूर्ण समजतात. दोघेही विष्णूचे अवतार. पण एकाला आठच कला तर दुसऱ्याला सोळा कला अवगत होत्या असे मानतात. वास्तविक एकदा अवतार म्हटल्यानंतर अपूर्ण कसले आणि संपूर्ण कसले? परंतु एकाला आठ व दुसऱ्याला सोळा कला येत होत्या असे म्हटले जाते तेव्हा तसे म्हणणाऱ्यांना त्यातून काही तरी निष्कर्ष काढायचा असतो असे मानले पाहिजे.

भागवतात एक मोठी वेधक कथा आहे. सीता हरवल्यानंतर रामाला अत्यंत दुःख झाले. जरा प्रमाणाबाहेर अधिक दुःख झाले. प्रमाणात झाले असते तर समजण्याजोगे होते. त्या प्रसंगी लक्ष्मण हे सारे पहात होता. रामाने उघडपणे अश्रु ढाळावे आणि वृक्षाशी बोलावे हे जरा विचित्र वाटते. राम एकांतात रडता तर ती गोष्ट वेगळी. पण लक्ष्मणाच्या देखत झाडाशी बोलणे आणि रडणे जरा अधिकच वाटते. कोणाला माहीत? कदाचित् वाल्मिकी व तुळसीदास यांना रामाच्या या कृतीद्वारे त्याचे थोरपण दाखवायचे असेल. वाल्मिकी व तुलसीदास यांच्यात फरक आहे. वाल्मिकीची सीता आणि तुलसीची सीता यांच्यात दोन ध्रुवांइतके अंतर आहे. गेल्या तीन-चार हजार वर्षांत सीतेचे व्यक्तित्व आपल्या देशाच्या वाङ्मयात कसे बदलत गेले आहे याचे संशोधन करून कोणी एखादे पुस्तक लिहिले तर ते किती मनोवेधक होईल! अशा प्रकारचे ग्रंथ लिहिले गेले पाहिजेत.

राम म्हणजे मर्यादित व्यक्तित्व पूर्णत्वास पोचल्याचे प्रतीक आहे. नियोजन, व्यवस्था व बाह्याचारावर कायदे-कानूंचे बंधन आणि अंतराचारावर स्वविवेक-बुद्धीचे नियंत्रण यांचा राम हा प्रतीक आहे. त्याच्या व्यक्तिमत्वाचे ही उभय

नियंत्रणे हे व्यवच्छेदक लक्षण आहे. राम हा उत्कृष्ट श्रोता होता. थोर माणसाने तसेच असले पाहिजे. रामाला मौनातील जादू माहीत होती. रामाचे व्यक्तिमत्व म्हणजे दुसऱ्याला आपल्यात सामावून घेण्यापेक्षा आपल्या मर्यादित व संयत व्यक्तिमत्वाची दुसऱ्यावर छाप पाडण्याची आणि विस्तारापेक्षा ऐक्यावर भर देण्यारी महान् कथा आहे.

मर्यादापुरुषोत्तम राम म्हणजे एक अद्‌भुत राजकीय व्यक्तिमत्व होते. रामराज्यातील कायदे व नियम यांचा आदर करण्याच्या हेतूनेच त्याने सीतेचा त्याग केला. अर्थात् कायद्याच्या, नीतिबंधनांच्या मर्यादा सांभाळण्याचा आणखीही एक मार्ग त्याला उपलब्ध होता. सीतेचा त्याग करण्याऐवजी रामाने राज्यत्याग करून परत सीतेसह वनवास पत्करावयास हरकत नव्हती. परंतु पुराणातील काय किंवा इतिहासातील घटनांविषयी काय अशी जर-तरची भाषा निरर्थक होय. अनिर्बंध व असंयत वर्तणुकीपेक्षां मर्यादांचे बंधन पाळणारे वर्तन हे नेतृत्वाच्या दृष्टीने कधीही श्रेष्ठच होय.

सीतेच्या विरहाने राम रडला तेव्हा चंद्र त्याला हसला; खूप हसला. म्हणाला, "पहा तर खरं ! वेडा कसा बायकोच्या विरहानं रडतोय ते !" विष्णूला याची चांगली आठवण होती. राम हा विष्णूचाच अवतार. त्याने पुढे कृष्णाचे रूप घेतले. तेव्हा एक दिवस हजारो गोपींच्या मेळाव्यात तो चंद्राला दिसला. तिथे कृष्णाने 'कृष्ण-लीला' रचल्या आणि रामरूपात असताना त्याला हसणाऱ्या चंद्राची चांगली खोड जिरवली. कृष्णाच्या गोपी किती होत्या, सोळा की बारा हजार, कोण जाणे ! परंतु एकेका गोपीबरोबर पुन्हा पुन्हा अवतीर्ण होत असे तेव्हा कृष्ण चंद्राकडे पाहून म्हणत असेल, "आता का हंसत नाहीस ?" पत्नीच्या विरहाने शोक करणाऱ्या रामाला हसणाऱ्या चंद्राकडे पाहून बारा-सोळा हजार गोपींचा सखा तो कृष्ण चंद्राला म्हणाला असेल, "आता का गप्प ? आता हस की जरा."

रामाने माणसारखे प्रेम केले. कृष्णाने केलेले प्रेम तसे होते की नाही याची मी चर्चा करीत नाहीं. कारण ती निरर्थक आहे. असल्या गोष्टींचा परिणाम, त्यातील खरेखोटेपणावर जोखला जात नाही; तर अशा गोष्टींनी मानवी मनावर किती प्रभाव पाडला आहे यावर परिणाम अजमावला जातो. कृष्णाने असे प्रेम केले की प्रियतमेच्या विरहाने शोक करण्याचा त्याच्यावर कधी प्रसंगच आला नाही. कारण त्याच्या प्रियतमा अमर्याद होत्या.

कृष्ण असत्य बोलतो, चोरी करतो, लबाडी करतो; अन्याय व अधर्म अशा

अनेक गोष्टी करतो. माझ्या या म्हणण्याचा, कृष्णाच्या खऱ्या भक्तांना राग येणार नाही. एखादा खोटा कृष्णभक्त कदाचित रागावेल. एकदा तुरुंगात एक मथुरेचे फार मोठे चौबे आमच्या बरोबर होते. आम्ही त्यांना कृष्णाच्या लबाडी-विषयी सांगू लागलो, की ते स्वतःच म्हणत, की कृष्ण तर 'माखनचोर' होता. आम्ही कृष्णाला लबाड म्हटले की ते कृष्णाच्या लबाडीची एखादी नवीन गोष्ट सांगत आणि आमच्या म्हणण्याला पुष्टी देत. कृष्णाचे खोटेपण, कपट, लबाडी आणि स्त्रीलंपटपणा यांच्या कथा ऐकून खरे म्हणजे खऱ्या कृष्णोपासकांना आनंदच वाटतो. असे का व्हावे ? कारण कृष्णाला सोळा कलांचा स्वामी मानण्यात आले आहे ना ? मग त्याच्या वागण्यास मर्यादा आणि नियोजन कसे असणार ? मनात येईल ते कृष्ण करणार ! कृष्ण ही एक अशी लोकसभा आहे की जिच्यावर कायद्याचे बंधन नाही, नियंत्रण नाही.

धर्माच्या विजयासाठी अधर्माबरोबर अधर्माने वागले पाहिजे या तत्त्वाचे कृष्ण हा प्रतीक आहे. यासंबंधीची फारशी उदाहरणे मी इथे देत बसत नाही. तुम्हीच ती आठवा. सूर्यास्त झाला नसतानाही कृष्णाने सूर्याला कसे झाकले; धर्मराजाला वाक्याचा अर्धा भाग मोठ्याने बोलावयास लावून दुसरा अर्धा भाग हलकेच त्याच्याकडून बोलवून कृष्ण असत्य कसे बोलला हे आपणच आठवून पहा. अशा तऱ्हेचे डावपेच तर कृष्णाने अनेक वेळा केले आहेत. सोळा कलांचा अवतारच तो ! कसलाच धरबंध नाही. पण राम मर्यादापूर्ण अवतार होता. आपल्या शक्तीवरील मर्यादांचे त्याने कधी उल्लंघन केले नाही. कृष्ण मर्यादाहीन अवतार ! पण याचा अर्थ असा नाही की, कुणी केवळ असत्य बोलून आणि कपट करून कृष्ण बनू शकेल. कृष्ण स्वतःच्या लाभासाठी किंवा 'रागा' साठी खोटे बोलला नाही. हिंदुस्थानात 'राग' असा एक चांगला शब्द प्रचलीत आहे- 'राग' म्हणजे भाव, आसक्ती, लोभ, क्रोध, असूया अशा अनेक रागांचे मानवी मनात वास्तव्य असते. भारतीय ग्रंथात भय, क्रोध आदि निरासक्त भावांची चर्चा आढळते. कृष्णाचे कपट, असत्य लंपटपणा, बदमाशी इत्यादि, अशा एका व्यक्तीची होती की ज्याच्या मनात स्वार्थ, लोभ, असूया, द्वेष किंवा स्पर्धा नव्हती. हे शक्य आहे की नाही हा महत्त्वाचा प्रश्न नाही. त्यांचा विचार सध्या सोडून देऊ. कृष्ण असे वागला या कल्पनेचा प्रभाव खरा महत्त्वाचा आहे. माणूस असा वागू शकेल ही गोष्ट शक्य कोटीतील आहे असे आपण मानले आहे. मला स्वतःलाही पूर्णपणे नाही तरी कोणत्या तरी रूपात ही गोष्ट संभवनीय आहे असे वाटते.

ठा. ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नोंद दि: ............



**वेणु गोपाळ**

ओरिसा १८ वे शतक

कृष्णाने जे जे केले ते पूर्णत्वाने केले, जीव ओतून केले. प्रेम पूर्णत्वाने केले, भोग पूर्णत्वाने भोगले. त्यागही पूर्णत्वाने केला. तो पूर्ण भोगी तसा पूर्ण त्यागी होता.

कृष्ण हा संपूर्ण पुरुष होता. कुतूहल व प्रसन्नता त्याच्या मुद्रेवरून कधी ढळली नाही. कृष्ण कधी रडलाच नाही. राम आपल्या प्रौढ वयात देखील दोनदा तरी रडला. कृष्णाने लक्षावधींना रडावयास लावले. कृष्ण हा श्रेष्ठ प्रणयीपुरुष होता. त्याने कृष्णसमर्पणाची भावना आपल्या भक्तात एवढी जागृत केली की आजही कृष्णभक्तात तिचा अनुभव येतो.

कृष्ण उन्मुक्त होता. त्याच्या कृतीची योग्यायोग्यता स्वयंसिद्ध नाही. मागची कारणे आणि पुढचे परिणाम यांच्या संदर्भात ती तपासावी लागते. कर्णाचे रथ-चक्र पृथ्वी गिळत होती तेव्हा कृष्णाने अर्जुनाला त्याच्यावर शरसंधान करण्याचा सल्ला दिला. द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळी कर्ण निमूटपणे तो लज्जास्पद प्रसंग पहात होता, म्हणून कृष्णाने असा सल्ला दिला असे याचे समर्थन करावे लागते. कृष्ण कर्णाला म्हणाला, "तेव्हा कुठे गेला होता तुझा धर्म, राधासुता ?" कृष्णाच्या कृतीला स्पष्टीकरणे द्यावी लागतात. वैयक्तिक जीवनात कृष्णाने आपल्या कृतीने जगाला थक्क केले. व्यावहारिक व लौकिक जीवन कसे जगावे याचा कायदा त्याने सांगितला.

आजकालच्या काळातील थोर व्यक्तींकडे पाहून देखील राम-कृष्णाची आठवण आपणास होत असेल. तशा कोणी व्यक्ती आज दिसत नसतील तर भावी काळात दिसतील. गांधीजींच्या मृत्यूनंतर एकदा माझा एक मित्र मला म्हणाला, "साबरमती किंवा काठेवाडातील नद्यांच्या पुत्राचे यमुनेच्या किनारी दहन झाले. आणि यमुनेच्या बालकाचे काठेवाडमधील नदीच्या किनारी दहन झाले." या दोन्ही प्रसंगांच्या काळात हजारो वर्षांचे अंतर आहे. काठेवाडी नदीचा पुत्र व यमुनेचा पुत्र या दोहोंमध्ये साम्यही नसेल. काही वर्षांपूर्वीपर्यंत माझ्याही ते लक्षात आले नव्हते. कारण गांधीजींनी स्वतः निरंतर रामालाच पूजिले. मृत्युसमयीही 'हे राम'च म्हटले. गांधीजींना कृष्ण व शिव प्रिय नव्हते असा याचा अर्थ नाही. परंतु गांधींना हिंदुस्थानपुढे महानतेचे एक सीमित चित्र ठेवायचे होते. म्हणून त्यांनी मर्यादा पुरुषोत्तमाचा आदर्श ठेवला. मर्यादा-पुरुषोत्तम राम म्हणजे स्वतःवर नीती, धर्म, व्यवहाराचे निर्बंध घालून घेणारी शक्ती होय !

गांधीजी देखील मर्यादा पुरुषोत्तमाप्रमाणे मर्यादेत राहून वागत असत असे

मला प्रारंभी पुष्कळ दिवस वाटत असे. माझे हे वाटणे ब्व्हंशी खरे होते, पण पूर्णांशाने मात्र नाही. कारण गांधीजींच्या व्यक्तिमत्वात कृष्णाचा आवेशही होता. गांधीजींची पत्रे, भाषणे आणि इतर साहित्य त्यांच्या मृत्यूनंतर आता एकदम एका मागोमाग वाचली की, परिस्थितिनुरूप आपल्या शब्दाचे अर्थ, व्याख्या गांधीजी कसे बदलत होते हे कळून येते. गांधीजी आपल्या विचारांचा पायाच बदलीत आहेत की काय असे वाटते. हे कृष्णाप्रमाणेच होते. कृष्ण आपल्या बोलण्याचा पायाच बदलत असे; राम मात्र नाही. युद्धकाळात गांधीजींनी दर सप्ताहास सतत जे लिहिले त्यातील सहा महिन्यातले लिखाण मी एकत्र एकाच वेळी वाचले. तेव्हा माझ्या लक्षात आले, गांधीजींचे बोलणे कसे बदलत होते ते. आज ज्या गोष्टीला गांधीजींनी अहिंसक म्हटले, तिलाच दोन तीन महिन्यांनी त्यांनी हिंसक म्हटले; आणि ज्याला आज हिंसक म्हटले त्याला उद्या अहिंसक म्हटले. प्रसंगविशेषी आपल्या संघटनेच्या धोरण-नियमांच्या पालनासाठी व आत्मीयांना मदत करण्याच्या हेतूने गांधीजी कधी कधी आपल्या मूलभूत सिद्धान्तात बदल करावयास देखील तयार असत. अर्थात असे त्यांनी फारच क्वचित् प्रसंगी केले हे लक्षात ठेवले पाहिजे.

गांधीजी फार वेळा कृष्णासारखे वागले असे मला वाटत नाही. थोडेफार वागले याचा अर्थ असा न्हे की गांधीजी आता माझ्या मनातून उतरले आहेत. कृष्ण कुठे मनातून उतरलाय ? माणसाने आपले निकष नेहेमी काटेकोर आणि निष्कलंक ठेविले पाहिजेत असे मात्र मी मानतो. माणसाने जे आदर्श स्वीकारले आहेत, तत्त्वे मानली आहेत, त्या आदर्शांची व तत्वांची तो अंमलबजावणी करतो की नाही याचा शोध जरूर घेतला पाहिजे. साधनांची शुचिता हा गांधीजींनी आपल्या जीवनाचा फार मोठा सिद्धांत म्हणून मानला होता. पण बिहारमधील भूकंपाला हिंदुस्थानातील जातिप्रथा कारणीभूत आहे असे सांगून ते जातिप्रथाविनाशाच्या थोर उद्दिष्टाच्या प्राप्तीसाठी असत्य बोलले नाहीत काय ? भूकंप, ग्रहनक्षत्रे, आभाळ, पाणी, सूर्य यांचा हिंदुस्थानातील जातिप्रथेशी खरोखरच काय संबध आहे.

राम मर्यादापुरुषोत्तम आहे तर कृष्ण स्वयंभू, अनिर्बंध आहे. शिवाच्या व्यक्तित्वात एक वेगळाच अविष्कार आहे. शिवकथेसारखी लांबी रुंदी जाडी, असलेली दुसरी कथा उभ्या जगात नसेल. एक फ्रेंच लेखकाने शंकराबद्दल एकदा म्हटले होते, "शिव म्हणजे एक नॉन डायमेन्शनल मिथ आहे." शिवाच्या व्यक्तित्वाला सीमा नाही, कक्षा नाही, लांबी नाही, रुंदी नाही की

गाडी नाही. जगातील सर्व देशात कथा—कहाण्या प्रचलीत आहेत. ग्रीससारख्या प्राचीन देशात तर अनेक कथा प्रचारात आहेत. कथा—दंतकथांशिवाय जगात एकही देश सापडणार नाही. देश जितका प्राचीन तितक्या तेथे अधिक कथा—दंतकथा. त्यातील काही कथा हितोपदेश व पंचतंत्रासारख्या नीतिकथा असतात, तर काही मानवाच्या जीवनात प्रसन्नता व स्वप्न रंगविणाऱ्या दंतकथा असतात.

शिवासंबंधी सुद्धा एक अशीच दंतकथा प्रचलित आहे. पुराणातील देव-देवता नेहेमीच आपापसात सतत भांडताना दिसतात. ब्रह्मा व विष्णु हे दोघे असेच एकदा खूप भांडत होते. तेव्हा शिवाने त्यांना सांगितले, " भांडू नका. जा बरं तुम्ही दोघे, माझे मस्तकाचे व पायाचे टोक शोधून घेऊन या. पहिल्यांदा जो येईल तो जिंकेल. " तशी शिवाचे मस्तक व पाय धुंडायला ब्रह्मा व विष्णु निघाले. अजूनही त्यांचे धुंडणे चालूच असावे. कारण दीर्घ कालानंतर, किती लाख वर्षे कोण जाणे, ब्रह्मा-विष्णु परत शंकराकडे आले आणि सांगू लागले, " हे बंधो, नाही सांपडले तुझं मस्तक आणि पाय. " त्यावर शिव म्हणाले, " मग उगाच का भांडत असता आपापसात ? " शिवाविषयीच्या या कथेतील काळाला काही सीमा आहेत काय ? तो असीम आहे. अशा कथा-दंतकथा जे नीर्मितात त्यांना त्याचे काळाशी काही अनुसंधाने ठेवण्याची गरज वाटत नाही. त्यांच्या दृष्टीने एका मिनिटाचा अर्थ एक कोटी वर्षे असावा.

कोणतीही शिवकथा ऐकली की माझ्या मनात एक विचार वारंवार येतो. जगातील सर्व इतिहासकालीन व पुराणकालीन महान व्यक्तीच्या कृती समजून घेण्यासाठी त्यांनी केलेली कर्मे व त्यांची फळे, घडलेली कारणे व त्याचे परिणाम यांचा विचार करावा लागतो. अशा लोकांच्या जीवनातील काही घटना इतक्या अद्भुत असतात, की त्यांचा एकदम अर्थच लागत नाही. अशा घटनांचा अर्थ समजून घेण्याकरिता त्या घटना घडण्यापूर्वीची कारणे शोधावी लागतात. आणि त्यानंतर घडलेला त्यांचा परिणाम तपासायला लागतो. असे केले तरच अशा घटनांचा अन्वयार्थ आपणास लागू शकतो. म्हणजेच कर्म व त्याचे फळ, कारण व त्याचा परिणाम याची एक सांखळी आपणास मानावी लागते. या साखळीतील एखादाच दुवा पकडून इतिहासातील किंवा पुराणातील एखाद्या व्यक्तीला कोणी चांगली किंवा वाईट ठरवू पाहील तर त्याची फसगत झाल्याशिवाय राहणार नाही. कारण या साखळीतील दुवे स्वतंत्र नसतात. कारण आणि फळ, कर्म व फळे असे ते एकमेकात गुंतलेले असतात. म्हणून इतिहासातील व पुरा-



**शिव**

दक्षिण भारत १६ वे शतक

णातील प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक प्रसंग समजून घेण्यासाठी या साखळीतील कारण व परिणाम या दोन्ही दुव्यांचा आधार घ्यावाच लागतो.

तथापि शिव हे एकच असे व्यक्तिमत्व आहे की ज्याच्या प्रत्येक कृतीचे औचित्य ती घडत असताना सिद्ध होत असते. शिवाच्या कृतीची कारणे शोधत बसावे लागत नाही; त्यातून निष्कर्ष काढीत बसण्याची आवश्यकता वाटत नाही. पुराणातील किंवा इतिहासातील इतर व्यक्तींची कृत्ये समजून घेण्यासाठी कार्यकारण-भावाचा आधार घ्यावा लागतो. राम व कृष्ण यांची कृती समजून घेण्यासाठीही असा आधार घ्यावा लागतो. परंतु शंकराच्या बाबतीत तसे नाही. मला तरी त्याचे असे एकही कृत्य आढळले नाही की त्या कृत्याची कारणे मला धुंडाळत बसावी लागली. त्याने असे का केले, त्यातून काय फळ निघाले याचा तपास करावा लागला नाही. शिवाच्या बाबतीत ही एक फार महान् गोष्ट आहे.

आजच्या जगात सामान्यतः सर्व लोक आपल्या प्रचलित समाजपद्धतींचे आणि आपल्या दुष्कर्मांचे समर्थन करताना असे सांगत असतात की, आज जरी आमच्या हातून काही चांगले घडत नसले तरी आमच्या कृत्यांचे भावी परिणाम चांगलेच घडणार असल्याने आमची आजची कृत्ये योग्यच होत. म्हणजेच हे लोक कर्म व फळ यांच्या दुव्यांची एक साखळी जगापुढे ठेवीत असतात. उद्याच्या फळांवरून आजच्या कर्मांचे मूल्यमापन केले जावे असे सांगतात. त्यामुळे माणसाच्या कामाला कोणती कसोटी असावी हे ठरविणे कठीण जाते. काय चांगले नी काय वाईट हे ठरवायला काही तरी निकष हे शेवटी हवेतच. कर्म व फळ, कारण व परिणाम यांचे असे दुवे जुळवीत आपण राहिलो तर मानवी आचरणासाठी निकषच ठरविता येणार नाहीत, आणि सर्वत्र स्वैराचार माजेल. कर्म व फळ यांची शृंखला जेवढी लांब तेवढी माणसाला मनःपूत आचरण करण्याची अधिकाधिक संधि मिळत जाईल. म्हणून आजच्या कृतींचा भविष्यकालीन उद्दिष्टांशी संबंध जोडायला आपण शिकले पाहिजे. उद्याच्या चांगल्या उद्दिष्टासाठी आज करावयाची कृतीही चांगलीच असली पाहिजे असा आग्रह धरला पहिजे. काहीशी अतिशयोक्ति होत असेल; पण मला असे सांगावेसे वाटते की जगाच्या राजकारणातील राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक घटनांचे औचित्य अथवा अनौचित्य भूतकाळातील किंवा भविष्यकाळातील परिणाम पाहून ठरवावे लागते. हे चांगले नाही. अश्वत्थाम्याच्या मृत्यूच्या-बाबतीत धर्मराजाच्या तोंडून कृष्णाने ' नरो वा कुंजरो वा'ची जी भाषा बोल-

विली त्याचे औचित्य वा अनौचित्य पूर्वी घडलेल्या कारणावरून किंवा भविष्य-काळात होणाऱ्या परिणामावरून ठरवावे लागते, हें वाईट आहे. परंतु नीळकंठ शंकराच्या कोणत्याही कृतीचे अशा पद्धतीने समर्थन वा खंडन करावे लागत नाही. त्याची प्रत्येक कृती स्वयंसिद्ध आहे. त्याच्या प्रत्येक कृतीत कारणे आणि परिणाम हे दोन्ही सामावलेले असतात. त्यामुळे ती कृती बरोबर आहे की चूक आहे याचा निर्णय तिथल्यातिथे करता येतो.

पार्वतीच्या मृत्यूनंतर शंकर गुरासारखा रडला. शंकराची महानता त्यात स्पष्ट होते. मृत पार्वतीचे कलेवर खांद्यावर घेऊन शिव सर्व देशभर फिरला. पार्वतीचे एकेक अंग झडून पडत होते. पण शंकराने तिचा शेवटचा अवयव जमिनीवर पडेपर्यंत तिचे कलेवर आपल्या खांद्यावर वाहिले. दृढ व चिरंतन साहचर्याची केवढी महान् कथा आहे ही! या शिवकथेतून भारताच्या अमर एकतेचे दर्शन होते. पार्वतीच्या शरीराचा भाग जिथे जिथे गळून पडला ते हिंदुस्थानातील प्रत्येक स्थळ हजारो वर्षे पवित्र धर्मक्षेत्र बनून राह्यले आहे.

शिवगंगाधराची प्रत्येक कृती स्वयंसिद्ध आहे. काही कथा तर अंतःकरण विशाल करावयास सांगणाऱ्या आहेत. माणसाला मार्गदर्शन करणाऱ्या आहेत. आधीच्या कारणांचा किंवा भावी परिणामांचा विचार न करता आपले प्रत्येक काम औचित्यपूर्ण बनवा अशी शिकवणूक शंकराच्या अनेक कथांतून मिळत असते.

या अनुषंगाने सुचला म्हणून एक विचार मांडतो. तो मानलाच पाहिजे असे नाहीं. प्रत्येक गोष्ट मान्य करण्याने मन व्यापक बनत नाहीं. मी सांगणार आहे तो विचार मलाही पूर्णपणे मान्य आहे असे नाही. एकदा १९५१–५२ च्या निवडणुकांचा विचार करीत असताना माझ्या मनात एक विलक्षण कल्पना येऊन गेली. या निवडणुकीत एका प्रांतात कम्युनिस्टांना सर्वात जास्त जागा मिळाल्या होत्या. तर दुसऱ्या एका प्रांतात समाजवाद्यांना अधिक जागा मिळाल्या होत्या, आणि तिसऱ्या एका प्रांतात जनसंघ, रामराज्य परिषदेसारख्या धार्मिक पक्षांना अधिक यश मिळाले होते. आता या संदर्भात हिंदुस्थानचा जरा सहज गंमतीने विचार करा. तसे केले तर हिंदुस्थानचे तीन विभाग पडतील. ते खरे असोत किंवा खोटे असोत. जिथे रामभक्तीचे महात्म्य आहे असा एक भाग, कृष्णभक्तीचा महिमा आहे असा दुसरा भाग आणि शिवभक्तीचे महात्म्य आहे असा तिसरा भाग. राम-कृष्ण-शिव यांच्या बरोबर त्यांच्या बायका व त्यांचे सेवक यांच्या भक्तीचेही त्या त्या भागात महात्म्य आहेच. उदाहरणार्थ

जिथे रामभक्ती आहे तिथे हनुमानभक्तीही आहेच. जिथे शिवभक्ती तिथे कालिमहात्म्य आहे, दुर्गामहात्म्य आहे. अशा रितीने राम-कृष्ण-शिव यांचे मानसिक प्रभुत्व असलेले तीन भाग देशात आहेत आणि या त्रयीसंबंधीच्या अनेक कथा व आख्यायिका यांचे तेथील जनतेच्या मनावर फार मोठे साम्राज्य आहे.

मी आपला एक सहज असा तर्क रचला आहे की जिथे शिवभक्तीचा महिमा आहे त्या भागात १९५२ साली कम्युनिस्ट पक्षाला अधिक यश मिळाले; कृष्ण-भक्तीच्या क्षेत्रात जनसंघ—रामराज्य परिषदेला जास्त जागा मिळाल्या आणि राममहिमा असलेल्या क्षेत्रात समाजवाद्यांना अधिक यश मिळाले. स्थूलमानाने मी हे म्हणत आहे. याचे खंडन करता येईल. मनात आणले तर मी स्वतःच ते एका क्षणात करू शकेन. कारण मला असेही सांगता येईल की, राम, कृष्ण व शिव यापैकी एकेकट्याच्या भक्तीची महात्म्य जिथे नाही; जिथे विद्याभक्ती आहे त्या क्षेत्रांचे काय ? कोणी विचारतील, तुम्ही ज्या शिवाची एवढी प्रशंसा करता तो शिव असला कसला ? तिथे तर कम्युनिस्ट जिंकले ? याचे उत्तर असे की, शिव किंवा राम किंवा कृष्ण यांच्या व्यक्तिमत्त्वाचा चांगला तसाच वाईटही प्रभाव जनमानसावर पडू शकतो. नीलकंठ शिवाने जगासाठी जसे हालाहल प्राशन केले तसे तो गांजासुद्धा पीत होता. तो कदाचित गांजा पीतही नसेल. परंतु शिवाच्या व्यक्तिमत्वाची तीही एक बाजू कथाकहाण्यांत चितारलेली आहे. शिवाची सेना लंगड्यांची, लुळ्या-पांगळ्यांची होती; त्यांत पशु-पक्षी, श्वापदे आणि भूते–प्रेतेही होती. शिव हा गरीबांचा, उपेक्षितांचा देव होता असा याचा अर्थ करावयास काय हरकत आहे ? शिवाची जी प्रतिमा रेखाटली जाते तिच्यात, शिवाच्या जटाभारात चंद्रमा आहे तशा अग्निज्वालाही बाहेर पडत आहेत. शिवाचे व्यक्तिमत्व हे भिन्न भिन्न प्रवृत्तींना सामावून घेणारे, शक्तिशाली आणि व्यापक आहे. ते विविधरूपी आहे. राम व कृष्ण यांचे व्यक्तित्वही तसेच आहे; हेही त्यांचे उपासक लक्षात घेतील तर बरे होईल.

राम, कृष्ण, शिव यांच्या कथा–दंतकथातून व्यक्त होणारे त्यांचे व्यक्तिमत्व मी स्थूलरूपाने आपल्यापुढे मांडले आहे. त्या कथा रम्य आहेत; मन विशाल बनविणाऱ्या आहेत. त्या खऱ्या आहेत की खोट्या आहेत याच्याशी मला काही कर्तव्य नाही. त्या कथा तर आहेत ना ? आपण कादंबऱ्या नाही का वाचत ? त्यातील व्यक्तींच्या व्यक्तिमत्वाचे जसे आपण विश्लेषण करतो तसे राम-कृष्ण-शिव यांच्या कथांतील व्यक्तींचे करायला काय हरकत आहे ? तो नीलकंठ शिव,

तो मर्यादापुरुषोत्तम राम व तो योगेश्वर कृष्ण ! या प्रत्येकाच्या कथा काळीज मोठे करणाऱ्या आहेत. या तिघांची एकमेकात स्पर्धा नाही, वैर नाही. आपल्या प्राचीन भारतवासीयांनी, या तिघांच्या उपासकांनी एकमेकांना विरोध करू नये अशी थोडी फार तरतूद करून ठेवली आहे. असा परस्पर विरोध होणारच नाही, झाला नाही असे नाही. काही वेळा या तिघांचे उपासक एकमेकांशी तंडले. एकमेकांच्या उपास्यदैवतांच्या मूर्तीही त्यांनी फोडल्या. परंतु त्याचा एवढा गंभीरपणाने विचार करू नये. हे सर्व खेळासारखे चालत राहते. खेळ मोडला जातो; तसा पुन्हा रचलाही जातो. कुठे कोणाची मूर्ती फोडली तर दुसरीकडे कुणी दुसऱ्यासाठी मूर्ती बनवतही असतो.

तीन्ही दैवतांचा आपापसातील संघर्ष टळावा असा प्रयत्न झाला आहे. आमच्याकडील अनेक कवींनी, संतांनी, शाहिरांनी आपल्या कवनांतून हा प्रयत्न केला आहे. त्यांनी यमुनेच्या तीरावर रामाला होळी खेळायला पाठविले आहे; तर शरयूच्या काठी कृष्णाला रवाना केले आहे. भारतीय कलाकारांनी, कवींनी आणि लेखकांनी आतां असे एक भव्य स्वप्न-चित्र का रंगवू नये की, ज्यातील शिवशंकराने आपल्या जटासंभारात केवळ चंद्रमाच नाही, तर कृष्णालाही ठेवले आहे आणि मर्यादा पुरुषोत्तम रामाबरोबर तो तांडवनृत्य करतो आहे ? स्वप्नचित्रच रंगवायचे असेल तर असे चित्र का रंगवू नये ?

राम, कृष्ण, शिव यांच्या व्यक्तिमत्वाचे काही पैलू मी आपणास सांगितले. यात आपणास काही शिकविण्याचा माझा हेतु नाही. आपले मन प्रसन्न व्हावे, आपण हसावे आणि स्वप्ने रंगवावी एवढाच माझा उद्देश आहे. आपल्या मृत पत्नीला-पार्वतीला आपल्या खांद्यावर घेऊन सहा महिने देशभर फिरणाऱ्या शिवाचे पत्नीप्रेम केवढे अपूर्व ! त्याच्या कल्पनेने आपणास आनंद होत नाही काय ? जगातील जवळपास सर्वश्रेष्ठ तत्वज्ञान गीतेद्वारे पद्यरूपात कृष्णाने प्रत्यक्ष युद्धभूमीवर सांगितले, ही कल्पना अद्‌भुतरम्य वाटत नाही काय ? आपले सामर्थ्य मर्यादेत राखून आपले जीवनकार्य करू शकणारा मर्यादा पुरुषोत्तम राम ही केवढी आदर्श कल्पना आहे ! राम, कृष्ण, शिव यांच्या प्रत्येक कथेत, तिच्या बारकाव्यात, संवादात आनंद भरलेला आहे. तो चाखला पाहिजे. त्यासाठी धर्मावर, देवावर विश्वास असण्याची गरज नाही. गेली पाच हजार वर्षे कोट्यवधी भारतीय या त्रिमूर्तीची खरी म्हणा किंवा काल्पनिक म्हणा कादंबरी वाचीत आले आहेत आणि कोण जाणे आणखी किती हजार वर्षे वाचणार आहेत आणि त्यातील आनंद लुटणार आहेत ! आपणही त्यातील थोडा आनंद लुटावा म्हणून

राम-कृष्ण-शिव यांच्याबद्दल मी विचार करतो, चिंतन करतो.

राम-कृष्ण-शिव ही हिंदुस्थानची महान् व परिपूर्ण स्वप्ने आहेत; उदास गांभीर्याची प्रतीके आहेत. ती आपापल्या मार्गांनी जात आहेत. राम मर्यादित जीवनाचा परमोत्कर्ष आहे तर कृष्ण उन्मुक्त जीवनाची सिद्धी आहे, आणि शिव असीमित व्यक्तिमत्वाची संपूर्णता आहे. यापैकी कोण पूर्ण किंवा अपूर्ण असा प्रश्न उपस्थित होत नाही. कारण पूर्णतेचे परिमाण काय ? परिपूर्णतेतही प्रकारभेद असू शकतात, वर्गभेद असू शकतात.

राम, कृष्ण आणि शिव यांच्या कथांचे क्रमशः विकृतीकरण होत गेले आहे. वास्तविक त्यांच्या व्यक्तिमत्वाचे बीज चांगले पोसले जाऊन फोफावायाचे; त्या ऐवजी ते जमिनीत सडतच गेले. रामाचे भक्त कधी पत्नीचा त्याग करणारे बनले तर कृष्णभक्त दुसऱ्याच्या बायका पळविणारे बनले; आणि शिवभक्त, अघोरपंथी झाले. अधःपतन आणि विकृती याच्या या प्रक्रियेत राम संकुचित बनला, कृष्ण दुराचारी झाला आणि शिव बेबंद बनला. यावर उपाय काय ? तो सांगण्याचा मला मूर्खपणा करावयाचा नाही. मी इतकेच म्हणेन की " हे भारतमाते, आम्हाला शिवाची बुद्धी दे; कृष्णाचे हृदय दे आणि रामाचा एकवचनीपणा व कर्मशक्ती दे. असीमित बुद्धी, उन्मुक्त हृदय आणि मर्यादायुक्त जीवन यांनी आमचे सृजन कर ! "

वि: ....................
नोंद दि. ....................

# रंग आणि सौंदर्य

कातडीचा रंग हा काही सौंदर्याचा निकष नव्हे, तसाच तो श्रेष्ठत्वाचा देखील वेगळा असा आदर्श नव्हे. तरी देखील केवळ गौरवर्णीय युरोपातच नव्हे तर आशिया आणि अमेरिकेतील ऊष्णकटिबंधातील प्रदेशातही गोरा रंग हीच सौंदर्याची कसोटी मानली जाते. हा सौंदर्यशास्त्राचा विपर्यास आहे; आणि औचित्याच्या दृष्टीनेही ते निराधार आहे.

शामल वर्णाची नेहमीच उपेक्षा झाली आहे असे नव्हे. किमान हिंदुस्थानात तरी तसे झालेले नाही. संस्कृत साहित्यात कृष्णवर्णीय शामा सुंदर मानली आहे. ती काळीच असली पाहिजे असे नव्हे; ती जर सुंदर आणि तरुण असली तरी तिला शामा म्हणत. म्हणजेच यौवन आणि लावण्य एकच मानले जाई. दूत बनलेला संभ्रमित मेघ प्रियेची खूण विचारतो तेव्हा कालिदास शामाच्या कृश-कटीचे, नितंबभारामुळे झालेल्या तिच्या मंथरगतीचे आणि उत्फुल्ल व अरुण अशा तिच्या निम्न ओष्ठबिंबाचे, आणि भयचकित हरिणीसारख्या असलेल्या तिच्या आकुल नेत्रांचे वर्णन करतो. राम आणि कृष्ण या देवांच्या पुरुष प्रतिमा देखील शामवर्णीय आहेत.

भारतीय पुराणातील सर्वश्रेष्ठ स्त्री सावळीच आहे. त्या द्रौपदीला कृष्णा असेही म्हणण्यात येते. तत्कालीन पुरुषी अहंकाराला तिचे पाच पती आणि शिवाय

तिची एक किंवा दोन प्लेटॉनिक प्रेमप्रकरणे मान्य झाली नसावीत म्हणून तिची उपेक्षा झाली. शुचितेच्या प्रतिमा मानल्या गेलेल्या आणि शिवाय गौर-वर्णाच्या अशा सीता-सावित्रीच भारतीय स्त्री-जातीच्या प्रतिनिधी मानल्या जातात. ही मान्यता अविचारीपणाची आहे; आणि त्यामुळे भारताच्या अन्य प्रातिनिधिक स्त्रियांच्यावर अन्याय झालेला आहे. भारतीय पौराणिक साहित्या-तील, सावळी कृष्ण आणि घनश्याम कृष्णा हे दोघेही सर्वोत्कृष्ट सौंदर्य आणि सुगंध लाभलेली अशी अनुपम पुष्पे होत.

विशाल विश्वामधील पुराणात अथवा इतिहासात आपल्या सर्व समकालीन पुरुषांपेक्षा हजरजबाबी आणि ज्ञानी अशी द्रौपदी हीच बहुधा एकमेव स्त्री आहे. कृष्णाशी तिची तुलना करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण ही समयसूचक आणि बुद्धिमान स्त्री कृष्णाची मित्र, सहकारी आणि नायिका देखील होती. कर्तव्यपालनाच्या वेळचा राधेच्या सहवासात कंठलेला काळ हा कृष्णाच्या जीवनातील निव्वळ आनंदाचा काळ होता. कृष्ण आणि कृष्णा ही महाभार-ताची समान योग्यतेची नायक-नायिका होत. त्या दोघांच्या मैत्रीत संघर्षाची छाया देखील दिसत नाही. अशी ही कृष्णा म्हणजे द्रौपदी, सावळी होती.

तर मग गौरवर्ण म्हणजे सौंदर्य नव्हे काय ? अर्थात याचे नकारार्थी उत्तर पुन्हा अर्धसत्य होईल. खरे म्हणजे नारीसौंदर्याचे वर्णन असलेल्या सर्वोत्तम काव्यात काळ्या कुंतलांनी परिवेष्टिलेल्या स्त्रीमुखाला अष्टमीचा अपूर्ण चंद्रमा म्हटले आहे. आणि अर्थातच हा मुखचंद्र गौरवर्णच असायला हवा. हे अत्यु-त्तम मनोहर काव्य देखील संस्कृत वाङ्मयातच आहे. प्राचीन हिंदुस्थानने कात-डीचा रंग आणि सौंदर्य यांना एकमेकांपासून वेगळे मानण्यात यश मिळविले होते; आणि जेथे कोठे चारुता सापडेल तेथे ती शोधण्याची तत्परता दाखविली होती. किमान एका विशिष्ट काळी तरी काळ्या रंगाबद्दलच्या पूर्वग्रहापासून भारताचे मन मुक्त होते; किंवा सौंदर्य कसोटीच्या बाबतीत निष्पक्ष होते असे म्हणता येईल. नंतरच्या पिढ्यांनी सौंदर्यनिकषाची ही महान् परिपक्वता गमाविली.

आजकाल होणाऱ्या सौंदर्यस्पर्धांच्या उत्सवांमध्ये वक्ष, कटि आणि नितंब यांचे प्रमाण सौंदर्याची निर्णायक गुणवैशिष्ट्ये म्हणून गणली जातात. अजून-पर्यंत तरी श्यामवर्णीय लावण्याची अशा स्पर्धांत निवड झालेली नाही. जवळपास पन्नास सौंदर्य स्पर्धांच्या नंतर १९६० साली प्रथमच एका जपानी ललनेने विश्वसुंदरीची स्पर्धा जिंकून पक्षपाताच्या त्या दरवाजावर धडक मारली. वस्तुतः



**शृंगार**

**देलवाडा मंदिर–माऊंट अबू**

एका जपानी ललनेच्या मस्तकावर विश्वसुंदरीपदाचा मुकुट बसण्यापूर्वी देखील जपानी स्त्रिया सुंदर होत्याच. आजच त्या एकाएकी पूर्वीपेक्षा अधिक सुरेख झाल्या असेही नव्हे. त्यांच्यात बदल झालेला नाही तर कॅलिफोर्नियाच्या सौंदर्य परीक्षकांच्या दृष्टीत बदल झालेला आहे. आफ्रिका-आशियातील कृष्णवर्णीयांची निवड व्हावयास अजून वेळ आहे.

सौंदर्य परीक्षकांच्या दृष्टीला केवळ गेली काही वर्षेच गौरवर्णाची ही भूल पडलेली आहे असे नाही तर गेली शेकडो वर्षे त्यांच्या नजरेला ही भुरळ पडलेली दिसून येते. त्याचे कारण त्यांचे मन त्यांना शिकवते तेच ते पाहतात. आसाम ही स्त्रीसौंदर्याच्या जादूची आणि मोहकतेची भूमी मानली गेली आहे. आसामला भेट देणारे पाहुणे तेथील स्त्रीसौंदर्याची तोंड फाटेपर्यंत स्तुती करतात. त्यापैकी बहुतेक औपचारिकपणे आणि अजाणतेपणे ती प्रशंसा करीत असावे. कारण ज्यांना गौरवर्णीय लावण्याची स्तुती करण्याची सवय आहे त्यांच्याच नजरेला हे कृष्णवर्णीय लावण्य आवडावे याचा अर्थ त्यांच्या आवडीत बदल झाला आहे असे मानावयाचे की सावळ्या रंगाच्या आसामी स्त्रियांचा स्वर्गीय बांधेसूदपणा त्यांच्या नजरेत भरला असे म्हणावयाचे ? आसाम खरोखरच स्त्रीमनोहारीत्वाची खाण आहे. परंतु रमणीयता आणि वर्ण यांत गोंधळ करणाऱ्यांना ती सांपडणे कठिण आहे. चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या, प्रामुख्याने छत्तीसगढ आणि ओरिसाच्या काही भागातील, किमान काही स्त्रिया तरी आपल्या शरीरसौष्ठवाने आणि मुखकांतीने पाहणाऱ्याची नजर खिळवून ठेवतात, नव्हे बांधूनही ठेवतात. या श्रमजीवी स्त्रिया सावळ्या असतात. कित्येक लोकांना आपल्या आयुष्यात कधीच काळ्या किंवा गोऱ्या सौंदर्यातील सत्याचे आकलन होत नाही. काहींना ते सत्य जाणवते; पण आपल्या उतारवयात. यौवनाने रसरसलेल्या कृष्णाची सखी राधा ही प्राचीन वाङ्मयात गोरी दाखवलेली आहे. पण कृष्णाची मध्यमवयातली आणि राजकारणाच्या काळातली सहचरी कृष्णा मात्र शामलवर्णी होती. वाढत्या वयाबरोबर उत्तरेपेक्षा दक्षिण आणि त्याचप्रमाणे सावळा वर्ण देखील प्रिय वाटू लागतो असे दिसते.

मी एका पुरुषाच्या भूमिकेतून स्त्रीच्या सुस्वरूपतेबद्दल लिहीत आहे. स्त्रीमध्ये तिच्या सौंदर्यापलीकडे काही नाही असे मी मानीत नाही असा याचा अर्थ नव्हे. खरोखरच माझी अशी दृष्टि असती तर द्रौपदीच्या सौंदर्याच्या उगमस्थानी असलेली तिची निरतिशय बुद्धिमत्ता तिच्या रूपापासून वेगळी आहे असे मी मानलेच नसते किंवा आसाममधील चहाच्या मळयात काम करणाऱ्या

कामगार स्त्रियांमधील श्रमशक्ति, स्वातंत्र्य आणि देखणेपणा मला वेगवेगळा करणेही कठिण झाले असते. मी जर स्त्री असतो तर मी बहुधा पुरुषसौंदर्याकडे देखील याच दृष्टिकोनातून पाहिले असते. एकतर कातडीच्या रंगामुळे पुरुषाचे रूप कमी मानले जात नाही आणि शिवाय स्त्रीदेखील स्वतःच्याप्रमाणेच पुरुषाच्या रूपाचे मूल्यमापन करीत आलेली आहे. आज सौंदर्य हे जसे स्त्रीच्या प्रतिष्ठेचे चिन्ह बनले आहे तितक्या प्रमाणात ते पुरुषाचे बनावे काय ? या बाबत मला निश्चित सांगता येत नाही. स्त्रियांच्या सौंदर्याचा, वर्ण हा जसा निकष नाही तसाच तो पुरुषांचाही असतां कामा नये एवढे मात्र मी म्हणेन.

तामिळनाडमधील वैगेई नदीकाठचे आजचे प्रमुख शहर मदुरा एके काळी पांड्यांची राजधानी होती. हेच मदुरा शहर मत्स्यनयना मीनाक्षीचे निवासस्थान आहे. भारतातील सर्वोत्तम भव्य मंदिरांपैकी मदुरेचे हे एक मीनाक्षी-मंदिर आहे. या देवालयातील ही महान् देवताच केवळ मत्स्यनयना नाही तर वैगईथडीच्या सर्व स्त्रियांना तसेच नेत्रलावण्य लाभले आहे. मत्स्यनयना आणि मृगनयना यात निवड करणे नेहमीच कठिण झाले आहे. कारण हरिणाक्षीच्या अर्धोन्मीलीत नेत्रांचा संवाद अधिकतर कामनांशी चालतो तर वैगई किनारीच्या मीनाक्षी अधिकांश आत्म्याला जाणवतात. मत्स्यनयनाजवळ सहानुभूती आणि करुणा यांची जरा अधिक गुणवत्ता असते. वैगईकाठच्या या मीनाक्षी कृष्णवर्णीय असतात. तसेच खऱ्या अर्थाने भारताच्या दक्षिणदिशेला असलेल्या तामिळ-नाडच्या स्त्रियादेखील काळयाच असतात.

हिंदी चित्रपट तामिळनाडमध्ये लोकप्रिय असले, तरी देखील तामिळ भाषेतूनहि तेथे चित्रपट निघतात. सर्वांत गमतीची गोष्ट अशी की, या सिनेमातील नायक सामान्यतः तामीळी असले तरी नायिका मात्र आंध्र आणि मल्याळी असतात. त्याची कारणे अनेक असू शकतील. पण एक कारण नमूद करावेसे वाटते. एकदा ताम्रम् ललिता नावाच्या तामीळी सिनेमानटीला पाहण्याचा योग आला. ती एक दुय्यम भूमिका करीत होती. तामीळी सिनेमापद्धतीचा मंत्र कळावा म्हणून मी बारकाईने तिच्याकडे पाहात होतो. रंगाच्या आणि पावडरीच्या जाड थरामुळे तिचा चेहरा वेगळा दिसत असला तरी हातावरच्या पातळ थरामधूनही तिच्या बाहूचा खरा रंग दृग्गोचर होत होता. तांत्रिक चूक म्हणून तिकडे दुर्लक्ष करता येईल, पण रंग आणि पावडरच्या अशा जाड थराने नटीचे सिनेमात दिसणारे सारे शरीर अशारितीने कितीसे आच्छादित करता येईल ?



१६६२२

त्या सिनेमामधील प्रमुख भूमिकेतील अन्य नट्यांइतकीच ललिता देखील मला सुंदर वाटली. बांधेसूद शरीरयष्टीची काळी मीनाक्षी देखील खरोखरच अनुपम होय. परंतु काळ्या तामीळी लोकांना ते पटत नाही आणि म्हणूनच आपल्या "सिनेमातून त्यांना उजळ वर्णाच्या आंध्र आणि मल्याळी स्त्रिया अधिक हव्याशा वाटतात." माझ्या या विधानाला माझ्या एका मित्राने पुस्ती जोडली. तो म्हणाला, " सिनेमा प्रेक्षकांकडून आपल्या सौंदर्याची प्रशंसा मिळविण्यापूर्वी या शामलवर्णी सुंदरींना निर्माते आणि दिग्दर्शक यांच्या परीक्षेतून सहीसलामत सुटावे लागते. " रंग आणि पावडरीचा थर प्रेक्षकांना भुलवू शकतो पण निर्माता या नटींना अधिक जवळून पाहात असल्याने त्याला त्या आपल्या रंगरंगोटीने भुलवू शकत नाहीत.

सौंदर्याच्या निकषाबद्दलची ही विकृत दृष्टी राजकीय प्रभावातून निर्माण होत असली पाहिजे. जवळपास तीन शतके युरोपचे गौरवर्णीय लोक जगावर वर्चस्व गाजवीत आहेत; सत्ताधारी बनून राहिलेले आहेत. सत्ता आणि समृद्धी सदैव त्यांच्या अधीनच होती. गौरेतरांजवळ मात्र सत्ता-समृद्धीचा अभाव होता. युरोपच्या गौरवर्णीयांप्रमाणे आफ्रिकेच्या निग्रोंची जगावर सत्ता असती तर नारीसौंदर्याचे निकष नक्कीच वेगळे झाले असते. कवी आणि ललित लेखकांनी निग्रोची कातडी सॅटीनसारखी मुलायम असते असे म्हटले असते. इतकेच नव्हे तर त्या कातडीचा स्पर्श आणि दर्शन ही प्रतिष्ठा वाढविणारी आहे असेही त्यांनी मानले असते. निग्रोचे सुंदर ओष्ठद्वय किंवा शोभिवंत नाक त्यांना उत्फुल्ल दिसले असते. राजकारण सौंदर्यकल्पनांवरही वर्चस्व गाजविते. सत्ता, विशेषेकरून अद्वितीय सत्ता तर सुंदरही दिसू लागते.

प्रचंड सत्ता आणि गोरा रंग यांच्या जागतिक संयोगाला, हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितीत तर आणखीनच बळ मिळाले आहे. गौरवर्णीय लोक उच्च जातीत मोडतात. जातीला वर्ण हा पर्यायी शब्द आहे. वर्णाचा अर्थ बहुधा रंग असाच आहे. ऋग्वेदात शुभ्र रंगाला आर्यांचा रंग म्हटले आहे. हिंदुस्थानातील आभाळ आणि निसर्ग यांच्या चकचकीत रंगामुळे येथे शुभ्र कपड्यासंबंधी आकर्षण असावे. पांढऱ्या कपड्यांमुळे सौंदर्यात भर पडत असावी. पण त्याचा कातडीच्या रंगाशी काहीहि संबंध नाही. तथापि गौरवर्णीयांच्या श्रेष्ठत्वाला भारतीय जातीपद्धतीमुळे हिंदुस्थानात जबरदस्त प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने गौरवर्णामुळे मिळालेली प्रतिष्ठा ही स्वतःच एक सौंदर्यवस्तु बनली आहे. मात्र सौंदर्याची इतर लक्षणे या सौंदर्यकल्पनेत आढळून येत नाहीत.

तर मग कातडीचा रंग हा सौंदर्याचा भाग नाहीं काय? गोऱ्या रंगाच्या अपूर्वाईमुळे तो रंग पाहून पाहणारा प्रसन्न होतो; तेव्हा त्याला गोरा रंग प्रशांत संगमरवरासारखा निष्कलंक भासतो. त्याच अपूर्वाईमुळे कृष्ण, पीत किंवा गव्हाळी वर्ण केळीच्या गाभ्यासारखा निष्कलंक वाटतो.अपूर्वाई संपली म्हणजे गोऱ्या रंगावरचे डाग दिसू लागतात आणि त्याचप्रमाणे काळया रंगाचा एकसूरीपणा जाणवू लागतो. कातडीचा रंग ही निश्चितच सौंदर्याची कसोटी नव्हे. कांती, मृदुता आणि निर्दोषता यामुळेच कातडीच्या रंगाचे सौंदर्य जाणवत असते. सर्वोत्कृष्ट अशी कातडीची कांती देखील कदाचित चीनमध्ये आढळते. आफ्रिकेतील, हिंदुस्थानातील किंवा तत्सम प्रदेशातील पीत अथवा गव्हाळी रंगाच्या स्त्रियातही ती कधीकधी दिसते. या चर्चेत मी कदाचित् काहीसे श्वेतेतरांच्या बाजूने झुकते माप दिले असण्याची शक्यता आहे. परंतु गोऱ्या रंगाबद्दलची पक्षपाती दृष्टी दुरुस्त करावयाची असल्याकारणाने तसे करावे लागले आहे. मृदु, निर्दोष आणि कांतिमान कातडी कर्पूरगौर रंगात क्वचितच सांपडते; मात्र ती घनःशाम वर्णाइतकीच उन्मादक असते.

माझे व्यक्तिशः असे मत आहे की, सर्वच स्त्रिया सुंदर असतात. काही स्त्रिया इतरांपेक्षा अधिक देखण्या असतात एवढेच. गौर वर्णातील स्वरूपसुंदर स्त्रियांच्या मुद्रेवर निरागसता आणि मांगल्य प्रवाहित होत असलेले दिसते. निर्मळ निर्झराच्या पृष्ठभूमीवर लहरींवर लहरी उठाव्यात तसे त्यांचे सौंदर्य नेत्रांना सुखद प्रतीत होते. यापेक्षा अधिक चांगली उपमा द्यावयाची तर असे म्हणता येईल की दरीकंदरातून वाहणाऱ्या नदीची सखोल नितळता आणि ज्योत्स्ना त्यांच्या चेहऱ्यावर झळकत असते. शामवर्णातील अधिक सुंदर स्त्रिया जीवन आणि सृजन यांच्या गूढतेबद्दलची उत्सुकता जागृत करतात. मासळीच्या हालचालीसारखे नेत्रचापल्य, हत्तीणीचा मंद पदविन्यास, संधिप्रकाशाच्या वेळची भारावलेली मदालसता आणि तत्सम गोष्टी कृष्णवर्णातील गूढता गूढतम बनवितात.

सौंदर्य आणि विषयासक्ती यांचे साहचर्य असते. खरे म्हणजे घनःशाम स्त्रिया प्रभावशाली पुरुषांची विषयासक्ति चेतवतात; पण ती फक्त रात्रीच्या क्लबामध्येच, किंवा त्यांना उत्तेजित करूनच त्या त्यांना आपल्याकडे खेचतात. हिंदुस्थानात तेथील जातीव्यवस्थेमुळे जादा अडथळे निर्माण झाले आहेत. उच्च आणि नीच जातीतील स्त्री-पुरुषांत जीवन पद्धती, भाषा आणि रीतिरिवाज यामुळे नुसते काहीसे अंतर पडते असे नाही तर त्यामुळे त्यांच्यामध्ये एक भिंतच निर्माण होते. कनिष्ठ वर्गातील सावळ्या स्त्रिया जेव्हा मनापासून प्रेमात पडतात

तेव्हा त्या खुशावतहि नाहीत किंवा उच्चजातीतील स्त्रियांप्रमाणे चातुर्याचे जाळेही उपयोगात आणीत नाहीत. वस्तुतः आसक्तीशिवाय प्रीती नाही; प्रीतीशिवाय सौंदर्य नाही. प्रेमात पडलेली आणि प्रेमपूर्ती लाभलेली स्त्री, मग ती काळी असो अथवा गोरी असो, चांदण्या रात्रीच्या आकाशाप्रमाणे प्रकाशकिरणे पसरवीत असते. अगदी अलीकडच्या काळापर्यंत काळया स्त्रिया अशा प्रकारच्या प्रेमाला वंचित झाल्या होत्या. किमानपक्षी सौंदर्यगान करणारे तरी तशी संधि त्यांना देत नव्हते. भिन्न जीवन पद्धतीमुळे उद्‌भवणारे अडथळे, भारतीय जातींमुळे उभी राहिलेली कुंपणे अगर साऱ्या जगांतील काळया-गोऱ्यातील भेद जावयास काही काळ लोटावा लागेल. याबाबतीत मूलतः सर्वात मोठा अडथळा म्हणजे गोऱ्या रंगातच सौंदर्य पाहण्याचा दोष हा होय.

रंगभेदाचा जुलुम हा जगातील मोठ्या अन्यायांपैकी एक होय. सर्वच स्त्रिया दडपलेल्या आहेत. आणि त्यामुळे त्यांची बुद्धी आणि गुण यांच्या पूर्ण अविष्काराचा फायदा मानवजातीला मिळत नाही. संख्येने अधिकच असलेल्या काळ्या स्त्रिया ह्या दडपशाहीच्या अधिक बळी आहेत. चिंता आणि न्यूनगंड यांत त्यांना जीवन कंठावे लागते. एकाच कुटुंबांतील गोऱ्या मुलीच्या काळ्या बहिणीला लहानपणापासून उपेक्षा आणि दुय्यम दर्जाची वागणूक सहन करावी लागते. मुलग्याच्या मानाने मुलीला विकासाची कमी संधि मिळते. त्यांतल्या त्यात काळया मुलीच्या वाट्याला तर लाजिरवाणेच जिणे येते, तिला हीनपणाने वागविले जाते. काळा मुलगा देखील असल्या दुःखापासून मुक्त नसतो.

काळया युवक-युवतींमध्ये, आपला रंग अधिक उजळ व्हावा म्हणून साबण, क्रीम्स, लोशन्स आणि अगदी अलीकडे निघालेली इंजेक्शन्स यांची फार मागणी आहे. दक्षिण अमेरिकेप्रमाणे ज्या प्रदेशात अल्पसंख्य गोरे आणि काळी जनता एकत्र राहतात आणि जेथे गोऱ्यांचे वर्चस्व आहे तेथे गौर रंगाचा मान्यता पावलेला जुलुम सर्वात केंद्रीत स्वरूपामध्ये पाहावयास मिळतो. कातडीच्या रंगाचा हा अत्याचार सारे जग सहन करीत आहे. या जुलुमाखाली भरडले जाणारे शोषित स्वतः, अन्य शोषितांवर जितका अत्याचार करतात तितका जुलुम तर जुलमी देखील करीत नाही आणि म्हणूनच हा जुलूम अधिक वाईट स्वरूपांत प्रगट होतो.

बहुतेक अत्याचार असत्याच्या पायावर घडत असतात. त्याचप्रमाणे रंगाचा हा सर्वात मोठा आणि व्यापक जुलुम देखील असत्यामुळेच घडतो. गौरेतर मानवतेने, गौरवर्णीयांनी ठरविलेली सौन्दर्यमूल्ये स्वेच्छेने आणि उत्सुकतेने कशी

स्वीकारली हे अन्य कोठल्याही आश्चर्यापेक्षा अधिक मोठे आश्चर्य आहे. अमीरांचा गरीबांवर, वरिष्ठ जातींचा कनिष्ठ जातींवर, स्थानिकांचा परभापिकांवर आणि विशिष्टांचा सामान्यांवर जसा जुलुम चालतो, तशा प्रकारच्या जुलुमांतच या देखील अत्याचाराचे रहस्य आहे. श्रीमंत आणि अकिंचनांप्रमाणेच काळया-गोऱ्यांमध्ये देखील रंगभेदाचे अगणित स्तर आहेत. कोळशाप्रमाणे काळा किंवा मोत्याप्रमाणे पिवळा आणि त्या दरम्यान असंख्य गव्हाळी आणि तपकिरी, पीत आणि चॉकलेटी असे काळया लोकांमध्ये अनेकविध स्तर असतात. त्यामुळे कृष्णवर्णीय लोकांमध्ये, सौन्दर्य निकषांवर प्रभुत्व गाजविणाऱ्या गोऱ्यांना भरपूर अनुयायी मिळतात. अमीर-गरीबांप्रमाणे काळया-गोऱ्यांमधले अंतर देखील किती तरी मधल्या बिंदूंनी जोडलेले असते. आणि म्हणूनच उचित किंवा नैतिक मूल्यांप्रमाणेच योग्य सौन्दर्य कसोटी ठरविणे कठिण झाले आहे. कृष्णवर्णीय सुंदरी आपली प्रतिष्ठा, किमान आपले समान हक्क प्रस्थापित करतील, किंवा अन्य बाबींप्रमाणे या प्रकरणीही क्रांती होईल, तेव्हाच गोरे अत्याचारी स्वतः होऊन शामवर्णीयांचा मार्ग प्रशस्त करतील; सौन्दर्याचे मूल्यमापन आणि त्याचा कातडीच्या रंगाशी असलेला संबंध यामध्ये जेव्हा सौन्दर्यशास्त्राच्या दृष्टीने क्रांती होईल तेव्हाच स्वतंत्रतेची हवा वाहू लागेल, आणि राजकीय किंवा आर्थिक क्रांतीमुळे पसरू शकणाऱ्या शांतीइतकीच आंतरिक शांतता याही क्रांतीमुळे साऱ्या भूतलावर पसरेल.

● ● ●

## कृष्ण

कृष्णाच्या सर्व गोष्टी दोन दोन आहेत. दोन आया, दोन बाप, दोन नगरे, दोन अथवा अनेक प्रेयसी. कृष्णाने प्रौढ वयात पत्करलेली गोष्टच अगोदरपेक्षा अधिक प्रसिद्ध आणि त्याची अधिक आवडती झालेली आहे. म्हणजे असे की कृष्ण देवकीनंदन तर आहेच पण यशोदानंदन म्हणून देखील अधिक प्रसिद्ध आहे. कृष्णाच्या जन्मदात्या आईचे नाव एखादेवेळी माहीत नसेल पण यशोदा गवळणीचे नांव माहीत नसणारा क्वचितच आढळेल. त्याचप्रमाणे वसुदेव काहीसा मागे पडला आहे. कृष्णाच्या जन्मदात्या बापापेक्षा नंदाला अधिक प्रतिष्ठा मिळालेली आहे. द्वारका आणि मथुरेची तुलना करणे योग्य होणार नाही. कारण भूगोल आणि इतिहासाने मथुरेलाच महत्त्व दिले आहे. परंतु कृष्णाशी संलग्न नाव आहे द्वारकेचेच. मथुरा आणि मथुराधीशापेक्षा द्वारका आणि द्वारकाधीश अधिक लोकप्रिय आहेत. कृष्णाच्या बाललीला आणि यौवनक्रीडा याबाबतीत तर मथुरेपेक्षा वृंदावन आणि बरसाना आदि नगरे अधिक महत्त्वाची आहेत. कृष्णाच्या प्रेयसीचा प्रश्न मात्र जरा गुंतागुंतीचा आहे. कुणाकुणाची तुलना श्रेष्ठत्वाबाबत करावयाची ? रुक्मिणी व सत्यभामा यांची की राधा व रुक्मिणी यांची की राधा व द्रौपदी यांची ? येथे प्रेयसी शब्दाचा संकुचित अर्थ न घेता सखा–सखी या व्यापक अर्थाने घेतला पाहिजे. पुढे तर मीराहि कृष्णप्रेमाच्या स्पर्धेत उतरली.

कसेही असो अद्याप तरी याबाबत राधा हीच सर्वांत भाग्यशालिनी समजली जाते. तिन्ही लोकांचा स्वामी कृष्ण तिच्या चरणांचा दास आहे. महान कालाच्या ओघात पुढे कदाचित् द्रौपदीला अथवा मीरेला राधेची जागा मिळे-ल्ही परंतु तशी शक्यता कमीच दिसते. रुक्मिणी मात्र राधेची जागा कधीच घेऊ शकणार नाही.

माणसाच्या शरीराची सीमा म्हणजे त्याची त्वचा व नखे. ही सीमाच त्याला एक मित्र, एक आई, एक बाप, एखादे तत्त्वज्ञान वगैरे मिळवून देत असते. पण माणूस या सीमेच्या बाहेर नेहमीच उसळ्या मारण्याचा प्रयत्न करीत असतो. मनाच्या जोरावरच तो हा यत्न करीत असतो. जे तत्त्व मानवी मनाला या नैसर्गिक शरीरसीमेपलीकडे नेऊन सर्वाभूती एकरूपता प्राप्त करून देते त्या तत्वाचे व त्या अमर्याद प्रेमभावनेचे नाव कृष्ण होय. कृष्ण म्हणजे काही केवळ सिद्धांत व तत्त्वे यांचे विवेचन नाही. कृष्ण म्हणजे घटनाक्रमाने युक्त अशी एक मानवी लीला आहे. आणि म्हणूनच कृष्णाच्या साऱ्या गोष्टी आपल्या स्वतःच्या स्वाभाविक सीमेत किंवा एकाच गोष्टीच्या कक्षेत राहत नाहीत. त्या दोन दोन असतात. मात्र गंमत अशी की त्या दोहोंपासून कृष्ण पुन्हा अलिप्तच आहे. परंतु आपल्या जीवनात त्याने आपली जन्मदाती आई, विवाहित पत्नी, आणि जन्मभूमी यापेक्षा मानलेली आई, प्रेमिका व कर्मभूमी श्रेष्ठ मानली आहे. रक्ताच्या नात्यापेक्षा मानलेले नाते श्रेष्ठ समजणे म्हणजे देखील एक प्रकारे आसक्ति नष्ट करणे नाही काय ?

भारतीय साहित्यातील कृष्णकथेत आई आहे यशोदा व बाळ आहे कृष्ण. या दोघांतील नात्यापेक्षा माय-लेकरांचे अधिक श्रेष्ठ नाते मला तरी माहीत नाही. अर्थात् श्रेष्ठ असेल ते चिरकाल राहाते. याचा अर्थ मथुरा किंवा रुक्मिणी श्रेष्ठतेत कमी आहेत असे नाही. मगधाच्या जरासंधापासून तो शिशुपालापर्यंत आणि हस्तिनापुरचे पाच पांडव व द्रौपदी यांच्यापर्यंत सर्वांशी मथुरा व रुक्मिणी यांनी एकरूपता साधली आहे. स्वकीयाहून परकीय वरचढ झाला आणि त्याने स्वकीयाला नाहीसे करून टाकले असे मात्र कृष्णकथेत घडलेले नाही. परकीयाने स्वकीय व परकीय यामधील आपपरतेच्या भिंती तेवढ्या जमीनदोस्त केल्या. आणि स्वकीयाने लोभ, मोह, ईर्ष्या, भय इत्यादींच्या कुंपणातून स्वतःची मुक्तता करून घेतली. या प्रक्रियेत सर्व ते आपले आणि आपले ते सर्वांचे होऊन गेले.

कृष्णलीला मोठी रसभरीत आहे. हा राधाकृष्ण म्हणजेच द्रौपदीसखा किंवा रुक्मिणीसखा प्रणयाचा उन्माद व रक्ताची सळसळ व आवेग याबाबतीत

माणसासारखाच आहे. आणि तरीही या सर्व प्रवृत्तींपासून तो मुक्तही आहे.

कृष्ण खरोखरी आहे कोण? गिरीधारी? गिरधर गोपाळ? तसे म्हणावे तर मुरलीधर व चक्रधर देखील आहे. पण एक गोष्ट निश्चित की कृष्ण गूढतम स्वरूपात फक्त गिरधर गोपालातच विशुद्धरीत्या व्यक्त होतो. आपल्या करंगळी-वर कन्हैयाला गोवर्धन पर्वत का बरे उचलावा लागला असेल? इंद्राची पूजा बंद करावयास लावून त्याचा नैवेद्य त्याने स्वतःच खाल्ला म्हणूनच की नाही? कृष्ण आणखीही नैवेद्य खात राहिला असता. परंतु इंद्राने रागावून पाऊस, गारा आणि दगड यांचा वर्षाव सुरू केला. तेव्हां गोवर्धन पर्वत उचलून कृष्णाला आपल्या गाई व गोपाळ यांचे रक्षण करावे लागले. यशोदा व कृष्ण यांचे या विषयींचे एक रहस्यमय संभाषण प्रचलित आहे. इंद्र श्रेष्ठ व फार शक्तिमान देव आहे. नैवेद्याच्या नुसत्या वासानेच तो तृप्त होतो. यशोदा इंद्राला नैवेद्य दाखविते. कारण इंद्र प्रसन्न झाला तर वर देतो. पण रुष्ट झाला तर मात्र त्रास देतो. या-संबंधी कृष्ण यशोदेला म्हणतो, " मी इंद्राहूनही श्रेष्ठ देव आहे. कारण मी केवळ नैवेद्याच्या फक्त वासाने संतुष्ट होत नाही. खूप खातो, अगदी अमर्याद खाऊ शकतो." कृष्णलीलेचे रहस्य हेच आहे. कृष्णलीला म्हणजे नैवद्याचा नुसता वास घेणाऱ्या देवत्वापासून नैवेद्य खाणाऱ्या देवत्वापर्यंत पोचण्यासाठी एका देवाने केलेली यात्रा.

कृष्णाच्या पूर्वीचे भारतीय देव आकाशांतील देवता आहेत. कृष्णाच्या पूर्वी-पासून देवांची परंपरा सुरू झाली. देव बनण्याचा सतत प्रयत्न करणारा माणूस म्हणजे त्रेतायुगातला राम होय. आणि त्यामुळेच त्याच्यात आकाशस्थ देवाचा कांहींसा अधिक अंश आहे. पण माणूस बनण्याचा सतत प्रयत्न करणारा देव म्हणजे द्वापरयुगांतील कृष्ण होय. त्यात तो पूर्णपणे यशस्वी झाला. कृष्ण हा संपूर्ण आणि मुक्त माणूस आहे. त्याने भरपूर खाल्ले व भरपूर खायलाही घातले. खूप प्रेम केले आणि प्रेम करायलाही शिकविले. सामान्यजनांचे रक्षण केले आणि रक्षणाचा मार्गही सांगितला. अलिप्त राहून उपभोग घेणारा तो महान् त्यागी आणि योगी बनला.

व्यक्तीच्या, विशेषतः राजकीय व्यक्तीच्या दृष्टीने रामाचा मार्ग सोपा की कृष्णाचा मार्ग सोपा आणि योग्य असा प्रश्न या संदर्भात विचारणे निरर्थक आहे. कृष्ण देव असूनही माणूस बनण्याचा सतत प्रयत्न करीत होता ही गोष्ट महत्त्वाची आहे. कृष्ण हा स्वरहित व असीम देव होता. त्यामुळे त्याच्या-मध्ये असत्य, कपट आणि हत्यावृत्ती आदि माणसातही संभव अशी वैशिष्ट्ये



यशोदा–कृष्ण
उभा बलराम–कर्नाटक १८ वे शतक

आहेत. फक्त या वैशिष्ठ्यांची नक्कल करणारे लोक मूर्ख आहेत. त्यात बिचाऱ्या कृष्णाचा काहीच दोष नाही. कृष्णाच्या शक्य कोटीतल्या व पूर्णपणे मानवसुलभ गुणांचेच अनुकरण झाले पाहिजे, अगदी एकाग्रतेने झाले पाहिजे.

कृष्णाने इंद्राचा पराभव केला. नैवेद्याच्या केवळ वासावर तृप्त होणाऱ्या देवांना नामोहरम केले; आणि त्यांच्या जागी माणसाप्रमाणे नैवेद्य खाणाऱ्या देवांना प्रतिष्ठित केले. हाडे व रक्तामांसाच्या माणसाला देव बनविले. देवाला आभाळात शोधू नका तर येथेच तुमच्यामध्ये पृथ्वीवर धुंडा अशी भावना जनसाधारणांत जागृत केली. पृथ्वीवरचा देव खातो, प्रेम करतो, माणसात मिळून मिसळून त्यांचे रक्षण करतो.

कृष्ण जे काही करी ते पूर्णपणे रंगून जाऊन करी. खाई ते अगदी रंगून, प्रेम करी तेहि अगदी देहभान विसरून, दुसऱ्याचे रक्षण करी तेही अगदी एकाग्र होऊन. पूर्ण भोग, पूर्ण प्रेम व पूर्ण रक्षण. कृष्ण आपले प्रत्येक काम सर्वशक्तिनिशी, ओतप्रोत करी. शक्तीचा एवढासा अंश देखील त्यावेळी राखून ठेवीत नसे. खरे म्हणजे कृष्णाचे स्वतःचे असे काही नव्हतेच. कृष्ण किंचितहि कंजुष नव्हता. माणसाला अशक्यप्राय अशाप्रकारे मन ओवाळून, शरीर झोकून प्रत्येक कृती करी. अखेर मनुष्यच मनुष्याचा आदर्श होऊ शकेल. भले मग त्यासाठी त्याला एक पायरी आधीच थांबावे लागो स्वतः कृष्णाने स्थितप्रज्ञाचे गीत गायले आहे. आपल्या इंद्रिय शक्तींचा पुरेपूर आणि सर्व स्वाने उपयोग करणाऱ्या माणसाचे गाणे. अशा माणसाला त्याने ' कूर्मोंगानीव ' म्हटले आहे. असा माणूस कांसवाप्रमाणे आपले सारे शरीर केंद्रित करून घेतो. त्याचा आपल्या इंद्रियांवर इतका संपूर्ण ताबा आहे की आपली सारी इंद्रिये तो इच्छाविरहित बनवतो. ही तर भोगाची उलट बाजू झाली असे काही लोक म्हणतील. पण ते बरोबर नाही. भोग, त्याग जे काही करावयाचे ते सर्वस्वाने, अगदी तन्मय होऊन. भोगात तल्लीन झालेला कृष्ण, विरक्तीशी तन्मय झालेला भोगी देखील होताच. कदाचित् भोगी व योगी, या दोघात फारसे अंतर नसेल. तरीहि कृष्णाने एकाचीच व्याख्या केली आहे. अचल स्थितप्रज्ञाची-एखाद्या चल स्थितप्रज्ञाची नाही. इंद्रिजन्य विषयांतून इंद्रिये काढून घेणाऱ्या पूर्ण संयमी माणसाची परिभाषा त्याने केली. परंतु इंद्रियजन्य इच्छांचा इंद्रियांनी उपभोग घेणाऱ्याबद्दल काहीच सांगितले नाही.

' कूर्मोंगानीव ' च्या व्याख्ये बरोबरच ' समग्र-अंग-एकाग्री ' चीही कृष्णाने व्याख्या करावयास हवी होती. जे काम कराल ते सर्वस्व लावून करा. आपले

सारे तनमन ओतून तल्लीन होऊन करा. देव बनण्याच्या प्रयत्नात माणूस काहीसा कृपण झाला आहे. पूर्णपणे आत्मसमर्पण करणे तो काहीसा विसरला आहे. दुसऱ्या कोणाला तरी माणसाने आपल्या स्वतःला समर्पित करायची मुळीच गरज नाही. आपल्याच कामात त्याने आत्मसमर्पण करावे. अगदी केरसुणीने केर काढावयाचा झाला तरी त्या कामातही आपले सर्वस्व त्याने ओतावे. युद्धात सारथ्य करावयाचे तर ते देखील आत्मानंदी टाळी लावून. श्यामा माळी-णीच्या रूपाने राधेकडे फुले विकायला जायचे झाले तरी ते देखील अगदी स्वतःला विसरून. जीवनातील तत्त्वज्ञान शोधून ते गायचे झाले तरी ते देखील अगदी देहभान विसरून. माणसाने आपली शक्ति समर्पित करण्याच्या बाबतीत उदार बनावे अशी कृष्णाची ललकार आहे. माणसाने आपल्या शक्तीची पूर्णपणे आणि एकाग्रतेने कुरवंडी करावी असे कृष्ण सांगतो. नाहीतर माणूस करीत असतो एक आणि त्याचे लक्ष मात्र असते दुसरीकडे. केर काढीत असतो तरी देखील कोपऱ्यात केर पडलेलाच राहतो. मन एकाग्र केले नाही तर साऱ्या इंद्रियांचा संपूर्ण उपयोग करता येत नाही. माणसाला 'कूर्मोंगानीव' आणि 'समग्र–अंग–एकाग्री' असे दोन्ही बनावयाचे आहे. देवाचा माणूस बनण्याचा प्रयत्न तो हाच. याच प्रयत्नात कृष्ण यशोदेला म्हणतो, "आई बघ, इंद्र केवळ वास घेतोय, मी तर खातोय."

आकाशस्थ देवतांना पळवून लावणाऱ्या कृष्णाला फार मोठ्या पराक्रमासाठी आणि कष्टासाठी सिद्ध राहणे जरूर होते. कृष्णाला त्यासाठीच संपूर्ण गोवर्धन पर्वत आपल्या करांगुळीवर उचलावा लागला. इंद्राचा राग ओढवून घेणारा पण त्याच्या परिणामाशी सामना न करू शकणारा म्हणजे आपल्या गाईंचे रक्षण न करू शकणारा कृष्ण काय कामाचा ?

कृष्णाच्या संरक्षण युगाचा प्रारंभ गोवर्धन उचलण्यापासून होणार होता. एका दृष्टीने गिरिधरलीला ही कृष्णाच्या बाळ आणि युवक लीलेचा शेवटचा भाग होय. कालियामर्दन आणि कंसवध हे दोन प्रसंग गिरिधरलीलेच्या जवळपास घडले. गोवर्धन उचलताना कृष्णाची करंगळी दुखली असावी. आणि म्हणून त्याने काहीसे चिडून आपल्या गोपाळांना आणि सवंगड्यांना आधार देण्याबद्दल सांगितले असावे. आईपाशी काहीशा तोऱ्यातच करंगळी दुखावल्या-बद्दलची तक्रार त्याने केली असेल. स्मित हास्य करून गोपींच्या नजरेला नजर भिडवून आपल्या आश्चर्यजनक पराक्रमाची शेखी मिरविली असेल. राधा आणि कृष्ण यांनी परस्परांकडे गंभीर आणि प्रफुल्ल मुद्रेने पाहिले असेल. बिचाऱ्याची

करांगुळी दुखत होती. अद्यापहि दुखत असावी असे गोवर्धनमध्ये गेले की अजूनही वाटते. तेथेच मानस गंगा आहे. गाईच्या रूपाने आलेल्या राक्षसाला कृष्णाने मारले तेव्हा राधा रागावली आणि तिने कृष्णापाशी त्या पापाच्या क्षालनार्थ तिथल्या तिथे गंगा आणून देण्याची मागणी केली. बिचाऱ्या कृष्णाला अशा किती तरी अशक्य गोष्टी कराव्या लागल्या आहेत. दुसऱ्यांना सुखी बनविण्यासाठी तो प्रत्येक वेळी काही ना काही करीत असताना दिसतो.

त्याची करंगळी दुखते आहे. चला, त्याला आधार द्या. एकदा गोवर्धनाच्या रस्त्याने जातांना काही जणांनी—अर्थात् त्यात पंडे होतेच. मी कुठला असा प्रश्न मला विचारला.

मी त्याला चिडवण्याच्या सुरांत म्हटले, “ रामाच्या अयोध्येतला. ”

पंडे म्हणाले, “ सर्व माया एक आहे. ”

मी अशारितीने त्याला खिजवीत असतानाच दुसरा एकजण म्हणाला, “ सत्तू खाणाऱ्या रामाबद्दल गोवर्धनवासीयांना का बरं प्रेम वाटतं ? त्यांचं मन तर लोणी-खडीसाखर खाणाऱ्या कृष्णापाशी गुंतलेलं असतं ?”

कृष्ण लोणी-खडीसाखर खाणारा होता आणि राम सत्तू खाणारा होता हे विधान काहीसे खरे आहे. पण लोणी खाणाऱ्या कृष्णाची स्वतःची करांगुळी मात्र अजूनपर्यंत दुखतेच आहे !

एकदा मथुरेच्या रस्त्याने जात असता एका पंड्याबरोबर मी बोलत होतो. पंड्याला अभिप्रेत असलेल्या सर्वसामान्य निकषाच्या दृष्टीने त्या बोलण्यातून काही आशय निघाला नाही, निघणाराहि नव्हता. पण गोड हसून तो पंड्या म्हणाला, “ दोन गोड गोष्टी बोलणे हेच तर जीवनात महत्वाचे आहे. ” कृष्ण गोड बोलायला शिकला होता. आकाशांतल्या देवांना त्याने पळ काढावयास लावले आहे. त्यांच्याजागी लोणी खडीसाखर खाणाऱ्या देवांना सुप्रतिष्ठित करून तो गेला आहे. पण त्याच्या शरीराचा कोठला ना कोठला तरी अवयव अजूनपर्यंत दुखून राहिला आहे.

माणूस बनण्याचा प्रयत्न करणारा कृष्णाप्रमाणेच आणखीही एक देव होऊन गेला. जगात त्याचे साम्राज्य अधिक पसरले. तो गरीब सुताराचा मुलगा होता आणि स्वतःच्या जीवनात त्याने संपत्ती कमाविली नव्हती की चैनविलास केला नव्हता. त्यामुळेच त्याचा प्रसार अधिक झाला असावा. कदाचित याचे कारण असेही असेल की जनरक्षणाच्या कामी शेवटी त्याची केवळ करांगुळीच दुखली नाही तर शरीराचा कण न् कण कापला गेला आणि प्रत्येक अवयवाचा सांधा न्

ठाण. स्थळप्रत
दि:
नों. दि:



**बालकृष्ण**

दक्षिण भारत १८ वे शतक

सांधा निखळून तो मृत्यु पावला. अजूनपर्यंत देखील देहभान विसरून लोक त्याचे स्मरण करतात. आज जे जगाचे स्वामी आहेत त्यांच्या संस्कृतीचे पूर्वज असलेल्या रोमनिवासीयांशी त्याला झगडा करावा लागला. त्यामुळेच ईसू मसीहाचा प्रसार सर्व जगात झाला असण्याची शक्यता आहे. रोमन लोकांपेक्षा ईसू श्रेष्ठ ठरला आणि आजच्या युरोपियनांपेक्षा रोमन श्रेष्ठ ठरले. कृष्णलीलेचा महिमा व्रज आणि भारतभूमी यांच्यापुरताच मर्यादित राहिला. त्यामुळेच कृष्णाचे भवितव्यही मर्यादित झाले. कदाचित यामुळेच कृष्णाचा येशू इतका प्रसार झाला नसावा.

कसेही असो. कृष्ण आणि क्रिस्टोस दोघांनीहि आभाळातल्या देवांना हत-प्रभ केले. दोघांच्या नावात आणि कहाणीत देखील कोठे कोठे साम्य आहे. दोन महापुरुषांची तुलना कधी करू नये. हे दोघेहि आपआपल्या क्षेत्रात मोठे आहेत. तरी देखील प्रेमासाठी आत्मविसर्जन करण्याच्या बाबतीत क्रिस्टोस आणि संपूर्ण मनुष्य लीलेच्या बाबतीत कृष्ण अतुलनीय आहे. कृष्णाचे आम्ही वंशज शक्तिशाली बनलो तर कृष्णलीला जगभर रसमयता पसरवील अशी शक्यता आहे.

कृष्ण हिंदुस्थानच्या भूमीशी अतिशय मिसळलेला आहे. हिंदुस्तानातले बहुतांश देव आणि अवतार येथल्या मातीलाच चिकटलेले आहेत. हिंदुस्तान-च्या उत्तर-दक्षिण एकतेचा देव म्हणजे त्रेतायुगातला राम आणि हिंदुस्थानच्या पूर्व-पश्चिम एकतेचा देव म्हणजे द्वापारयुगांतील कृष्ण होय. राम उत्तर-दक्षिणेच्या केंद्राभोवती आणि कृष्ण पूर्व-पश्चिम केंद्राभोवती फिरले. देशाचे उत्तर-दक्षिण आणि पूर्व-पश्चिम ऐक्य साधणे हाच राम-कृष्णांचा धर्म होता असेही केव्हा केव्हा वाटते. तसे तर सर्व धर्मांची उत्पत्ती राजकारणातूनच झालेली आहे. इतस्ततः पसरलेल्या स्वजनांना एकत्र करणे, त्याच्यातील कलह मोडणे, त्यांचे मीलन घडवून आणणे आणि शक्य तर आपल्या आणि सर्वांच्याच भोवतालची कुंपणे जमीनदोस्त करणे ही धर्मांची उद्दिष्टे आहेत. त्याचबरोबर सदाचार आणि आत्मचिंतन या बाबतीत जीवनस्तर काहीसा अधिक उंचावणे हामुद्धा धर्मांचा हेतु आहे.

देशाचे ऐक्य आणि समाजाची शुद्धी साधण्यासाठीच जगातील साऱ्या महान धर्मांची उत्पत्ती झाली आहे. अर्थात् यापेक्षाही अधिक उच्चतर पातळीवर नेऊन मानवाला पूर्णत्वाप्रत पोहोचण्याचाही धर्म प्रयत्न करतो. भारतीय धर्मात ही उद्दिष्टे जितक्या परिपूर्ण स्वरूपात दिसतात तितकी ती अन्य धर्मांत दिसत

नाहीत. भारतीय धर्मातील एकतेचे अद्वितीय उद्दिष्ट प्राप्त करण्याच्या हेतूनेच राम व कृष्ण यांच्या वास्तविक कथा रचण्यात आल्या असाव्यात असे कधी कधी वाटते. एका विशाल देशाच्या उत्तर-दक्षिण आणि पूर्व-पश्चिम अशा चारी दिशा एका सूत्रात बांधावयाच्या होत्या. या विलक्षण उद्दिष्टासाठी या विलक्षण कथा बनविण्यात आल्या. अर्थातच त्या साऱ्याच्या साऱ्या काल्पनिक आहेत असे मला म्हणायचे नाही. गोवर्धन पर्वताची प्रचलित कथा मात्र अगदी काल्पनिक आहे. कृष्णाशी संबंधीत अशा आणखी किती तरी व्यक्तींच्या अशाच काल्पनिक गोष्टी अस्तित्वात आहेत. त्या रचणाऱ्यांचे कसब विलक्षणच म्हटले पाहिजे. राम व कृष्ण या नांवाचे अद्‌भुत पुरुष कदाचित् होऊनही गेले असतील. त्यांनी केलेले चमत्कारही कदाचित् जगाच्या इतिहासात अपूर्ण असतील. परंतु प्रत्यक्ष घडलेल्या इतिहासानेही लाजावे इतक्या तपशीलाने आणि क्रमबद्ध घटनांमध्ये राम-कृष्णांचे जीवन गुंफणारे त्या कथांचे रचनाकार हा देखील एक अलौकिक चमत्कारच होय. बुद्ध व अशोक भारतीयांच्या स्मृतीत अस्पष्ट रूपांत असल्याचे दिसते. परंतु राम व कृष्ण यांच्या कथाकहाण्यांच्या बारीक बारीक तपशीलाची देखील भारतीयांना सप्रमाण माहिती आहे; आणि त्या कथा ते मोठ्या रुचीने आळवत असतात.

महाभारत ही हिंदुस्थानची पूर्व-पश्चिम यात्रा आहे तर रामायण उत्तर–दक्षिण यात्रा आहे. पूर्व–पश्चिम यात्रेचा नायक कृष्ण तर उत्तर-दक्षिण यात्रेचा नायक राम आहे. मणीपुरपासून तो द्वारकेपर्यंत कृष्ण आणि त्याचे सहकारी यांनी पराक्रम गाजवला आहे तर जनकपुर ते श्रीलंकेपर्यंत राम आणि त्याचे सहकारी यांनी कर्तृत्व गाजविले आहे. रामाचे कार्य तुलनेने सहज होते. किमान त्याच्या कामात एकसंधपणा अधिक होता. रामाचा संघर्ष किंवा मैत्री झाली ती ती त्याच्या स्वतःचा संस्कृतीहून वेगळ्या असलेल्या अशा भील, किराट, किन्नर राक्षस इत्यादींशी. त्यांना आपल्यात सामावून घेऊन आपल्या संस्कृतीत मिसळून घेणे हे रामाचे कार्य होते. ते कार्य रामाने त्यांना पराभूत करून केले किंवा त्यांचा पराभव करावा न लागता त्याला करता आले.

कृष्णाचा स्वकीयांशी संबंध आला. एकाच संस्कृतीच्या दोन गटांपैकी एका गटाच्या साहाय्याने कृष्णाला पूर्व–पश्चिम ऐक्य स्थापन करावे लागले. हे काम गुंतागुंतीचे होते. त्यासाठी कृष्णाला अनेक तडजोडी कराव्या लागल्या. सतत लढे करावे लागले. कितीतरी कपट करावे लागले. कारस्थाने रचावी लागली. हे करीत असताना कृष्णाला अगदी अपूर्व व तावून सुलाखन निघालेले राजकार-

णाचे इंगित गवसले. कित्येकदा उच्चकोटीची कामेही कृष्णाने केली.

पूर्व–पश्चिम राजकारणाप्रमाणेच माणसामाणसातले, विशेषेकरून स्त्री-पुरुषातले संबंध गुंतागुंतीचे होते. अर्जुनाची मणिपूरमधील चित्रांगदा, भीमाची हेडंबा व पांचाली या स्त्रियांविषयी या संबंधात काय बोलावे? कृष्णाच्या आत्येचा एक मुलगा होता अर्जुन आणि दुसरा होता कर्ण. पण दोघांचे बाप मात्र वेगवेगळे होते.

कृष्णाने कर्णाचा कपटाने वध करण्यासाठी अर्जुनाला चिथावले. तरी त्या त्याच्या कृतीतून जीवनतत्त्वाचे एक सार व्यक्त झाले. कारण त्यांत स्वतःचा कृष्णाचा काहीच स्वार्थ नव्हता. त्याच्या इतका निस्वार्थ मानव झाला नाही. आणि होणे शक्य नाही. रामाने उत्तर-दक्षिण ऐक्याचे केवळ नेतृत्व केले असे नाही तर त्याला राज्यपदहि मिळाले. पण कृष्णाला काय मिळाले? तो आपला अखेर मुरलीच वाजवीत राहिला. एवढी त्याची सखी द्रौपदी–महाभारताची नायिका, तिला त्याने दिले; पण तिच्याकडून घेतले मात्र काही नाही, मिळविले काही नाही.

पूर्व–पश्चिम एकतेची दोन प्रमुख केंद्रे कृष्णकालात स्पष्टपणे पुढे आली. एक पाटलीपुत्र व गयेचे मगध साम्राज्य आणि दुसरे हस्तिनापूर व इंद्रप्रस्थाचे कुरु-साम्राज्य. मगध साम्राज्याचा विस्तार साक्षात् कृष्णाच्या मथुरेपर्यंत पोचला होता. तेथेच मगधाधीश जरासंधाचा जावई कंस राज्य करीत होता. शिशुपाल व मगधाचे मांडलीक राजे या दोन साम्राज्यांच्या मध्यावर राज्य करीत होते. बलशाली कृष्णाने या शक्तिशाली मगध-साम्राज्याविरुद्ध कुरु-केंद्राची निर्मिती केली. कृष्णाने कुरु-केंद्राचा फार मोठा विस्तार केला. पूर्वेकडील मणिपूर ते पश्चिमेकडील द्वारका एवढा विस्तीर्ण प्रदेश कुरु-साम्राज्यांत समाविष्ट केला. पूर्वेकडील पर्वतमय सीमा व पश्चिमेकडील सागरसीमा यांना कृष्णाने एकत्र गोवले. हे केंद्र कायम व सामर्थ्य-संपन्न बनावे यासाठी त्याला अत्यंत मेहनत करावी लागली; पराक्रम करावा लागला. दूरदृष्टीने प्रत्येक गोष्टीचा विचार करावा लागला. आपल्या स्वतःच्या घरी मथुरेत मगधाधीशाच्या जावयावर, आपल्या मामावर त्याने पहिला प्रहार केला. त्यावेळी साऱ्या हिंदुस्थानात या प्रहाराने खळबळ माजविली असेल. कृष्णाची ही पहिली हाक होती. वाचेने नव्हे तर कृतिद्वारा त्याने रणभेरी वाजविली. त्याकडे कोण दुर्लक्ष करू शकले असते? सर्वांना चर्चेसाठी बोलविण्यात आले. मगधराजाला अथवा कृष्ण म्हणेल त्याला सम्राट म्हणून निवडण्यासाठी पाचारण करण्यात आले.

कृष्णाने शेवटी मोठ्या कपटाने नाव सुचविले. न्याय-अन्यायाच्या प्रश्नावर कुरु वंशाचे दोन तुकडे झाले आणि त्यातील अन्यायी बाजूशी मगधकेंद्राचे संधान जोडून दिले. तो कुरुवंशाचा अंतर्गत व परस्परांतील तंटा आहे अशीच जगाची समजूत झाली असेल. पण तो तंटा वास्तविक इंद्रप्रस्थ-हस्तिनापुरचे कुरू-साम्राज्य आणि राजगिरीचे मगध साम्राज्य यांच्यातील आहे हे कृष्णाला माहीत होते.

कंसवधामुळे राजगिरीचे राज्य संतापून उठले असेल. कृष्णाने पहिल्याच घावात मगधच्या पश्चिमेकडील सत्तेला जवळजवळ नेस्तनाबूद केले. आता तर फारच मोठ्या प्रमाणात शक्तिसंचयाची व शक्तिसंवर्धनाची गरज होती. केवळ आरंभ झाला होता. तो चांगला झाला होता. साऱ्या जगाला कृष्णाच्या सामर्थ्याची जाणीव झाली. पण प्रारंभ करून तेथेच थांबण्याइतका कृष्ण मूर्ख थोडाच होता? कंसाचा सासरा मगधराज आणि त्याची सर्व हिंदुस्थानव्याप्त सत्ता यांच्याशी झुंज देण्याइतपत कृष्णाची ताकद नव्हती. म्हणून प्रारंभी त्यावर नुसता प्रहार करून आणि त्याचा डंका जगात वाजवून कृष्ण पळून गेला. पळाला तो देखील फार दूर द्वारकेत. तेव्हापासूनच त्याचे नाव रणछोडदास पडले. गुजराथेत आजहि हजारो लोकांचे नाव रणछोडदास आहे. मी प्रथम हे नाव ऐकले तेव्हा खूप हसलो, अजूनहि खदखदा हसतो. पण तसे पाहिले तर हिंदुस्थानात आणखीही असे रणछोडदास देव होऊन गेलेले आहेत की ज्यांनी पळून जाऊन पराक्रम गाजविला. ज्ञानवापीचा शिव त्यापैकीच एक होय. हा फार वृद्ध देश आहे. येथे लढता लढता थकलेल्या हाडांची माणसे नेहमीच पळतात. पण शरीर थकले म्हणून कृष्ण पळाला नाही. तारुण्याचे रक्त अंगांत सळसळत होते तेव्हा तो पळाला. त्याला आपल्या शरीरातील हाडे व रक्तामांस वाढवायला वेळ हवा होता. आजकालच्या गनिमी युद्धासारखाच कृष्णाचा हा गनिमी डावपेच होता. वार करायचा आणि पळून जायचे. परंतु आज मात्र कृष्णाचे वंशज पळण्यातच फक्त पटाईत आहेत याचे दुःख होते.

मथुरेपासून द्वारका सरळ मार्गाने जवळपास ७०० मैल आहे. सध्याच्या रस्त्याचे अंतर मोजता ते अंदाजे १०५० मैल आहे. मधल्या रस्त्याचे अंतर सुमारे ८५० मैल आहे. कृष्ण आपल्या शत्रूपासून निसटून दूर गेला तो या ८५० मैलांवर असलेल्या द्वारकेस. अशा रितीने पळतानाही त्याने देशाची पूर्व-पश्चिम एकता साधली. भारताचे पश्चिम टोक पूर्वेशी जोडून दिले. पुढे पाच-पांडवांच्या वनवास काळात अर्जुनाची चित्रांगदा व भीमाची हेडम्बा यांच्याद्वारे

त्याने अतिपूर्वेकडील शेवटचे टोकदेखील जोडून घेतले. आणि अशा रितीने मथुरेपासून मणिपूरपर्यंतच्या विस्तीर्ण प्रदेशाचे ऐक्य साधले. या दोहोंतील अंतर मोजावयाचे असेल तर मथुरा ते अयोध्या, अयोध्या ते राजमहाल आणि राजमहाल ते इम्फाल ( मणिपूर ) या मार्गांचे अंतर मोजणे जरूर आहे. हेच त्यावेळचे मोठे राजमार्ग असावेत. मथुरा ते अयोध्या यांतील अंतर जवळजवळ ३०० मैल आहे. अयोध्याहून राजमहाल जवळजवळ ४७० मैल आहे. राजमहाल ते इम्फाल यांच्यामधले अंतर सुमारे ५२५ मैल आहे. सध्याच्या मार्गांनी हे अंतर ८५० मैल आणि सरळ अंतर ३८० मैल आहे. अशा प्रकारे मथुरा ते इम्फाल यांतील अंतर तत्कालीन राजमार्गांच्या दृष्टीने सुमारे १६०० मैल असावे. कुरु-केंद्रावर ताबा मिळवून ते बळकट बनविण्यापूर्वी कृष्ण केंद्रापासून ८०० मैल लांबवर पळाला आणि आपले सहकारी आणि शिष्य यांना त्याने १६०० मैल अंतराच्या परीघात फिरावयास लावले. अशाप्रकारे ही पूर्व-पश्चिम अशी भारताची पूर्ण यात्राच झाली. त्याकाळचे भारतीय राजकारण समजून घेण्याच्या दृष्टीने काही ठिकाणचे अंतरदेखील समजून घेणे आवश्यक आहे. मथुरा ते वाराणसी हे अंतर ३७० मैल आणि मथुरा ते पाटलीपुत्र ( पाटणा ) जवळपास ५०० मैल आहे. दिल्लीपासून-तत्कालीन इन्द्रप्रस्थापासून—मथुरेचे अंतर जवळजवळ ९० मैल आहे. पाटणा ते कलकत्ता यांतील अंतर सुमारे ३२५ मैल आहे. येथे कलकत्त्याचे फारसे महत्त्व नाही. कलकत्ता हिंदुस्थानची—गुलाम हिंदुस्थानची का होईना— काही काळ राजधानी होती एवढेच कलकत्त्याचे महत्त्व. त्यावेळी मगध-केंद्राचा पुनर्जन्म एका दृष्टीने कलकत्त्याला झाला असे म्हणता येईल. कृष्ण काळातील मगधसाम्राज्याचे केंद्र राजगिरी आहे. त्याचप्रमाणे ऐतिहासिक मगधसाम्राज्याचे केंद्र पाटणा म्हणजेच पाटलीपुत्र आहे. आणि या दोहोतले अंतर ४० मैल आहे. पाटणा-राजगिरी केंद्राचा पुनर्जन्म कलकत्त्यात झाला या घटनेचे इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी अध्ययन करावे; वाटल्यास क्षुब्ध होऊन परकीयांनीं हे कार्य केले याबद्दलही राग व्यक्त करावा.

कृष्णाने मगधसाम्राज्याचा नाश करून कुरू—साम्राज्याची प्रतिष्ठापना का केली ? या प्रश्नाचे एक उत्तर तर उघड आहे. त्यावेळी उत्तर आणि पश्चिम प्रदेशांत भारतीयांची दाट लोकवस्ती होती. राजगिरी व पाटणा ही ठिकाणे तेथून फार लांब होती. त्याशिवाय मगधसाम्राज्य काहीसे जुने झाले होते. तसे ते शक्तिशाली होते पण त्याचा प्रसार सीमित होता. कुरू साम्राज्य नवे होते. आणि त्याची सत्ता आणि विस्तार या दोहोंचा कृष्णच सर्वशक्तिसंपन्न निर्माता



राज गोपाळ

दक्षिण भारत १८ वे शतक

होता. आपल्या इच्छेनुसार तो मगधसाम्राज्याला वळण देऊं शकत नव्हता पण कुरू साम्राज्याला मात्र आपल्या इच्छेप्रमाणे वळवूही शकत होता आणि वाढवूही शकत होता. त्याला सारा देश एका सूत्रात गोवायचा होता. कृष्ण त्रिकालदर्शी होता. उत्तर आणि पश्चिम प्रदेशावर भविष्यांत ग्रीक, हूण, पठाण, मोंगल इत्यादींची आक्रमणे होणार आहेत हे त्याने ओळखले असावे. म्हणून या आक्रमणांचा जोरदार सामना होऊ शकेल अशा जागीच भारतीय ऐक्याचे केंद्र स्थापले पाहिजे असे त्याला वाटले असावे. पण त्या त्रिकालदर्शीला हे कसे दिसले नाही की या परकीय आक्रमणांच्या पूर्वीच एतद्देशीय मगधसाम्राज्य सूड घेईल आणि शेकडो वर्षे भारतावर आपले राज्य कायम करील आणि आक्रमणाच्या वेळेपर्यंत कृष्णाच्या भूमीच्या जवळ म्हणजे कनौज व उज्जैनपर्यंतहि ते साम्राज्य पसरेल पण त्याची सत्ता दुर्बळ असेल? हे सर्व काही घडणार आहे, परंतु ते थांबविण्यासाठि काही करता येण्यासारखे नाही असेही कदाचित् त्या त्रिकालदर्शीच्या चक्षूंना दिसले असेल. मगधसाम्राज्याचा विस्तार रोकण्यासाठी लागणारी बुद्धिमत्ता किंवा साधुत्व आपल्या देशवासीयांत कृष्ण निर्माण करूं शकला नाही. अर्थात् ते त्याचे कामही नसावे. तो फक्त रस्ता दाखवू शकत होता. त्यातही त्याने कमतरता केली असे फार तर म्हणावे. आपण दाखविलेल्या मार्गाने केवळ ज्ञानीच नाहीत तर अज्ञानीदेखील जाणार आहेत हे त्या त्रिकालदर्शीला समजायला हवे होते. रामाच्या मार्गाने गेल्याने कदाचित् मनुष्याचा फायदा होत नसेलही; परंतु निदान अज्ञानी माणसाचे त्या मार्गाने गेल्याने नुकसान तर निश्चितच होत नाही. कृष्णमार्गाचे तसे नाही. त्याच्या बुद्धिहीन अनुसरणामुळे कुरु–पांचाल कराराचे काय झाले ते आपण पाहतोच.

हा करार ही कुरू-साम्राज्याची आधारशिला होती. कुरू व पांचाल या दोन्ही प्रदेशांच्या आसपासचा भाग एकत्र आणून भक्कम ऐक्य प्रस्थापित करावयाचे होते. कृष्णलीलेने हे ऐक्य साधले. त्यासाठीच पांचालीचा विवाह पाच पांडवांशी झाला.

ही पांचाली ही एक अद्‌भुत स्त्री होती. पांचाली अर्थात् द्रौपदी. तिच्यापेक्षा श्रेष्ठ अशी दुसरी हजरजबाबी व ज्ञानी भारतीय स्त्री नाही. "जो माणूस स्वतः पराभूत झाला आहे त्याला दुसऱ्याला पणाला लावायचे स्वातंत्र्य आहे काय?" असा खणखणीत प्रश्न कुरू-सभेला टाकून त्याचे उत्तर मागणारी द्रौपदी ती हीच.

अर्जुनासह पाची पांडव तिच्यापुढे फिके वाटतात. या द्रौपदीच्या ऊर्फ कृष्णेच्या योग्यतेची फक्त कृष्णाच्या योग्यतेशीच तुलना होऊ शकते. महाभारताचा नायक

आहे कृष्ण व नायिका आहे कृष्णा. कृष्ण-कृष्णा यांच्यातील नात्याला विश्व-इतिहासात तोड नाही. दोघे केवळ सखा-सखी का राहिले? दोघांपैकी कोणी कधी आणखी काही व्हावयाची इच्छा दाखविली काय? सखा-सखी हे त्यांचे नाते खरोखरच मानसिक होते की कुरु-साम्राज्य निर्मिण्याच्या व त्याच्या विस्ताराच्या हेतूने ते जोडले होते? ते कसेही असो. कृष्ण-कृष्णातील हे नाते राधा-कृष्णाच्या नात्याहून कमी महत्त्वाचे नाही हे मात्र निश्चित. परंतु साहित्यिक व कृष्णभक्त यांनी त्याचा फारसा विचार केलेला दिसत नाही. भारताच्या पूर्व-पश्चिम एकतेच्या या शिल्पकाराला आपल्या स्वतःच्याच शिकवणुकीनुसार आपल्या कर्माच्या फळाचा मोह नसावा; त्याला फक्त कर्मच करावयाचे होते. म्हणून कृष्ण-कृष्णांतील नाते अखेरपर्यंत सखा-सखीचेच राहिले असेही कदाचित असेल. कृष्णाने स्वतःच जर कर्मफलाचा लोभ बाळगला असता तर त्याला अपूर्व असा निर्माताही होता आले नसते, हेही आणखी एक कारण असू शकेल. आपल्या मथुरेलाच साम्राज्याचे केंद्र बनवावे अशी लालसा त्याने कधी बाळगली नाही. इंद्रप्रस्थ व हस्तिनापूरला ते स्थान मिळाले तरी त्याला त्याची पर्वा नव्हती. या निरासक्तीमुळेच तो कृष्णेशीही केवळ सखी म्हणूनच वागला. जग ज्याला ‘आपली’ म्हणते तशी त्याने तिला आपली बनविली नाही. कृष्णाला हे सहज जमलें की त्यासाठी त्याला मानसिक यातना सहन कराव्या लागल्या? कोण जाणे!

कृष्णा आपल्या नावाप्रमाणेच सावळी होती. श्रेष्ठ सुंदरीही असावी. तिच्या हरणासारख्या डोळयात बुद्धीचे तेज चमकत असावे. गौरवर्णी स्त्रीपेक्षां सुंदर श्यामलवर्णी स्त्री सर्वांगाने सुडौल असते. राधा गोरी असावी. बाल आणि युवक वयातला कृष्ण राधेशी समरस झाला असावा व प्रौढ वयातील श्रीकृष्णाचे मन कृष्णाने व्यापले असावे. राधा आणि कृष्ण तर एकरूप होतेच. तारुण्यांत नक-ळत गौरवर्णीय स्त्रीत गुंतून पडायचे आणि प्रौढ वयांत मात्र श्यामवर्णीय स्त्री आवडू लागायची ही चूक आम्ही कृष्णाचे वंशज कितीकाळ करत राहणार आहोत? कृष्ण-कृष्णा यांच्या संबंधांचा अधिक काहीं अर्थ असो नसो. एक बोध मात्र त्यापासून निश्चित मिळतो. भारतीय पुरुषांना सांवळया स्त्रीचे जे आक-र्षण आहे त्याचा त्यांनी पुनः विचार करावा.

रामायणाची नायिका गोरी आहे. महाभारताची नायिका सावळी आहे. गोऱ्या नायिकेपेक्षा सावळी अधिक जिवंत आहे. कसेही असो. याच कृष्ण-कृष्णा नात्याचे अज्ञानी लोकांकडून पुनरुज्जीवन झाले. त्यात

कर्मफलाच्या उद्दिष्टाचा त्याग करण्याची मनाची तयारीही राहिली नाही. कृष्णा ही पांचाल म्हणजेच कनौज प्रदेशातील होती. संयुक्ता पण तेथीलीच. कुरू साम्राज्याचे केंद्र जे इंद्रप्रस्थ तेथील पुढच्या काळातील अज्ञानी राजा पृथ्वीराज, आपल्या पूर्वजांच्या-कृष्णाच्या मार्गाचे अनुसरण करू शकला नाही. ज्या पांचाल देशाच्या द्रौपदीद्वारा कुरुसाम्राज्याची आधारशिला बसविण्यात आली; त्याच पांचाल देशाच्या संयुक्तेपायी दिल्ली–कनौजमध्ये झालेली स्पर्धा परकीयांच्या आक्रमणाच्या यशाला कारणीभूत झाली. व्यक्तीची नाही पण इतिहासाची मात्र कधी निस्तेज स्वरूपात तर कधी सुखद स्वरूपात पुनरावृत्ती होते असे केव्हा केव्हा वाटते. कुठे द्रौपदी आणि कुठे संयुक्ता! कुठे कृष्ण आणि कुठे पृथ्वीराज! हे खरे आहे की दोघात काही साम्य नाही. पण निस्तेज असली तरी ती पुनरावृत्ती होती यात शंका नाही.

कृष्णाच्या कुरू साम्राज्याची आणखीही रहस्ये असावीत. राम हा आदर्शवादी, एकरूपी एकतेचा निर्माता आणि प्रतीक होता तसा जरासंध भौतिकवादी ऐक्याचे प्रतीक होता हे स्पष्ट आहे. आजकाल काही लोक कृष्ण जरासंधातील युद्ध हे आदर्शवाद-भौतिकवाद यातील युद्ध समजू लागले आहेत. हे काहीसे खरे असले तरी ते या घटनेचे अपूर्ण विवेचन आहे. जरासंध हा भौतिकवादी एकसंध एकतेचा इच्छुक होता. नंतरच्या मगध देशीय मौर्य आणि गुप्त राज्यांमध्ये काही प्रमाणात याच भौतिकवादी एकसंघ एकतेचा प्रादुर्भाव झाला आणि त्याच दृष्टिकोनातून बौद्ध धर्माचा देखील उद्भव झाला.

कृष्ण हा आदर्शवादी बहुरंगी एकतेचा निर्माता होता. आजवर भौतिकवादी बहुरूपी एकतेच्या पायावर भारताची निर्मिती करण्याचे प्रयत्न कधीच झालेले नाहीत असे मला वाटते. आदर्शवाद आणि भौतिकवाद यांच्या सम्मीलित बहुरूपी एकतेच्या पायावर भारताची निर्मिती होईल तेव्हा चिरकालिन चमत्कार होईल.

रामाचा एकरूप ऐक्याचा प्रयास अनुकरणीय वाटत असला तरी आज तरी कृष्णाचा बहुरूपी एकतेचा प्रयत्न सर्वात अधिक स्वीकारार्ह वाटतो. कृष्णाच्या बहुरूपतेत अन्यत्र नसलेले असे त्रिकालजीवन आहे.

कृष्ण केवळ क्षत्रिय राजा नव्हता तर यादव (गवळी) शिरोमणि देखील होता. कदाचित् तो गवळी अधिक होता; क्षत्रिय कमी. म्हणूनच कृष्णकथेत राधा गवळणीला अढळ स्थान मिळाले. क्षत्राणी द्रौपदी तिला तेथून हटवू शकली नाही. विराट विश्व आणि त्रिकाळ यांना अनुरूप असे कृष्णाचे बहुरूपी व्यक्तित्व होते.

राम आणि जरासंध एकरूपी होते. त्यांच्या आदर्शवादी एकरूपतेत केंद्रीयकरण आणि क्रौर्य कमी असले तरी थोडे का होईना केंद्रीकरण दोघांतही होतेच. मौर्य आणि गुप्त राज्यात केवढे तरी केंद्रीकरण होते; आणि काहीसे क्रौर्यही होते.

बिचाऱ्या कृष्णाने इतके निःस्वार्थ परिश्रम केले पण जनमानसात रामच वरचढ राहिला आहे. केवळ बंगालमध्येच 'बोल हरि, हरि बोल' असे म्हणून प्रेतयात्रा काढतात. नाहीतर दक्षिणेतला काही भाग सोडल्यास साऱ्या हिंदुस्थानात 'रामनाम सत्य है' म्हणतच प्रेतयात्रा काढली जाते. बंगालइतके जरी नसले तरी देखील ओरिसा आणि आसाममध्ये कृष्णाला चांगले स्थान आहे. राम आणि कृष्ण यांच्यात डावे-उजवे ठरविणे कठीण आहे. खुद्द व्रजभूमीच्या चोहो-बाजूंच्या प्रदेशातील लोक देखील परस्परांना 'जयरामजी' म्हणून नमस्कार करतात ही सर्वांत आश्चर्याची गोष्ट आहे. रस्त्यावरून जाणाऱ्या अपरिचित लोकांना देखील हे 'जयराम' मोठे गोड वाटते. जयरामाच्या लोकप्रियतेचे हेहि कदाचित एक कारण असावे.

राम हा मधुर, शांत व सुसंस्कृत अशा त्रेता युगाचा देव आहे; आणि कृष्ण हा परिपक्व, गुंतागुंतीच्या, तीक्ष्ण व प्रखर बुद्धियुगाचा देव आहे. कृष्णाचे वंशज कृष्णाला आपला आदर्श मानायला घाबरतात. स्वतःला विसरून अविश्रांत कार्य करण्याची त्याची शक्ति असाध्य आहे असे त्यांना वाटते. म्हणून कृष्णभक्त त्याच्या मैत्रीभावनेतील पक्षपाती वृत्तीची आणि कपटनीतीची तेवढी नक्कल करतात. म्हणूनच कृष्ण हा येथे कृतिप्रवणतेचा देव होऊं शकलेला नाही.

रामापेक्षा कृष्णाने अधिक कृति केल्या आहेत. कितीतरी तह आणि तंटे आणि प्रांताप्रांतांतील परस्पर संबंधांचे धागे त्याला पालटावे लागले. फार मोठे श्रम आणि महान पराक्रम ! प्रांतातील परस्परसंबंधांत कृष्णनीति आताहि चालवली जावी असा याचा अर्थ नाही. पूर्व-पश्चिम एकता करून गेलेल्या कृष्णाबरोबर त्या नीतीचे औचित्य देखील संपले आहे. शिल्लक काही उरले असेल तर ते कृष्णाचे मन आणि त्याची वाणी ! आणि रामाचे शिल्लक उरले आहे कर्म. अजूनपर्यंत भारतीय या दोहोंचा समन्वय करू शकलेले नाहीत. तसा समन्वय साधला तर रामाच्या कृतीच्या स्वरूपात देखील परिवर्तन होईल. राम रडवा आहे. अमर्याद रडका आहे. कृष्ण कधीच रडत नाही. एखाद्या सखीला किंवा स्त्रीला दुष्ट लोक विवस्त्र करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा अथवा तत्सम प्रसंगी त्याचे डोळे जरूर डबडबतात पण अश्रुधारा वाहात नाहीत.

त्या कृष्णाची वाणी आणि मन कसे कमाल होते ? आज देखील त्या वेळच्या

गोपी आणि अन्य लुब्धा कृष्णाची वाणी आणि मुरलीची तान ऐकून कशा रसविभोर होत आणि देहभान विसरून कशा नाचत याची गीते आपण ऐकतो. त्याच बरोबर काम-निष्काम; सुख-दुःख, शीत–उष्ण, जय-अजय यांच्या बाबतीत समभाव राखण्याचा कृष्णाने साधलेला योग आणि सर्वांभूती एकच अक्षय भाव ठेवण्याचे त्याचे सुस्वर तत्त्वज्ञान याची गीते ऐकू येतात. तत्त्वज्ञान गीतबद्ध करणारा जगात एक कृष्णच झाला.

चतुर वाणीची मूर्तिमंत देवी जी द्रौपदी, तिच्याबरोबर कृष्णाचा संबंध कशा प्रकारचा होता ?

ज्याच्यानंतर आणखी एखादी अवस्था किंवा क्षेत्र संभवत नाही असे सखासखी हे नाते आहे तरी काय? हे नाते हीच प्रेमाची अंतिम अवस्था आणि असीम क्षेत्र आहे काय ? कृष्ण कपटी जरूर होता पण कृष्णेबरोबर त्याने कधीच कपट केले नाही. कदाचित वचनबद्ध होता म्हणूनही असेल. जेव्हा कधी कृष्णेने त्याची आठवण काढली तेव्हा तो धावत आला. स्त्री-पुरुषातील कोमल मैत्रीला आजकालचे मनोवैज्ञानिक अवरुद्ध प्रणयासक्ती असे म्हणतात. हा संयम सामाजिक किंवा मानसिक कारणांनी निर्माण होऊ शकतो. द्रौपदीचे पती पाच पांडव हे कृष्णाचे भाऊ होते आणि द्रौपदीला त्यानेच कुरू-पांचाल कराराची आधारशिळा बनविले होते. अशा प्रकारची उभयांच्या प्रेमात आडकाठी आण-णारी अनेक कारणे होती. कृष्णेशी संबंध आला तेव्हां कधीही कृष्णाची वृत्ती अनावर झालेली नाही. तिच्याशी असलेले त्याचे नाते त्याच्या दृष्टीने सहज आणि अंतीम स्वरूपाचे होते. त्याच्यापुढे त्याला जायचेच नव्हते. कृष्णाचे राधेशी ज्या प्रकारचे सहज, अंतीम पण रसमय नाते होते तसेच हे कृष्ण-कृष्णा नाते होते. मी म्हणतो ते खरे असेल तर त्या उभयतांतील या सखा-सखी नात्याची, त्यांतील तपशीलासह, साऱ्या जगाला माहिती करून दिली पाहिजे. कारण त्यामुळे पुरुष-स्त्री संबंधांचे एक नवे दालन उघडू शकेल. राधेचे तेज कृष्णावर निरंतर पसरलेले आहे तशीच कृष्णाची शोभा राधेवरही निरंतर पसरलेली आहे. राधेचे तेज जसे आगळे तसे कृष्णाची घनमेघ शोभाही असा-धारण आहे. राधेच्या तेजातून तृप्ती ओसंडते तर कृष्णाच्या घनमेघ शोभेतून उत्कंठा व्यक्त होते.

राधेची उत्फुल्लता तर कमाल आहे. राधा व कृष्ण एक आहेत. राधा कृष्णाचे स्त्रीरूप आहे तर कृष्ण राधेचे पुरुषरूप आहे. भारतीय साहित्यांत प्रथम ' अनु-राधा' या नावाने राधेचा उल्लेख आहे. आत्मविभोर अशा प्रेमाचे व भक्तीचे

तिच्या या नावातच दर्शन घडते. कृष्णप्रेमात ती देहभान पूर्णपणे विसरून दंग झाली आहे. पुढे इतिहासकाळात झालेल्या मीरेने अशीच आत्मविस्मृती प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला. त्यात तिने खूप यशही मिळविले. कोणाही सजीव देहाला एखाद्याच्या स्मृतीत जेवढे म्हणून रंगून जाणे शक्य आहे तितके मीरा कृष्ण-स्मृतीत दंग झालेली आहे. तरीदेखील मीरेच्या आत्मविलीनतेत काहीशी दाहकता होती. कृष्णाला कोण जाळू शकत होते ? खरे म्हणजे नुसते होरपळूही शकत नव्हते. तरीही मीरेच्या जवळ बसल्यानंतर त्याला थोडासा घाम तर जरूर आला असेल; किमान तप्तता भासली असेल. राधा दाहक नव्हती तशी थंडहि नव्हती. ती पूर्ण होती. मीरेची कथा आणखी एका दृष्टीने अजोड आहे. पद्मिनी मीरेची पूर्वज होती. दोघीजणी चितोडच्या नायिका आहेत. दोघींत सुमारे २५० वर्षांचे अंतर आहे. या दोघीत कोण श्रेष्ठ आहे ? जोहार करणारी पद्मिनी की कृष्णासाठी नाचताना जिला कोणी अडवू शकले नाही ती मीरा ? या प्राचीन देशाची प्रतिभा अशीच आहे. या हिंदुस्थानने फार मोठे युग पाहिले आहे. पद्मिनी काळाच्या ओघात शंभर वर्षांनी तरी मिरा बनू शकेल काय ? की मीराच पद्मिनीचे श्रेष्ठ रूप आहे ? की प्रताप येतो तेव्हा मीरा पुन्हां पद्मिनी बनते ? हे त्रिकालदर्शी कृष्णा ! तूं मीरा आणि पद्मिनी यांना एकाच स्वरूपात बनवू शकत नाहीस काय ?

राधारसाची पूर्ण मजा तर व्रजभूमीत सांपडते. मी शरयू आणि अयोध्येचा पुत्र आहे. मी परत मथुरा वृंदावनाच्या व्रजभूमीत जाईन हे शक्य दिसत नाही. मनाने तर तेथे गेलेला आहे. राधेच्या नगरीत बरसानाजवळ एक रात्र राहून राधाराणीची गाणी मी ऐकली आहेत. कृष्ण फार लबाड होता. कधी शामा माळीण बनून राधेकडे फुले विकायला जाई तर राधा अजून सासरी जाण्यास योग्य झाली नाही असे सांगायला कधी पंडित बनून येई; कधी गाईचे दूध काढण्यासाठी गवळण बनून येत असे तर कधी वृंदेची साडी नेसून येई. एकदा ' या ' वृंदेला राधेने मिठी मारली आणि संतापून दूर झाली. श्रीकृष्ण-मुरारीही स्वतःच हैराण झाला. त्याला राधाला समजवावे लागले की वृंदेच्या डोळ्यांना डोळा भिडवू नको.

केवळ व्रजभूमीत आणि कृष्णकन्हैयाच्या संगतीतच पुरुषाच्या समानते स्त्री वागू शकली असे मला वाटते. कदाचित् म्हणूनच आज देखील हिंदुस्थानातील स्त्रिया वृंदावनातील यमुनाकाठच्या झाडाला साडी म्हणून रुमाल बांधतात. आपली साडी कृष्णाने पळवावी असे कोठच्या स्त्रीला वाटणार नाही ? कारण

दुष्ट लोकांनी वस्त्रहरण आरंभल्यास त्यावेळी कृष्णच त्यांची वस्त्रे कधीही संपू देणार नाही हे त्या स्त्रियांना माहीत असते. ज्या स्त्रिया झाडाला रुमाल बांधतात त्यांना हे सांगितले तर त्या कदाचित् लाजतील. पण पुत्रप्राप्ति, पुण्य इत्यादी इच्छांच्या मागे देखील कोणती गुप्त आठवण आहे ?

कुरू क्षेत्रावरील कृष्णाची विसर पाडणारी विव्हलता व्रजातील कृष्णाची मुरली लोकांत कशी निर्माण करते ? मला तर असे वाटते की अयोध्येचा राम मणीपुर ते द्वारकेपर्यंतच्या कृष्णाचा विसर कधी पडू देणार नाही. मी जेथे स्त्रियांना वस्त्र बांधताना पाहिले तेथेच खाली यमुनेला मिळणारा वृंदावनच्या घाणेरड्या पाण्याचा नाला वाहात असलेला पाहिला. राधाराणीच्या बरसाना येथील बोळातील रस्त्यावर जपून जपून पाऊल टाकावे लागते. चिखलात पाय पडू नये म्हणून याच प्रणयरंजीत बोळातून बरसान्याच्या स्त्रिया प्रत्येक होळीच्या दिवशी लाठी घेऊन बाहेर पडतात. आणि पुढच्या चौकात नंदगावचे पुरुष मोठेमोठे फेटे बांधून मोठ्या फांद्या घेऊन आपला बचाव करतात.

राधाराणी कुठून कधी आलीच तर हे नाले आणि हा उकिरडा तर ती स्वच्छ करीलच. पण तिने बरसान्यांतील स्त्रियांच्या हाती अत्तर गुलाल आणि सुगंधि सौम्य रंगाच्या पिचकाऱ्या द्याव्या आणि नंदगावच्या पुरुषांना होळी खेळण्यासाठी निमंत्रण देण्यास त्या स्त्रियांना सांगावे. आज व्रजभूमीत सुगंध दरवळत नाही, कुंज नाहीत. केवळ निवडुंग शिल्लक उरले आहेत. शीतलता पण नष्ट झाली आहे. बरसाना गावात राधाराणीच्या गवळणीचा मी खूप शोध घेतला. पाच दहा घरे असतील. तेथे मारवाडणी आणि ब्राह्मण स्त्रियाच आज राहात आहेत.

तेथील मंदिर आणि दुकाने पाहात पाहात जात असताना या ब्राह्मण स्त्रियांचे चेहरे दिसतात. तेही म्लान असतात. गरीब, कृश आणि रोगट. काही लोक मला अज्ञानाने ब्राह्मणांचा शत्रु समजतात. मी तर द्विज-मित्र आहे. म्हणून तर माझ्या ध्यानी आले की राधाराणीच्या गोपी, कोळणी आणि चांभारणी यांना घालवून दिल्यामुळे ब्राह्मण स्त्रिया आपली कांति गमावून बसल्या आहेत. व्रजाच्या मातीत पुष्पाचा सुगंध मिसळा. कृष्णाची बहुरूपी एकता हिंदुस्थानला द्या. रामाचा एकरूपी द्विज-शूद्र धर्म हटवा. पण सत्य आणि नियम यांचे पालन करीत रामाच्या मर्यादा पालनाच्या मार्गाने चला.

शरयू आणि गंगा कर्तव्याच्या नद्या आहेत. कर्तव्य कधी कधी कठोर झाल्यामुळे अन्यायी बनते आणि नुकसानदायकही ठरते. यमुना आणि चंबळ,

केन आणि यमुनेला मिळणाऱ्या अन्य नद्या, या रसिकतेच्या नद्या आहेत. रसिकतेत मीलन आहे. तेथे कलह संपतात. पण तीच रसिकता भ्रष्ट माणसाला कुचकामी देखील बनवते. याच रसपूर्ण नखरेबाज यमुनेच्या किनारी कृष्णाने लीला केल्या पण कुरू-साम्राज्याचे केंद्र त्याने गंगेच्या किनाऱ्यावरच वसविले. तद्नंतर हिंदुस्थानांतील कांही राज्ये यमुनेच्या काठी वसली. एक तर आजही चालले आहे. यमुने, तू कधी बदलशील काय? अखेरीला गंगेलाच तर मिळतेस ना! या भूमीत कधी रसमय कर्तव्याचा उदय होईल? कृष्णा तू होऊन गेलास की नाही कोण जाणे! आपल्या राधालीला आणि कुरूलीला यांचा मेळ तू कसा काय घातलास? युवक कृष्णाचा प्रौढ कृष्णाशी कांही संबंध नाही असे लोक म्हणतात. महाभारतात राधेचे नाव देखील नाही असेहि काही सांगतात. ही गोष्ट तितकीशी बरोबर नाही, कारण शिशुपालाने संतप्त होऊन कृष्णाच्या जुन्या गोष्टी नावे न घेता सांगितल्या आहेत. सभ्य माणसे असले उल्लेख उगीचच करीत नाहीत. महाभारतात राधेचा उल्लेख कसा असेल? जेथे त्रिलोकाचा स्वामी तिचा दास झाला आहे तेथेच राधेचे वर्णन असणार! रास रचणारा कृष्ण आणि गीतेतला कृष्ण एकच आहेत. हजारो वर्षांनंतरही कृष्णाच्या बाबतीत कधी पारडे या किंवा त्या बाजूला जड का होते कळत नाही. सांग बरे कृष्णा!

● ● ●

## पावित्र्य आणि स्त्री–पुरुषसंबंध

देशाच्या अधःपातनाचे मुख्य कारण काय असा प्रश्न वारंवार केला जातो. तात्कालिक नव्हे, तर दीर्घकालीन कारणांचाच विचार येथे अभिप्रेत आहे. वृक्षाला फुटलेल्या शाखा-उपशाखांप्रमाणेच देशाच्या अधोगतीची कारणेदेखील अनेकविध आहेत. अर्थात झाडाची मुळे जशी कोठेतरी रुजलेली असतात तद्वतच देशाच्या पतनाची देखील पानेमुळे कोठेतरी रुजलेली आहेत. भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती आणि जातिप्रथा यात ही मुळे रुजलेली आहेत. जातिप्रथा आणि स्त्रिया हे दोन मोठे पिंजरे येथील समाजात आहेत आणि या पिंजऱ्याच्या अस्तित्वामुळेच देश सडून चालला आहे. हे दोन्ही तुरुंग परस्परांशी संबंधित असून परस्परांचे पोषण करीत असतात.

देशाच्या राजकीय व सार्वजनिक जीवनात सर्व पक्षांचे ज्याबद्दल एकमत आहे अशी एकच एक गोष्ट आहे आणि ती म्हणजे राजकारणातील आणि सार्वजनिक क्षेत्रातील सर्व मोक्याच्या जागांपासून स्त्रीशूद्रादिकांना, खास करून स्त्रियांना वंचित ठेवणे ही होय.

भारताच्या पंतप्रधानपदी सांप्रत एक स्त्री आहे, किंवा काही स्त्रिया मंत्री आहेत अथवा परराष्ट्र-वकीलही झाल्या आहेत. पण त्यामुळे निम्मी लोकसंख्या असलेल्या स्त्रियांची भारतीय समाजातील स्थिती बदललेली नाही. वरवर स्त्रीचे

स्थान उच्च आहे, पण प्रत्यक्षात मात्र ती नगण्य आहे. घरात देवी आणि बाहेर शून्य. पश्चिम आशियात तर स्त्री म्हणजे एक सुंदर खेळणे मानले जाते. पुरुषाला मौज करण्यापुरती ती हवी असते. अन्य वेळी ती त्याला अडचणच वाटते. शेकडो वर्षांपासून हिंदु पुरुषाची बुद्धी स्वार्थप्रेरित, विषमतेच्या पायावर स्थिर झालेली आहे. समाजाच्या अन्याय्य आधारशिलांपैकी स्त्रीपुरुषविषमता ही सर्वांत मोठी आधारशिला होय.

आशियाप्रमाणे युरोपमध्ये स्त्री कधीही आणि कोणत्याही युगात विषमतेचे भक्ष्य बनलेली नाही. तेथे प्राचीनतम युगापासून तो आजतागायत बहुपत्नीत्वाची प्रथा बेकायदेशीर आहे. केवळ महायुद्धाच्या काळातच एखाद्याने क्वचित अधिक बायका केल्याची घटना सापडते. मध्ययुगात शार्लमनने आपल्या सरदारांच्या विधवांबरोबर एकदम विवाह केले होते. पण अशा घटना अपवादात्मकच आहेत.

हिंदुस्थानात अलीकडे बहुपत्नीत्वाची चाल कायद्याने बंद केली असली तरी भूतकाळात ती अस्तित्वात होती. हिंदुस्थान, चीन, अरबस्थान आदी गौरेतर दुनियेत ही प्रथा का रूढ होती हा एक अध्ययनाचा विषय होऊ शकेल. असे संशोधन झाले तर गंमतीदार निष्कर्ष बाहेर पडतील.

युरोपीय संस्कृतीत स्त्री आणि पुरुष यांना समानतेने वागविण्याचा प्रयत्न होत असतो. हा प्रयत्न अपुरा आहे आणि जीवनातील कित्येक पैलूंना त्याने स्पर्श केलेला नाही हे खरे आहे. याचे कारण कोठे ना कोठे तरी फार मोठा बिघाड असला पाहिजे. कारण त्यामुळेच युरोप–अमेरिकेतही स्त्री सर्वश्रेष्ठ जागेपर्यंत पोचू शकलेली नाही.

अमेरिकेतील एका मोठ्या संमेलनास मी गेलो होतो. अनेक सुशिक्षित व विद्वान स्त्रिया आणि ख्यातनाम कवयित्री व कादंबरीकार तेथे उपस्थित होत्या. पण सम्मेलनाच्या विविध अधिकारांच्या व महत्त्वाच्या जागांवर मात्र एकही स्त्री मला दिसली नाही. ही वस्तुस्थिती माझ्या भाषणात मी परिषदेसमोर मांडली आणि सांगितले कीं याचा अर्थ अमेरिकन स्त्रीही अद्याप पुरुषाच्या मागे आहे. भाषणानंतर काही स्त्रिया मला भेटल्या आणि त्यांनी तुमचे म्हणणे बरोबर आहे असे मला सांगितले.

विश्वसरकार स्थापन करण्याच्या ध्येयासाठी धडपडणाऱ्या एका अमेरिकन मित्राला देखील आपल्या देशात असे असेल याची कल्पना नव्हती. विश्वसरकार बनवावयाचे असेल तर विषमतेची जितकी अंगे आहेत ती सर्व नाहीशी केली



**विष्णुलक्ष्मी**
खजुराव इ. स. १० वे शतक

पाहिजेत याची जाणीव त्याला नव्हती. स्त्री-पुरुष समानतेच्या प्रश्नाबाबत सर्वच दृष्टीने युरोपीयन लोक भारतीयांपेक्षा श्रेष्ठ आहेत असे नव्हे. युरोप-अमेरिकेतही जेथे स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने स्थान मिळाले आहे असे संमेलन भरलेले नाही. तेथे अधिकाराच्या जागा पुरुषांकडेच आहेत. दुनियेत कोठेही बौद्धिक बाबीमध्ये स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचे स्थान नाही. युरोप-अमेरिकेचे लोक समाजाची पुनर्रचना करून समाज सुंदर आणि सुदृढ बनविण्याची सांप्रत पराकाष्ठा करीत आहेत. परंतु तेथेही पैसा कमाविणे, दैनंदिन व्यवहार आणि गृहकृत्ये इत्यादिपुरती बाह्य समानता आलेली आहे. बौद्धिक व अध्यात्मिक समानता तेथेही नाही. परंतु तरीही युरोप–अमेरिकेतील, विशेषेकरून अमेरिकेमधील स्त्रिया स्वतःला पुरुषांच्या समान मानतात. अमेरिकेतील ५५ टक्के संपत्तीची मालकी स्त्रियांकडे आहे. स्त्रियांना तेथे प्रतिष्ठाही आहे. घरातील कामे पतिपत्नी दोघे मिळून करतात. एकजण सैपाक करीत असेल तर दुसरा भांडी घाशील.

सर्वसामान्यपणे विवाह आणि स्त्री-पुरुषसंबंध या बाबतीत भारतीयाचे मन अगदी गलिच्छ आहे. साऱ्या जगातील पुरुषांनी आदर्श स्त्रीसंबंधीच्या ज्या कल्पना नित्य मनात बाळगल्या आहेत त्यात पावित्र्यालाच प्रामुख्याने स्थान दिलेले आढळते. पण भारतातील याबाबतच्या कल्पना अधिकच संकुचित आहेत. येथे स्त्रीशुचितेच्या आदर्शात वळणावळणाने तिच्या शरीरालाच अधिक महत्त्व देण्यात आले आहे. आणि ते देखील शरीराच्या एका लहानशा भागाला! स्त्रीला परपुरुषाचा स्पर्श होता कामा नये, विवाहापूर्वी तर मुळीच होता कामा नये आणि विवाहानंतरदेखील तिला फक्त तिच्या पतीचाच स्पर्श व्हावा, पती असताना दुसरा पुरुष कोणत्याही परिस्थितीत तिच्या जीवनात येताच कामा नये, हे विचार साऱ्या विश्वात केव्हा ना केव्हा तरी पुरुषांनी स्वाभाविकपणे मान्य केले असतील. पण भारतवर्षातील या विचारांची पाळेमुळे आणि त्याचे प्रस्फुटन अवर्णनीय आहे. ‘अष्टवर्षा भवेत गौरी’ हे सूत्र कोणा मोठ्या ऋषींनी कदाचित् प्रतिपादले नसेल. पण आजपर्यंत मोठ्या प्रमाणात ते प्रचलित आहे. धर्म, समाज, संघटना आणि शरीरशुद्धतेबद्दलच्या विशिष्ट कल्पना या द्वारे मुलीला शृंखलाबद्ध करावयाचे आणि लवकरात लवकर तिचा विवाह करून तिची शुचिता रक्षण करावयाची असा शिरस्ता येथे आहे. विवाहधूमाने कन्या पवित्र होत नाही तोवर तिला अमर्याद एकाकीपणात जगावे लागते.

अन्य देशातही स्त्रीला जखडबंद करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. पण

भारतातील तऱ्हा औरच ! येथे स्त्रीला शुद्ध राखण्याच्या प्रयत्नात तिला किती अपमानित आणि लांछित करण्यात आले आहे त्याची साक्ष भारतीय पुरुषाच्या वागण्या-बोलण्यात सापडते. आईच्या हातचा सैपाक अशुद्ध मानून बाप किंवा भाऊ यांनी शिजवलेले अन्न खाणारे महाभाग व अनेक जाती येथे आहेत.

संधी मिळाली म्हणजेच माणसाची शक्ती प्रकट होत असते, आणि प्रकट होत असताना ती वाढतही असते. मानवी सामर्थ्य दडपत राहिले की त्याची वाढ खुंटते आणि मग असे म्हटले जाते की मुळात सामर्थ्य अस्तित्वातच नसले पाहिजे. भारतीय स्त्रीच्या बाबतीत हे अगदी खरे आहे. ती दडपणाखाली वावरत असते. अत्यंत वरिष्ठ वर्गातील काही स्त्रियांचा अपवाद वगळल्यास, सर्वसामान्य स्त्रियांना विकासाची कोणतीही संधी मिळत नाही. आणि या अपवादभूत स्त्रियांना देखील कुटुंबांतर्गतच आणि ती देखील दिखावटी संधीच मिळत असते. एकच अर्थ असलेली एखादी 'भारतीय स्त्री' अशी संज्ञा येथे उपलब्ध नाही हे खरे आहे. भारतातील स्त्रियांचे अनेक वर्ग आणि वर्ण आहेत. एकीकडे शेतमजूर स्त्रिया आहेत. त्यांच्या ओव्यांत सीतेने रामालाही पापी म्हटलेले आढळते. या वर्गात घटस्फोटाचीही चाल आहे. या वर्गात आणि आदिवासी स्त्रियांत एक सहज आनंद आणि स्वच्छंदता आढळते. दुसरीकडे मध्यमवर्गीय आणि सनातनी स्त्रिया आहेत. या स्त्रिया मनाने आणि वाचेने अग्निपरीक्षेनंतर देखील सीतेला वनवासाला पाठविणाऱ्या रामाला आपले आराध्य दैवत मानतात. त्यांची कृती मग भले विपरीत होत असो! रामाने सीतेशी केलेला व्यवहार पाहिला की या स्त्रिया रामभक्ति कशी करू शकतात याचे आश्चर्य वाटते. लोकशाहीचा भोक्ता म्हणून रामाने परटाच्या बोलण्यावरून सीतेला टाकले हे समजण्याजोगे आहे. पण रामाजवळ अन्य मार्ग नव्हता काय? सत्तात्याग करून तो सीतेसह वनवासाला जाऊ शकला असता. आणखीही अशा काही उच्चवर्णीय स्त्रियांचा वर्ग आहे की त्यांना सीता अथवा राम कोणाचीच, त्याचप्रमाणे आधुनिक जगाचीही माहिती नसते. तथापि आपले कुटुंब, भाषा, चालीरीती इत्यादींबाबत अत्याधुनिक असे प्रचलित रीतिरिवाज त्यांनी आत्मसात केलेले असतात. भारतीय स्त्रियांचे असे विविध वर्ग असले तरी एक गोष्ट सर्वांमध्ये समान आहे. आणि ती म्हणजे या सर्व स्त्रिया बांधल्यासारख्या दिसतात. रूढी-परंपरा यांच्या शेकडो दोरखंडांनी आणि शृंखलांनी त्यांना जखडलेले आहे. कोणत्याही वर्गातील स्त्रिया असोत, त्यांच्यात शक्तीच उरलेली दिसत नाही. साऱ्या भारतीय स्त्रिया खरोखरच

शृंखलाबद्ध आहेत. कालीचे रूप म्हणून समजली गेलेली दुर्गा आणि भगवती यांचे स्वातंत्र्यही नाममात्र आहे. म्हणून तर पार्वतीची माता पार्वतीच्या विवाहप्रसंगी म्हणाली, " कतविधि सृजी नारि जग नाही, पराधीन सपने हुँ सुख नाही । "

स्त्रीला हेतुपुरस्सर एक शक्तिहीन वस्तु बनविण्यात येत असते. मुलगी वयात येऊ लागली की पहिल्यांदा तिला सांगितले जाते, " मुली, हळू बोल. ऐटीत किंवा फल्कारत चालू नकोस." या दबून वागण्याच्या शिकवणुकीमुळे ती हळूहळू निस्तेज होत जाते. मग ती निस्तेजता सात्विक असो की राजस असो. रजस्वला स्त्रीबाबतच्या जुनाट कल्पना देखील या वैचारिक विकृतीचाच परिणाम होय. खरे पाहता सर्व स्त्री-पुरुषांच्या शरीरात नेहमी मलमूत्र असते. त्यांनीही मग चोवीस तास अस्पर्श स्थितीत बाजूला बसले पाहिजे. शुचिता कोणाला नको आहे ? योनीची देखील शुचिता कोणाला नकोशी वाटेल ? ती प्राप्त कशी करावयाची इतकाच खरे म्हणजे प्रश्न आहे. स्त्री-जीवनविषयक नियम-उपनियमांचा मुख्य रोख योनिशुचितेवरच केंद्रित केला तर स्त्री निस्संशयपणे अमंगल आणि निष्प्राण बनेल. या नियमाला पावित्र्याचा केंद्रबिंदू मानण्याचे कारण नाही. अन्य अनेक नियम-उपनियमांप्रमाणेच हा देखील एक आहे असे समजावयास पाहिजे. एखाद्या मोठ्या सिद्धान्तासाठी किंवा चुकीने कधीकधी नियमांचा भंग होतो तसेच या नियमाबद्दल मानावयास हवे. एखादा नियम चुकीने मोडला गेला तर त्यातून मार्ग काढण्यासाठी साधा उपाय शोधला गेला पाहिजे. पाय घाणीत पडला तर पाय धुतला की काम भागते. तसेच याही बाबतीत असावयास हवे. ज्या प्रमाणात अस्वच्छता असेल त्या प्रमाणात तिच्या क्षालनाचा उपाय असला पाहिजे. झालेल्या चुकीबद्दल जन्मभर तिला पश्चात्ताप करावयास लावणे किंवा तिचा तिरस्कार करणे चूक आहे. स्त्रियांसंबंधीच्या या संकुचित वृत्तीमुळे स्त्री अधिकच बंधनमुक्त व अमंगळ बनेल. चूक झाली की माणसाला थोडा फार पश्चात्ताप होतोच. सात्विक मन जगाला आणि स्वतःला हसून ही ग्लानी पचवते.

आपली स्त्री चपल असावी; चतुर, बुद्धिमान, तेजस्त्री आणि सजीव असावी असे प्रत्येक पुरुषाला वाटते. पण त्याचबरोबर ती आपल्या आधीन असावी, ताब्यात असावी असेही त्याला वाटत असते. या दोन्ही भावना परस्पर विसंगत आहेत. परतंत्र व पराधीन व्यक्ती सजीव आणि तेजस्वी असूच शकत नाही. पुरुषाने यापैकी कोणती तरी एक गोष्ट पत्करावयास हवी.

आपल्या ताब्यात राहणारी परंतु निष्प्राण असणारी स्त्री निरर्थक मानली पाहिजे. स्त्रीला स्वातंत्र्यच द्यावयास हवे. ती बंधमुक्त राहिली तरच ती पुरुषाप्रमाणे मोठी होऊ शकेल.

भारतीय हिंदूंना व मुसलमानांना निरोगी व खेळाडू स्त्रिया आवडतात. मैदानावर खेळत असतेवेळचे त्यांचे सौंदर्य आकर्षक वाटते. पण स्वतःच्या कुटुंबातील स्त्रियांनी मात्र जाहीररीत्या खेळलेले त्यांना आवडत नाही. म्हणूनच भारताच्या हॉकी टीममध्ये मेरी, डिसोझा आणि व्हायोलेट दिसतात. सीता अथवा हमीदा आढळत नाहीत. गेली पाच हजार वर्षे स्त्रियांना भिंतीआड ठेवण्यात आले आहे. प्राचीन काळी वशिष्ठासारख्या सनातन पंथीयांनी सीतेसारख्या स्त्रियांना देखील बंधनात ठेविले होते. आधुनिक वशिष्ठ फार तर सीतेला स्वातंत्र्य देत असेल, पण वासंती आणि कुशिका मात्र त्यांना अद्यापही उपभोग्य वस्तूच वाटतात. भारताच्या इतिहासात मातृहन्ता परशुरामापासून सनातन पंथीयांची एक संकुचित वशिष्ठ परंपरा चालत आलेली आहे. त्याचबरोबर विश्वामित्रापासून एक उदारपंथी वाल्मिकी परंपरा देखील आढळते.

विश्व अधिक शुभ व निर्मळ बनवावयाचे असेल तर पुरुषाप्रमाणेच स्त्रीला देखील एकानंतर दुसरे प्रेम करण्याची मुभा असली पाहिजे. हिंदु स्त्री आणि पुरुष या दोघांच्याही मनावर पातिव्रत्याची कल्पना प्रभाव गाजवीत आलेली आहे. स्त्री व पुरुष यांचा विचार असमानतेच्या पायावर केला जात असल्याने पुरुषांनी पतिव्रता सावित्रीलाच आदर्श मानले आहे. सावित्रीप्रमाणे पत्नीचे प्राण परत आणणाऱ्या ' पत्नीव्रता 'चे एखादे प्रतीक मात्र हिंदू अथवामध्ये मुसलमानांत दिसत नाही.

हिंदुस्थानातील स्त्रियांची भयंकर गुलामी, चुलीपुरतीच मर्यादित नाही. पाप-पुण्याच्या कल्पनेच्या बेड्याही तिच्या पायात अडकविण्यात आल्या आहेत. याची चर्चा करावयाची तर पाप कशाला म्हणावयाचे आणि पुण्य म्हणजे काय याचाही विचार केला पाहिजे. माझ्या मते आध्यात्मिकता निरक्षेप आहे तर नैतिकता सापेक्ष आहे. प्रत्येक युगाने आणि व्यक्तीने नैतिकता कशात आहे ते शोधले पाहिजे. स्त्री-पुरुषांसाठी वेगवेगळ्या नीती-अनीतीच्या कसोट्या असता कामा नयेत. घटस्फोट आणि अनौरस अपत्ये या स्त्री-पुरुष संबंधातील अपयशाच्या खुणा आहेत यात शंका नाही. परंतु ज्या स्त्रीने साऱ्या आयुष्यात एकाच अनौरस अपत्याला जन्म दिला आणि दुसरीला विवाहानंतर सहा औरस अपत्ये झाली त्यापैकी पहिली स्त्री निश्चित अधिक सभ्य आणि अधिक नीतीमान

म्हटली पाहिजे. त्याचप्रमाणे तीनदा घटस्फोट घेऊन चौथ्यांदा विवाह करणारी एखादी स्त्री आणि तीन बायका एकापाठोपाठ गेल्यानंतर चौथ्यांदा लग्न करणारा पुरुष यांमध्ये स्त्रीच अधिक भली आणि सज्जन होय. एकामागोमाग तीन बायका नैसर्गिक मृत्यूने अकस्मात् मृत्यू पावल्या असे क्वचितच घडते. हेळसांड अथवा गरिबीमुळेच बहुधा बायका मरत असतात.

हिंदुस्थानची आदर्श स्त्री कोण ? द्रौपदी की सावित्री ? अशाप्रकारच्या विषयांवर जाहीर वादविवाद झाले पाहिजेत. अशा चर्चेमुळेच बुद्धी क्रांतिकारक बनण्याची शक्यता आहे. द्रौपदी आणि सावित्री या दोन्ही स्त्रिया काल्पनिक असण्याची शक्यता आहे. कदाचित् खरोखरच होऊन गेल्याहि असतील. ते कसेहि असो. कथापुराणातील या व्यक्तींची भारतीय मनावर विलक्षण पकड आहे. आणि म्हणूनच त्यांच्या व्यक्तिमत्वाचे परीशीलन केले पाहिजे.

सध्या द्रौपदीचे वैशिष्ट्य म्हणून तिच्या पंचपतीत्वाकडे फक्त लक्ष दिले जाते आणि तिच्या खऱ्या वैशिष्ट्यांकडे दुर्लक्ष होते हे बरोबर नाही. द्रौपदीला पाच पती होते की सहा याचीच चर्चा होणे ही आजच्या सडक्या-नासक्या हिंदुस्थानी बुद्धीची निशाणी आहे.

हिंदु स्त्री-पुरुषांचे मन पतिव्रता या शब्दाने उचंबळते. पतिव्रता शब्दाची प्रतीक सावित्री. सावित्री आपल्या पतीशी एकनिष्ठ होती आणि यमराजाकडून तिने आपल्या पतीचे प्राण परत आणले या एकाच गोष्टीमुळे ती भारतीयांना थोर वाटते. आपल्या पतीच्या शरीराशी, मनाशी आणि आत्म्याशी जी एकरूप असते, पातिव्रत्याचे प्रतीक बनलेली असते अशा स्त्रीचीच भारतीय माणूस कदर करतो. भारतीय स्त्री देखील जन्मोजन्मी एकच पती लाभावा म्हणून इच्छा करते. माझ्या मते पुनर्जन्म नाही. पण पुनर्जन्म आहे की नाही हा प्रश्न येथे गैरलागू आहे. जन्मजन्मांतरी एका स्त्रीचा एकाच पुरुषाशी संबंध राहणे कितपत योग्य आहे ?

प्रेम, स्नेह, प्रणय या क्षेत्रांत हिंदु स्त्रीपुरुषांचे विचार फारच संकुचित आणि मागासलेले आहेत. एकापेक्षा अनेक पुरुषांवर प्रेम करणारी स्त्री आदर्श होय असे मला म्हणावयाचे नाही. पण पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही मोकळीक असली पाहिजे. विश्व जर निर्मळ बनवावयाचे असेल तर याही बाबतीत स्त्रीपुरुषांना समान न्याय पाहिजे. आज स्त्री हे समाजावरचे ओझे बनले आहे. तिच्या गुणांचा समाजाला काहीही फायदा होत नाही आणि ती देखील समाजासाठी काही करू शकत नाही. तिचा एकमेव गुण पतिव्रता असणे हाच मानण्यात येतो.

दुनियेतील कोठल्याही देशात, कोठल्याही कालखंडात द्रौपदीसारखी ज्ञानी, हजरजबाबी, समजदार आणि साहसी स्त्री आढळणार नाही. आपल्या हरएक समकालीन पुरुषाला तिने वादविवादात पराभूत केले आहे. अपवाद आहे फक्त कृष्णाचा ! पण त्यांच्यात स्पर्धा होतीच कुठे ? कृष्ण-कृष्णेत कधीच चढाओढ लागली नाही.

भीष्म पितामहांच्या अंतःसमयीची एक कथा द्रौपदीची प्रखरता आणि सडेतोडपणा दाखविते. महाभारतात ती कहाणी लिहलेली आहे की नाही मला माहीत नाही. पण समाजात ती प्रचलीत आहे. आणि माझ्या मते तिचा आणखीही प्रचार झाला पाहिजे.

शरपंजरी भीष्म राजनीती सांगत होते. ' शांतिपर्व ' हे जगामधले राजनीतिशास्त्रावरचे पहिले पुस्तक होय. कौरव-पांडव भीष्मांच्या तोंडून राजनीती ऐकत होते. तेव्हा एका प्रसंगी द्रौपदी हंसली. भीष्म राजकारणशास्त्र सांगत आहेत; आणि अशा गंभीर प्रसंगी द्रौपदी हंसते आहे हे पाहून अर्जुन संतापून तिच्या अंगावर धांवला. कृष्णाने त्याला थोपविले आणि द्रौपदीला हसण्याचे कारण विचारावयास सांगितले. अर्जुनाने विचारले तेव्हा द्रौपदी उत्तरली, " साऱ्या आयुष्यभर स्वतः या शिकवणुकीविरुद्ध व्यवहार केला आणि आता अंतकाळी आले आहेत नीती शिकवायला ! " द्रौपदीच्या या टोल्याइतकेच भीष्मांचे उत्तरही असामान्य होते. ते म्हणाले, " मला हंसण्याचा द्रौपदीला पूर्ण अधिकार आहे. पण मी आणखीही एका शिकवण देऊ इच्छितो ती अशी की, कोणत्याही बुद्धिमान माणसाने सत्ताग्रहण करू नये. "

द्रौपदीच्या जीवनात अनेक घटना आणि समस्या आहेत. आणि त्या प्रत्येक प्रसंगी ज्ञानी व्यक्तिप्रमाणे प्रश्न समजून घेऊन तिने तो सोडविला आहे. केवळ ज्ञानाच्या बळावरच नव्हे तर स्पष्टवक्ता बनून, तेजस्वी वृत्तीने आणि प्रसंगावधान दाखवून प्रत्येक प्रसंगातून ती सहीसलामत सुटली आहे. तिच्या लेखी दरबार, रणक्षेत्र, वन सर्व सारखेच होते. लहान वयातल्या वनवासकाळात, राज्य उपभोगीत असताना, युद्धकाळात किंवा अखेरच्या स्वर्गारोहणाच्या वेळी— या प्रत्येक समयी ती बहादुरीने व धैर्याने वागली आहे.

महाभारतातला शेवटचा भाग, द्रौपदीच्या मृत्यूचा भाग, लिहणारा लेखक पुरुष असला पाहिजे. वस्तुतः ती मरून पडावयास हवी होती शेवटी. प्रथम नाही. द्रौपदी प्रथम का मरून पडली याचे कारण सांगणारी एक कहाणी आहे. ही कहाणी लिहिणाराने द्रौपदी प्रथम मेली त्याचे कारण तिचे अनेक प्रियकर

किंवा पती होते हे न लिहता ती अर्जुनावर जास्त प्रेम करी असे सांगितले आहे. ज्या कोणी ही कहाणी रचली त्याने किमान एक चांगली गोष्ट केली. त्याने तिच्या मृत्युचे कारण तिचे अनेकपतीत्व हे न सांगता समानतेचे कारण दाखवून प्रीतीतील समानतेच्या आदर्शाखातरच तिला प्रथम मरावयास लावले.

दरबार भरला होता. द्रौपदी द्युतात हरली गेली होती. भर दरबारात द्रौपदीने सिद्ध केले की, "स्वतः हरलेल्या युधिष्ठिराला, मला पणाला लावण्याचा अधिकारच नाही." ही कहाणी देखील द्रौपदीचे ज्ञान, समज, हिंमत व हजरबाबीपणा दाखवणारी आहे. आणि या गुणांमुळेच सावित्री नव्हे तर द्रौपदी मला हिंदुस्थानाची प्रतीक वाटते. हिंदुस्थानातच काय पण जगात मला द्रौपदीसारखी स्त्री सापडत नाही. केवळ पतिव्रताधर्म आचरला म्हणूनच सावित्रीला श्रेष्ठ ठरविणे म्हणजे आपल्या बुद्धीला मांद्य आले आहे आणि आपली बुद्धी फक्त पुरुषी हिताचेच रक्षण करणारी आहे असे सिद्ध करणे होय.

गेल्या हजार वर्षांत हिंदु पुरुषाची बुद्धी पुरुषांचे हित पाहणाऱ्या विषमतेच्या पायावरच स्थिर झालेली आहे. ती प्रहार कर करून नष्ट केली पाहिजे. आणि स्त्री-पुरुषांत समानता आणली पाहिजे. कोणत्याही स्त्रीला अगर पुरुषाला एकापेक्षा अधिक प्रियकर वा प्रेयसी आहेत किंवा नाहीत ही गोष्ट व्यक्तिगतच समजली पाहिजे. त्यावरून व्यक्तीचे मूल्यमापन करणे बरोबर नाही. माझ्या मते फार तर इतकेच म्हणता येईल, की एकावेळी एकच प्रियकर वा प्रेयसी असल्यास जग अधिक भद्र होईल.

वत्साशिवाय धेनूला तशी हुंड्याशिवाय कन्येलाही किंमत नसते. थरथरत्या हाताने चहाचा पेला घेऊन येणाऱ्या मुलीचा विवाह, 'पाहण्या'च्या पद्धतीने जमविणे वाह्यातपणाचे आहे. वस्तुतः मुलीचा विवाह जमविणे ही माता-पित्यांची जबाबदारी नव्हेच मुळी ! चांगले आरोग्य व चांगले शिक्षण दिले की त्यांची जबाबदारी संपते. मुलगी कोणा मित्राबरोबर फिरत असेल, स्वःतचे लग्न जमविण्याच्या या प्रयत्नात चुकून तिला मूल झाले तरी ती घटना स्त्री-पुरुषांमधील योग्य संबंध प्रस्थापित करून घेण्याच्या मार्गातला एक भाग म्हणूनच त्याकडे पहावयास पाहिजे. त्यामुळे तिच्या चारित्र्यावर डाग पडला असे समजले जाऊ नये. समाजाच्या यासंबंधीच्या धारणेविरुद्ध तरुणतरुणींनी बंड केले पाहिजे. स्त्रीपुरुषासंबंधांच्या क्षेत्रात फक्त दोनच अपराध आहेत. एक बलात्कार आणि दुसरे खोटे बोलणे अथवा वचनभंग. युवजनांनी प्रतिपक्षाला पीडाही शक्यतो

देऊ नये. प्रामाणिक प्रेमासाठी बदनामी पत्करावी लागली तरी युवकांनी त्यास तयार राहिले पाहिजे. सामाजिक कल्पनांचा उकिरडा स्वच्छ करण्यासाठी आपण ही किंमत दिली असे त्यांनी समजावयास हवे. त्यामुळेच स्वच्छ पाण्याचा अनिरुद्ध प्रवाह पुन्हा वाहू लागेल.

भारताचे मन फार क्रूर झाले आहे. जनावरांना व माणसांना या देशात जितके क्रूरपणे वागवतात तितके अन्यत्र कोठे वागवत नसतील. गाव क्रूर आहे, मोहल्ले क्रूर आहेत. सारा समाज निर्दय आहे. स्त्रिया तर फारच क्रूर होऊ शकतात असा अनुभव आहे. विवाहित स्त्रिया, कुमारी अथवा विधवा स्त्रियांबद्दल इतक्या निर्दयपणे व अनुदारपणे बोलत असतात की चीड येते. माणसात अशी भावनाशून्य बुद्धी असेपर्यंत स्त्री-पुरुषांमधली कुंपणे नष्ट होणार नाहीत. या सर्व निर्दयपणापासून स्वतःचा बचाव करू शकणारी गावे अथवा मोहल्ले किंवा कुटुंबे वा मुली किती असणार ? आणि म्हणूनच बहुसंख्य गावे, मोहल्ले व कुटुंबे रूढीच्या वेढ्यात अडकून पडलेली दिसतात. पातिव्रत्य व परपुरुष स्पर्शाच्या भ्रमाचे स्त्रियांच्या मनावर कमालीचे ओझे आहे.

अर्थात् भारतात नेहमीच स्त्रियांच्या बाबतीत अशी संकुचित दृष्टी नसावी. इतिहासपूर्व काळातील एका सुंदरतम सूत्राची याला साक्ष आहे. कोणा एका ऋषीने म्हटले आहे की, स्त्री प्रत्येक महिन्याला कुमारिका बनत असते. किती सत्य आहे हे ! केवढी उदारता आणि महानता त्यात आहे. तीन हजार वर्षांपूर्वीची अशीच एक घटना या संदर्भात नमूद करण्यासारखी आहे. जाबाली नावाच्या स्त्रीला तिच्या मुलाने विचारले, "माझा बाप कोण ?" तिने उत्तर दिले, "मला निश्चित सांगता येणार नाही." प्राचीन वाङ्मयातील सत्यनिष्ठ स्त्री म्हणून जाबालीचा उल्लेख करावा लागेल. याचा अर्थ असा नाही की एकापेक्षा अधिक प्रियकर स्त्रीला असावेत. माझे म्हणणे इतकेच की स्त्रीपुरुषांना समान न्याय असावा. स्त्रीने भारभूत बनू नये. प्रसंगवश पुरुषाचा भार संभाळून तिने स्वतंत्रपणे मार्ग काढावा.

वर उल्लेखिलेल्या इतिहासपूर्वकालीन सूत्राच्या विरुद्ध असे, योनिशुचितेच्या कल्पनेभोवती कायकाय घाणेरडे विचार गुंफलेले आहेत. या प्रकारच्या विचारांनी स्त्री गुलाम होणार नाही तर काय होणार ? नेति-धोती आदी हठयोगाच्या क्रियांद्वारे आपले नाक, पोट व तोंड संपूर्णपणे स्वच्छ ठेवू पाहणारे साधू खरे म्हणजे घाणेरडे वाटतात. अतिशूचितेचा परिणाम खरे म्हणजे असाच होणार. योनी अतिशुद्ध राखण्याच्या उद्देशानं किती घाणेरडे

शारीरिक आणि मानसिक परिणाम घडत असतात यांबद्दलचे अनुभव योनिशू-चितेच्या अतीवतेचा आदर्श आपल्या जीवनात पाळणारी स्त्रीच सांगू शकेल. या गोष्टीखेरीज स्त्रीच्या जीवनात विचार करण्याजोगे अन्य काही नाहीच काय ? या कल्पनेवर एवढी बुद्धि खर्च व्हावी इतका खरोखरच हा मर्मभेदी विषय आहे काय ? भारतीयांची बुद्धी विकृत बनली आहे. येथे स्त्रीला डोक्यावर तरी बसवतात अथवा पायांशी तरी. देवी किंवा दासी. यातून काहीच हाती लागत नाही. मानवीसंस्कृतीच्या खऱ्या विकासासाठी स्त्री-पुरुषांत समानता आली पाहिजे तरच काही फलनिष्पत्ती होईल. भारतीय स्त्री अद्याप या समानतेपासून फार दूर आहे. आणि तिचे समाजातील विषम स्थानच भारताच्या अधःपतनाचें एक महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळेच भारतातील क्रांतिभावना निद्रिस्त असल्याचे अनुभवास येते. विषमता आणि समाजाची अन्याय्य चौकट मोडण्यासाठी आणि परिणामी शुचितेचा खरा अर्थ शोधण्यासाठी एखादी स्त्री पुढे आली तरच देशाच्या जीवनात शक्तीचा प्रादुर्भाव होईल.

मिथ्याभिमान आणि चुकीचें आदर्श यामुळे भारताचे मन छिन्नभिन्न झालेले आहे. चितोड पडल्यावर पद्मिनीने अन्य स्त्रियांसह जोहार केला. याउलट गेल्या महायुद्धातील रशियन हेर नटालीचे उदाहरण पाहा. नटालीला युक्रेनमध्ये जर्मन फलटणीने पकडले. जर्मन अधिकाऱ्याच्या सैपाकघरात नोकरी करताकरता तेथून जर्मन पलटणीच्या हालचालींच्या गुप्त बातम्या बिनतारी यंत्राच्या द्वारे ती आपल्या मायदेशात, रशियात पाठवी. या उपक्रमाद्वारे नटालीने जवळपास साठसत्तर हजार जर्मन फौजेला धारातीर्थी लोळवले. नटालीच्या हालचाली जर्मनांच्या लक्षात येताच त्यांनी तिला फाशी दिले. आपल्याला भारतात आता पद्मिनी नकोत तर नटाली हव्यात. हिंदुस्थानात पुष्कळशा जाती अशा आहेत की त्यातील आईबापांना मुलगी जन्माला आल्याचे दुःख होते. आणि उपजलेल्या कन्येचा ते वध करतात. असा कन्यावध होत राहिला तर या देशात न्यायप्रवृत्ती वाढणे सर्वस्वी अशक्य आहे. भारतीय पुरुष इतका पाजी आहे की आपल्या घरातील स्त्रीवर तो हात टाकतो. आपल्या मालकाला, अधिकाऱ्याला उलट उत्तर देण्याची त्याची हिंमत होत नाही. तो आतल्याआत धुमसत असतो. त्याला लाचारीचे, अपमानित जिणे जगावे लागते आणि एके दिवशी मनातला संताप परिपक्व झाला की तो आपला संताप घरातील स्त्रीला मारून बाहेर काढतो. दुबळी स्त्री मुलावर राग काढते. अशा प्रकारे अन्यायाचे चक्र फिरत राहते. आणि मग अशा या भारतावर परकीय आक्रमणे होत राहतात.

गौरवर्णीय दुनियेत मादाम क्यूरीसारख्या शास्त्रज्ञ आणि जीविताच्या विविध क्षेत्रात नाव गाजविणाऱ्या स्त्रिया झाल्या आहेत. पण जीवनाचे सर्व पैलू आणि जग याकडे सम्यक् दृष्टीने पाहून तत्वदर्शन घडविणारी स्त्री तेथेही सापडत नाही. पण प्राचीन भारतात तत्त्वज्ञानी स्त्रिया आढळतात. गार्गी-मैत्रेयी ह्या या देशाच्या अद्‌भुत प्रतिमा होत. अध्यात्मिक क्षेत्रातही येथे एक विलक्षण स्त्री होऊन गेली. तिचे नाव महादेवी. कर्नाटकात चारशे वर्षापूर्वी ती होऊन गेली. भारतीय पुरुष क्षुद्र बुद्धीचा आहे. त्याला स्त्रियांची कदर नाही. त्यामुळे महादेवी उपेक्षित राहिली. साधुता, गुणवत्तादर्शन, ध्यान आदींबाबतीत पुरुष जसा अंतिम मर्यादेपर्यंत जाऊन वस्त्रत्याग करण्याइतकी विरक्ती दाखवू शकतो तसे स्त्रीदेखील त्या मर्यादेपर्यंत पोचू शकेल असा तिचा दावा होता. लिंगायत धर्माचा प्रचार करीत कर्नाटकात नग्न साधूंच्या रूपात ती विद्वान स्त्री फिरत असे. अनासक्ती, निःसंगता आणि निर्विकारता याचे हे केवढे मोठे उदाहरण हिंदुस्थानच्या इतिहासात आहे. हिंदुस्थानातील एका ऋषीने म्हटले आहे, " स्त्रीला कोणतीच जात नसते. ती एक रत्न आहे. ती कोठेही भेटली तरी तिचा स्वीकार करा. " सर्व देशात, सर्व युगात सती-पतीव्रता तर अनेक झाल्या आहेत. पण गार्गी–मैत्रेयीसारख्या द्रष्ट्या अथवा द्रौपदीसारख्या तेजस्वी स्त्रिया अन्य देशाच्या कथा–कहाण्यातदेखील सापडत नाहीत.

पण निसर्गतःच विभक्त असलेले एखादे विचारबीज आमच्या संस्कृतीच्या भूमीत कोठेतरी रुजलेले आहे. त्यामुळेच उदार आणि सनातनी–कट्टर अशा दोन्ही परंपरा येथे दिसतात. सनातनी प्रवृत्तीचा निःपात करण्याची वेळ आता आलेली आहे. या बाबतीत जुन्याचा मोह धरला तर संस्कृतीच्या भूमीतील विचाराचे हे दुहेरी बीज आपणास निरंतर निस्तेज बनवीत राहील. आणि यासाठीच पुरुषांइतके स्वातंत्र्य स्त्रियांना मिळाले पाहिजे. सामाजिक जीवनात दोघांना समानता हवी. या बाबतीत पुरुषांनी आपल्या बुद्धीचे पुनर्गठन केले पाहिजे.

स्त्रियांनीदेखील चोहोबाजूंनी वेढलेल्या प्रचलित परंपरांना आणि रूढीसंकेतांना इतके मानीत राहण्याएवजी समाजाची वर्तमान चौकट व्यापक रूपाने तोडण्याचा प्रयास केला पाहिजे. व्यक्तिगत स्वरूपात किंवा चोरून लपून नव्हे, तर समाजाची प्रस्थापित घडी मोडण्याच्या हेतूने सामुदायिक प्रहार करण्याचा त्यांनी प्रयत्न करावयास हवा. गुजरातेत रोज दोनतीन स्त्रिया आत्महत्या करून घेतात. परंतु समाजद्रोहास त्या का प्रवृत्त होत नाहीत ? ( संकलित लेख )

● ● ●

# दिल्ली

जगातील राजधान्यांशी तुलना करता दिल्ली सर्वात मोहक आहे हे खरे, पण त्याचबरोबर ती एक अत्यंत नीच वेश्याही आहे. प्रामाणिक प्रियकराबरोबर देखील ती इमानाने नांदलेली नाही. सदासर्वकाळ अत्याचाऱ्यांनीच तिला आपल्या अधीन राखलेले आहे. अर्थात् त्यांना खोटा शिष्टाचार आणि लंपट-पणा यांची दीक्षा देण्याचा प्रयत्न तिने केला हेही खरे आहे. अत्याचा-ऱ्याच्या पहिल्या तुकडीला सुधारण्याचे काम संपते न संपते तोच हल्लेखोरांची नवी टोळी सुधारण्याचे काम तिच्यापुढे उभे राही. पण ती कधी थकली नाही की निराशही झाली नाही. तिच्या प्रकृतीतला धार्मिक अंश आणि चिरप्रणयाने नटलेले असे तिचे मनमोहक लावण्य पाहिले की तिला जणु स्वतःप्रमाणेच सारे विश्व शुभ्र, मंगल आणि सुंदर बनवावयाचे असावे असे वाटते.

दिल्ली असाधारण आहे. ती पॅरिससारखी नाही की वॉशिंग्टनसारखी नाही. टोकियो अथवा दमास्कसशी देखील तिची तुलना होऊ शकत नाही. या साऱ्या राजधान्यांमधली थोडी थोडी वैशिष्ट्ये तर तिच्यात आहेतच पण त्याबरोबरच त्या शहरातील अमांगल्य आणि सौंदर्य हेही ठाशीव स्वरूपात तिच्या ठायी दिसते. सांप्रतच्या जगाची पॅरिस ही निःसंशयपणे प्रेयसी आहे. ही राजधानी आपला प्रियकर वारंवार बदलत नाही. फ्रेंच जनतेलाच पॅरिसने सदैव आपला

प्रियकर मानले आहे. विवाह बंधनांची कक्षा ओलांडून तिच्या प्रसन्न प्रणय-लीलांनी तिचा प्रियकार कधी प्रसन्न होतो तर कधी त्याकडे दुर्लक्ष करतो. आग आणि पाणी यांचे गुणधर्म जणू एकवटावेत तशी पॅरिसनगरी एकनिष्ठ आणि प्रणयासक्त दोन्ही आहे. या तिच्या स्वभावामुळे काळजात कळ तर उठते पण त्याच बरोबर मनात उल्हासही दाटतो. मरगळ मात्र कधीच वाटत नाही. वॉशिंग्टन ही राजधानी गंभीर आणि पवित्र संगमरवरासारखी निष्कलंक अशी एक प्रौढ सुभगा आहे. आपल्या पतीच्या सेवेत ती इतकी रममाण असते की तिच्याकडे पाहून काहीसे कुतूहल वाटले तरी कणवच अधिक वाटते. टोकियो आणि दमिश्क ( दमास्कस ) या तर अगदी उघड उघड दुकान मांडून बसलेल्या इमानी आणि कष्टाळू कसबिणी आहेत. आपले कायदेशीर पती विशाल विश्वातील अन्य पतीप्रमाणे आधुनिक सुखसोईत राहावेत म्हणून त्या खूपशी दौलत जमविण्याच्या प्रयत्नात असतात. दिल्लीला पती असा कधी नव्हताच. तिने कोणावर प्रेमही केले नाही. ती कधी प्रणय क्रीडेच्या मोहात पडली नाही की प्रासंगिक प्रेम प्रकरणातही गुरफटली नाही. तिने अगदी सरळसरळ आणि धोपटमार्गी असे दुनियेतल्या एका वेश्येचे जिणे पत्करले. तिच्यावर आपले अस्तित्व लादणाऱ्या अशा नव्या पशुतुल्य अत्याचाऱ्याला सुधारण्याच्या आणि दुबळे बनविण्याच्या कार्यातच ती रत झालेली आहे. या कुलटेचे लावण्य वेड लावणारे आहे. ही हृदयहीन तर आहेच पण केवळ विलास आणि आधुनिकताच तिच्या जीवनाची उद्दिष्टे आहेत. प्रेयसी, सुभगा आणि बाजारबसवी यांच्यातील थोडा थोडा अंश सामावून घेऊनही आपल्या निव्वळ पापाचरणाने ती त्या सर्वांमध्ये वरचढ ठरली आहे.

इतिहासात दिल्लीचा उल्लेख तसा अलीकडचाच आहे. अनेकांना वाटते तशी ती जुनी नाही. दिल्लीला केवळ साडेसातशे वर्षांचाच इतिहास आहे. इतिहासपूर्वकालीन पुराणात अल्प कालखंडातच तिचा काहीसा उल्लेख आहे. इद्रप्रस्थ या मयपुरीची कारागिरी मय राक्षसाची. त्याने हिची रचना शोभिवंत आणि रहस्यमय अशी केली. हस्तिनापुरात राज्य करणाऱ्या कौरवांना अपमानीत करण्यासाठी म्हणून पांडवांनी हिची स्थापना केली. हस्तिनापुरचे राज्य जिंकण्यापूर्वीच्या काळातली तात्पुरती अशी ही इंद्रप्रस्थ राजधानी होती. पूर्वाश्रमाची दिल्ली म्हणजेच इंद्रप्रस्थ ही पुराणातील कृष्णकथात वर्णिल्याप्रमाणे मोहक मायानगरी होती. आपल्या तत्कालीन मालकाशिवाय अन्य साऱ्यांची मानखंडना करण्यासाठीच जणू तिची वास्तु कुटिल बनवण्यात आली होती. पण



अशोकस्तंभ

सारनाथ इ. स. पूर्व ३ रे शतक

यमुनाकांठच्या या इंद्रप्रस्थाचे अस्तित्व फारच अल्पकालचे होते. कृष्णाचे आवडते पांडव, गंगाकाठच्या जवळच्याच हस्तिनापुरच्या गादीवर आरूढ होईपर्यंतच्या अल्पकाळात, इंद्रप्रस्थ म्हणजे हस्तिनापुरचे जणू एक प्रवेशद्वारच बनले होते. पुराणातील हा छोटासा उल्लेख वगळल्यास या रमणीय, कपटी, आणि दुष्ट देहलीचा–भारताच्या प्रवेशद्वाराचा–७६४ वर्षांपूर्वीपर्यंत उल्लेख नाही. हिंदुस्थानचे प्रवेशद्वार आणि उभ्या देशाचे सत्ता–नियंत्रण केंद्र म्हणून सुमारे १२१४ त दिल्ली प्रथम उदयास आली. परकी आणि अद्‌भुत शक्तिशाली अशा एकामागोमाग येणाऱ्या आक्रमकांचे दिल्ली हे प्रवेशद्वार होते, तर जनतेचा तेजोभंग करणे आणि तत्कालीन राज्यकर्त्यांना दुबळे आणि उथळ सुसंस्कृत बनवणे या दृष्टीने ते सत्तानियंत्रण केंद्र होते. दिल्लीला जणु गतस्मृतींनी घायाळ व्हावयाचे नसावे, म्हणूनच ती प्रत्येक नवविजेत्याबरोबरच वेगवेगळ्या स्थळी जाऊन राहिली. मोहक पापाचरणाच्या प्रत्येक नव्या साहसप्रसंगी ती नवकुमारिका बनत असे. आठ शतकांच्या कालखंडात आणि पंधरा मैलांच्या परिसरात सात दिल्ल्या वसलेल्या आहेत. या दिल्ल्या एकमेकींच्या वर अथवा एकमेकींच्या शेजारी प्रतिष्ठा आणि मानखंडना यांचा इतिहास दाखवत उभ्या आहेत.

खंडित स्वरूपात विशाल तुघलगाबाद अजूनही अपूर्वाईने उभे आहे. ह्याच्याएवढा अवाढव्य लांबीरुंदी असलेला किल्ला पाहिल्याचे मला स्मरत नाही. जगात कोठल्याही काळी आणि कोठेही अशाप्रकारचे सत्तेचे ओबडधोबड स्वरूप आढळणार नाही. जगातील उध्वस्त स्थळांपैकी एक स्थळ जहाँपनाह, तुघलगाबादजवळच आहे. तेथे हजार खांबांचा एक लाकडी राजवाडा होता. तो नंतर जाळण्यात आला. आता त्याची राख देखील शिल्लक उरलेली नाही. हा राजवाडा तघलगाबादएवढाच प्रचंड पण कमी भीतिदायक आणि अधिक सुंदर असला पाहिजे. तघलग एक विचित्र वंश होता. त्यांची प्रतिभा दैदिप्यमान होती, पण त्यांचेजवळ शहाणपणा नव्हता. अनेक गोष्टी अगदी प्रथमच त्यांनी जगात सुरू केल्या. आपल्या साम्राज्यशक्तीच्या जोरावर त्यांनी चामड्याची नाणी प्रचारात आणली, आपला किल्ला बांधला, शहर वसवले. पण पुरेशा पाणीपुरवठ्याची व्यवस्था मात्र केली नाही. एतद्देशीय बनण्याच्या प्रक्रियेत जनतेशी एकरूप होण्याच्या प्रयत्नाबरोबरच स्वतःला दुबळे बनवणाऱ्या सुधारणेचा आधार घेण्याचाही त्यांनी कठोर प्रयास केला. या प्रक्रियेच्या अखेरच्या कालखंडात एका तुघलगाने हजार मैलावरील देवगिरी येथे आपली राजधानी नेली

आणि तिचे नाव दौलताबाद ठेवले. तो प्रचंड किल्ला मानवापेक्षा निसर्गानेच अधिक बनवला आहे. त्याच्या पार्श्वभूमीवर तेथे कुतुबची एक छोटीशी प्रतिकृती अजूनही हंसत उभी आहे.

एतद्देशीय बनलेल्या परकीयांनीच बहुतेक दिल्ल्या वसवलेल्या आहेत. कुतुब, तघलगाबाद, जहाँपनाह, कोटला आणि शहाजहानाबाद या दिल्ल्या, या गोष्टींच्या खुणा आहेत. परकीयानी एतद्देशीय बनण्याचा हा प्रारंभीचा काळ अत्यंत जुलम आणि कलंकमय घटनांनी भरलेला आहे. या काळातच परकीयांनी एतद्देशीयांना जिंकले आणि नंतर ते परकीय जसेजसे स्वदेशी बनत गेले तसेतसे पुढील कालखंडात अधःपात आणि सौंदर्य दोन्ही गोष्टी येथे फुलू लागल्या. रायपिथोरा आणि कुतुब या पहिल्या दोन दिल्ल्या एकमेकींशेजारी नसून एकमेकींच्या उरावर बसलेल्या आहेत. या दिल्ल्या परकीयांचा अत्याचार आणि स्थानीयांची नालायकी यांच्या प्रतीक आहेत. आणि गेली आठशे नऊशे वर्षं भारतीय इतिहासाचा हाच गुणविशेष बनून राहिला आहे. पृथ्वीराजाच्या दिल्लीचे रूपांतर कुतुब आणि त्याचे वशंज यांच्या दिल्लीत करण्यासाठी म्हणून तेथील शिल्पांकित दगड उलटा करण्यात आला आहे तर काही ठिकाणी त्यावर अरबीत कुराण खोदण्यात आले आहे.

हिंदुस्थानी इतिहासातील या उजाड स्थळी मी एक रात्र घालवलेली आहे. अशा ठिकाणचे तेथील गूढ शोधून काढण्यासाठी पुन्हा अशीच एखादी रात्र काढावी असे मला वाटते. मी हे रागाने म्हणत नाही. आपल्या आईने परकीय विजेत्याबद्दल अधिक स्नेह दाखवला तरी देखील तिच्यावर कोणाला रागावता कसे येईल ? अथवा आपल्या आईवर प्रथम बलात्कार करून मागाहून तिच्याशी विवाह करणाऱ्या सावत्र बापावर आणि त्याच्या मीलनातून जन्मलेल्या भावावर देखील राग कसा धरता येईल ? संतापापेक्षा देखील माझ्या भावनेचे वर्णन उदास मनोयातना असेच करावे लागले. त्यातून मी जर कोणावर क्रुद्ध असेनच तर तो मातेचे रक्षण करू न शकणाऱ्या पित्यावर ! हिंदु असो की मुसलमान असो प्रत्येक दुबळ्या पित्याचा क्रमशः वधच झालेला आहे. अथवा त्याला नव्या सावत्र बापाचा ढोल वाजवावा लागला आहे. अपूर्णावस्थेतल्या ओबडधोबड अल्लाउद्दीनाच्या मीनारच्या पायावर उभा असलेला वैभवशाली कुतुब आणि त्याच्या शिखरावर असलेले काळेशार सुंदर लोखंडी स्तम्भ यांनी बनलेल्या त्रिकोणावर बराच वेळ माझी नजर खिळली. मी एकटाच होतो. आणि चंद्रही इतका क्षीण होता की त्याचीही सोबत होऊ शकत नव्हती. त्या

त्रिकोणाचा पाया पाहून एका अज्ञात भयाने मी व्याकुळ झालो. ते भय सापांचे किंवा चोराचिलटांचे होते? की महागड्या महालातील मोहमय पापाचाराला प्रोत्साहन देऊन गरीबांच्या निर्भय प्रणयावर चिखलफेक करणाऱ्या त्या शुचितेच्या ठेकेदारांचे भय मला वाटले? आजची दिल्ली ही अशी आहे. दहा शतके झाली हीच तिची रीत राहिलेली आहे. कदाचित् हिंदुस्थानी इतिहासातील अत्याचार आणि कलंक यांची गाथा पाहून त्या अज्ञात भीतीनेच मला ग्रासले असावे!

मुसलमानांनी हिंदूंना जिंकले याचे मला दुःख होत आहे असा माझ्या शोकभावनेचा गैरअर्थ लावला जाईल म्हणून एक गोष्ट स्पष्ट करतो. तितक्याच अत्याचारी आणि कलंकमय मार्गांनी मुसलमान कुतुबाला, मुसलमान तघलगांनी जिंकले आहे. आणि तघलगांना देखील मुसलमानांनीच पराजित केले आहे. शेवटची राजधानी शहाजहानाबाद हिला मात्र ब्रिटिश 'गुलामाबाद' ने पादाक्रांत केले. या साऱ्या प्रक्रियेत भयंकर लूटालूट आणि भयचकित करणाऱ्या कत्तली दिल्लीत झाल्या. तैमूर, नादीरशहा आणि अहमदशहा हे सारे मुसलमान होते. तरी त्यांनी सैय्यद अथवा मोगलांच्या मुसलमान दिल्लीतही लूटमार आणि कत्तली केल्या. गेल्या दहा शतकांचा हिंदुस्थानी इतिहास हिंदूइतकाच मुसलमानांना देखील संतप्त करणारा अथवा शोकाकुल बनवणारा आहे. कारण भारतीय जनतारूपी पित्याला दुबळेपणापासून आणि भारतभूमिरूपी मातेला तिच्या क्रूर स्वेच्छाचारापासून यांच्यापैकी कोणीच वाचवू शकलेले नाही. एकापाठोपाठ अगदी वेगाने एकेक रानदांडगे आक्रमक येत राहिले. त्यांच्यापैकी लोदी मुसलमानांना मोगल मुसलमान-रूपी नवा सावत्र पिता स्वीकारावा लागला.

स्थानिक राज्यकर्त्यांनी आपले राज्य परत मिळविण्याचा प्रयत्न केला अशा केवळ दोन प्रसंगीच परकीयांनी एतद्देशीय बनण्याच्या प्रक्रियेला खीळ बसली. प्रथम सैय्यद आणि लोदी, आणि पुढे सुरींनी दिल्लीला सहृदय बनवण्याचा प्रयत्न केला. तो सफल झाला असता तर ती जगाची प्रेयसी पॅरिस हिच्याप्रमाणे किंवा जगाचे आश्रयस्थान लंडन यांच्यासारखी राजधानी बनली असती. शेवटचा मोगल बहादुरशहा यानेही असाच काहीसा दुबळा प्रयास केला. त्याने कविता लिहिल्या आणि नजराणे स्वीकारले. त्याला बहुसंख्य जनतेचा पाठिंबा मिळाल्याने त्याचा प्रयत्न संस्मरणीय ठरला.

हिंदुस्थानच्या मुसलमान इतिहासातील शेरशहा आणि हेमू बक्कल या सुरींचा प्रयास सर्वश्रेष्ठ आणि अतीव आनंदित करणारा असा दैदिप्यमान बुद्धिमत्तेचा होता. शेरशहा अकबरापेक्षा आणि हेमू अबुल फाजल किंवा मानसिंगापेक्षा

श्रेष्ठतर होते. त्या दोघांना अपयश आले हे हिंदुस्थानचे दुर्भाग्य होय. त्यांच्या अपयशाला कारणीभूत त्यांचे स्वतःचे दोष कमी प्रमाणात आहेत. दोष आहे तो क्रूर परंतु सुंदर वेश्या बनलेल्या दिल्लीचा ! दिल्लीने त्यांना साथ दिली नाही. शेरशहा–हेमूनी दुतर्फा वृक्षराजी लावून प्रशस्त सडका बांधल्या. पोस्टाची योजना केली. योग्य हिशोब ठेवणे, जमीनविषयक व्यवस्था, कायद्याचा आदर इत्यादी गोष्टी सुरू केल्या. पुढे अकबराने त्यांच्या कल्पना केवळ पूर्णतेस नेण्याचे काम केले. मुस्लिम हिंदुस्थानातील हेमू–शेरशहा या अद्वितीय राज्यकर्त्या-जोडीची इतिहासकारांनी उपेक्षा केली आहे. अर्थातच त्यांचे अपयश हेच त्याचे कारण आहे. परंतु त्यापेक्षा देखील खरे कारण असे की घटनाक्रम आणि हिंदुस्थानची इतिहासाची प्रक्रिया याबाबतचा उचित दृष्टिकोण या वेश्येच्या संततीने प्राप्त करून घेतलेला नाही. एतद्देशीयांना आपले राज्य परत मिळविण्याच्या प्रयत्नांची मूलभूत प्रेरणा दिल्लीत नव्हे, तर शेकडो मैल दूर असलेल्या सासाराम येथे मिळाली ही गोष्ट ध्यानात घेण्याजोगी आहे. पुराणात वर्णिलेल्या इंद्रप्रस्थाच्या भूमीची निवड आपला किल्ला बांधण्यासाठी हेमू–शेरशहांनी केली हीही गोष्ट वेधक आहे. इंद्रप्रस्थात, अर्थात् याच पुराण्या किल्ल्यात १९४७ सालच्या हिंदुस्थानच्या फाळणीच्या वेळचे शरणार्थी ठेवण्यात आले होते.

सध्याचे दिल्ली विश्वविद्यालय आहे ते स्थळ किंवा ब्रिटिशांनी उभारलेल्या वास्तू असलेली स्थळे म्हणजेच गुलामाबाद हा मात्र तेवढा परकीयांनी स्थानिक बनण्याच्या हजार वर्षांच्या जुन्या परंपरेचा अपवाद होय. याप्रसंगी परकीयांनी स्थानिक बनण्याचे नाकारले. दुबळे बनविण्याइतकी सुसंस्कृतता त्याच्यात वेश्या रुजवू शकली नाही. त्यांना ती आपला भाटही बनवू शकली नाही. म्हणूनच त्यांना येथून जावे लागले. विद्वानापेक्षा अधिक शहाणपणा दाखवून जनतेने ब्रिटिश राजधानीला गुलामाबाद, गुलामांचे निवासस्थान, असे योग्य नाव ठेविले.

दिल्लीच्या एकूण इतिहासात दिल्ली ही एक श्रेष्ठ वारांगना राहिली आहे. तिच्या एका बाजूला तिला जिंकणारे विजेते आहेत तर दुसरीकडे तोंडपूजकांचा घोळका आहे. दिल्लीला आक्रमक किंवा तोंडपूजक या व्यतिरिक्तची श्रेणी माहीत नाही. आक्रमक विजेत्यांच्या प्रत्येक टोळीला एतद्देशीय आणि शेळपट बनवून नंतर येणाऱ्या दुसऱ्या टोळीच्या पुढे तिला भाट बनविण्यात आले. भाटगिरी करणाऱ्यांचे दोन गट होते. एक गट तोंडपूजक जनतेचा आणि दुसरा आधीच्या विजेत्यांचा. नव्या आक्रमकांपुढे शरणागती पत्करण्याच्या बाबतीत या दोन्ही

गटात काही अंशांचाच फरक दिसून येतो. आधीच्या विजेत्यांच्या गटाला दरबारी म्हणता येणार नाही; शक्तिशाली अशा हल्लेखोरांची नवी टोळीच खरी दरबारी होय. तरीदेखील आधीच्या दरबारी तोंडपूजक गटाला नवे विजेते आणि वेश्या यांच्या शय्यागृहात कृपा म्हणून शिरावयास मिळे आणि दरबारी तोंडपूजकांच्या दुसऱ्या गटाला म्हणजे जनतेला रस्त्यावर उभे राहून मान लववावी लागे.

या शरणागतीच्या परिस्थितीला फक्त तीनच अपवाद आहेत. या तिन्ही प्रसंगी काही प्रमाणात का होईना दिल्लीची जनता आपल्या स्तुतिपठनाच्या कामातून जागी झाली. सरदार, सैन्य आणि मुल्लामौलवी या त्रिकूटाच्या कारा-स्थानाविरुद्ध रझियाने बंड पुकारले तेव्हा जनता किल्ल्याबाहेर रझियाला पाठिंबा देण्यासाठी म्हणून प्रचंड संख्येने जमली. एक उच्चपदाधिष्ठित स्त्री आणि गरीब जनता स्वाभाविक मित्र बनून जुनाट आणि गतिहीन व्यवस्थेविरुद्ध उभे राहिले. दुसरा प्रसंग १८५७ सालचा. त्यावेळी जवळच्या मीरत शहरापासून मुळांत प्रेरणा घेऊन दिल्लीची जनता परसत्तेविरुद्ध काही काळ बंड करून उठली. दिल्लीच्या या शरणागतीच्या स्वभावाला अपवादभूत ठरलेला तिसरा प्रसंग फारसा गंभीर नसला तरी काहीसा दीर्घ काळ टिकला. प्रारंभीचे व्यक्तिगत शौर्याचे हिंसक प्रयत्न वगळले तरी देखील १९२० ते १९४७ पर्यंतच्या कालखंडांत दिल्लीची जनता वेगवेगळ्या प्रसंगी कमी अधिक प्रमाणात परकीय राजवटी-विरुद्ध देशभर चाललेल्या बंडात आपल्या देशबांधवांप्रमाणेच सामील झाली. लाठीगोळीशी तिने सामना केला, निर्धारपूर्वक निदर्शने केली. पण हे तीन छोटेसे कालखंड वगळल्यास दिल्लीच्या जनतेने निलाजरी शरणागती पत्करली आणि वेश्येच्या बाजूने जो कोणी उभा राहिला त्याचे दास्यत्व स्वीकारले.

परकीयांनी एतद्देशीय बनणे, परकीयांनी स्वदेशी बनण्यास नाकारणे आणि एतद्देशियांनी आपले राज्य परत जिंकण्याचा प्रयत्न करणे या तिन्हीं प्रक्रिया गेल्या दहा शतकांच्या कालावधीत दिल्लीने पाहिल्या आहेत. सांप्रत दिल्लीच्या रंगभूमीवर चालू असलेल्या नव्या नाटकाला काय म्हणावे? या नाटकात एत-द्देशीय परकीय बनण्याचा निश्चितपणे प्रयत्न करून राहिले आहेत. 'गुलामा-बाद' निर्मित वास्तू स्वीकारल्या गेल्या आहेत; आणि त्यांच्या साम्राज्याची चिन्हे अजूनही कायम आहेत. राष्ट्रपतिभवन उंच जागी खडे आहे तर इंग्रजी अमदानीतल्याप्रमाणे अद्यापही खालच्या पातळीवर बांधलेले सचीवालय आणि संसद्भवन नतमस्तकावस्थेत उभे आहे. मथुरारोड अथवा करोलबाग परिसरातील नव्या आणि विविधप्रकारच्या आधुनिक इमारती मोठ्या डौलदार दिसतात पण

त्या वारांगनेच्या दरबाऱ्यांसाठी बांधलेल्या आहेत. भारतीय जनतारूपी विस्मृत पतीला त्या वास्तूंचा काडीमात्र फायदा अद्यापहि नाही. उच्चभ्रु स्तुतिपाठकांचा पूर आला आहे. विद्वान, कवी, गायक, शिक्षक, वकील, निर्माते, शास्त्रज्ञ, नर्तक, चित्रकार आणि राजकारणी हे अगदी घोळका करून त्वरेने तेथे पोचले आहेत. पण त्यांच्यापैकी कोणीदेखील असामान्य तर नाहीच पण महत्त्वपूर्ण देखील नाही. ती कसबीण आणि तिचा नवा प्रियकर यांच्यापुढे शिरसाष्टांग घालावयास ती टोळी जणू तेथे पोहोचली आहे. आपल्या सर्वशक्तिनिशी विलायती जीवनपद्धतीची आणि रीतीभातींची नक्कल ते तेथे राहून करीत आहेत. आणि म्हणूनच नवे राज्यकर्ते एतद्देशीय आणि स्वदेशी असल्याचा देखावा करीत असले तरी त्यांच्यापुढे पूर्णपणे मान झुकविण्याव्यतिरिक्त त्या टोळीला गत्यंतर नाही. बहुजनांनी मात्र अद्याप नक्की निर्णय केलेला नाही. ते अजूनही शरणागती आणि निस्तेज त्रडत्रड या दरम्यान झोके घेत आहेत.

वरिष्ठ पातळीवरच्या विजेत्यांपैकी फारच थोड्या व्यक्ती वगळल्यास दिल्लीला क्वचितच कधी महान् अथवा प्रभावी व्यक्ती लाभल्या असतील. तानसेनसारखा संगीतसम्राट अथवा तोडरमलसारखा शासक देखील, राजधानी दिल्लीला असतांना नव्हे, तर आग्रा आणि फत्तेपूर-शिक्री येथे मोगलांची राजधानी होती तेव्हा उदयास आले. फारसे दुर्बल न होता ज्या एका परकीयाने स्वदेशी बनण्याचा प्रयत्न केला त्याने देखील दिल्लीपासून दूर जाणेच पसंत केले. या गोष्टीला किती महत्त्व द्यावे कोण जाणे! गालिब हा अपवादभूत वाटण्याची देखील शक्यता आहे. अर्थात तो राजा असला तरी कमी महत्त्वाच्या अशा काव्यक्षेत्रातला राजा होता. आणि शिवाय दिल्लीचा राजा आपल्या किल्ल्यातच बंदीवान होऊन पडला होता त्या काळात तो उदयास आला.

पण संपूर्ण हिंदुस्थानचा इतिहास असा पराधीनतेच्या यातनांचा नाही. दुनियेत अन्यत्र झाले आहेत तसे, किंबहुना कांकणभर अधिक श्रेष्ठ असे थोर स्त्री-पुरुष, श्रेष्ठ राज्ये, आणि महान् जनता येथेही होऊन गेलेली आहे. पण त्यांनी आपली कर्मभूमी दिल्लीपासून दूर निवडली. पाटलीपुत्र, कनोज आणि उज्जैन या हिंदुस्थानच्या इतिहासकाळातील राजधान्या या दृष्टीने महत्त्वपूर्ण तर आहेतच पण भुवनेश्वर, धार, पैठण, आणि श्रीरंगम् या राजधान्या देखील सामर्थ्य व सौंदर्य यांची केंद्रे राहिली आहेत. पाटीलपुत्र राजधानीने तर काबुल आणि अफगाणीस्तानातील अगदी शेवटच्या चौक्यांचे रक्षण केले आणि आक्रमकांना पिटाळून लावले. मंदसौरने मिहिरकुल या हूण आक्रमकाला दांती तृण धरून शरण

यावयास लावले. जनता समर्थ आणि रगदार होती हे तर खरेच, पण त्याच-बरोबर या राजधान्या जनमानसाशी एकरूप झाल्या होत्या. कमीत कमी सत्तेचा त्या वापर करीत आणि विद्वानांना व कलावंतांना राजधानीपासून दूर राहून साधना करू देत. या राजधान्या आणि तेथील जनता राज्यकर्त्यांच्या हस्तक्षेपा-पासून किती प्रमाणात स्वतंत्र असत हे सांगता येणार नाही पण किमान लिच्छवी लोकांची वैशाली तरी पूर्णपणे विमुक्त होती.

पॅरिस आणि लंडन या राजधान्या आपल्या राज्यकर्त्यांच्या हस्तक्षेपापासून मुक्त राहिल्या आहेत. रोम आणि बर्लिनची स्थिती देखील अशीच आहे. या शहरातील जनता आपल्या सरकारी मंत्र्यांना ओळखूही शकणार नाही की त्यांचे नाव देखील सांगू शकणार नाही. फ्रान्सच्या सत्ताधीशांनी पॅरिसचा एक अगदी छोटासा भाग व्यापलेला आहे. हिंदुस्थानचे सरकार मात्र संपूर्ण दिल्ली व्यापून राहिले आहे. पॅरिस, बर्लिन, लंडन, आणि रोम या राजधान्या सत्ता आणि राज्यकर्ते यांची पत्रास न ठेवणाऱ्या आहेत तर वॉशिंग्टन, दिल्ली, टोकियो आणि काहिरा या राजधान्यांना मात्र सरकारबाहेर फारसे अस्तित्व नाही. पॅरिस हा विमुक्त राजधानीचा आजचा संपूर्ण सर्वश्रेष्ठ अविष्कार आहे, तर दिल्ली हा गुलाम राजधानीचा आजचा संपूर्ण सर्वश्रेष्ठ अविष्कार होय. गुलाम राजधानी आणि स्वतंत्र राजधानी यांच्यातील व्यवच्छेदक लक्षण केवळ परसत्ता हे नव्हे. जेथे जनता सरकारपुढे आत्मविसर्जन करते ती गुलाम राज-धानी होय. पॅरिस हे शहर फ्रान्सच्या संयमी जनतेचा सहचर आहे तर दिल्ली तत्कालीन राज्यकर्त्यांची दासी आहे.

लंडन ही इंग्लंडची राजधानी असल्यामुळे मी तिच्याकडे उपेक्षाभावाने पाहतो असा गैरसमज करून घेऊ नये. मीही लंडनवर एकेकाळी प्रेम केले आहे. तेही अगदी वियोगाच्या काळात आणि तरुण वयात. बार्लिनहून लंडन पाहावयास म्हणून आलो असताना. मी आगगाडीत बसलो होतो. आणि लंडन शहर क्षणमात्रात चमकून गेले. पण त्याची अमिट छाप अजूनही माझ्या मनावर आहे. त्याचे काय कारण असावे याचा विचार मी मागाहून केला. अजूनही मी आठवण्याचा प्रयत्न करतो आहे. टॉटेनहॅम-रीजंटस्ट्रीट ते वेलसाईज पार्क, आणि सेंटपॉल कॅथेड्रल ते हाईडपार्क या विभागाबद्दल जवळिक वाटल्यानेच लंडनबद्दलची ओढ वाटली असावी. त्या जागतिक राजधानीच्या व्यस्त आणि गजबलेल्या भागापासून तो ग्रामीण गीताची अद्‌भुतरम्यता दाखवणाऱ्या लंडन-मधील बागा आणि सीमांपर्यंतचा प्रवास मी अगदी आरामात आणि गतीने करू

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
१०५५३



सूर्यचक्र
कोणारक–ओरिसा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १६६२२
(स्थळ प्रत)

शकलो. हेच ते संपूर्ण लंडन! एका टोकाला न्यूयॉर्क इतक्या जलद गतीचा अथवा टोकियो इतका कठोर नसला तरी काही प्रमाणात कार्यक्षम आणि कठोर व्यवहार दिसला तर दुसऱ्या टोकाला देखण्या गवळणींचे विमुक्त हास्य दिसले.

लंडन विशाल हृदयाचे आहे. प्रथमदर्शनी ते अवाढव्य आणि अस्ताव्यस्त वाटून माणूस नजर फिरवतो पण वियोगाची वेळ आली की जणू विशाल हृदय उघडले जाते आणि वाटते की खरोखरच हे शहर तर जगाचे आश्रयस्थान आहे. रेखल्यासारखे आणि मनमोहक. मी लंडनला पुन्हा गेलो होतो त्यावेळचे काही अनुभव मला आठवतात. एका लोकप्रिय दैनिकातील मथळ्यातून नाव गाजवणारी एक विश्वविद्यालयीन विद्यार्थिनी मला आठवते. ती जींजर होती. स्टुलावर उभे राहून आपल्या जोरदार भाषणाने तिने थिएटरमध्ये जाणारा जमाव आणि मॅनेजर यांच्यातील दंगलीच्या परिस्थितीवर काबू मिळविला होता. विश्वविद्यालयातील आणखीही काही मुली लंडनमधील हाईडपार्कमध्ये अथवा बर्लिनच्या मे डेच्या परेडमध्ये स्टुलावर उभ्या राहून सरकारच्या भावी पतना-बद्दल अथवा भांडवलशाहीविरुद्ध किंवा दोहोंच्या जुलुम आणि शोषणाबद्दल भाषणे करीत असलेल्या मी पाहिल्या आहेत. मी माझ्या कोटाची पुरेशी काळजी घेत नाही म्हणून माझी पत्नी मला काय म्हणेल याबद्दल फटकारणाऱ्या एका वेट्रेसची मला आठवण आहे. माझी पत्नी बनायला कोणी स्त्री तयारच झाली नाही असे खेदाने मी म्हणताच "तुम्ही मुळी कुणाला विचारलंच नसेल!" असे झणकाऱ्यात मिळालेले तिचे उत्तर मला मोठे लोभस आणि गोड वाटले होते. सोहो रेस्टारंटमध्ये भेटलेली अशीच एक देखणी आणि चतुर वेट्रेस मला आठवते. ती मध्यप्रदेश सरकारच्या एकेकाळच्या मुख्य सचीवाची सून होती. त्यानंतर एकदा सटनमध्ये एक फारच सुबक आणि नीटनेटकी अशी मध्यमवर्गीय मुलगी मला भेटली. माझ्या घराचा पत्ता मी तिला विचारला. काहीतरी भांडण झाल्यामुळे असो की प्रेमभंगामुळे असो ती रडत असावी. माझ्या ते प्रथम लक्षात आले नाही. अगदी शांतपणे तिने मला माझा रस्ता दाखवला. लंडन खरेच विशाल आहे.

मागच्या खेपेला मी तेथे होतो तेव्हा ट्राफल्गार स्क्वेअरचे भव्य दृश्य मला दिसले. मी तात्काळ ठरवले की इंग्लंडमध्ये त्या चौकात चुबतऱ्यावर उभा असलेला ॲडमिरल नेल्सन चबुतऱ्याच्या बाजूचे सिंह आणि तेथे जमणारी कबुतरे यांच्या सहवासात प्रत्येकी अर्धा तास घालवावयाचा. जणू काही कबुतरांच्या रक्षणार्थच तैनात केले असावेत अशा थाटात सिंह तेथे अगदी स्थिरपणे उभे

आहेत. अर्थात् ही गोष्ट ब्रिटिश इतिहासाला धरून नाही. परंतु काही का असेना इंग्लंडच्या अंतर्गत व्यवहाराचे प्रतीक असलेले ते दृश्य फारच मनोरम आहे. न्यूयार्कमध्ये त्या महान शहराचा आत्मा जाणून घेण्याच्या दृष्टीने मी अधिक काळ थांबावयास हवे होते असे वाटते. लंडन भव्य आहे. प्रेयसी, सुगृहिणी आणि बाजारबसवी यांचा संगम तेथे झाला आहे. तिघीजणी मोठ्या उदार मनाने तेथे प्रकट झाल्या आहेत.

ती वेट्रेस, ती विश्वविद्यालयीन विद्यार्थिनी आणि सटन उपनगरातील ती तरुणी आणि त्यांच्यासारखेच मुलगे हे काही केवळ लंडनमध्येच भेटतात असे नव्हे. ते येथे दिल्लीतही भेटतात. खरे म्हणजे लंडनमधील मुलांप्रमाणेच दिल्ली-तली मुले देखील देखणी आणि प्रसन्नमुख दिसतात. आपल्या जुन्या घरंदाज-पणामुळे काहीशी अधिक चतुर आणि हुशारच असतात. पण त्यांना शेळपट तोंडपुजे बनवण्यात आले आहे. त्यांना आपल्या मनातल्या भावना मोकळे-पणाने बोलण्याची मुभा नाही. आणि त्यांचे कपडे मळकट व चुरगळलेले आहेत. ही गणिका आपला सहवास त्यांना मिळू देत नाही. लंडन आणि पॅरिसची मुले मुक्त असतात. लंडनमध्ये ती सरकारची उपेक्षा करू शकतात. पॅरिसमध्ये आपल्या सरकारचा कान देखील ते पकडू शकतात.

मी मस्कवा ( मॉस्को ) पाहिलेले नाही. पण मला त्या शहराबद्दल आदर आहे. मस्कवाला आपल्या अस्तित्वासाठी वेळोवेळी लढा द्यावा लागलेला आहे. दबावामुळे कधी ते मागे हटले आहे पण त्याने आपला प्रत्येक रस्ता आणि प्रत्येक घर जणू किल्ला बनविला आहे. दिल्लीनेही आपल्या रक्षणासाठी कुरुक्षेत्र अथवा पानिपतच्या भूमीवर संग्राम केलेला आहे. कनोजने आपले स्वातंत्र्या-प्रीत्यर्थचे अखेरचे युद्ध दिल्लीत नव्हे, तर उत्तरेकडे ९० मैलांवर असलेल्या ठाणेश्वरपाशी केले ही गोष्ट काहीशी वेधक आहे. ठाणेश्वर आणि पानिपत ही दुःखी शहरे आहेत. ठाणेश्वर तर अधिकच शोकपूर्ण आहे. त्या जुन्या शहरांच्या मूक कहाण्यांशी माझ्या मनाचा सूर जमवण्यास मला बराच काळ लागतो. ठाणेश्वरला मला पुन्हा एकदा जावे लागले. पण त्या शहराच्या आकार-हीन आणि उंच भग्नावशेषांचे या मूठभर उच्चवर्णीय दरबाऱ्यांनी काही करावयास नको काय? कुरुक्षेत्र अथवा पानिपत येथे दिल्लीला मिळालेले यश अपवादात्मक आहे. खरे म्हणजे प्रयत्नांतीच ते आठवावे लागेल. पीछेहाटीला दिल्लीने एक कला बनवले आहे. जेत्यापुढे ती आपले वक्षस्थळ उघडत आली आहे. त्याला भुरळ पडून शेवटी तो माणसाळेल अशी तिला आशा वाटत आली

शकलो. हेच ते संपूर्ण लंडन ! एका टोकाला न्यूयॉर्क इतक्या जलद गतीचा अथवा टोकियो इतका कठोर नसला तरी काही प्रमाणात कार्यक्षम आणि कठोर व्यवहार दिसला तर दुसऱ्या टोकाला देखण्या गवळणींचे विमुक्त हास्य दिसले.

लंडन विशाल हृदयाचे आहे. प्रथमदर्शनी ते अवाढव्य आणि अस्ताव्यस्त वाटून माणूस नजर फिरवतो पण वियोगाची वेळ आली की जणू विशाल हृदय उघडले जाते आणि वाटते की खरोखरच हे शहर तर जगाचे आश्रयस्थान आहे. रेखल्यासारखे आणि मनमोहक. मी लंडनला पुन्हा गेलो होतो त्यावेळचे काही अनुभव मला आठवतात. एका लोकप्रिय दैनिकातील मथळ्यातून नाव गाजवणारी एक विश्वविद्यालयीन विद्यार्थिनी मला आठवते. ती जींजर होती. स्टुलावर उभे राहून आपल्या जोरदार भाषणाने तिने थिएटरमध्ये जाणारा जमाव आणि मॅनेजर यांच्यातील दंगलीच्या परिस्थितीवर काबू मिळविला होता. विश्वविद्यालयातील आणखीही काही मुली लंडनमधील हाईडपार्कमध्ये अथवा बर्लिनच्या मे डेच्या परेडमध्ये स्टुलावर उभ्या राहून सरकारच्या भावी पतना-बद्दल अथवा भांडवलशाहीविरुद्ध किंवा दोहोंच्या जुलुम आणि शोषणाबद्दल भाषणे करीत असलेल्या मी पाहिल्या आहेत. मी माझ्या कोटाची पुरेशी काळजी घेत नाही म्हणून माझी पत्नी मला काय म्हणेल याबद्दल फटकारणाऱ्या एका वेट्रेसची मला आठवण आहे. माझी पत्नी बनायला कोणी स्त्री तयारच झाली नाही असे खेदाने मी म्हणताच "तुम्ही मुळी कुणाला विचारलंच नसेल !" असे झणकाऱ्यात मिळालेले तिचे उत्तर मला मोठे लोभस आणि गोड वाटले होते. सोहो रेस्टारंटमध्ये भेटलेली अशीच एक देखणी आणि चतुर वेट्रेस मला आठवते. ती मध्यप्रदेश सरकारच्या एकेकाळच्या मुख्य सचीवाची सून होती. त्यानंतर एकदा सटनमध्ये एक फारच सुबक आणि नीटनेटकी अशी मध्यमवर्गीय मुलगी मला भेटली. माझ्या घराचा पत्ता मी तिला विचारला. काहीतरी भांडण झाल्यामुळे असो की प्रेमभंगामुळे असो ती रडत असावी. माझ्या ते प्रथम लक्षात आले नाही. अगदी शांतपणे तिने मला माझा रस्ता दाखवला. लंडन खरेच विशाल आहे.

मागच्या खेपेला मी तेथे होतो तेव्हा ट्राफलगार स्क्वेअरचे भव्य दृश्य मला दिसले. मी तात्काळ ठरवले की इंग्लंडमध्ये त्या चौकात चुबतऱ्यावर उभा असलेला ॲडमिरल नेल्सन चबुतऱ्याच्या बाजूचे सिंह आणि तेथे जमणारी कबुतरे यांच्या सहवासात प्रत्येकी अर्धातास घालवावयाचा. जणू काही कबुतरांच्या रक्षणार्थच तैनात केले असावेत अशा थाटात सिंह तेथे अगदी स्थिरपणे उभे

आहेत. अर्थात् ही गोष्ट ब्रिटिश इतिहासाला धरून नाही. परंतु काही का असेना इंग्लंडच्या अंतर्गत व्यवहाराचे प्रतीक असलेले ते दृश्य फारच मनोरम आहे. न्यूयार्कमध्ये त्या महान शहराचा आत्मा जाणून घेण्याच्या दृष्टीने मी अधिक काळ थांबावयास हवे होते असे वाटते. लंडन भव्य आहे. प्रेयसी, सुगृहिणी आणि बाजारबसवी यांचा संगम तेथे झाला आहे. तिघीजणी मोठ्या उदार मनाने तेथे प्रकट झाल्या आहेत.

ती वेट्रेस, ती विश्वविद्यालयीन विद्यार्थिनी आणि सटन उपनगरातील ती तरुणी आणि त्यांच्यासारखेच मुलगे हे काही केवळ लंडनमध्येच भेटतात असे नव्हे. ते येथे दिल्लीतही भेटतात. खरे म्हणजे लंडनमधील मुलांप्रमाणेच दिल्लीतली मुले देखील देखणी आणि प्रसन्नमुख दिसतात. आपल्या जुन्या घरंदाजपणामुळे काहीशी अधिक चतुर आणि हुशारच असतात. पण त्यांना शेळपट तोंडपुजे बनवण्यात आले आहे. त्यांना आपल्या मनातल्या भावना मोकळेपणाने बोलण्याची मुभा नाही. आणि त्यांचे कपडे मळकट व चुरगळलेले आहेत. ही गणिका आपला सहवास त्यांना मिळू देत नाही. लंडन आणि पॅरिसची मुले मुक्त असतात. लंडनमध्ये ती सरकारची उपेक्षा करू शकतात. पॅरिसमध्ये आपल्या सरकारचा कान देखील ते पकडू शकतात.

मी मस्कवा ( मॉस्को ) पाहिलेले नाही. पण मला त्या शहराबद्दल आदर आहे. मस्कवाला आपल्या अस्तित्वासाठी वेळोवेळी लढा द्यावा लागलेला आहे. दबावामुळे कधी ते मागे हटले आहे पण त्याने आपला प्रत्येक रस्ता आणि प्रत्येक घर जणू किल्ला बनविला आहे. दिल्लीनेही आपल्या रक्षणासाठी कुरूक्षेत्र अथवा पानिपतच्या भूमीवर संग्राम केलेला आहे. कनोजने आपले स्वातंत्र्याप्रीत्यर्थचे अखेरचे युद्ध दिल्लीत नव्हे, तर उत्तरेकडे ९० मैलांवर असलेल्या ठाणेश्वरपाशी केले ही गोष्ट काहीशी वेधक आहे. ठाणेश्वर आणि पानिपत ही दुःखी शहरे आहेत. ठाणेश्वर तर अधिकच शोकपूर्ण आहे. त्या जुन्या शहरांच्या मूक कहाण्यांशी माझ्या मनाचा सूर जमवण्यास मला बराच काळ लागतो. ठाणेश्वरला मला पुन्हा एकदा जावे लागले. पण त्या शहराच्या आकारहीन आणि उंच भग्नावशेषांचे या मूठभर उच्चवर्णीय दरबाऱ्यांनी काही करावयास नको काय ! कुरूक्षेत्र अथवा पानिपत येथे दिल्लीला मिळालेले यश अपवादात्मक आहे. खरे म्हणजे प्रयत्नांतीच ते आठवावे लागेल. पीछेहाटीला दिल्लीने एक कला बनवले आहे. जेत्यापुढे ती आपले वक्षस्थळ उघडत आली आहे. त्याला भुरळ पडून शेवटी तो मागसाळेल अशी तिला आशा वाटत आली

असावी. तिचे स्तन भूतकाळात खरोखरच उत्कृष्ट आणि सुंदर होते. पण आता ते वैभवाचे युग संपलेले आहे, आणि परिस्थितीला एक नवीन वळण लागले आहे.

दिल्लीने नेहमीच आपले वक्षस्थळ विजेत्यांपुढे उघडलेले आहे; पण ताबडतोबीने त्याचा तिला काहीच फायदा झालेला नाही. तैमूर आणि नादीरशहाने अकारण घाव घालून तिला विद्रूप केले. ती शरणही गेलेली आहे. पण त्या जुन्या चेटकिणीजवळ काहीतरी गुप्त शक्ति आणि मलम असावे. आणि त्यामुळे जुने व्रण भरून येत असावेत. अन्य शहरे जिंकण्याच्या हेतूने लुटली गेली आहेत. पण दिल्ली जिंकली गेल्यावर लुटली गेली आहे. १९४७ साली, ब्रिटिशांनी दिल्ली सोडल्यावर दिल्लीच्या रस्त्यावरून पुन्हां एकदा रक्ताच्या नद्या वाहल्या. घरे उध्वस्त झाली. एक वृद्ध मुस्लिम स्त्री अगदी गंभीरपणे म्हणाली, "दिल्ली पुन्हा नव्याने सवाष्ण बनत आहे. असं होतं तेव्हां नेहमीच रक्त वाहतं." हे तिचे म्हणणे पूर्णपणे बरोबर नाही. कारण सवाष्ण बनणे याचा अर्थ सौभाग्यवती होणे अथवा सधवा असा आहे. मग असा रक्तपात का व्हावा कोण जाणे! सवाष्ण बनत असताना रक्तपात झाला तर ते समजण्याजोगे आहे. पण नंतर रक्तपात होण्याचे काय कारण? ही क्रूर आणि लोभस वारांगना आपला प्रत्येक नवा प्रणयोत्सव रक्ताने तर साजरा करूं इच्छित नसावी?

दोन दिवस किंबहुना आणखीही काळ घालवून स्वदेशी वा परदेशी माणसाने येथल्या सात किंवा आठ दिल्ल्या पहाव्या. हे पापी शहर मी फार वर्षांपासून पाहात आहे. याचे सौंदर्य पाहून मी कैकदां मोहून विरघळलोही आहे. दुरून पाहिल्यावर जुम्मा मशिदीचे तन्वंगीसारखे दिसणारे लावण्य अथवा कुतुबमीनारचे उत्तुंग सौंदर्य पाहून मी विरघळलो नाही. तसे पाहिले तर या शहरांत जुनी स्मारके फारच कमी आहेत. हजार वर्षांपूर्वीची तर नाहीतच.

राय पिथोराचा लोखंडी स्तम्भ आणि कोटला व रीजवरचे दोन अशोक स्तम्भ हे दिल्लीचे स्वतःचे असे नाहीत. ते आक्रमकांनी दूर अंतरावरून युगानुरूप प्रतिष्ठा मिळविण्यासाठी म्हणून आणले. मध्ययुगीन किंवा आधुनिक अशा सुंदर इमारती देखील फारशा दिल्लीत नाहीत. कदाचित हीच दिल्लीची मोहकता असावी. दिल्ली गतस्मृतींच्या घोळांत पडत नाही. दिल्लीला न्याय द्यायचा तर फार तर इतकेच म्हणता येईल की गंगा—यमुनेच्या खोऱ्यातील साऱ्याच शहरांची ही अवस्था आहे. येथे महाकालाचे किंवा प्रलयकालाचे साम्राज्य आहे आणि तो सर्वभक्षक काळ सर्व काही गिळून टाकतो. काही शिल्लक ठेवीत नाही.

दिल्ली आपले सुंदर पापी जीवन कोठल्याही गतस्मृतींनी घायाळ न होता घालवू शकते. तिची ही शक्ती मला प्रशंसनीय वाटते. ही क्रूर वृद्धा एखाद्या किशोरीपेक्षा देखील अधिक मनोहर भासते.

तघलगाबादच्या समोर एका फणा उभारलेल्या नागाशी माझी एकदा नजरानजर झाली. मी मोटारीत होतो आणि नाग रस्त्याच्या मध्यावर होता. नागापासून आम्ही अर्ध्याएक मैलावर गेलो असू. मध्यरात्र झाली होती. ड्रायव्हरने मला नागाबाबत सांगताच मी त्याला त्या जागेकडे परतवले. जवळपास एक गज अंतरावरून आम्ही काही क्षण नजरेला नजर भिडविली. नाग मोठ्या दिमाखाने आणि सामर्थ्याने मोटारीकडे येऊ लागला. नकळत मी शहारलो. पण तत्पूर्वीच तो वळला आणि जवळच्या गवतात सरपटत निघून गेला. जुने खंडहर सापांचे आणि सरड्यांचे निवासस्थान असते. दिल्लीला तसे प्राचीन खंडहर नाहीत. तिला स्वतःला आठवत नसल्या तरी ती माणसाच्या मनातील असंख्य गतस्मृती चाळवते. म्हणूनच मी दिल्लीची सफर करा असा सल्ला देतो. त्यामुळेच दिल्लीच्या सौंदर्याची, पापाची, कमालीच्या सडकेपणाची, विजेत्यांच्या क्रौर्याची, जितांच्या नालायकीची आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जागृत माणसाला आपल्या संपूर्ण अशाश्वततेची जाणीव मनोमनी होईल.

दिल्लीवर राज्य करण्याची कोणाला इच्छा असेल तर त्याने तिचा प्रियकर बनून येऊ नये, तर तिला जिंकणारा म्हणून यावे. परकीयांनी 'विजय मिळवण्याचे युग आता किमान बराच काळ पावेतो तरी संपले आहे अशी मला आशा आणि विश्वास आहे. जनतेतच सत्तांतर होण्याचे युग सुरू झाले आहे. सांप्रत दिल्लीवर राज्य करणाऱ्या कॉंग्रेस पार्टीने आपली केंद्रकचेरी, दिल्ली ताब्यात आल्याची खात्री पटल्यानंतरच अलाहाबादेहून दिल्ली येथे आणली. कम्युनिस्ट आणि प्रजा सोशालिस्ट हे देखील तिला काबूत आणण्याच्या इच्छेने नव्हे तर प्रेमी बनूनच आले आहेत. त्यांनी आपल्या केंद्रकचेऱ्या या रोगग्रस्त सुंदर शहरात स्थापन केलेल्या आहेत. ते दिल्लीला जिंकू शकणार नाहीत उलट दिल्लीच त्यांना आपले टाळकुटे बनवील.

बगदाद, काहिरा येथे होते तसे किंवा लंडनमध्ये तत्त्वतः होऊ शकणारे कटकारस्थानांचे सत्तांतर दिल्लीला होऊ शकेल काय? मला फार शंका आहे. दिल्लीच्या या पापी शस्त्रागाराला एक लहानसे छिद्र पडले आहे; आणि जनतेचे भविष्यकालीन सौभाग्यही येथेच लिहिलेले आहे. हिंदुस्थान विशाल आहे. त्यातील प्रत्येक राज्य वाढत्या प्रमाणात संघटित, एकसंध, जागृत आणि जबाब-

दौर बनत जाईल. दिल्लीत हिंसक उलथापालथ झाली तर विविध राज्यातून सतत प्रतिकार होण्यात त्या उलथापार्थीचे पर्यवसान होईल अशी मला आशा वाटते. या परिस्थितीला काही अपवाद असू शकतील; पण तसे अपवाद निर्माण होऊ नयेत अशीच आशा कोणीही करील. अर्थातच दिल्लीकरांच्या कृतीला निर्णयात्मक महत्त्व आहे. या वेश्येच्या युगाचा अंत आता झाला आहे असे दिल्लीकर कधी ओळखतील बरे? त्यांनी या वेश्येपुढे झुकूही नये अथवा केवळ आपल्या किंवा आपल्या नेत्याच्याच ती पूर्ण अधीनही राखण्याचा त्यांनी प्रयत्न करू नये. त्याचप्रमाणे सरकार आणि सचीवालये यांच्याकडे मूलतः उपेक्षाभावाने त्यांनी पहावे. सरकारच्या चांगल्या कृतीचे समर्थन करावे, पण वाईट कृती घडली तर नाकावर ठोसा द्यावयास कमी करू नये. एवढे केले तरी पुरेसे आहे.

दुनियेच्या इतिहासातील सर्वात हृदयहीन वेश्येमध्ये दिल्लीचे अनेक कारणांनी रूपांतर झाले आहे. इतक्या मोठ्या कालावधीपर्यंत एका परकी आणि सामंती भाषेत जगातील दुसऱ्या कोठल्याहि राजधानीचा कारभार चालला नसेल. अरबी, फारसी, आणि इंग्रजी यांनी दिल्लीवर सत्ता गाजविली. या सर्व भाषा जनभाषा नव्हत्या, तर मूठभर राज्यकर्त्या सामंती लोकांच्या त्या भाषा होत्या. बहुदा या वारांगनेला जनतेपासून संपूर्णपणे काडीमोड घ्यावयाची असावी आणि म्हणूनच तिने आपले कामकाज जनतेला न कळणाऱ्या भाषेतून चालवले असावे. उर्दू या स्थानीय भाषेतील कारभार काहीकाळ चालला होता. पण उर्दूचा तो वापरही दुय्यम बाबींपुरताच मर्यादित होता. जनतेला मात्र या वेश्येपुढे नगारा वाजवून गुणगान करण्याव्यतिरिक्त अन्य काम नव्हते. काही एका प्रमाणात टोकियो व काहिरा यांनी दिल्लीप्रमाणेच जनतेपासून घटस्फोट घेतला आहे. पण त्यापैकी एकजण देखील तो घटस्फोट शाश्वत अथवा अपरिवर्तनीय होईल असे काही करू शकलेली नाही. कारण उघड आहे. विदेशी आणि सामंती भाषेचे लोखंडी चिलखत घालून यापैकीं कोणतीच राजधानी जनतेपासून आपणाला तोडू शकलेली नाही. पोलादी पडदा कोठे असेल तर तो येथे दिल्लींत आहे. या परकीय भाषेच्या पडद्याआड सुंदरतेचे आणि दुबळेपणाचे पाप वाढत चालले आहे. जनतेला केवळ कानगोष्टी आणि अफवा या मार्गानेच साऱ्या गोष्टी कळतात. जगाच्या पाठीवरील कोणतीच जनता, इतकेच काय पण आपल्या सहनशीलतेबद्दल कुप्रसिद्ध असलेली भारतीय जनता देखील, दिल्लीसारखा कलंक इतका काळपावेतो सहन करू शकणार नाही. परकी भाषेच्या सुरक्षित

पेंड्यामुळेच येथे हे शक्य झाले.

लंडन किंवा पॅरिस यांनी आपले महत्त्वाचे कामकाज जनतेला न कळणाऱ्या भाषेतून केले असते तर काय घडले असते याची कल्पना करा. जनतेला न कळणाऱ्या भाषेतून पॅरिस, बर्लिन किंवा लंडन आणि रोम यांनी आपली विश्व-विद्यालये, कोर्टकचेऱ्या, लोकसभा–विधानसभा यांच्या व्यवहार चालवला असता तर काय झाले असते याचीही कल्पना करा. धरून चालू या की दहा शतकांहूनही अधिक काळ अपरिचित भाषातून सतत व्यवहार चालूनही तेथील जनतेने बंड केले नसते. पण तसे घडते तर त्याही राजधान्यांचे रूपांतर वारांगनांमध्ये आणि तेथील जनतेचे रूपांतर तोंडपूजक भाटांमध्ये झाले असते. हिंदुस्थान-प्रमाणेच तेथील विश्वविद्यालये, कोर्टकचेऱ्या आणि लोकसभा–विधानसभा बेचव, निर्जीव राहिल्या असत्या. तेथील विद्वान, कलावंत, आणि गुणीजन प्रचलित राज्यकर्त्यांचे श्रेष्ठ हस्तक, सुसंस्कृत हस्तक कदाचित बनले असते. जन-तेच्या प्रचंड बहुसंख्येवर केवळ गोळीच्या जोरावर अल्पसंख्य मूठभर सामंती वर्गाने राज्य करणे अशक्य आहे. प्रजेमध्ये न्यूनगंडाची भावना जागृत करूनच त्यांना राज्यकारभार करणे शक्य होईल. मूठभर सामंती वर्गाला अपरिचित अशी भाषा हेच जनतेत हीन भावना पैदा करण्याचे सर्वश्रेष्ठ साधन होय. मग ती भाषा या देशांतील संस्कृत असो. कीं परदेशी इंग्रजी असो. भाषेपेक्षा देखील विशेष अशी भूषा आणि संस्कृती जनतेत आत्महीनता निर्माण करते. या वारांगनेने जनतेपासून घेतलेला घटस्फोट परिपूर्ण आहे. इतका परिपूर्ण आहे की परकीय राजवट संपल्यावर आणि लोकराज्य सुरू झाल्यावर देखील या वारांग-नेच्या दुर्गुणामुळे आणि दुराचारांतून प्रस्थापित राज्यकर्त्यांच्या दरबाऱ्यांचा– मूठभर स्थानिक अल्पसंख्याकाचा एक वर्ग उदयास आला आहे. हा एतद्देशीय मूठभरांचा वर्ग परकीय भाषेच्या संरक्षक पडद्यानें सुसज्ज आहे. त्यामुळेच या नायकिणीच्या पापी आणि मादक मुद्रेवर हास्याची आभा पसरली आहे.

ही नायकीण केवळ परकी भाषाच बोलत नाही तर तिने भूषा, भवन आणि भोजनाच्या परकीय पद्धती देखील आत्मसात केल्या आहेत. एतद्देशीय पद्धतींपेक्षा त्यापैकी काही पद्धती निश्चितच अधिक श्रेष्ठ आहेत. त्या केवळ आधुनिकच नाहीत तर चांगल्याही आहेत. पण त्यांच्या नावावर घडत असलेल्या कितीतरी बनावटी गोष्टी आधुनिकतेच्या नावाने चांगल्या समजल्या जात आहेत. भूमिगत गटारांची आधुनिक योजना चांगली आहे. पण कोट, टाय आणि शेरवाणी या गोष्टी मात्र हिंदुस्थानच्या दारिद्र्याचा आणि भूमीचा निस्संशयपणे अपमान

करणाऱ्या आहेत. पण या कसबिणीला त्याच आवडतात. जनतेपासून स्वतःला अलग राखणाऱ्या साऱ्याच गोष्टींचा तिला शौक आहे. जवळपास सर्व आधुनिक गोष्टी महागड्या आणि जनतेच्या आवाक्याबाहेरच्या आहेत, हे पाहून तर या नायकिणीला हर्षाच्या उकळ्या फुटतात. दारिद्र्य ज्यांच्या पांचवीला पुजलेले आहे असे जन्मदरिद्री लोक सध्याच्या जीवनमानपद्धतीप्रमाणे आधुनिक होणे शक्य नाही या गोष्टीचा तिला अत्यानंद होतो. बहुजनसमाज साहाजिकच अपरिहार्यपणे विलायती ढंगाच्या महालांबाहेर राहतो आणि आपल्या याच देशांतील परंतु विलायती पद्धतीच्या दरबाऱ्यांसह त्या आधुनिक महालांमध्ये ती रममाण होऊ शकते. आपल्या क्रीडाविलासाला ती देशाबद्दलचे पवित्र कर्तव्य असेही म्हणू शकते. देश आधुनिक बनवण्याच्या नावाने ती आपल्या खऱ्या पतीपासून–भारतीय जनतेपासून चैनीत दूर राहू शकते. आधुनिकतेच्या वेडापायी ती आणि तिचे दरबारी स्वार्थी आणि क्रूर होऊ शकतात आणि झालेही आहेत.

आशिया, आफ्रिका, आणि दक्षिण अमेरिकेच्या वकिलातींनी दिल्लीचे प्रचलित चारित्र्य आणि भवितव्य पाहून त्यापासून खपसे शिकण्याजोगे आहे. दिल्लीप्रमाणे त्यांची सरकारे जनतेपासून पूर्णतया दुरावलेली नाहीत. याचे कारण ते आपआपल्या भाषेतून कारभार करतात हे आहे. पण अविवेकी आणि महागड्या आधुनिकीकरणाच्या क्रौर्याचे ते देखील दिल्लीप्रमाणेच भक्ष्य बनलेले आहेत. दिल्लीचे भवितव्य पाहून ते धडा घेऊ शकत नाहीत काय ? आपआपल्या जनतेपासून फारकत न होऊ देणाऱ्या अशा बेगडी गोष्टी वगळून आधुनिकीकरण करण्याची योजना ते आखू शकणार नाहीत काय ? आराम करीत असताना अगदी कठोर आणि कुरुप दिसणारे पण काम करीत असताना सुहास्याने विनटलेले टोकियो मी पाहिले आहे. मी काहिराही पाहिले आहे. ते अगदी पॅरिसप्रमाणे नसले तरी किमान ब्रुसेल्सप्रमाणे आहे. अशा या ब्रुसेल्समध्ये आधुनिक वस्ती सोडल्यास उरलेल्या साऱ्या शहरात दुर्गंधी, धूळ, आणि दारिद्र्य आहे. अशाप्रकारची परस्परविसंगति आणि तणाव आरोग्यदायक नाहीत. ते टिकणारेही नाहीत.

दिल्ली आपली वेश्यावृत्ती सोडील काय ? जनतेबरोबर एकरूपता ती कधी साधू शकेल ? कोण जाणे ! इतिहासाने एकप्रकारचे दुर्भाग्यच तिच्या ललाटी लादलेले दिसते. पण तिच्या विश्वविद्यालयीन मुली, वेट्रेसेस, सुगृहिणी आणि तत्सम पुरुष हे मनात आणतील तर आपली विश्वविद्यालये, लोक सभा आणि कोर्टे यापासून त्यांना अलग राखणारा असा लोखंडी पडदा ते तोडू-फाडू शकतील.

वेश्येच्या आज्ञेने सामंती पोशाख घालणाऱ्या किंवा परकी इंग्रजी भाषा जाहीरपणे बोलणाऱ्या माणसाबद्दलचा घृणाभाव ते आपल्यात बाणवू शकतील. आणि तो निर्धारपूर्वक व्यक्तही करू शकतील. त्यांनी असे केले तर राजधानी बदलण्याची गरज शिल्लक राहाणार नाही.

● ● ●

# अथ योगानुशासनम्

आपल्याला लाहोर किल्ल्याच्या तुरुंगात आणून ठेवलेय याची मला बरेच दिवस कल्पना नव्हती. १९४२ चे उघड बंडाचे दिवस. युद्धसामुग्रीची नासधूस. काही ब्रिटिश आणि हिंदी अधिकाऱ्यांना लोकांनी मारून टाकलेले. उलट हजारो हिंदी देशभक्तांची ब्रिटिश सरकारने नाना तऱ्हांनी केलेली कत्तल आणि वर पसरलेल्या चित्रविचित्र अफवा. असे दिवस. लाहोर किल्ल्याविषयी तर कितीतरी अफवा पसरलेल्या होत्या. म्हणत होते की लाहोर किल्ल्यांत ब्रिटिश आपल्या सर्वांत भयंकर कैद्यांना आणून ठेवतात म्हणून. त्यांना छळण्यासाठी म्हणून सगळ्या जुन्यापान्या क्लृप्त्या वापरत होते आणि नवनव्या शोधून काढत होते. हे सगळे चालायचे, माहिती काढून घेण्यासाठी किंवा कुठल्यातरी गुन्ह्यात गुंतवून टाकण्यासाठी. लाहोर किल्ल्यांतल्या त्या सुरुवातीच्या दिवसांत आपण कुठे आहोत त्याची मला कल्पना नव्हती पण पुढ्यांत काय वाढून ठेवलेय त्याची पक्की कल्पना होती. आणि त्यावेळी जे काही काहूर उठले होते मनात ते आता मला नीटसे आठवतही नाही. पण सगळी भीती, हताशा, संताप आणि वैताग ह्यांच्यात एक कुतूहलाची रेषाही होती. आणखी अशावेळी कधीकधी अवतरणारा एक प्रकारचा टणकपणा. कधीकधी मी भलताच टणक, बधीर असा होऊन जातो. मागे एकदा एका इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर आम्ही



**गजलक्ष्मी**

बंगाल– इ. स. १८ वे शतक

काहीजण पुरते अडकून पडलो होतो. पोलिसांनी घराला गराडा घातला होता आणि तळमजल्यापासून वर त्यांनी झडती सुरू केली होती. आजूबाजूच्या सज्जांमधून लोकांची टोळकी गोळा झाली होती. एखाद्या आगीकडे किंवा रस्त्याच्या खेळाकडे बघायला जमतात तशी. काय झालेय ते कोणीतरी काहीसे मला सांगितले तेव्हाच कळले. माझ्याजवळ उपाय नव्हता. बाकीचे सगळे आपापसात बोलत होते—कांही क्लुप्त्या—सुटकेचे उपाय. मी सगळयांचे नीट ऐकत होतो. पण मी मात्र फत्तर बनून गेलो होतो. एक स्फोटक परिस्थिति आणि तिच्यांतून उद्‌भवणारी घटना यांच्या दरम्यानचे जे काही असते त्याला माझं शरीर अशा तऱ्हेने सामना देत असते की काय कोण जाणे ? अशाच तऱ्हेचा आणखी एक अनुभव. पणजी आणि मडगाव दरम्यानची गोव्यातली गाडी. मशीनगन्सच उपयोग होणार असल्याच्या अफवा प्रत्येक स्टेशनवर येत होत्या. त्यावेळीही हाच प्रकार. पण अशा ताणलेल्या स्थितीत कोणी फार काळ राहू शकत नाही. तुरुंगांत तर नाहीच. काही करायची संधीच नसते. छळ करतात त्या तुरुंगांतला ताण कोणाही कैद्याला काही करायला प्रवृत्त करणे शक्य नाही. काही करणे ही चीज मोकळ्या माणसांसाठी—कैद्यांसाठी नाही.

कोंदट आणि ओक्याबोक्या कोठड्या सोडल्या तर लाहोरचा तुरुंग तसा साधाच होता. तिथली ऑफिसे तर कुठल्याही वकिलाची किंवा कमिशन एजंटची असावीत तशी. हाल करायच्या साधनांचा कुठे मागमूसही नव्हता. पण त्या लोकांना—त्या हाल करणाऱ्या अधिकाऱ्यांना—त्यांची इलम चांगली माहीत होती. त्यांचा चांगला अनुभव होता की माणूस खचतो, पड खातो—जवळजवळ नेहमीच. त्याच्या मोक्याच्या जागेवर फक्त मारा करायला हवा—शरीराच्या, मनाच्या. आजूबाजूला कोणी मित्र नाहीत. कोणाशी बोलणे नाही, चालणे नाही की लिहिणे नाही. कागद, पेन्सिल काही काही देऊ नका. की थोड्याच वेळात त्याला वाटायला लागेल की आजूबाजूच्या जगाला आपल्या अस्तित्वाची खबर नाही की खंत नाही म्हणून. त्याला वाटायला लागेल की आता उरल्यासुरल्या आयुष्यात समोर येतील ते फक्त शत्रू—ते सुद्धा भाडोत्री.

माझा छळ सुरू झाला तो अगदी माफक प्रमाणात. सुरुवातीलाच मला भडकावून टाकायचा उद्देश नसेल. किंवा माझ्या स्वभावातल्या कुतूहलाला वाव मिळायचा असेल. हे कुतूहल कधीकधी फार धोका देते. माणसाला उगाच नको त्या संकटात टाकून जाते. पहिल्यापहिल्या दिवसात माझी कोठडी आणि ऑफिस यांच्यात माझ्या खूप चकरा व्हायच्या. आणि केव्हाही. काळवेळेचं बंधन नाही.

वेळ दिवसाची की रात्रीची याचीही त्यांना फिकीर नसायची. त्यांच्या ऑफिसात कधी थोडा वेळ तर कधी तासन्तास ते मला खुर्चीला खिळवून ठेवायचे. एखादाच शब्द—एखादं वाक्य पन्नासपन्नास शंभरशंभर वेळा उच्चारायचे. निरनिराळ्या आकाराच्या, वजनाच्या वेड्या हातात घालायचे. पहिल्यांदा माझ्या लक्षात आले नाही की माझ्यावर पहारा करणाऱ्या शिपायाचा कुठली बेडी ते निवडण्यात काही हात नाही म्हणून. हाल करायच्या सबंध योजनेचा हा वेडीप्रकार एक छोटासा भाग होता.

माझे हाल करायसाठी म्हणून मला झोपच घेऊ न द्यायला त्यांनी सुरुवात केली. सक्तीने जागेच ठेवायचे. हे म्हणजे काही फक्त अंथरुणावर पडू न देण्याइतके सोपे नव्हते. तसे तर काय माणूस खुर्चीत बसूनसुद्धा झोपेल. पण इथे तर डोळे सताड उघडेच ठेवावे लागायचे. नेहमीच्या जागेपणी पापण्या जेवढ्या काही लवतील तेवढीच फक्त उसंत. ह्यापेक्षा जास्त वेळ जर का डोळे मिटले की तो शिपाई हातकडीला जोराचा हिसडा द्यायचा किंवा माझे डोचके धरून चांगले बुसळायचा. ही जुलमाची जाग त्यांनी थोड्याथोड्या वेळाने अशी अंमलात आणली. सुरुवातीसुरुवातीला हा खेळ एक दिवस किंवा एक रात्र याच्या पलीकडे गेला नाही. ही वेळ हळूहळू त्यांनी लांबवली. मला एकदम भडकून द्यायचा त्यांचा विचार नसेल. आहे ह्या परिस्थितीची संवय करून द्यायचा विचार असेल. माझ्यातल्या कुतूहलाची त्यांना कल्पना असेल.

दुसऱ्या महिन्यांत ही जुलमाच्या जागेपणाची मर्यादा त्यांनी तीन दिवसांपर्यंत लांबवली. तिसऱ्या महिन्यात पाच दिवसांपर्यंत. तोवर शारीरिक विरोध करायची माझी उरली सुरली इच्छाशक्तीही खलास झाली. मला आठवतंय ते असे की ह्या चारेक महिन्यात फक्त दोनदाच माझा माझ्यावरचा ताबा उडाला. एकदा एक शिपाई सगळ्या राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या आणि माझ्या दोस्तांच्या नावाने शिव्या घालायला लागला. माझे पित्त खवळले होते पण तरी मी गप्प बसलो. मग त्याने गांधीजींचे पण नाव घ्यायला सुरुवात केली. 'चुप बस' असे मी बेंबीच्या देठापासून किंचाळलो. त्या किल्ल्यात आजूबाजूला कोणी मित्र नव्हते. माझ्या त्या ओरडण्याला काही अर्थ नव्हता. पण अशा वेळेला माणूस विचार करून थोडाच वागत असतो ? अविवेकाने शरीराचा ताबा घ्यावा हेही मला वाटतं निकोपपणाचंच लक्षण आहे. त्या शिपायाने खूप आरडाओरडा केला. खूप आदळआपट केली. जणू काय आता त्याच्या सगळ्यात भयंकर छळाला तो सुरुवात करणार आहे. पण नंतर अशा तऱ्हेचा शिवीगाळीचा प्रकार कधी

कोणी केला नाही.

दुसरी वेळ. खूप दिवस मला जागे ठेवले होते. चौथा की पाचवा दिवस. पहाटेचा चारचा सुमार. गरम गरम राखेत खुपसल्यासारखे डोके भणभणत होते. तो पोलीस टेबलावर काहीतरी जड आदळून ठाकठाक करत होता. किंवा जोरजोराने वेडेवाकडे आवाज करत होता. हे एकेक आवाज काळजाला झोंबत होते. हातोड्यासारखे, चाकूच्या तीक्ष्ण टोकासारखे. मी डोळे मिटले. पोलीस बोंबलला. मी डोळे मिटूनच ठेवले. तो खुर्चीवरनं उठला आणि अंगावर धावून आला. माझ्या आवाजात विलक्षण शांत निश्चय आला होता. तो अधिकारी माझ्याजवळ एकटाच होता. बाकीच्या शिपायांना त्यांनी जायला सांगितले होते. मी त्याला शांतपणाने म्हटले आपल्या अंगाला हात लावू नकोस. बरे व्हायचे नाही. साधारणपणे माझ्या अवतीभोवती बरेच पोलीस असायचे. कधी दोघेच असायचे. थोड्याथोड्या वेळाने त्यांची बदली व्हायची. दर चारचार तासांनी पोलीस बदलायचे. विश्रांति घ्यायसाठी म्हणून.

तर तो अधिकारी हादरलाच. त्यावेळेला माझी दशा ती काय होती! सतत जागत रहायच्या त्या दिवसात मी अन्न असे घेतच नव्हतो. सकाळी कपभर दूध. संध्याकाळी कपभर चहा. कधीकधी माझा छळ कमी व्हायचा. आणि कोठडीतल्या सांडपाण्याच्या गटारातूनच बाहेरून माझी थाळी आत सरकावली जायची. त्यावेळीही मी अन्न घ्यायचो नाही. अशी स्थिति. पण तो अधिकारी जाम थिरला. तो वेड्यासारखा मदतीसाठी ओरडायला लागला. चारपाच शिपाई आणि माझ्या कोठडीसमोर गस्त घालणारा बंदूकवाला शिपाई इतके सगळे धावत आले. त्यांनी खुर्चीवरनं मला उचललं आणि भिंतीशी उभं केलं, त्या अधिकाऱ्याला म्हटले तू ह्या किल्ल्यातला सगळ्यात भेकड आहेस. तशी तो पुन्हा अंगावर आला. नंतर मग मला कळलं की मी त्याला भेकड म्हट-ल्याचे किल्ल्यात सगळीकडे झाले म्हणून. कारण तो लेकाचा बाकीच्यांशी पण दादागिरी करायचा. मी परत डोळे मिटले. तिथल्या खरखरीत जाजमावरून त्याने मला फरफरफरफर ओढले. हे असे तासभर चालले असेल. माझे तळवे, खांदे खरचटून निघाले. पण आणखी विशेष काही झाले नाहीं. मला त्यानी अंधोळीला नेले आणि मग माझा छळ नेहमीसारखा सुरू झाला.

खूप वेळा वाटले की सुरवातीलाच जर आपण डोळे उघडे ठेवायला नकारच दिला असता तर काय झाले असते? जे काय झाले असते ते निश्चितपणे लौकर एकटाचे होऊन गेले असते. असे नाही तर तसे. पण मग एक नसते झाले.

माणसाच्या मनात डोकवायची संधी नसती मिळाली. माझा हट्टीपणा, कुतूहल आणि अभावितपणाने ब्रिटिश साम्राज्य यांनी ती मला दिली. सबंध परिस्थिती जशी होती तशी सांगतो आणि मग माझा अनुभव सांगतो.

माझ्यावरच्या अधिकाऱ्यांना माझ्यावर आलेल्या दरिद्री वैतागाला तडे कसे पाडावेत ते चांगले माहीत होते. कधी छळावे कधी स्तुती करावी. कधी तर ते मोठ्या भक्तीभावाने माझ्या पायावर हात ठेवायचे. हा तर एक अजब अनुभव होता. आधी तर इतका क्रूर छळ सहन करावयाचा आणि वर ही पाद-पूजा. ह्यामुळे कधीकधी मी नरम होऊन जायचा. पण मग एक भेसूर चित्र दिसायला लागायचे. असे वाटायचे की हळूहळू पण निश्चितपणे एक दिवस मी गटारातलं सांडपाणी पिणार. मी त्यांना सांगितले की आपण कायकाय केले ते तुम्हाला सांगू पण बाकीच्यांबद्दल माहिती देणे आपल्याच्याने व्हायचे नाही. माझ्यावर जो बडा अधिकारी होता त्याच्याच ताब्यात मागे भगतसिंगालाहि दिलं होतं म्हणे. देशावर झालेल्या अन्यायाचा भगतसिंगाने घातपात करून बदला घेतला होता. आणि ब्रिटिशांनी त्याला फासावर लटकावला. तर तो अधिकारी मला सांगायला लागला की शेवटी भगतसिंगदेखील बोलता झाला होता. मी विचारले किती वर्षांचा होता भगतसिंग ? तरुण होता माझ्यापेक्षा. तरुण माणसाला गोष्टी माफ करता येण्याजोग्या होत्या. ते समजू शकणारे होते. ती माफी मला नव्हती.

हा सगळा छळ चालू असताना ते पोलीस आणि मी एकमेकांशी बोलायच्या-सुद्धा मनस्थितीत नसायचो. पण छळ जरा कमी झाला की काहीबाही बोलणे निघायचे. माझ्यावरचा एक अधिकारी चांगला इतिहास घेऊन एम. ए. झालेला होता. आणि साध्या शिपायाचा आता इन्स्पेक्टर झाला होता. ह्या सगळ्यांचा त्याला चांगला गर्वहि होता आणि म्हणूनच तो चांगला क्रूरहि बनला होता. तर तो मला एकदा म्हणाला की येशू ख्रिस्त इंग्लिश भाषा बोलायचा म्हणून. एकदा माझा नेहमीसारखाच छळ चाललेला असतानाच बकर इद आली. त्याने छळ काही कमी केला नाही. पण संध्याकाळी त्याने काही फळे, अननस वगैरे आणले. वाटले असेल त्याला की त्याच्यासारखाच मी पण जन्मात कधी अननस कसा तो खाल्ला नसेल. तो एक चांगला रांगडा माणूस होता. मुळात मोठा चांगला. पण ही असली नोकरी आणि बढतीची हाव या गोष्टींनी सगळे बिघडवून टाकले होते. त्याची सगळ्यात एक वाईट खोड होती. कोंबड्या आणायच्या आणि पिंजऱ्यात गाठोडे करून ठेवायच्या किंवा नुसत्याच कपड्यात

गाठोडे करून ठेवायच्या. आणि हा पिंजरा किंवा गाठोडे तो माझ्यासमोर खुंटीला अडकवून ठेवायचा. ह्या सगळ्याची मला किती विलक्षण चीड होती हे त्याला कदाचित् माहीत नसेल. त्या कोंबड्या कधी ओरडायच्या, कधी जीवाच्या आकांताने फडफडाट करायच्या आणि शेवटी माना टाकून पडून रहायच्या. मरायची वाट पहात.

तो क्रूर एकांत आणि भयाण वैताग. कधीकधी मी भयंकर कावून जायचो. वाटायचे एखाद्या बिळात आपल्याला कोंडलेय आणि वरून लिपून टाकलेय. आजूबाजूला कोणी मित्र नाहीत. आपल्या अस्तित्वाचीदेखील कोणाला दखल नाही. माझी कोठडी आणि ऑफिस यांच्या दरम्यानच्या वाटेत एक जिना होता. त्याच्यावरून स्वतःला झोकून द्यायचा प्रयत्न केला. जमले नाही. वेडीला एक जोराचा हिसडा आणि वर एक शिवी इतकेच वाट्याला आले.

ऑफिसातल्या खिडकीतून मी एकदा काही पहारेकऱ्यांना एका हरणाशी खेळतांना पाहिले. साधासुधा खेळ नव्हता तो. विलक्षण आवेगाने ते हरण चौफेर उड्या मारत होते. असे वाटत होते की धडकत्या काळजाने ते काहीतरी हुंगू बघतेय, चाटू पहातेय, त्या पहारेकऱ्यांची चुंबने घेऊ बघतेय. इतक्या लांबून त्या हरणाचे डोळे खरेच हरणाच्या डोळ्यांपेक्षादेखील सुंदर दिसत होते. एका अधिकाऱ्याने मला सांगितले की ह्या शिपायांची ही नेहमीचीच खोड आहे. ते त्या हरणाला नेहमी पेटवतात आणि त्यांच्यापैकी काही जणांचा तर निव्वळ जगण्यावर असा विश्वास होता की माणूस आणि जनावर हा फरक देखील त्यांच्या खिजगणतीत नसायचा. पंजाब, सरहद्द प्रांत या बाजूचे ते क्रूर लोक होते. त्यांच्या आयुष्यांतल्या नित्याच्या गरजा ते अगदी आदिमानवाच्या जोशात भागवून घेत होते. आणि सामाजिक बाबतीत चांगले वाईट या गोष्टीच्या ते पलीकडे गेले होते. आपल्याच देशबांधवांवर तिथे दररोज होणाऱ्या छळाला आपण मदत करत आहोत ह्याची त्यांना जाणीव नव्हती. आणि जरी ती तशी असती तरी त्याची जबाबदारी म्हणून आपल्यावर आहे असे तर त्यांना नक्कीच वाटले नसते. पहिल्या दोनेक बंदूकवाल्या पहारेकऱ्यांपैकी कोणी माझ्याशी शब्द-देखील बोलला नव्हता. मी स्वतःला समजावले की आपण आपले भिंतीशीच बोलतोय. जेव्हां त्यांना कळले की हा काही फोडणार नाही कुठे, तेव्हा त्यांच्या-पैकी एकादोघांनी कानात पुटपुटत तुरुंगात आणखी कोणकोण आहेत त्यांची नावे सांगितली.

एक बंदूकवाला तर खराच चांगला होता. अगदी कधीकधीच जेव्हा तो

एकटाच माझ्याजवळ असायचा तेव्हा तो माझा जरा डोळा लागू द्यायचा. मध्यम वयाचा प्रेमळ माणूस. शेवटच्या शेवटच्या दिवसात तो असा कावला की त्यांतल्यात्यांत आगाऊ ऑफिसरवर खुशाल हल्ला कर म्हणून त्यानेच मला सांगितले. समाजबिमाज असले काही नव्हते त्यांना कळत. पण तरी साधी सरळ माणसे होती. पण आजूबाजूच्या त्या छळाच्या वातावरणांत रहावे लागून लागून त्यांची काळजे दगड बनून गेली होती. कधीकधी त्या मृत्यूच्या घरात मला मोठमोठ्या आणि उंच किंकाळ्या ऐकू यायच्या. साधारणपणे वातावरण स्तब्ध असायचे. एकदा मात्र एका जबरदस्त माणसाने उंच सुरात गायत्री मंत्र म्हणत अधिकाऱ्यांची वाट लाऊन टाकली होती. एरवी किल्ल्यांतले काम चोख, फारच चोख. चार महिने तुरुंगात काढूनसुद्धा मला छापील कागदाचे एक चिठोरेसुद्धा कधी मिळाले नव्हते. फक्त एकदाच. अधिकाऱ्यांनी कशी काय परवानगी दिली कोण जाणे. पण एक पहारेकरी मला वर्तमानपत्राच्या तुकड्यात बांधून थोडीशी साखर घेऊन आला. त्या कागदावरचे अक्षर उर्दू होते. एखाद्या जुन्यापुराण्या आलेखाचा अन्वय अर्थ लावावा तशा भक्तिभावाने मी तो कागद वाचला. कालिदास, शेक्सपियरवरचा तो लेख मी दोन तास नुसताच वाचला. त्याच्यात काय लिहिले होते ते नंतर डोक्यांत शिरले.

माझ्याजवळ दात घासायला टूथपेस्ट नव्हती. ब्रश नव्हता. लिंबाची काडीसुद्धा नव्हती. साबण, राखुंडी नाहीतर कोळशाची भुकी यांचाच उपयोग करावा लागायचा. सुरुवातीला तर मला आंघोळ करायचीसुद्धा परवानगी नव्हती. तेव्हा मी अन्नच घ्यायचे बंद केले. तशी ते नरमले. दहा मिनिटे आंघोळीसाठी म्हणून देण्यात आली. त्या छळाच्या ह्या एवढ्याच वेळात काय त्या माझ्या हातकड्या काढल्या जायच्या. ही अंघोळ म्हणजे अगदी निव्वळ आनंद आणि शारीरिक सुख असायचे. कधीकधी चोवीस तास झोपेशिवाय काढल्यानंतर अंघोळ करताना अंगातली सगळी आग हळूहळू निचरून जायची. पुढचे काही सांगायच्या आतच एक बजाऊन ठेवतो. नाहीतर ज्या गोष्टी माझ्यावर लादल्या गेल्या होत्या त्यांचाच कोणी पाठपुरावा करायचा. ह्या गोष्टी माझ्यावर लादल्या गेल्या नसत्या तर माझे दात इतक्या लौकर किडायला लागले नसते. आणि माझ्यामागे हृदयविकाराची काळजीही लागली नसती.

ही जुलमाची जाग त्यांनी जास्तीत जास्त लांबवली ती दहा रात्री आणि दहा दिवस इतकी. शेवटी नाकातोंडातून रक्त यायला लागले, नाकपुड्यांतून रक्ताच्या गुठळ्या साचून राहिल्या. बहुतेक ताप पण खूप चढला होता वाटते.

अधिकाऱ्यांनी मला कोठडीत नेले. जेलचा डॉक्टर म्हणाला सात दिवसांचा ताप आहे. सातव्या दिवशी बरे वाटेल म्हणाला. मजेत म्हणाला. देशांत काय धामधूम चालली आहे त्याची दखल नसल्यासारखा. पण त्याच्यात काहीच ओलावा नव्हता असं निश्चित म्हणता आले नसते. सातव्या दिवशी मला दुसऱ्या एका ऑफिसासारख्या ठिकाणी नेले. मोगलांचा सुप्रसिद्ध हत्तीखाना तो हाच. अनन्वित छळाच्या गोष्टी त्याच्याशी निगडित होऊन बसल्या होत्या. शिपायाने हलकेच सुचविले की अजून खूप हाल पुढे वाढून ठेवलेत. ह्यावेळेपर्यंत मी पुरता शांत होऊन गेलो असलो पाहिजे. पण ब्रिटिश सरकार तेवढ्यावरच थांबले.

सगळा तपशील आता इतक्या वर्षांनंतर कितीसा आठवणार? पण त्या अनुभवातले खास असे मनातून कधीच बाजूला झाले नाही. त्याच्याभोवती अनेक भावना, कल्पना यांचा गुंता होऊन बसलेला होता—काही रोज अनुभवल्या जायच्या काही अधेमधे. हा गुंता मोकळा करायला लागलो की तीन वेगवेगळ्या अवस्था दिसून येतात. पहिल्या अवस्थेत स्वातंत्र्याच्या लढ्याचे पुढचे बेत किंवा संघटनेच्या कामात झालेल्या चुकांच्या दुरुस्त्या. हे सगळे व्हायचे सकाळच्या वेळात. दुसरी अवस्था तत्त्वचिंतनाची, ब्रह्मांडाच्या आणि माणसाच्या नियतीच्या विचारांची. हे सगळे दुपारी किंवा संध्याकाळी. निव्वळ वैताग, दैना—भोवतालच्या रात्रीसारखी काळीकुट्ट—ती यायची मध्यरात्रीनंतर. दिवसभराच्या अनुभवाच्या ह्या तीन अवस्था. सूडाचे क्रूर विचारदेखील यायचे. हालहाल करायच्या अगदी नामी कल्पना मी शोधून काढल्या होत्या. कल्पनेतच मी हे सगळे प्रयोग ब्रिटन आणि हिंदुस्थानवर सत्ता गाजवणाऱ्यांवर करून पाहिले. हे असले विचार सकाळच्या तपशीलात यायचे की दुपारच्या ते आता नीटसं आठवत नाही. बहुतेक ते अधेमधेच यायचे. आता त्याच्यातलं सगळं आठवत नाही. पण एक पिंजरा—चाकावरून दोरीनं ओढून घ्यायचा वर आढ्याशी लोंबकळणारा. त्याच्यात अडकवलेल्या माणसाला जे काही म्हणून हवे असेल ते सगळे अगदी त्याच्या पुढ्यात पण आवाक्याच्या बाहेर असे ठेवायचे. आणखी शिवाय ह्या योजनेत जाळ, पाणी वगैरेचाही समावेश होताच.

एक योजना नीट आठवते. एक इलेक्ट्रॉनिक फॅक्टरी. शेवटच्या क्षणी नुसते एक बटण दाबायचे की तमाम देशातल्या सत्तेच्या ठिकऱ्या. ब्रिटिश सत्ता किंवा इतर कोणत्याही सत्तेचा त्याच्यापुढे निभाव लागला नसता. नवल वाटते. माझे सगळे विचार माणसाचा आत्मा, त्याची उत्स्फूर्तता यांच्याभोवतीच घोटाळत होते आणि नेमका त्यावेळीच असल्या ह्या योजनांचा तपशीलवार

सांगाडा मी तयार करत होतो. ज्या एका जबरदस्त भाराखाली मी सारखा वावरत होतो त्याचा आणि ह्याचा संबंध असणार.

अशीच आणखी एक योजना. जवळजवळ लाखभर चळवळे स्वयंसेवक. दहा खेड्याला एक असे. सगळ्या गोष्टींचे नीट प्राथमिक शिक्षण घेऊन तयार असलेले. स्वतःच्या डोक्याने काम रेटू शकणारे आणि तरी संघटनेच्या गाड्यात नीट बसलेले असे. थोडक्यात म्हणजे यातला प्रत्येकजण धैर्य, ज्ञान आणि कृतिपरायणता यात परिपूर्ण. व्यक्तीला म्हणून स्थान नसलेली संघटना आणि लाख लोक. तुरुंगातून बाहेर आल्यावर महात्मा गांधींच्या डोक्यातही असलेच काहीतरी घोळत होते हे ऐकल्यावर मला मजा वाटली. त्यांची योजनाही फलद्रप झाली नाहीच. मी निदान लाहोर किल्ल्यातल्या माझ्या योजना याच्या आधी कुठे बोलून तरी दाखवल्या नव्हत्या. पण आपल्या देशातल्या राजकीय पक्षांची अजून अनेक दिवस पैसा आणि माणूसबळ ह्या बाबतीतली परिस्थिती लक्षात घेतली तर ह्या असल्या योजनांना काहीं अर्थ नाही. पण गांधीजींचेसुद्धा असेच हाल होत होते का? शारीरिक नसतील. कारण ह्या असल्या हालहालातच तर माझ्या योजनाचा जन्म होता.

एक कल्पना होती प्रकाशनाची. हिंदुस्थानातल्या मुख्य मुख्य भाषांतून साप्ताहिक, मासिक वगैरे काढायची. त्यांतला दोनतृतीयांश असा भाग सगळीकडे सारखा. देशातल्या लोकांचे मन एकसंध करायसाठी; त्यांच्यात मूलभूत बदल करायसाठी म्हणून. ही कल्पना मग 'पोथीपत्रा'च्या स्वरूपात पुढे आली. कष्ट खप घेतले. निष्पन्न काही नाही. ह्या सगळ्यातून मला एकच सांगायचेय. ह्या योजना तयार करण्यात, या सूडाच्या योजनात (त्यात शारीरिक हाल नव्हते हे एक) तर ह्या योजना करत बसण्यातून मला सुख मिळायचे. कुणाच्या तरी भेटीची कल्पना करत बसताना किंवा एखाद्या आवडीच्या खायच्या गोष्टीची कल्पना करत बसताना मिळते तसे.

मध्यरात्रीची वेळ, विशेषतः दोननंतरची. तो मात्र नुस्ता वैताग—एकमुरी. ह्या वतागाची कधीकधी वेदना व्हायची. डोके सारखे भणभणायचे. दुखायचे. आतमधे दोननंतर उकाडा खूप वाढायचा—निदान मला तसे वाटायचे. पहाटेच्या घटकेपर्यंत हा उकाडा वाढतच जायचा. वाटायचे की डोके पेटलेय आणि त्यातून धूर निघतोय. एकदोनदा तर मला आठवते की मी डोक्यावर हात धरला वाफा निघताय का ते बघायला. ह्या दिव्यांतून कसा काय बाहेर पडलो माझं मलाच समजत नाही. कधी तर अगदी वाट बघायचो, आत्ता डोके फुटून

चिध्या होतायत.

रात्री दोनपासून पहाटेपर्यंतच्या वेळात ते पोलीस कधीकधी टेबलावर ठाक-ठाक करत बसायचे किंवा एकचएक प्रश्न सारखा विचारत बसायचे. एकंदर परिस्थितीची केविलवाणी जाणीव सतत होणे एवढंच काय ते माझ्या स्वाधीन होते. वाटायचे आता हे सगळे आणखी जास्त वेळ सहन होणार आहे का नाही. पुढच्या क्षणाला काय होईल. ह्या सगळ्यात थोडसे कुतूहल हें होतेच. दोन्ही गोष्टींचे—शरीराचे कायकाय हाल होतील याचे आणि त्या भाराखाली आपले मन खचणार तर नाही ना याचेही.

योग, त्यातल्या त्यात हठयोग हा कोणत्या हिंदी माणसाला ऐकून माहीत नाही? ते स्मशानातले आणि माणसाच्या कवट्यांचे प्रयोग. आणि ते वाटेल तितका वेळ जागे राहणे. लहानपणी वडिलांच्या तोंडून पंतजलींच्या योगसूत्रातले पहिले दोन मंत्र ऐकले होते.

**अथ योगानुशासनम्**
**योगश्चित्तवृत्तिनिरोध:**

कधी वाटायचे की मी मारून मुटकून हठयोग आचरतोय. इच्छाशक्ती कुठल्या दिशेने धावतेय आणि तिच्यावर आपल्याला ताबा मिळवता येतोय का नाही याचेहि एक कुतूहल होतेच. शरीराच्या हालामुळे जिवाचा वैताग व्हायचा. पण त्याच्याही मी मघाशी सांगितल्या तशा एकेक अवस्था होत्या.

पहाटेच्या पूर्वीची वेळ ही एक अवस्था. मी अडकून पडलेल्या माझ्या परिस्थितीवरून माझे लक्ष जरा उडायचे आणि समोरच्या किल्ल्याच्या रेषा, कंगोरे मी बघत बसायचो. पहाट कधीकधी खोटी असायची. त्याचा आणखीनच त्रास व्हायचा. कधीकधी फटफटायला फार वेळ लागायचा. वेळ अगदी अनंत वाटायची आणि मी त्या पहाटेवर चिडायचो. येत तर असायची पण इतकी हळूहळू. भिंतीची रेषा हलके अगदी हलके प्रकट व्हायची. स्वच्छ, सरळ, रेखीव, सुंदर.

निरनिराळ्या वेळच्या प्रकाशात गोष्टी बघितल्या आहेत. दिवसाचा भगभगीत प्रकाश, संध्याकाळचा उतरता प्रकाश आणि विशेष म्हणजे चांदणे. दिवसाचा प्रकाश सौंदर्य नाही खुलवत. तो अति दाखवून जातो. रेषान्‌रेषांचा तपशील नको इतका. संध्याकाळच्या उतरत्या प्रकाशात गोष्टी खुलतात तर खऱ्याच. पण हे खोटं, मावळगारं. सौंदर्य खरे खुलते ते चांदण्यात. चंद्रबिंब जितके म्हणून पूर्ण तितके ते सौंदर्य जास्त. प्राचीन हिंदुस्थानातल्या (आणि इतर

ठिकाणच्याही ) नववधु पूर्णचंद्राच्या हलक्या चांदण्यातच आपले रूप पहिल्या वेळेला प्रकट करतात ते उगाच का? चंद्र एकूणएक गोष्ट सौंदर्याने नाहून टाकतो. पण पहाटेचा प्रकाश जी शुभ्रता देतो ती वेगळीच. अगदी हलके हलके स्पष्ट होत जाणारी पहाटेची रेषा अजून काळीज असे हरखून टाकते!

मी अगदी खचायला लागलो होतो. त्रास असह्य वाटायला लागला होता. पण प्रत्येक वेळेला गटारातले सांडपाणी प्यायची कल्पना समोर यायची. अशा अनेक यातनांवर मात केल्यावर वेदना, त्यांची सुसह्यता, असह्यता याचा मी नीट विचार करायला लागलो. दुःख असह्य असते ह्या म्हणण्यातच काहीतरी चूक आहे. मी ते अनेकवेळा सहन केलेय आणि प्रत्येक वेळेला त्याच्यावर मात केलीय. मग ते दुःख असह्य कसले? असले असह्य दुःखाचे प्रकार जसजसे वाढत गेले तेव्हा लक्षात आले की प्रत्येक नवा अनुभव वाढत्यां दुःखाबरोबरच त्याच्यावर मात केल्यानंतर वाढती अशी शांतता घेऊन येतो. तेव्हा जीवात जीव आला. आणि मी बेधडक निष्कर्ष काढला की कुठलेच दुःख असह्य वगैरे नसतेच.

प्रत्येक वाढती यातना तिच्याबरोबरच वाढती शांतताही घेऊन येत नव्हती काय? शरीर अर्थातच निसर्गाचे नियम बदलू शकत नव्हते. त्याला वेदना सहन कराव्या लागत होत्या. त्याची नोंद घ्यावी लागत होती. अशा सहन करण्यालाही काहीएक मर्यादा असावी. मग शरीरच अस्तित्वात रहाणार नाही किंवा बधीर तरी होऊन जाईल. पण शारीरिक वेदना आणि त्याच्यापासून होणारा त्रास यावर जास्त जास्त शांतपणे मात करता येत होती. इच्छाशक्तीवर काबू ठेवता येत होता. शारीरिक त्रास सहन करून त्याच्या आधीन होऊन जाणे हे सहज होते. इच्छाशक्तीवर ताबा नसल्याचे ते लक्षण. इच्छाशक्तीवर काबू असेल तर शारीरिक त्रास सहन करून त्याला शांतपणे तोंड देता येईल—मरण येईपर्यंत किंवा शुद्ध जाईपर्यंत. ही शांतता येते कुठून ते मी पाहायला लागलो.

मी मागेच सांगितलेय की बऱ्याचवेळा ह्या यातना केवळ असह्य वाटायच्या. पण मी त्याच्यावर बरोबर मात करत होतो. इथेच एक गुपित होते. त्याचा संबंध काळाच्या किमयेशी होता. जे सुसह्य होते ते असह्य वाटत होते. कारण काळ ही गोष्टच नीट आवाक्यात आली नव्हती. तिथेच गडबड झाली होती. आणि काळासंबंधी चुकीची कल्पना दुरुस्त झाल्याबरोबर जे असह्य वाटत होते, ते सुसह्य होऊन गेले. वर्तमान नेहमीच सह्य होता. भविष्यकाळच तेवढा असह्य वाटायचा. प्रत्येक आघात, पुढचा आघात याहीपेक्षा भयंकर असेल

अशी कल्पना करून घ्यायचा. आलेले प्रत्येक दुःख सह्यच होते. येणाऱ्या दुःखाची कल्पनाच असह्य होती. जुलुमाच्या जागेच्या पहिल्यापहिल्या दिवसात पुढच्या क्षणाची मला भीती वाटायची. पण एकाएका अनुभवावरनं लक्षात आले की निघून गेलेले क्षण आणि चालू क्षण याची भीतीही नव्हती की असह्य दुःखही नव्हते. वेदनेसारखीच भीतीसुद्धा पुढच्या काळाबद्दची असते, चालू काळाबद्दलची नाही. आणि आपण तर काही भविष्यात जगत नसतो. भविष्याची फक्त कल्पना करत असतो. पण जगतो वर्तमानांतच. काळाची किमया ज्याने बघितली आहे त्याला वर्तमानाची भीती नाही. आणि म्हणूनच स्वतःवर ताबा असलेल्या माणसाला भीती नावाची चीज ठाऊक असणे संभवत नाही.

काळासंबंधीचे तत्त्वचिंतन काही नुसते अडाखे अंदाज नव्हते. उत्साह देणारे अनेक आशेचे प्रवाह पण त्यात होते. ह्या तत्त्वचिंनातूनच एक समजूत—एक ठाम अशी समजूत—तयार झाली. ह्या लाहोरच्या किल्ल्यात आपल्याला असे किती दिवस काढायचे आहेत याचा मी विचार करायला लागलो. जर अमुक काही दिवसांची अशी मला शिक्षा झाली असती तर ह्या असल्या विचारांना काही अर्थ होता. पण माझी तर बेमुदत कैद होती. आणि तरी मी किती दिवस इथे असा विचार करत होतो. ह्या विचारांचा संबंध नियतीशी होता.

नियतीचा संबंध नेहमी देव आणि दैवी शक्ती यांच्याशीच निगडित असतो असे नाही. जगभर लोक नियतीचा विचार करतात. नियती ही गोष्टच बराच समजुतीचा खेळ आहे. पण तरीदेखील नियतीचा काही भाग तरी नक्कीच समुदायाच्या आणि व्यक्तीच्याही इतिहासावर अवलंबून असतो. समुदायाच्या इतिहासाशी नियतीचा संबंध जास्त आहे. भूतकाळच भविष्याच्या गर्भातले बीज होऊन राहिलेला असतो. त्यामुळेच भविष्यवाणी करणे शक्य होते. पण इथे तर मी माझ्याच नियतीचा विचार करत होतो. नियतीच्या ह्या समजुतीमुळे माणूस जगातल्या आपल्या एकंदर दिवसांचा आणि त्यांच्या निरनिराळ्या अवस्थांचा विचार करत असतो. माझ्या नशिबी आलेल्या एकंदर काळात हा हालाचा काळ किती ह्याचा मी विचार करत होतो. कधी ना कधी हा काळ संपुष्टात येणारच. तो दिवस नजीक की दूर? तो दिवस नेमका कोणता आणि केव्हा ते नसेल मला सांगता येत, पण तरी तो होताच. म्हणजेच असे की हे हालाचे दिवस हळूहळू कमीच होत जाणार हे नक्की. असा आणखी एक दिवस गेला म्हणजे हालाच्या एकंदर काळात तेवढीच घट, ही एक ठाम आशा होती—कमी होत जाणाऱ्या हालाच्या काळाची. काळासंबंधीचे तत्त्वचिंतनही त्यांत

होतेच पण उत्साह देणारेच. भविष्यात आशा निश्चित होती.

तसेच असेही असेल की एखाद्याच्या नियतीत नुसता निराशेचा खेळच वाढून ठेवलेला असेल. तुरुंगातल्या ह्या हालांना काळाची नेमकी मर्यादा असली पाहिजे असे मी समजत होतो. पण ह्या तुरुंगात अमुक एक काळच कंठायचा आहे असे समजणे खरोखरच चुकीचे होते. हा काळ अनंत असण्याचीही शक्यता होती. म्हणजे माझ्या तुटपुंज्या आयुष्याच्या संदर्भात. जिवंत असेपर्यंत मी इथेच रहावे अशीही कदाचित् नियती असेल. मग एक एक दिवस कमी होत जाणे ह्या म्हणण्याला काही अर्थ नव्हता. तर एक एक दिवस एकासारखा एक असाच टळत रहाणार होता. ह्या कल्पनेप्रमाणे तर मग माझे आयुष्य आणि हे हालाचे दिवस दोन्ही एकदमच संपुष्टात येणार होते. भविष्यासंबंधीचे हे असले विचार काळीकुट्ट निराशा पदरात टाकायचे. पण मग काही दिवसांनी भविष्याच्या ह्या दोन्ही बाजूंचा मी विचार करायला लागलो.

जर आपल्या पुरत्या आयुष्यापेक्षा हे हालाचे दिवस कमीच असतील तर आशेला जागा आहे. पण जर हे दोन्ही एकदमच संपणार असेल तर मात्र निव्वळ वैतागच. पण आशा निराशा ह्यात मन आणि इच्छाशक्ती यांनी नेहमी घोटाळत रहावे यात काहीतरी गडबड आहे. त्याचवेळी एक असेही जाणवले की आपले अस्तित्वच संपून जाणे ही काही तितकी वाईट अशी गोष्ट नाही. खरे तर ती म्हणजे फुकट आशेतून, त्रासातून, दुःखातून कायमची सुटका. जी एक काळीकुट्ट निराशा वाटत होती तीच तर खरी सुटका होती. बेलगाम इच्छाशक्ती चालू क्षणाच्या कलानुसार कधी आशा बघत होती कधी निराशा. म्हणजेच असे की ह्या भविष्यकाळाच्या विचारात बरेच खाचखळगे होते. पण जर भविष्याविषयीची भीतीची भावना ही खोटी तर मग आशा, निराशा, हाव आणि शेवटची सुटका– मुक्ती ह्या गोष्टीदेखील खोट्याच.

लाहोर अनुभवाच्या आधीदेखील मला वाटायचे की क्षण हा अनंत आहे. पण ते आपले नुसते बोलणे. अनुभव असा नव्हे. अनुभव इतकाच की असे वाटायचे की वर्तमानात संपूर्णपणे बुडावे, जगावे–भूताचा, भविष्याचा फार असा विचार न करता. पण लाहोरच्या अनुभवानंतर चालू क्षण आणि आपले जीवन ह्या गोष्टींना माझ्यापुरता तरी खास अर्थ आला. तेव्हापासून माझे मीच बघतोय–, नेहमी भविष्यातल्या कशाची तरी आस धरून असतो—मग तो नुसता पुढचा क्षण का असेना. वर्तमानातले सुख नुसते पुरे पडत नाही. एखादी निदर्शनांची योजना किंवा कुणाच्यातरी केसावरून हात फिरवणे ह्या गोष्टींच्या

आधी आणि नंतर अनेक गोष्टींचे तपशील जोडलेले असतात. पण नियंत्रित इच्छाशक्ति भविष्यातल्या विचारांनी वर्तमान क्षणाचे सुख ढळू देणार नाही. भविष्याची वखवख न धरता पूर्ण आयुष्य जगणे ते हेच.

पण आयुष्य म्हणजे एक सुटी स्वतंत्र क्रिया किंवा घटना नव्हे. तो तर एक गुंता असतो, निरनिराळ्या घटनांचा. एकामागून एक घटना येत असतात. तसे नसेल तर आयुष्य नष्ट होईल. काळ थांबून बसेल. प्रेम, क्रांती सगळेच म्हणजे निरनिराळ्या घटनांची माळका. पुढच्या क्षणाची ज्याला जिज्ञासा नाही, हे सगळे ज्याने टाळलेय असा माणूस असेल, असू शकेल असे मला वाटतच नाही. सगळ्या इच्छाअपेक्षांना नको म्हणणे केवळ अशक्यच. ते इष्ट आहे का नाही तो भाग सोडा. आणि आयुष्य म्हणजे जर काळातल्या अनेक घटनांची माळका तर मन ह्या प्रत्येक घटनेची नोंद घेणारच, त्याचे अडाखेअंदाज बांधणारच. नियंत्रित इच्छाशक्ति ह्या काहीतरी हवे असण्यातली वखवख, हाव तरी काढून टाकील. वर्तमानातच इतके बुडून जाता येईल की भविष्याकडे अपेक्षेने बघताना हाव, वखवख ह्या गोष्टी रहाणार नाहीत.

पुन्हा तो लाहोरचा अनुभव. मी काळ बघितला होता. त्याच्या निरनिराळ्या रूपात—भीति, आशा, मुक्ति. वाटले की काळ असा समोर उभा आहे. एकेक वस्त्र उतरवतो आहे. दुसरे चढवतो आहे. पण नाही. हे काही खरे नाही. हे म्हणजे एखाद्या फॅन्सी ड्रेस बॉलसारखे. घोटाळ्यात पाडणारे. ही सगळी वस्त्रे फेकून दिलेला शुद्ध नागडा काळ मला बघायचा होता. फक्त दोनदाच मला वाटले मी जिंकलो. पण किती? क्षणाचा कितवा हिस्सा—मोजता येणार नाही इतका. मी काळ धरू शकलो नाही. माझे मन त्याला पकडेपर्यंत, माझी बोटे त्याला आवळीपर्यंत, तो निसटला. आणि निसटला. पण तरी मनात राहिलेच की काळाला थांब म्हणून फर्मावले. एका क्षणाच्या कोट्यांश इतका वेळ. आणि जेव्हा काळ माझ्या समोर उभा ठाकला स्वच्छ, शुभ्र वस्त्रासारखा. इतर सर्व काही टाकून. भीती आणि हाव आणि वैताग आणि मुक्ति. मी जगाचा राजा होतो. काळजी नाही, किरीट नाही. सगळी घाण लकाणा कचरा मी निपटून काढला होता. माझी आज्ञा सार्वभौम नव्हती. खरे तर आज्ञाहि नव्हती आणि तिचे उल्लंघनही नव्हते. माझी नियंत्रित इच्छा सार्वभौम होती. मी काळ बघितला होता. नुसता वर्तमानाच्या रूपात. शुद्ध, नीतळ. भूतकाळाची खेदखंत नाही, भविष्यकाळाची हाव नाही असा. मी जिंकलो होतो. किती? आठवणार पण नाही इतका थोडा वेळ. ह्या सगळ्यावरून कोणाला असे वाटेल की माझे मन,

माझी इच्छा स्वच्छ, नियंत्रित ठेवलेली आहेत. माझा असा मुळीच दावा नाही. पण ती आठवण सारखी मनात घोटाळते आहे. म्हणूनच कदाचित् महाकाळच्या जुन्या देवळाविषयी मला आकर्षण वाटत असेल. भारतीय तत्त्वज्ञान नेहमी ज्याच्या गोष्टी सांगते ते आरशासारखे नितळ स्वच्छ मन असणं शक्य आहे. भीती आणि हाव यांनी न डागळलेले मनच फक्त नीट विचार करू शकते. माझ्या राजकीय जीवनात, माझ्या बाकीच्याहि जीवनात माझी वर्तणूक अशी होती की नाही मला माहीत नाही. पण जर कोणी माझे ऐकणार असेल तर त्यांना मला सांगायचेय की स्वतःच्या इच्छेवर, मनावर जरा ताबा ठेवा. त्या मनाला वर्तमानातच राहू द्या. म्हणजे भीति आणि हाव या भविष्याशीच निगडीत असलेल्या गोष्टींचा त्याला स्पर्शही होणार नाही.

[ अनुवाद : रघू दंडवते ]

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

REFBK-0016622

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६६२

या संग्रहातील लोहियांचे काही लेख त्यांनी मुळात लिहिलेले आहेत तर काही लेख त्यांची अनेक ठिकाणी विखुरलेली भाषणे, स्फुट टिपणे यांवरून संकलित केलेले आहेत. हे सर्व लेखन १९५५ ते ६० या काळातील आहे. मूळ हिंदीत अथवा इंग्रजीत. ‘ जन ’ व ‘ मनकाईंड ’ या त्यांनीच संपादित केलेल्या मासिकात प्रकाशित झालेले. संपादन व अनुवाद : इंदुमति केळकर व श्रीपाद केळकर.



भारतीय कला आणि शिल्प
सर्व साधारणपणे अक्षांश रेखांश दाखविणारा तक्ता
अक्षांश १° = ७० मैल
रेखांश १° = ५५ मैल
श्रीनगर
तक्षिला
हडप्पा
कुरुक्षेत्र ठाणेश्वर
दिल्ली
फत्तेपूर सिक्री
ताम्रेश्व
मोहनजो दारो
जैसलमेर
मथुरा
आग्रा
लुंबिनी
कुशीनगर
काठमांडू
ओसिया
अजमेर
ग्वाल्हेर
स्फटिक शिला
मिर्झापुर
वैशाली
चित्तूर
दांतिया
खजुराव
कौसंबी
सारनाथ
गया नालंद पाटलीपुत्र
अबु देलवाडा
भोजपुरी
देवगढ
उज्जैन
विदिशा सांची
रका
बाघ मांडव
ताम्लुक
जुनागढ सोमनाथ
औरंगाबाद
पुरी
घारापुरी
कार्ले
वरंगळ
विजयपुरी
ऐहोले बदामी पट्टा दाकल
अमरावती
धारवाड
हंपी
वेलूर
हळेबीड श्रवण बेलगोळ
कांचीपुरम
महाबली पुरम
कुंबकोणम्
कला गुमलाइ
तिरुचिरापल्ली
मदुराई
तंजाउली
कन्या कुमारी